**<u>सभापतीस्थानी - माननीय उपसभापती</u>**

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.पद्माकर वळवी (लाभक्षेत्र विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा सन 2008-2009 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन 2007-2008 चा अकरावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.पद्माकर वळवी (कामगार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लातूर व उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लातूर यांचा सन 2008-2009 चा अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने जळगाव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगांव यांचा सन 2000-2001 चा वैधानिक लेखापरीक्षण व वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वैधानिक लेखापरीक्षण व वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने क्लिअरींग आणि फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळ (बृहन्मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यांकरिता) यांचा सन 2004-2005 चा चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.



श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दि खोका मेकींग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन 2006-2007 व 2007-2008 चा अनुक्रमे चौतीसावा व पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यांकरिता यांचा सन 2008-2009 चा अठ्ठाविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

. . . .अे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी "दि.20 जुलै 2009 रोजी सन 2010-11 या शैक्षणिक वर्षापासून सर्व प्रकारच्या नवीन शाळांना मान्यता देण्यासाठी सर्वमान्य स्वरुपाचा बृहत आराखडा तयार करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दहशतवाद्यांच्या टार्गेटवर अग्रभागी असलेल्या मुंबई, ठाणे येथील मॉल्स आणि गर्दीच्या ठिकाणी आगी लावून स्फोट घडविण्यासाठी स्फोटके आणि केमिकलचा साठा गुजराथमार्गे दहिसर ठाणे येथील चेकनाक्यामार्गे उपनगरात आणला गेल्याचा पोलिसांना नुकताच आलेला संशय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 या विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, दिवाकर रावते, किशनचंद तनवाणी, अनिल परब यांनी "वाशिम नगरपालिकेमध्ये नगररचना विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, 1996 चे कलम 37 व 127 अन्वये आरक्षण उठविण्यासंबंधी विविध बोगस ठराव मंजूर करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सिंधुदूर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेने वैज्ञानिक लेखा परीक्षण व नाबार्डला आढळलेल्या आर्थिक घोटाळयाच्या दोषाबाबत पूर्तता न करणे, त्यामुळे बँकेच्या बॅलन्सशीटमध्ये फायदा दाखवून ठेवीदारांची दिशाभूल केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अ अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड . . ..

**उपसभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर यांनी "राज्यातील अनुदानित शाळांचे वेतनेतर अनुदान गेल्या 6 वर्षापासून बंद करण्यात आले आहे व बंद केलेले वेतनेतर अनुदान सुरु करण्याचे शासनाने आश्वासन देऊनही अद्याप पूर्तता केली नसल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "ठाणे शहरातील राबोडी या संवेदनशील परिसरात दि. 17.3.2009 रोजी वा त्या सुमारास कार व रिक्षा यांच्या किरकोळ अपघातावरुन तंटा निर्माण होऊन त्याचें जातीय दंगलीत रुपांतर झालेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे यांनी "वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दि. 25 नोव्हेंबर, 2003 रोजीच्या शासन निर्णयानुसार सन 2003-04 या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रतीवर्षासाठी शिष्यवृत्ती स्वरुपात 50 हजार रुपये ते 1 लाख रुपये शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचे आदेश निर्गमित करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "रायगड जिल्ह्यातील रोहा शहरात दूषित पाण्यामुळे दि. 18 मार्च, 2010 रोजी सुमारे 75 जणांना काविळीची लागण झाली असून आणखी रुग्ण वाढण्याची भीती व्यक्त झाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

RDB/ KTG/ KGS/

**उपसभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "मुंबई येथील महानगरपालिकेच्या केईएम वैद्यकीय महाविद्यालयाला मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया यांनी अपुरा कर्मचारी वर्ग, शिक्षक वर्ग, अपुऱ्या शैक्षणिक सुविधा, रक्तपेढीचे अनुज्ञापन डिसेंबर, 2006 पासून नुतनीकरण करण्यात आलेले नसणे,याबाबत बंद करण्याची नोटीस बजावल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नियम 93 अन्वये आलेल्या इतर सूचनांना दालनात अनुमती नाकारलेली आहे. यानंतर औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, औचित्याचे मुद्दे लक्षवेधी सूचनेनंतर घ्यावेत अशी माझी विनंती आहे. आधी लक्षवेधी सूचना घ्याव्यात. कारण नंतर विधानसभा सभागृहामध्ये आमचे कामकाज आहे.

श्री. दिवाकर रावते : लक्षवेधी सूचनेनंतर औचित्याचे मुद्दे घ्यावेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, विधानसभा सभागृहामध्ये कामकाज आहे हा मुद्दा होऊ शकत नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय या सभागृहाला कमी लेखणार असतील तर ती बाब चुकीची आहे.

**उपसभापती** : आपण विधानसभा सभागृहामध्ये होता तोपर्यंत हे मान्य केले होते काय ?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आम्ही विधानसभा सभागृह आणि विधान परिषद सभागृह यांच्यामध्ये लहानमोठेपणा केलेला नाही.

**उपसभापती** : ठीक आहे. यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येतील.

---

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

**पृ. शी.** : मुंबई शहर व इतर परिसरात तीव्र पाणी टंचाई भासणे

**मु. शी.** : मुंबई शहर व इतर परिसरात तीव्र पाणी टंचाई भासणे यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, उल्हास पवार, मोहन जोशी, सय्यद जमा, भाई जगताप, संजय दत्त, सुभाष चव्हाण, चरणसिंग सप्रा, प्रतापसिंह माहिते-पाटील, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री राम पंडागळे, रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयप्रकाश छाजेड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई शहर व इतर परिसरात मोठया प्रमाणात तीव्र पाणी टंचाई भासणे, पाणी टंचाईमुळे स्थानिक रहिवाशांमध्ये वादविवाद होणे, तसेच मुंबईसाठी ज्या जलाशयांमधून जलवाहिन्यांमार्फत पाणी पुरवठा करण्यात येतो त्या जलवाहिन्या फार जुन्या झालेल्या असणे, मुंबईत एमएमआरडीए आणि एमएसआरडीसीतर्फे सुरु असलेल्या कामांसाठी खोदकाम करतांना बहुदा जलवाहिन्या फुटून पाणी वाया जाणे, काही जलवाहिन्यांमध्ये सांडपाणी गेल्याने पाणी प्रदूषित होणे, प्रदूषित पाण्यामुळे मुंबईमध्ये मलेरिया, विषमज्वर, काविळ इत्यादी साथींच्या रोगांचे प्रमाण वाढणे, परिणामी मुंबईतील नागरीकांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, सबब सदरहू जुन्या जलवाहिन्या तातडीने बदलण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 4 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/ 20.03.2010

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मुंबई हे देशातील अतिशय महत्वपूर्ण शहर आहे. या शहरामध्ये गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठा आणि ड्रेनेज सिस्टिममुळे नागरिकांच्या आरोग्याला प्रचंड धोका निर्माण झाला आहे. पाणीपुरवठ्यामध्ये नैसर्गिक पावसामुळे आलेली तूट आणि त्याहीपेक्षा महानगरपालिकेच्या बेजबाबदारपणामुळे मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या वेळोवेळी फुटून पाणी वाया जात आहे. एकीकडे पाण्याची तूट असताना दुसरीकडे महापालिकेच्या जलवाहिन्यांवर लक्ष ठेवण्याचे काम मुंबई महापालिकेने केलेले नसल्यामुळे पाण्याची तूट मुंबईमध्ये वाढत चाललेली आहे. या सगळ्या जलवाहिन्या ब्रिटीशकालीन आहेत तसेच त्यासोबत असलेल्या ड्रेनेज लाईन्स फुटल्यामुळे मुंबई शहरामध्ये रोगराई पसरण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या आठवड्यामध्ये वरळी येथील पाण्यामध्ये किडे आढळून आले. वरळी येथील लोकांनी तक्रारी केल्या तरी प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. मुंबई शहरामध्ये पाणीपुरवठ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दुर्दैवाने इतर गोष्टींकडे लक्ष देणारी मुंबई महानगरपालिका या मुंबई शहरातील सामान्य माणसांच्या पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाकडे आणि आरोग्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत आहे इतक्या गंभीर स्वरुपाचा हा प्रश्न आहे. या ब्रिटीशकालीन, 90 वर्षापूर्वी टाकलेल्या पाईपलाईन्स बदललेल्या नाहीत. त्या ठिकाणी धोका होऊ शकतो. या सभागृहाला अतिरेक्यांपासून धोका आहे अशा वेळी फुटलेल्या पाईलपाईन्सच्या ठिकाणी अतिरेक्यांनी काही गैरप्रकार करण्याचा प्रयत्न केला तर मुंबई शहराचे आरोग्य आणि मुंबईतील नागरिकांची सुरक्षा धोक्यात येणार आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड....

म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे की, या सगळया प्रश्नाकडे सरकार गांभीर्याने लक्ष घालून मुंबई महानगरपालिकेला योग्य निर्देश देऊन पाणी पुरवठयाची लाईन दुरुस्त करणार आहे की नाही ? राज्यातील अनेक ठिकाणी 50 टक्के नागरीकरण झालेले आहे. मग महानगरपालिकांचे क्षेत्र असेल किंवा नगरपालिकांचे क्षेत्र असेल. नागरीकरणाचे क्षेत्र वाढलेल्या या भागाला पाणी पुरवठा करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन मुंबई महानगरपालिका व इतर महानगरपालिका प्रशासनाला जाब विचारुन शासन काही उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, मुंबईतील रेसिडेन्शल झ ोनमध्ये 15 टक्के पाणी कपात करण्यात आलेली आहे आणि नॉन रेसिडेन्शल झोनमध्ये ती 30 टक्के आहे. मुंबईतील पाण्याचे संकट दूर करण्याच्या दृष्टीने लघुपाटबंधारे विभागाच्या अंतर्गत काय मदत करता येईल यादृष्टीने मध्यंतरी राज्याचे माननीय जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार यांनी एक बैठक घेतली होती. त्या बैठकीला मी स्वत: उपस्थित होतो. लघुपाटबंधारे विभागाच्या अंतर्गत अप्पर वैतरणा व भातसा ही दोन धरणे आहेत. त्यापैकी अप्पर वैतरणा धरणातून 51 एमसीएम पाणी व भातसा धरणातून 148 एमसीएम पाणी असे एकूण 199 एमसीएम पाणी मुंबई महानगरपालिकेला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नगरविकास खाते माननीय मुख्यमंत्र्यांकडे असल्यामुळे मुंबई महानगरपालिकेचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तात्काळ सोडवावा यासाठी एमएमआरडीएने धरणे बांधण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार 2 धरणाचे काम प्रगतीपथावर आहे. त्यापैकी मध्य वैतरणा हे धरण मुंबई महानगरपालिका स्वत: बांधत आहे, त्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्या धरणातून 450 एमएलडी इतके पाणी मिळणार आहे. दुसरे पिंजाळ धरण लघुपाटबंधारे विभागामार्फत बांधले जाणार आहे, त्याची निविदा काढलेली आहे, हे धरण 2012 मध्ये पूर्ण होईल. या धरणातून 865 एमएलडी पाणी मुंबईसाठी मिळणार आहे. मुंबईची वाढती लोकसंख्या व पाण्याची मागणी याचा विचार करुन महाराष्ट्र शासन यासाठी ठोस अशी पावले उचलत आहे. त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेने सुध्दा पुढाकार घेतलेला आहे.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK

श्री.भास्कर जाधव.....

सभापती महोदय, आता मुंबईतील पाणी पुरवठ्याच्या पाईप लाईन्सच्या लिकेजचा प्रश्न मोठया प्रमाणावर उभा राहिलेला आहे. ही पाईप लाईन 100 वर्षांपूर्वीची आहे. तानसा धरणाची लाईन 46 कि.मी.लांबीची असून फार जुनी लाईन आहे. मुंबई महानगरपालिका सातत्याने या लाईन्सचे लिकेज काढण्याचा आटोकाट प्रयन करीत आहे. मुंबई महानगरपालिकने आतापर्यंत 348 कि.मी.लांबीच्या वेगवेगळया मापाच्या जुन्या जलवाहिन्या बदलण्याचे व 263 कि.मी.लांबीच्या जलवाहिन्याचे पुनर्वसिकरण, मजबुतीकरण करण्याचे काम केलेले आहे. शिवाय 64 कि.मी.लांबीच्या जलवाहिन्या बदलण्याचे व 46 कि.मी.लांबीच्या जलवाहिन्या मजबुतीकरण, पुनर्वसिकरण करण्याचे काम सुरु केलेले आहे. या उपर मुंबई महानगरपालिकेच्या आवारात जवळजवळ 5,335 विहिरी आहेत. त्यामध्ये खाजगी व मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत. त्यापैकी 1,324 विहिरी महानगरपालिकेने अधिग्रहित केलेल्या आहेत. जवळपास 500 विहिरी साफ करुन त्यावर पंप बसविले आहेत, जाळया बसविल्या आहेत. त्याशिवाय 676 टँकरच्या फे-या महापालिकेमार्फत सुरु असून त्याद्वारे नागरिकांना पाणी देण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे. मुंबईला पाणी सुरळीतपणे होण्यासाठी हे सर्व प्रयत्न सुरु आहेत. अशाप्रकारे मुंबई शहराला भविष्यात पाणी मिळावे यासाठी शासन व मुंबई महानगरपालिका कार्यरत आहे.

सभापती महोदय, पाईप लाईन्सचे लिकेज सातत्याने झाल्यामुळे त्यातून रोगराई पसरते.

यानंतर श्री.ओटवणेकर......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने लक्ष देणे गरजेचे आहे, असा मुद्दा उपस्थित केला आहे. गेल्या तीन वर्षाची आकडेवारी पाहिली तर रोगराईचे प्रमाण हळूहळू कमी होत आहे, हे दिसून येते. तरी सुद्धा काविळ, गॅस्ट्रो, मलेरिया यांच्या साथी मुंबई महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या भागामध्ये सुरू असतात. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. याबाबत शासनाच्यावतीने सूचना देण्यात आल्या आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी विस्तृत असे विवेचन उत्तराच्या माध्यमातून आता केले आहे. त्यामुळे मी आपले लक्ष लेखी निवेदनातील पान क्रमांक दोन वरील तिसऱ्या परिच्छेदाकडे कडे वेधू इच्छितो. यात नमूद करण्यात आले आहे की, "झोनल कंत्राटदार तसेच गळती अन्वेषक पथकाच्या मदतीने शहरात पाणी वितरण व्यवस्थेतील गळती कमी करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील असून चालू वर्षात शहरात अंदाजे 3050 ठिकाणी गळती बंद करण्यात आलेली आहे." माझे फक्त दोनच मुख्य प्रश्न आहेत. ज्यावेळी जलसाठा नसतो, आणीबाणीचा प्रश्न निर्माण होतो त्यावेळी त्यावेळी धरणातील रेझर्व्हार वापर केला जातो. जुलैच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत मुंबईला पाणी पुरवठा होईल असा जल तज्ज्ञांचा कयास आहे. हे कितपत खरे आहे ? तसेच दोन धरणांमध्ये रेझर्व्हार किती आहे ? या विषयी मंत्रिमहोदयांकडे काय माहिती आहे. खरोखरच 25 जुलै पर्यंत पाण्याचा साठा पुरेल का ? 3050 ठिकाणी गळती बंद करण्यात आलेली आहे असा दावा केला आहे. अजूनही कित्येक पटीने जास्त गळती सुरू आहे. याबाबत राज्य शासन व मुंबई महानगरपालिका मिळून जलवाहिनी बदलण्यासंबंधी काही ठोस प्रयत्न करणार आहेत काय ? तसेच पाणी माफियांचा प्रश्न सुद्धा मोठा आहे. त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, धरणामध्ये ठराविक जलसाठा राखून ठेवला जातो त्यासंबंधीचा मुद्दा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केला आहे. पाऊस कमी पडल्यामुळे लोकांना पाणी मिळाले नाही तर राखून ठेवलेला साठा वापरण्यात येतो. राखून ठेवलेला पाण्याचा साठा हा धरण बांधतानाच राखून ठेवलेला असतो. परंतु, काही वर्षाने धरण गाळाने भरत जात असल्यामुळे राखून ठेवलेल्या पाण्याचा साठा कमी होतो. त्यामुळे आजच्या परिस्थितीचा विचार करता पाहिजे तेवढा साठा धरणामध्ये नाही. 15 जुलैपर्यंत अशीच परिस्थिती राहिली, पाऊस वेळेवर पडला नाही तरी 199 एमसीएम पाणी आपण दिलेले आहे. धरणातील पाण्याच्या परिस्थितीवर शासन नजर ठेवून आहे. तरी सुद्धा मुंबईतील नागरिकांना आपण पाणी देऊ शकू, या दृष्टीने शासनाने खबरदारी घेतली आहे. टॅन्कर माफियाचा सुळसुळाट सुरू झाला आहे, अशी चर्चा आहे. ही गोष्ट खरी आहे. मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. मुंबई महानगरपालिका व शासन यांना समन्वयाने काम करावे लागते. मुंबई महानगरपालिकेनला नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने योग्य त्या सूचना शासनातर्फे आजच देण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांचा तिसरा प्रश्न पाणी गळतीचा होता. वर्ष भरात शहरातील 3050 ठिकाणची गळती मुंबई महानगरपालिकेने बंद केली आहे. तरी सुद्धा सातत्याने गळती सुरू असते. त्याला वेगवेगळी कारणे आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या जुन्या झाल्या आहेत. एमएमआरडीए आणि एमएसआरडीसी यांच्यामार्फत वेगवेगळ्या प्रकाकरची कामे मुंबईत सुरू असतात. मुंबईत जलवाहिनी कुठे आहे याचा विचार न करता आपले काम लवकर करण्याच्या नादात जलवाहिनीला धक्का लागून त्यातून गळती होते. असा प्रकार होऊ नये म्हणून त्यांना लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत. या यंत्रणांनी काम सुरू करण्यापूर्वी मुंबई महानगरपालिकेच्या विभाग अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन जलवाहिनी कुठून गेलेली आहे यासंबंधी विचारणा करून कामास सुरूवात करावी अशा सूचना देखील दिल्या आहेत. ताडदेव येथील प्रकारण नजरेसमोर असल्यामुळे आम्ही योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. मुंबई महानगरपालिकेने जलवाहिनी बदलण्याचा आणखी एक प्रकल्प हातामध्ये घेतला आहे. यासाठी 1200 कोटी रूपये खर्च येणार येणार असून 2012 पर्यंत जलवाहिनी बदलण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे. महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासनसुद्धा याबाबत अधिकची मदत मुंबई महानगरपालिकेला करीत आहे.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : लक्षवेधीच्या निवेदनामध्ये मलेरिया पाण्यामुळे होत नाही असे जरी म्हटलेले असले तरी मलेरिया पाण्यामुळे देखील होतो हे मला माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.मध्यंतरी मुंबईतील वरळी भागामध्ये पाण्याच्या टाकीमध्ये किडे सापडले हे खरे आहे काय ? जीर्णावस्थेतील पाईप लाईन्स ह्या शंभर वर्षापूर्वीच्या असून त्या बदलण्याचे काम एमएमआरडीए आणि मुंबई महानगरपालिका 2012 पर्यन्त करणार आहे असेही निवेदनामध्ये म्हटलेले आहे. ह्या जुन्या पाईप लाईन्स बदलण्यासाठी कालबध्द कार्यक्रम हाती घेतलेला आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : मलेरिया दुषित पाण्यामुळे होत नाही असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे हे खरे आहे. दुषित पाण्यामुळे गॅस्ट्रो, कॉलरा या सारखे साथीचे रोग पसरतात. दुषित पाण्यामुळे मलेरिया होत नाही असे तांत्रिक स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे. त्यामधून वेगळा अर्थ काढण्याची आवश्यकता नाही. 1200 कोटी रुपये खर्च करुन 46 कि.मी. लांबीची पाईप लाईन वेळेत बदलली जाईल का, असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. ही पाईप लाईन 2012 पर्यन्त बदलण्याचा शासनाचा आणि महापालिकेचा प्रयत्न आहे. त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : एमएमआरडीए धरण बांधणार आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. एमएमआरडीए ही प्लॅनिंग करण्यासाठी नियुक्त केलेली संस्था आहे. मुंबई महापालिका आणि त्या परिसरातील आमच्या रायगड जिल्ह्यातील अर्ध्या गावातील जमिनी घेऊन तेथे धरण बांधण्याचे अधिकार एमएमआरडीएला दिलेले आहेत. म्हणजे एमएमआरडीए हे पॅरलल गव्हर्नमेंट निर्माण करण्यात आलेले आहे काय ? तेव्हा एमएमआरडीएला धरण बांधण्याचे जे काम शासनाने दिलेले आहे ते शासन रद्द करील काय ? एमएमआरडीएची कामे पायाभूत समिती समोर येत नाहीत, ती पायाभूत समितीसमोर यावीत यासाठी माननीय उच्च न्यायालयाने शासनावर ताशेरे ओढल्याचे वृत्तपत्रातून मी वाचलेले आहे. एमएमआरडीए हे पॅरलल गव्हर्नमेंट स्थापण्याचा शासनाचा विचार आहे काय ? मुंबई महानगरपालिकेला पर्याय म्हणून एमएमआरडीएची स्थापना केली आहे काय ? धरणे बांधणे हे एमएमआरडीएचे काम नाही. तेव्हा एमएमआरडीएला धरण बांधण्याचे काम दिलेले आहे ते शासन रद्द करील काय ?

==2==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

सभापती महोदय, याच प्रश्नाच्या अनुषंगाने मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, काल मी संध्याकाळी या सदनामध्ये उपस्थित नव्हतो. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांचा कोकणातील पाणी मुंबईमध्ये आणण्यासंबंधीचा अशासकीय ठराव होता. कोकणातील, चिपळूण मधील पाणी समुद्रामध्ये सोडले जाते. ते पाणी मुंबईला आणण्याच्या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी गेली 8 वर्षे सातत्याने या सभागृहामध्ये हा प्रश्न आम्ही उपस्थित करीत आहोत. माननीय राज्यमंत्री महोदय श्री. भास्कर जाधव हे कार्यक्षम मंत्री आहेत. धरणे बांधण्यासाठी आमच्या रायगड जिल्ह्यातील शेतक-यांच्या जमिनी घेतल्या जातात. तेव्हा कोकणातील, चिपळूण मधील वाया जाणारे पाणी मुंबईला आणण्याच्या संदर्भामध्ये शासन धोरणात्मक निर्णय घेईल काय ?

श्री. भास्कर जाधव : एमएमआरडीए हे समांतर सरकार निर्माण करण्यात येत आहे काय, असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. अशा प्रकारे कोणतेही काम एमएमआरडीए करु इच्छित नाही आणि करु शकत देखील नाही. शेवटी शासन हे शासन आहे आणि एमएमआरडीए ही एजन्सी आहे. त्यामुळे शासन ठरवून देईल तेवढीच कामे एमएमआरडीएला करण्याचे अधिकरार आहेत. सन्माननीय सदस्यांनी कोयना धरणाच्या टेल वॉटरचा उल्लेख केला. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आणि मी, आम्ही दोघे कोकणातील असल्यामुळे हा आमच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.

...नंतर श्री. पी.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ........

69 एमसीएस पाणी वाया जाते यासंबंधी अनेक वेळा, अनेक ठिकाणी चर्चा केली आणि हे पाणी प्रत्यक्ष मुंबईत आणणे हे आर्थिकदृष्टयाृ तांत्रिकदृष्ट्या तसेच भौगोलिकदृष्ट्या शक्य आहे काय याची पाहणी करण्याचे काम शासनाच्या वतीने करण्यात आले आहे. तुर्तास तरी हे पाणी स्वत:च्या खर्चातून मुंबईला आणणे परवडणारे नाही. म्हणून पाटबंधारे विभागामार्फत अशा प्रकारचा प्रयत्न केला गेला. यासाठी एक प्रायव्हेट एजन्सी सध्या पीपीए या नावाने ओळखली जाते त्या एजन्सीच्या माध्यमातून जर कोणी हे पाणी मुंबईत आणत असेल आणि नागरिकांना पिण्याच्या पाण्याऐवजी सर्व्हिस स्टेशन्स किंवा कन्स्ट्रक्शनसाठी खाजगीरित्या वापरता येईल असे पाणी देणे परवडेल काय यादृष्टीने टेंडर कॉल करण्यात आले होते परंतु त्याला अपेक्षित असा प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून सन्माननीय सदस्यांनी कोयनेचे पाणी मुंबईत आणणे शक्य आहे काय असा जो प्रश्न उपस्थित केला तर ते शासनाला शक्य नाही, हे या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांच्या मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मी ज्या भागात राहतो तेथे वॉर्ड ऑफिसरच नाही. तेथे असिस्टंट कमिशनर म्हणून कार्यरत आहेत. तेव्हा वॉर्ड ऑफिसर देणार की नाही हे मला माहीत नाही. तसेच मलेरियाच्या संदर्भात या ठिकाणी जे वक्तव्य करण्यात आले त्या अनुषंगाने मी मुद्दाम सांगू इच्छितो की, इमारतींवर जेवढ्या पाण्याच्या टाक्या आहेत त्या बंद केल्या नाहीत तर त्यामध्ये डास निर्माण होतात व त्यामुळे देखील मलेरिया होतो. म्हणून अशा रहिवासी इमारतींवरील टाक्यांची झाकणे बंद केली की नाही याची तपासणी करणारी खास यंत्रणा महापालिकेकडे आहे. ते प्रत्येक इमारतीत जाऊन टाकीवरील झाकण बंद केले नसेल तर कारवाई करतात. दुसरे म्हणजे एमएमआरडीएच्या संदर्भात सांगावयाचे तर माननीय मंत्री अजितदादा यांनी जे शासनाचे कौतूक करुन घेतले त्याला माझे ऑब्जेक्शन आहे. तानसा आणि भातसा धरणे झाली त्यावेळेस एमएमआरडीए ही एजन्सी अस्तित्वात देखील नव्हती. महानगरपालिकेने ही दोन्ही धरणे बांधलेली आहेत. या धरणातील पाणी आम्ही मुंबईला देणार अशा प्रकारे सांगून आम्ही मुंबईचे तारणहार असल्याचे दादा भासवितात हे चुकीचे आहे. ही धरणे महापालिकेने आपल्या पैशातून उभी केलेली आहेत. असे असताना दानशुराचे काम आपण करीत असल्याचे पटलावर आले ते मी जाणीवपूर्वक खोडून

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

काढतो. किंबहुना मुंबईचे पाणी आजपर्यंत शेतीच्या नावाखाली पळविले जात आहे ते थांबवा हे सांगण्याचे काम शासन म्हणून आपण करावे. त्यानंतर एमएमआरडीए धरणे बांधणार का या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री महोदय सांगतात की ती एक एजन्सी आहे. एक प्रकारे मुंबई महापालिकेवर आक्रमण करण्याचे काम आज ही एमएमआरडीए नावाची एजन्सी मोठ्या प्रमाणावर करीत आहे, हा काय वाह्यातपणा लावला? मुंबई महापालिका कायद्याप्रमाणे ती एक स्वायत्त संस्था आहे आणि त्या स्वायत्त संस्थेवर आक्रमण करण्याचा जो प्रकार सुरु आहे तो बरोबर नाही. आजपर्यंत या महापालिकेने जागतिक बँकेच्या कर्जामधून सक्षमतेने पाणीपुरवठ्याचे स्त्रोत उभे केले ते पुरेसे आहेत. कमी पडण्याचे कारण म्हणजे या शहरात येणारे लोंढे थांबवा. अशा प्रकारच्या लोंढ्यांमुळे मुंबईला तिच्या हक्काचे पाणी सुध्दा कमी पडत आहे. यासंदर्भातील माझे एक विधेयक सरकारने बेकायदेशीर रित्या अडवून ठेवले आहे, त्यावर मी नंतर बोलणारच आहे. परंतु मुंबईत येणाऱ्या लोंढ्यांमुळे खरे तर लोकांच्या हक्काचे पाणी पळविले जात आहे. अशा लोंढ्यांमुळे वाढणाऱ्या लोकसंख्येला जो पाणीपुरवठा कमी पडत आहे त्यासाठी धरणे बांधण्याची कुवत शासनाने दाखवावी आणि एमएमआरडीए धरणे बांधणार हा जो संदेश राज्याला आपण देत आहात तो ताबडतोब थांबवावा. एमएमआरडीएच्या माध्यमातून अलिबागपर्यंत चार पदरी रस्ता बांधण्यात येत आहे. अशा प्रकारे रस्ते बांधण्याचा या एजन्सीचा काय संबंध आहे ? या वाढीव क्षेत्रासाठी पुन्हा पाणी देणार की मुंबईला पुरविणार हा प्रश्न त्यातून निर्माण होतो म्हणून अशा वेगळ्या प्रकारचा जो संदेश आहे तो चुकीचा आहे. जर मुंबई महानगरपालिकेला राज्यशासन, केंद्रशासन आणि जागतिक बँकेच्या माध्यमातून पतपुरवठा केला तर महापालिकाच अशी धरणे बांधण्यासाठी सक्षम आहे, त्याला एमएमआरडीएची गरज नाही. त्याचप्रमाणे पाणी टंचाईच्या परिस्थितीत वास्तविक ज्या गृहनिर्माण संस्थांनी आपापल्या सोसायटीत विहिरी किंवा बोअरवेल खोदलेल्या आहेत त्यातून पाणीपुरवठा झाला तर ते 2/3 पाणी देखील मुंबई महापालिकेचे वाचणार आहे.

यानंतर श्री. खर्चे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KTG/ KGS/ 10:30

श्री.दिवाकर रावते........ लक्षवेधी सूचना क्रमांक-1...

त्याबाबतीत आपण सवलती देणार का? देणार असल्यास तेथील रहिवाशांना कोणत्या स्वरुपाच्या सवलती दिल्या जातील? ती सवलत कराच्या स्वरुपात असेल की आणखी कोणत्या स्वरुपात असेल हे मंत्रीमहोदयांनी स्पष्टपणे सांगावे.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, माझ्या शासनाचे धोरण असे आहे की, सत्ता कोणाची यापेक्षा या राज्यातील प्रत्येक नागरिक आमचा आहे हे शासनाचे धोरण आहे. खरे तर मुंबई महानगरपालिका सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या पक्षाच्या ताब्यात आहे. मी बिलकूल याविषयी पक्षीय बोललो नाही. मी फक्त सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार यांचे नाव घेतल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आक्षेप घेतला..........

श्री.दिवाकर रावते : तुम्ही सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार यांचे कौतुक करण्याची गरज काय होती?

श्री.भास्कर जाधव : मी तुम्हाला डिस्टर्ब केलेले नाही. आता माझे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल. सन्माननीय सभापती महोदय, जी बैठक झाली ती झाली की नाही हे आपण तपासून बघावे. बैठक झाली. त्या बैठकीला मी स्वत: आणि महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते. म्हणून आम्ही सांगितले की, 199 एमसीएम पाणी दिले. त्याचा स्वत: मी याठिकाणी उल्लेख केला.

श्री.दिवाकर रावते : आम्ही कोण देणारे?

श्री.भास्कर जाधव : आम्ही म्हणजे शासन. हे धरण लघुपाटबंधारे विभागाच्या ताब्यात आहे. सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी हे पाणी दिले ही वस्तुस्थिती खरी आहे. केवळ रोज वृत्तपत्रात बातमी द्यायची, इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या माध्यमातून जाहीर करायचे, मात्र उपाय सांगायचा नाही. आरोप करायचे, टीका करायची, उपाय का सांगितला नाही? फक्त आरोप करता येतो. मागणी करता येते. बोलता येते. टीका करता येते. बोट दाखविता येते....(अडथळा)...

**उपसभापती** : प्रश्न मुंबई शहराच्या पाणीपुरवठ्याचा आहे. त्या प्रश्नावर बोलण्याऐवजी राजकीय स्वरुपाची विधाने केली जात आहेत. माझी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना व मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, मूळ प्रश्नाशी संबंधित अशा प्रकारची वक्तव्ये करावीत. जेणेकरुन मूळ प्रश्नाला न्याय मिळू शकेल.

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1...

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, माझी आपल्याला हीच विनंती होती की, आपण त्याच वेळेला सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना समज देण्याची आवश्यकता होती. त्यांनी "वाह्यात" शब्द वापरला. वाटेल ते बोलायचे. माननीय सदस्य डॉ.दिपक सावंत यांना धन्यवाद दिले पाहिजेत. त्यांनी कबूल केले की, मुंबई महानगरपालिका कितीही ठिगळ लावले तरी काम पूर्ण करु शकत नाही. टँकर माफीया हेच बोलले. टँकर माफीया कोण चालवितात? प्रशासन तुमच्या ताब्यात आहे. महानगरपालिका तुमच्या ताब्यात आहे. ही माफीयादारी किती दिवस करणार तुम्ही. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी एमएमआरडीए आणि धरणाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. मी त्यांना असे म्हणालो की, पहिल्यांदा एका धरणाचे टेंडर हे लघुपाटबंधारे विभागाने काढले.....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय मंत्रीमहोदय म्हणाले की, माफीयादारी किती दिवस करणार तुम्ही. हे वक्तव्य कृपा करुन कामकाजातून वगळण्यात यावे. आपण रेकॉर्ड तपासून पहावे. चुकीचे रेकॉर्डवर राहू नये एवढीच माझी विनंती आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विनंती केल्याप्रमाणे "माफीया" हा शब्द कामकाजातून वगळण्यात येईल. यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या वक्तव्यातील "वाह्यात" हा शब्द देखील कामकाजातून वगळण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेला भविष्यामध्ये पाण्याच्या संकटाला सामोरे जायला लागू नये म्हणून पिंजाळ आणि बारई ही धरणे लघुपाटबंधारे विभागामार्फत आणि मध्य वैतरणा धरण महानगरपालिकेच्या वतीने बांधले जाणार आहे. त्याचे टेंडर झालेले नाही. म्हणून पाण्याचा प्रश्न भविष्यात सोडविण्याच्या दृष्टीने महानगरपालिका विचार करेल. दुसरा प्रश्न एमएमआरडीएबद्दल उपस्थित केला केला. शासन त्यांना परवानगी देते. कोणते काम करावे आणि कोणते काम करु नये.............

(नंतर श्री.भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

म्हणून त्याठिकाणी रस्ते हवे असतील तर त्यासंदर्भातील कामे करण्याचा निर्णय शासनाचा झालेला आहे. यावर्षाचे एमएमआरडीएचे बजेट 6142 कोटी रुपयांचे मांडले गेले आहे. त्यामध्ये एमएमआरडीएने काही धरणे बांधावीत काय असा विचार समोर आला म्हणून मी असे म्हणालो की, एक धरण लघु पाटबंधारे विभागामार्फत, एक धरण मुंबई महानगरपालिकेमार्फत बांधले जावे असा शब्द प्रयोग मी केला होता ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे त्यादृष्टीने निश्चितपणे विचार केला जात आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी असा प्रश्न उपस्थित केला होता की, इमारतीच्या वर ज्या स्टोअर टँक आहेत त्यावर झाकणे नसल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात वाढतो व त्यामुळे मलेरिया होऊन लोक आजारी पडताता. यासंदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही परंतु पाण्याच्या टाकीवर झाकणे टाकण्याचे काम तात्काळ महानगरपालिकेला सांगण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी बोअरच्या संदर्भात तसेच विहिरींच्या संदर्भातील विषय या ठिकाणी उपस्थित केलेला आहे त्यामुळे मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये मुंबई महानगर पालिकेच्या तसेच खाजगी अशा एकूण 5143 विहिरी आहेत. यातील 1301 विहिरी मुंबई महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घेतलेल्या आहेत. 1324 आणि 501 विहिरी या पूर्णपणे साफ झालेल्या आहेत. एखाद्या सोसायटीने बोअर केला किंवा विहीर खोदली तर संबंधित सोसायटीला काही कन्सेशन देण्यात येईल का असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. परंतु या प्रश्नाच्या संदर्भातील माहिती आता माझ्याकडे नाही परंतु याबाबत सुध्दा निश्चितपणे सहानुभुतीने विचार केला जाईल.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मुंबईतील पिण्याच्या पाण्याचा महत्वाचा विषय या ठिकाणी उपस्थित झालेला आहे. मी आपल्या मार्फत शासनाला विचारु इच्छितो की, मुंबई महानगरपालिका ही आशिया खंडातील सर्वात मोठी महानगरपालिका आहे. मुंबईतून प्रती वर्षी 90 हजार कोटी रुपयांचा महसूल केंद्र सरकारला जात असतो परंतु मुंबईच्या विकासासाठी केंद्राकडून किती निधी येतो हा महत्वाचा प्रश्न आहे. या 90 हजार कोटी रुपयांतून संपूर्ण देशाचा विकास होतो पण ज्या मुंबईतून केंद्रसरकारला 90 हजार कोटी रुपयांचा महसूल जात असतांना मुंबईतील

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

जनता आज पाण्यावाचून तडफडत आहे. म्हणून मला शासनाला विचारावयाचे आहे की, केंद्रसरकारला मुंबईतून जो 90 हजार कोटी रुपयांचा निधी जातो त्यातील किमान 10 हजार कोटी रुपये निधी मुंबईच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकार केंद्रसरकारकडून आणणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जो प्रश्न विचारला आहे तो प्रश्न मूळ प्रश्नाशी निगडित नाही. आपण सर्वजण म्हणत असतो की, मुंबई ही केंद्रसरकारला 90 हजार कोटी रुपयांचा महसूल दर वर्षी देत असते. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे ही वस्तुस्थिती आहे. मुंबई जर केंद्राला एवढया मोठया प्रमाणात महसूल देत असेल तर त्या प्रमाणात मुंबईला निधी मिळाला पाहिजे अशी अपेक्षा केवळ एका सन्माननीय सदस्यांची नाही तर ही अपेक्षा सर्व महाराष्ट्रातील जनतेची आहे. परंतु एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे की, मुंबई ही केवळ महाराष्ट्राची राजधानी नाही तर मुंबई ही संपूर्ण देशाची आर्थिक राजधानी आहे हे आपल्याला विसरुन चालणार नाही. मुंबईमध्ये देशातील अनेक व्यवसाय येत असतात त्यामुळे मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईतून केंद्रसरकारला जो महसूल जातो तो महसूल केवळ मुंबईला मिळणार नाही त्याचा लाभ संपूर्ण देशाला मिळाला पाहिजे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, केंद्रसरकारकडून मुंबईला अधिक निधी मिळवून देण्याची जबाबदारी काँग्रेस शासनाची आहे की, नाही?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 10:40

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, धारावीच्या झोपडपट्टीची सुधारणा करणे, एम.एम.आर.डी.ए.चा मेट्रो रेल प्रकल्प आणि जे.एन.यु.आर.एम. या योजना केन्द्र सरकारच्या आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांना ते कधी समजणार आहे ? हा विषय अभ्यास करण्याचा असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांची अडचण होत आहे.

श्री.रामदास कदम :माझ्या प्रश्नाला उत्तर मिळत नाही.

( गोंधळ )

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,शासनाचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात )

**उपसभापती** : यानंतर दुसरी लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, मुंबई शहराच्या पाणीपुरवठयाच्या संदर्भातील लक्षवेधी सूचनेवर माझे नाव असून मला त्यासंबंधी एक प्रश्न विचारावयाचा आहे.परतु मला संधी मिळाली नाही. त्यामुळे माझ्यावर अन्याय झाला आहे.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

**उपसभापती** : अशा प्रकारे जर सभागृहाचे कामकाज आपण करणार असाल तर मी सभागृहाचे कामकाज आताच तहकूब करीन. या लक्षवेधी सूचनेवर आतापर्यत अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले आहेत. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री राम पंडागळे यांना प्रश्न विचारण्याची मी परवानगी देणार होतो परंतु दरम्यानच्या काळात सभागृहात गोंधळ सुरु झाला होता. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली नाही म्हणून त्यांच्यावर अन्याय झाला नाही. तर सभागृहातील इतर सन्माननीय सदस्यांनी गोंधळ घातल्यामुळे अन्याय झ ाला आहे. मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देण्याचा प्रयत्न करतो. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे हे मुंबईतील आहेत हे मला माहीत आहे.त्यामुळे त्यांना यासंबंधीचा प्रश्न विचारावयाचा आहे तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनासुध्दा या लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारावयाचा आहे हे मला माहीत आहे.

श्री.राम पंडागळे : या लक्षवेधी सूचनेवर माझे नाव आहे.

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना देणा-या सर्वच सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली जात नाही परंतु या लक्षवेधी सूचनेवर सन्माननीय सदस्य श्री राम पडांगळे यांना

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

त्याचबरोबर सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांना प्रश्न विचारण्याची संधी देणार होतो. परतु सभागृहात गोंधळ सुरु असल्यामुळे मला पुढची लक्षवेधी सूचना पुकारावी लागली.

श्री.राम पडांगळे : त्यामध्ये माझा काही दोष नाही.

**उपसभापती** : त्यात आपला काहीही दोष नाही. सदनातील ज्या सन्माननीय सदस्यांनी गोंधळ घातला होता त्यांचा दोष आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

**पृ.शी.**: औरंगाबाद शहरात एल.पी.जी.गॅसवर चालणा-या वाहनांमध्ये घरगुती गॅसचा होत असलेला गैरवापर

**मु.शी.** : औरंगाबाद शहरात एल.पी.जी.गॅसवर चालणा-या वाहनामध्ये घरगुती गॅसचा होत असलेला गैरवापर यासबंधी सर्वश्री श्री किसनचंद तनवाणी, दिवाकर रावते,डॉ.नीलम गो-हे सर्वश्री प्रतापसिंह मोहिते पाटील,संजय दत्त, प्रा.सुरेश नवले, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. किसनचंद तनवाणी : (औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था ):सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनती करतो.

"औरंगाबाद शहरात मोठया प्रमाणात एल.पी.जी. गॅसवर चालणा-या वाहनामध्ये सर्रासपणे घरगुती गॅस भरुन दिला जात असल्याची धक्कादायक माहिती फेब्रुवारी 2010 च्या सुमारास निदर्शनास येणे, यातील बहुतांश अवैध केन्द्र नागरी वस्तीमध्ये कार्यरत असल्यामुळे जीवितहानी व वित्तहानी होण्याची शक्यता निर्माण होणे, या प्रकरणी शासनाकडून होणारे दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरिकामध्ये शासनाच्या विरुध्द पसरलेला तीव्र असंतोष, या प्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका "

श्री.अनिल देशमुख ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.किसनचंद तनवाणी : सभापती महोदय, या निवेदनामध्ये माननीय मत्रिमहोदयांना काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : नाही.

श्री.किसनचंद तनवाणी : सभापती महोदय, या निवेदनात असे म्हटलेले आहे की, " वाहनामध्ये एलपीजी गॅस कीट बसविण्यासाठी परिवहन विभागाची मान्यता घ्यावी लागते." माझा माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, शहरातील सामान्य माणसांना घरगुती गॅस सिलेंडर मिळत नाही व तो गॅस वाहनासाठी वापरला जातो परतु त्याबंधी शासन कोणतीही ठोस कारवाई करीत नाही. या संदर्भात एक समिती नेमण्यात आली असून त्यामध्ये पुरवठा विभाग, गृह विभाग, परिवहन विभागाचे अधिकारी आहेत या समितीने आतापर्यंत किती जणांविरुध्द कारवाई केली आहे आणि किती लोकांच्याविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, घरगुती गॅसचा वापर वाहनासाठी मोठया प्रमाणावर केला जातो यासबंधी लक्षवेधी सूचना मांडण्यात आली असून काही शहरामध्ये अशा प्रकारे घरगुती गॅसचा वापर वाहनामध्ये केला जातो. औरंगाबाद शहरासंबंधी ही लक्षवेधी सूचना मांडण्यात आली असून औरांगाबाद शहरातील पोलीस ,परिवहन विभागाचे अधिकारी , गॅस कंपनीचे अधिकारी यांचे एक पथक मागच्या फेब्रुवारी महिन्यात तयार करण्यात आले होते आणि त्याच्या मार्फत जवळजवळ 77 हॉटेल्समध्ये तपासणी करण्यात आली होती. त्यामध्ये घरगुती वापराचे 9 सिलेडर्स आढळून आले असून त्यासंबधी पाच गुन्हे दाखल करण्यात आले होते. तसेच 16 धाबे आणि 50 वाहनाची तपासणी करण्यात आली होती . त्या वाहनामध्ये घरगुती गॅस सिलेडरचा वापर केल्याचे आढळून आले नाही. घरगुती गॅसचा वापर जर एखाद्या वाहनामध्ये करण्यात येत असेल तर आपण ते वाहन आपण पकडू शकतो.

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख....

माननीय सदस्यांच्या प्रश्नाचा रोख असा आहे की, अनेक ठिकाणी अवैध केंद्रे आहेत त्याठिकाणी डॉमेस्टिक सिलेंडरमधून कमर्शिअल सिलेंडरमध्ये गॅस ट्रान्सफर केला जातो. तशाप्रकारे लक्षवेधी सूचनेमध्ये म्हटले आहे. त्याकरिता पथकाच्या माध्यमातून तपासणी करण्यात येत असून असा प्रकार अद्यापि आढळलेला नाही. परंतु अशाप्रकारच्या तक्रारी करण्यात येत आहेत ही गोष्ट खरी आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. तनवाणी यांनी लेखी निवेदनामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय? असे सुरुवातीला मंत्रिमहोदयांना विचारले होते. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "औरंगाबाद शहरात पुरवठा विभागाचे अधिकारी, पोलीस, परिवहन विभागाचे निरीक्षक व गॅस कंपनीचे विक्री अधिकारी यांच्या स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त पथकाने फेब्रुवारी, 2010 मध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा वापर वाहनांमध्ये अवैधरित्या केला जाणे व अशा प्रकारची केंद्रे नागरी वस्तीमध्ये कार्यरत असणे याबाबत तपासणी केली असता सदर तपासणीत अशी बाब आढळून आली नाही" असे म्हटले आहे. सभापती महोदय, मी आपणाकडे वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले फोटो पाठवितो. आपण ते ताबडतोब मंत्रिमहोदयांकडे पाठवावेत. मंत्रिमहोदय सभागृहात सांगत आहेत की, असे काही प्रकार आढळून आले नाहीत. परंतु याठिकाणी वर्तमानपत्रामध्ये फोटो प्रसिध्द झाले आहेत, बातमी छापून आली आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, "पंचायत समिती कार्यालयामागे असलेल्या एका खुल्या जागेवर गॅस रिफिलिंग करण्याचे अवैध अड्डे आहेत, शहरातील वाळूंज, चिकलठाणा, एम.आय.डी.सी. परिसरात, बजाज नगर, हरसूल, जुने शहर सिडको, हडकोच्या परिसरामध्ये 25 ते 30 गॅस सिलेंडर रिफिलिंगचे अड्डे आहेत: " याठिकाणी एकही अड्डा आढळून आला नाही असे जर शासनाकडून उत्तर येत असेल तर हा हप्तेबाजीचा सर्व प्रकार आहे. आपले अधिकारी ज्यावेळी रेड टाकण्यासाठी जातात त्यावेळी ते पोहोचण्यापूर्वीच पहिल्यांदा त्याठिकाणी बातमी पोहोचते. आणि मग त्याठिकाणी साफसूफ केली जाते, आणि आम्हाला काहीही सापडले नाही असे दाखविले जाते. पुन्हा त्याठिकाणी 10 मिनिटामध्ये गाडयांमध्ये रिफिलिंग केले जाते. आपले अधिकारी भ्रष्टाचारी आहेत, प्रचंड पैश्याचा भ्रष्टाचार सुरु आहे, हप्तेबाजी सुरु आहे. त्यामधून आपणाकडे आलेली माहिती चुकीची आहे. हे याठिकाणी वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या छायाचित्रावरुन स्पष्ट होत आहे. त्यामध्ये वर्तमानपत्रांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. दिवाकर रावते....

अड्डयांची नावे लिहिलेली आहेत. हे आपल्या अधिकाऱ्यांना सापडले नसतील आणि या सभागृहामध्ये मंत्रिमहोदयांना खोटे ठरविण्याची परिस्थिती येणार असेल तर आपण या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहात?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मधल्या काळात औरंगाबादमधील वर्तमानपत्रामध्ये बातमी आणि फोटो छापून आले असता ज्या ज्याठिकाणी अशाप्रकारचे रिफिलिंग होते त्याठिकाणी पोलीस, आरटीओ आणि गॅस कंपनीच्या माध्यमातून तपासणी करण्यात आली. सभापती महोदय, हे रिफिलिंग सेंटर एखाद्या गॅरेजमध्ये किंवा गल्लीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात केले जाते. त्यांचे एकाच ठिकाणी परमनंट एस्टॅब्लिशमेंट रहात नाही. तरीसुध्दा त्याठिकाणी बेकायदेशीर व्यवहार होतात ही गोष्ट मी नाकारीत नाही. त्यांचे आऊटलेट परमनंट नसल्यामुळे एखाद्या गॅरेजमध्ये केल्यानंतर आठ ते दहा दिवसानंतर दुसऱ्या ठिकाणी केले जाते. तरीसुध्दा पोलिसांच्या माध्यमातून अवैधरित्या रिफिलिंग सेंटरवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. एखाद्या वाहनामध्ये डॉमेस्टिक सिलेंडर भरल्यानंतर ते लगेच लक्षात येते. परंतु डॉमेस्टिक सिलेंडरमधील गॅस कमर्शिअल गॅसमध्ये टाकला तर ते लक्षात येत नाही. अशा रिफिलिंग सेंटरची तपासणी करुन व त्याबाबत माहिती घेऊन त्यांच्यावर धाडी टाकण्याची कडक कारवाई करण्याबाबत आरटीओ आणि पोलिसांना आदेश देण्यात आले आहेत.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या प्रश्नाची व्याप्ती औरंगाबाद शहरापुरती मर्यादित नाही तर मुंबई, ठाणे, नाशिक इत्यादी महाराष्ट्रातील शहरीकरण झालेल्या शहरांमध्ये अवैधरित्या गॅस रिफिलिंग सेंटर चालविले जातात. राज्याच्या प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये व त्या शहरातील वर्तमानपत्रांमध्ये आम्ही किट बसवून देऊ अशाप्रकारच्या जाहिराती दिल्या जातात. तरीसुध्दा आपले अधिकारी "काहीही आढळले नाही" असे म्हणत असतील तर आपण याबाबत गंभीर दखल घेतली पाहिजे. आपल्या अधिकाऱ्यांवर याबाबत थोडा वचक असला पाहिजे, त्यांना याबाबत जबाबदार धरले पाहिजे. माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या फोटोचे पुरावे सादर केले आहेत. तसे आपल्याला मुंबईमध्ये होत असलेल्या अवैध केंद्राचे फोटो सुध्दा देता येतील. म्हणून माझा प्रश्न आहे की, या बाबत आपल्या सर्व अधिकाऱ्यांना सज्जड दम देऊन कारवाई करण्यास सांगणार काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 10:50

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, आम्ही या विषयाच्या बाबतीत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये धडक मोहीम राबवून कारवाई करु. फक्त याठिकाणी औरंगाबाद शहराच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना दिलेली असल्याने, मी त्याबाबत उल्लेख केला आहे. परंतु राज्यातील मोठमोठया शहरांमध्ये म्हणजे मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक इ.अनेक शहरांमध्ये अवैध धंदे चालतात ही वस्तुस्थिती आहे. याबाबत धडक मोहीम आखून कारवाई करण्याच्यादृष्टहीने आम्ही त्वरीत कार्यवाही करु.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, याठिकाणी असे सांगण्यात आले की, आपण यासंबंधात काही हॉटेलची देखील तपासणी केलेली असून त्यावेळी नऊ हॉटेल्स् दोषी आढळून आलेले आहेत. ही हॉटेल्स् कोणती आहेत ? माननीय मंत्री महोदय याची माहिती देऊ शकतील काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, यासंबंधात जे पाच गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत, मी त्या बाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, एक वर्षापूर्वी कणकवली येथील आदर्श नगरामध्ये एका मारुती व्हॅनमधील गॅस सिलेंडरचा स्फोट झाला होता आणि त्यावेळी तेथे जवळजवळ 15 ते 20 अवैध गॅस सिलेंडर सापडले होते. कणकवली येथे जी गॅस एजन्सी आहे, त्यांच्या माध्यमातून सातत्याने तेथे अशा प्रकारे गॅस सिलेंडरचा काळाबाजार केला जातो आणि हे गॅस सिलेंडर विकले जातात. याबाबत कारवाई करणार आहात काय ? याबाबतीत सर्व वर्तमानपत्रामध्ये देखील छापून आलेले आहे. जसे आपण महाराष्ट्रातील विविध भागांच्या संदर्भात सांगितले, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये सुध्दा अशा प्रकारे अवैध प्रकार सुरु आहेत. याबाबत कारवाई करणार आहात काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी सांगितले की, मोठी शहरे असो किंवा ग्रामीण भाग असो, या ठिकाणी बेकायदेशीर व्यवहार होत आहेत. त्यासंबंधात पोलिसांच्या माध्यमातून कारवाई होत असते. परंतु आता संपूर्ण राज्यात या अनुषंगाने धडक मोहीम राबविली तर एकाच वेळी अशा प्रकारे अवैध व्यवहार करणांऱ्या सर्वांवर कारवाई करता येईल. म्हणून यासंबंधात राज्यामध्ये धडक योजना लवकरात लवकर राबविण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मघापासून मी या विषयाबाबतची चर्चा ऐकत आहे. गॅस रिफीलिंग सेंटरवर धाडी टाकणे हा या कारवाईचा एक भाग झाला. परंतु मुळात प्रश्न असा आहे की, या लोकांना घरगुती वापराचे सिलेंडर कुठून मिळतात ? याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, ....

. . . .के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . ..

घरगुती वापरासाठी येणारे गॅस सिलेंडर जर चोरवाटेने रिफीलिंग सेंटरवर जात असतील तर ते योग्य नाही. कारण जेव्हा लोक घरगुती गॅस सिलेंडरसाठी संबंधित एजन्सीकडे मागणी करतात, तेव्हा एजन्सीमधील लोक त्यांना सांगतात की, गॅस उद्या मिळेल, परवा मिळेल वगैरे. अशा प्रकारे दोन-तीन दिवस डिले केला जातो. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, गॅस एजन्सीला जेथून चोरवाट मिळते आणि गॅस सिलेंडर चोरवाटेने बाहेर जातात. यावर आपण कोणते नियंत्रण ठेवणार आहात ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, तो महत्वाचा आहे आणि ही गोष्ट खरी आहे की, बेसिकली गॅस एजन्सीकडूनच सिलेंडर पुरविले जातात ही वस्तुस्थिती आहे. आम्ही अशा अनेक एजन्सीज्वर कारवाई केलेली आहे. मधल्या काळामध्ये ज्या-ज्या ग्राहकांकडून तक्रारी आल्या आहेत, तेव्हा त्याबाबत मोठया प्रमाणात कारवाई केली आहे आणि आम्ही पुढील काळामध्ये ही कारवाई कठोरपणे करु.

----

. . . .के-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : व्हेंटिलेटरच्या खरेदीत लाखो रुपयांचा गैरव्यवहार

होणे

**मु.शी.** : व्हेंटिलेटरच्या खरेदीत लाखो रुपयांचा गैरव्यवहार होणे याबाबत सर्वश्री अरुण गुजराथी,रमेश शेंडगे, हेमंत टकले, गुरुनाथ कुलकर्णी,विक्रम काळे,सतीश चव्हाण,श्रीमती उषा दराडे,श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री चंद्रकांत पाटील,विनोद तावडे, भगवान साळुंखे,डॉ.दीपक सावंत सर्वश्री किरण पावसकर, अनिल परब,परशुराम उपरकर, डॉ.नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रुग्णांसाठी अत्यावश्यक जीवनदायी असणाऱ्या व्हेंटिलेटरच्या खरेदीत लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येणे, जागतिक दर्जाचे अत्याधुनिक व्हेंटिलेटर बाजारात सर्वत्र उपलब्ध असताना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी जुन्या पध्दतीचे व्हेंटिलेटर खरेदी करण्यात येणे,जुन्या व्हेंटिलेटरच्या अनेक तक्रारी असणे, अमेरिकन एफफडीएने संबंधित कंपनीचे व्हेंटिलेटर्स बाजारातून मागे घेतले असताना शासनाने सदर व्हेंटिलेटर खरेदी केल्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यां मध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण,याबाबतची चौकशी गुप्तचर यंत्रणेमार्फत करण्यात यावी अशी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील तज्ज्ञ डॉक्टरांकडून होत असलेली मागणी, तसेच रुग्णांच्या जिवीताला धोका निर्माण करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याबाबत जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

प्रा.वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

. . . .के-4



**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . .. के-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, लोकसभेचे सन्माननीय सदस्य श्री.सु.का.टावरे यांनी व्हेन्टीलेटर खरेदी प्रक्रियेबाबत चौकशीची मागणी दिनांक 20 फेब्रुवारी 2010 च्या पत्रानुसार केली होती की, नेमके यामध्ये काय घडलेले आहे ? याठिकाणी योग्य प्रकारे खरेदी केलेली आहे काय ?

डॉ.जोगळेकर, डॉ.जळगांवकर आणि डॉ.तिरपुडे यांच्या अहवालाचा निवेदनामध्ये उल्लेख केलेला आहे. त्या उल्लेखामध्ये एस्पिरीट हे निकृष्ट दर्जाचे नाही, सबस्टॅण्डर्ड नाही असे म्हटलेले आहे. तेव्हा अहवालामध्ये नेमके काय म्हटलेले आहे, त्या ओळी जर माननीय मंत्री महोदयांनी वाचून दाखविल्या तर ही बाब जास्त स्पष्ट होईल. तसेच 2001 साली फिलीप्स् कंपनीने जे व्हेन्टीलेटर्स् घेतले होते, ते परत मागविले आणि 2002 साली त्यामध्ये ज्या काही त्रुटी होत्या, त्या पूर्ण करुन घेतल्या. याचा अर्थ काही प्रमाणात त्रुटी होत्या. माझा प्रश्न असा आहे की, आपण जास्तीतजास्त असे अत्याधुनिक साधन किंवा उपकरण का विकत घेतले नाही ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथीसाहेबांनी प्रश्न विचारलेला आहे की, लोकसभेचे सन्माननीय सदस्य श्री.सु.का.टावरे यांनी पत्र पाठविले आणि त्या पत्रानुसार त्यांनी सांगितले की, हे व्हेन्टीलेटर निकृष्ट दर्जाचे आहे.आम्ही त्यासंदर्भात दिनांक 03-03-2000 रोजी संचालनालयामार्फत एक कमिटी स्थापन केली, ज्याचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. त्यानुसार डॉ.व्ही.के.जोगळेकर जे ग्रँट मेडिकल महाविद्यालयामध्ये प्राध्यापक आहेत आणि या समितीचे अध्यक्ष होते. तसेच डॉ.एस.व्ही.जळगांवकर, डॉ.एन.जी.तिरपुडे हे या कमिटीचे सदस्य होते. या गठित केलेल्या समितीचा अभिप्राय खालील प्रमाणे आहे. सन्माननीय सदस्यांना शब्दश: पाहिजे असेल तर "समंक 18 प्रमाणे संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधक मुंबई या कार्यालयाने मागविलेल्या निविदा व त्यामधील कारवाई योग्य आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड....

सदर निविदेप्रमाणे मंजूर झालेली व्हेंटिलेटर्स यंत्रसामुग्री विकत घेण्याची शिफारस करण्यात येत आहे. निविदेतील कागदाप्रमाणे मंजूर झालेले व्हेंटिलेटर मॉडेल इस्पिरीट सबस्टॅण्डर्ड आहे असे म्हणता येणार नाही अशी समितीचे मत आहे. त्यांनी चौकशीमध्ये दोन गोष्टी सांगितल्या. एक त्यांनी असे सांगितले की, व्हेंटिलेटर्सची जी प्रक्रिया झाली ती 1992 चा जो शासन निर्णय आहे त्यानुसार बरोबर प्रक्रिया झालेली आहे. दुसरा निर्णय त्यांनी असा सांगितलेला आहे की, फिलिप्स कंपनीचे जे इस्पिरीट मॉडेल आहे ते निकृष्ट दर्जाचे नाही असा त्या समितीचा अहवाल आला. ही जी पूर्ण प्रोसेस आहे ती शासनाचा जो निर्णय आहे, जो जी.आर. आहे त्यानुसार पारदर्शक पध्दतीने झालेली आहे. आपले दोन लिफाफे असतात. एक लिफाफा असतो तो तांत्रिक बाबींच्या संदर्भात असतो आणि दुसरा लिफाफा दर ठरविण्याचा बाबतीत असतो. या जी.आर. नुसार प्रक्रिया झालेली आहे. त्यामुळे आम्हाला या प्रक्रियेमध्ये कोठेच दोष आढळून आलेला नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी फार सुंदररीतीने कंपन्यांचा बचाव केला. आपण समिती नेमली. त्या समितीमध्ये आपलेच लोक होते. या समितीतील नावे बघितली तर त्यामध्ये प्राध्यापक अगरवाल, सहयोगी प्राध्यापक कुऱ्हेकर, प्राध्यापक कल्पना केळकर अशी नावे आहे. आपल्याला बाहेरचे कोणी मिळत नाहीत काय ? ज्यावेळी एखादा डॉक्टर शासकीय सेवेमध्ये काम करीत असतो त्यावेळी त्यांच्यावर दबाव असणे साहजिकच असते. हे काही खालचा अधिकारी करत नाही. ही सगळी वरपासून खालपर्यंत साखळी आहे. आपण ही जी समिती नेमलेली होती त्यामध्ये बाहेरच्या या विषयातील तज्ज्ञ डॉक्टरचा किंवा तंत्रज्ञाचा समावेश का केला नाही ? जर आपल्याला हे सिध्द करावयाचे होते की, फिलिप्स कंपनी चांगली आहे, इस्पिरीट मॉडेल हे सगळ्यात चांगले आहे तर त्यांचा का समावेश केला नाही ? दुसरा प्रश्न असा की, केवळ दीड लाख रुपये खर्च करुन आपल्याला कॅप्नोग्राफी टेक्नॉलॉजी असेलेले व्हेंटिलेटर मिळत होते. वास्तविक हे आपण स्वाईन फ्ल्यूसाठी घेतले. कॅप्नोग्राफी तंत्रज्ञान हे स्वाईन फ्ल्यूसाठी अत्यंत उपयुक्त होते. आपण सांगितले की, पेडियॅट्रिक व्हेंटिलेटर्स घेतले तर त्यामध्ये कॅप्नोग्राफी नसले तरी चालले असते. पण जर आपण स्वाईन फ्ल्यूसाठी घेतले तर त्यामध्ये कॅप्नोग्राफी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/ D/ KTG/

डॉ. दीपक सावंत ....

टेक्नॉलॉजी पाहिजे होती. मग आपण त्याकडे का लक्ष दिले नाही आणि या समितीने का सांगितले नाही ? आपल्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, स्वाईन फ्ल्यूसाठी सुध्दा घेतलेले आहे. तर या सर्व विषयाची चौकशी करणार काय ? हे सगळे जे आहे ते या दोन कंपन्यातील युध्द आहे. या कंपन्या लोकांसाठी भांडत नाहीत. या कंपन्या आपले प्रॉडक्ट कसे पुढे ढकलावयाचे यासाठी भांडत आहेत. हे ताबडतोब बद करण्यासाठी आपण भविष्य काळामध्ये लक्ष दिले पाहिजे. आपण 6-6 कोटी, 10-10 कोटी रुपयांची खरेदी करतो. हे जे इन्स्ट्रुमेंट आहे ते रेस्पिरेटरी डिस्ट्रेस आहे की नाही हे पाहण्यासाठी आहे. यामध्ये जीवनमरणाचा प्रश्न आहे. ते घेताना आपण आपल्या शासकीय अधिकाऱ्याच्या किंवा शासकीय डॉक्टरांच्या बाहेरच्या लोकांचा समावेश करुन कमिटी नेमून त्याचे जे काही स्पेसिफिकेशन आहे ते तपासण्याची आपण तसदी घेणार काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छिते की, आपली जी नेहमीची पध्दत आहे त्याप्रमाणे आपण शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांची नेमणूक करतो. पण आपण जी सूचना केली त्याबाबत आमचा विचार चालू आहे की, 1 शासनाचा प्रतिनिधी, 1 महानगरपालिकेचा प्रतिनिधी आणि 1 खाजगी तज्ज्ञ डॉक्टर यांना घेऊन एक समिती स्थापन करण्याचा पॉझिटिव विचार आहे. पण अडचण अशी होते की, खाजगी डॉक्टर्स सहसा या समितीमध्ये येण्यास तयार होत नाही. पण आमचा प्रयत्न नक्कीच आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ज्यावेळी बाहेरच्या डॉक्टरला बैठकीला बोलवितात त्यावेळी शासन त्यांना 1 हजार रुपये मानधन देते. 1 हजार रुपयांमध्ये कोणता खाजगी डॉक्टर आपली प्रॅक्टीस सोडून येईल ? आपण त्यामध्ये वाढ करावी. आपण बेसिकमध्ये जावे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे की, आमची विचारसरणी एकदम पॉझिटिव आहे. 1 शासनाचा प्रतिनिधी, 1 मुंबई महानगरपालिकेचा प्रतिनिधी 1 खाजगी डॉक्टर यांना घेऊन समिती करण्याचा विचार करीत आहोत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड....

सन्माननीय सदस्यांनी कॅप्नोग्राफी बद्दल दुसरा प्रश्न विचारला आहे. व्हेन्टिलेटर मिळत असताना कॅप्नोग्राफी टेक्नोलॉजी का घेतली असे त्यांनी म्हटले आहे. यासंदर्भात मी सांगेन की, पुष्कळ डॉक्टरांचे असे म्हणणे आहे की, कॅप्नोग्राफी टेक्नोलॉजीद्वारे श्वासातील कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण मोजता येते. बऱ्याच तज्ज्ञ मंडळींचे म्हणणे आहे की, सर्व अतिदक्षता विभागात सर्व रुग्णालयात मल्टीपॅरामीटर मॉनिटर नावाचे उपकरण उपलब्ध आहे. या उपकरणाद्वारे इसीजी चेक करु शकतो, ब्लड प्रेशर चेक करु शकतो, हार्ट रेट चेक करु शकतो, पल्स रेट चेक करु शकतो, श्वासोश्वासाचा रेट चेक करु शकतो, रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण चेक करु शकतो, श्वसनातील कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण चेक करु शकतो. त्यामुळे या उपकरणाचा आपण उपयोग करु शकतो. सन्माननीय सदस्यांनी दुसऱ्या व्हेन्टिलेटरचा उल्लेख केला आहे. त्यासंदर्भातील नागपूर खंडपीठामध्ये पीआयएल दाखल असल्यामुळे आपण त्याबाबत अधिक चर्चा करु शकत नाही. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, या उपकरणाचे बाकीच्या हॉस्पिटलमध्ये सुध्दा प्रावधान केलेले आहे. बाकीच्या हॉस्पिटल्सना सुध्दा मल्टिपॅरामीटर मॉनिटरचा उपयोग होतो.

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, 50 पैकी 27 व्हेन्टिलेटर्स मराठवाडयाच्या माथी मारलेली आहेत. फार्माकॅलॉजीचे प्रोफेसर किंवा ॲनेस्थेशियाचे प्रोफेसर हे यंत्र तपासणीसाठी एक्सपर्टस् आहेत काय, या समितीमध्ये बायोमेडिकल इंजिनियरला का नेमले नाही ? सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी म्हटल्याप्रमाणे जरी बाहेरच्या इंजिनिअरला नेमले नाही तरी शासकीय बायोमेडिकल इंजिनिअर का नेमला नाही ? फार्माकॅलॉजीचे प्रोफेसर किंवा ॲनेस्थेशियाचे प्रोफेसर हे यंत्र तपासणीसाठी एक्सपर्टस् असू शकत नाहीत. ते ड्रग्जमध्ये तज्ज्ञ असू शकतील. एखादे यंत्र योग्य चालते किंवा नाही हे पाहण्यासाठी हे तज्ज्ञ असू शकत नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचा आक्षेप आहे तो अतिशय योग्य आहे. वरपासून खालपर्यंत जर कडी असते. त्यामुळे वरची माणसे खालच्या माणसावर दबाव आणून पाहिजे तसा रिपोर्ट घेऊ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम.....

शकतात. जीवनावश्यक अत्यंत महत्वाचे हे यंत्र आहे. म्हणजे जीवन मरणाच्या सीमा रेषेवर असलेल्या माणसांना व्हेन्टिलेटरवर ठेवले जाते. त्याच्याबाबतीत कोणी अफरातफर करीत असेल तर ही गंभीर बाब आहे. शासनाने बायोमेडिकल इंजिनिअर्सची कमिटी नेमून याची तपासणी करील काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्या प्रश्नाला यापूर्वीच उत्तर देताना बायोमेडिकल इंजिनिअर्ससंबंधी बोलले आहे. खरे तर व्हेन्टिलेटरची आवश्यकता कधी तरी लागते. ज्यावेळी एखाद्याला न्युमोनिया होतो, फुप्फुसाचे आजार होतात, श्वसन संस्थेचे आजार होतो, स्नायुचे आजार होतात, दमा होतो आणि ह्दयरोग या आजारासाठी व्हेन्टिलेटरचा उपयोग होतो. यासंदर्भात शासनाने कमिटी नेमलेली आहे त्यामध्ये ॲनेस्थेशियन्सना घेतलेले आहे, मेडिसीनमधील तज्ज्ञांना घेतलेले आहे. याचे कारण असे की ते या टेक्नोलॉजीचा जास्तीत जास्त उपयोग करतात. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी केलेली सूचना तपासून त्याबाबत काय विचार करता येईल ते पाहू.

--------

3.....



NTK/ D/ MMP/ KTG/ KGS/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. वैधानिक विकास मंडळासंबंधी माझा औचित्याचा मुद्दा आहे. वैधानिक विकास मंडळांची मुदत दिनांक 31 मार्च, 2010 रोजी संपत आहे. शासनाने त्वरित याबाबत उपाययोजना करावी यासाठी मी या औचित्याद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

सभापती महोदय,1984 साली वि.म.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि कोकण या मागास भागाचा किती अनुशेष आहे त्याचा शोध घेण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविली होती. दांडेकर समितीने 1982 च्या किंमतीवर आधारित या भागात किती अनुशेष आहे याचा अभ्यास करुन तो 3186.78 कोटी रुपये इतका आहे असा निष्कर्ष काढला आणि त्यानंतर दर पाच वर्षांनी विकासातील अनुशेषाचा आढावा घ्यावा अशी शिफारस केली होती. परंतु राज्य सरकारने ती मान्य केली नाही. त्यानंतर दिनांक 30.4.94 रोजी मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी ही वैधानिक मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. खरे तर राज्यपालांचे आदेश राज्य सरकारवर बंधनकारक असले पाहिजेत. परंतु राज्यपालांचे आदेश राज्य सरकारने अनेक वेळा धुडकावले आहेत हे आजवरच्या आकडेवारीवरुन स्पष्ट झालेले आहे. मराठवाडा, विदर्भ या भागाच्या वाटयापैकी अर्ध्याहून अधिक रक्कम ही पश्चिम महाराष्ट्राकडे वळविली गेली अशी अनेकजणांची तक्रार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रशासकीय मंजुरी नसल्यामुळे व राजकीय कारणांमुळे अनुशेष पूर्ण झाला असा काही लोक दावा करीत असले तरी यासंबंधी विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व उर्वरित महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्र या सर्व ठिकाणी प्रचंड नाराजी आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जयप्रकाश छाजेड )**

यानंतर श्री.ओटवणेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे........

म्हणून दिनांक 12 मार्च 2010 रोजी माननीय राज्यपाल, श्री.के.शंकरनारायणन यांची भेट शिवेसना कार्याध्यक्ष माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांनी शिष्टमंडळासह घेतली. वैधानिक विकास महामंडळाची मुदत दिनांक 31मार्च 2010 रोजी संपत आहे. त्यामुळे त्वरित या वैधानिक विकास मंडळाला मुदत वाढ द्यावी, अशा प्रकारची मागणी केली आहे. आपले अधिवेशन सुरू आहे आणि 31 मार्च जवळ येत आहे. यासंबंधी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे हे अद्यापपर्यंत स्पष्ट झालेले नाही. राज्य शासनाने वैधानिक विकास महामंडळाला मुदत वाढ द्यावी याकडे शासनाचे लक्ष वेधावे म्हणून मी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.जयप्रकाश छाजेड) : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण येथे सिंधुदुर्ग किल्ला आहे. या किल्ल्यात शिवाजी महाराजांचे मंदिर असून ते एकमेव आहे. हे मंदिर जगप्रसिद्ध आहे. या मंदिराचे नूतनीकरण करण्यासाठी निधीची तरतूद करावी अशी मी सभागृहात वारंवार मागणी केली आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये या मंदिराच्या नूतनीकरणासाठी एक कोटी रूपये देण्याची घोषणा झालेली असताना अद्यापि निधी मिळालेला नाही. एवढेच नव्हे तर मागील अधिवेशनात दिनांक 23 डिसेंबर 2009 रोजी मी प्रश्न उपस्थित केला होता. कोकणातील असलेले अर्थमंत्री यांनी जर या मंदिराच्या नूतनीकरणामध्ये लक्ष घालून 1 कोटी रूपये सी.एफ. मधून देण्याची घोषणा करून देखील अद्यापि निधी मिळालेला नाही. सिंधुदुर्ग किल्ल्यातील शिवाजी महाराज यांच्या मंदिराचे तातडीने नूतनीकरण करण्यासाठी एक कोटी रूपयांची घोषणा शासनाने करावी म्हणून मी येथे औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

त्याचप्रमाणे मी माझा दुसरा औचित्याचा मुद्दा मांडत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून कोकण रेल्वे धावते. वैभववाडीपर्यंत रूळ टाकण्याचे सर्वेक्षण करण्यासंबंधात परिवहन मंत्र्यांनी सभागृहात घोषणा केली होती. या कामाचा शुभारंभाचा नारळ माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते फोडण्याची घोषणा याच सभागृहात केली होती. या कामाचा अद्यापी शुभारंभ झालेला नाही. वैभववाडीपासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंत रूळ टाकण्याच्या सर्वेक्षणाची कार्यवाही तातडीने आणि लवकरात लवकर व्हावी अशी मी विनंती करीत आहे.

त्याच बरोबर मी येथे आणखी एक मुद्दा उपस्थित करू इच्छितो. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा आहे. त्यामुळे येथे तातडीने 8 दिवसात व्होल्वो बससेवा सुरू करू असे माननीय परिवहन मंत्र्यांनी सभागृहाला आश्वासित केले होते. अजूनही सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी व्होल्वो बससेवा सुरू करण्यात आलेली नाही. ही बससेवा सुरू करण्यासंबंधी आणि वैभववाडी ते कोल्हापूर असा रूळ टाकण्यासंदर्भात तातडीने शासनाने उपाययोजना करावी, असा मुद्दा मी औचित्याच्या मुद्याद्वारे मांडत आहे.

....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुळकर्णी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.गुरूनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मालवणला नगर परिषदेचे वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी रूग्णालय होते. या रूग्णालयाच्या माध्यमातून शहरातील तसेच ग्रामीण भागातील जनतेला वैद्यकीय सेवा पुरविली जात होती. परंतु, शासनाने येथे ग्रामीण रूग्णालय सुरू करण्याचा निर्णय घेतला. ग्रामीण रूग्णालय सुरू केल्यामुळे नगर परिषदेची वैद्यकीय सेवा पुरविण्याची सेवा पूर्णपणे कोलमडून पडली. ग्रामीण रूग्णालय सुरू केल्यामुळे तेथे अधिक सोयी मिळतील, अधिक डॉक्टर्स उपलब्ध होतील, शहराची आणि ग्रामीण भागातील जनतेला डॉक्टरांची अधिक सेवा उपलब्ध होईल असे वाटले होते. परंतु, दुर्दैवाने जे होते ते बरे होते आणि जे आता निर्माण केले आहे, ते अत्यंत धोकादायक आहे असे म्हणण्याची पाळी तेथील लोकांवर आली आहे. त्यामुळे एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधित आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील ग्रामीण रूग्णालयासाठी तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर असताना केवळ एकच वैद्यकीय अधिकारी कार्यरत असणे, कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ.श्रीमती झांटये या सातत्याने रजेवर जाणे, परिणामी रूग्णांची हेळसांड होणे, डॉ.झांट्ये यांची त्वरित बदली करून त्या ठिकाणी दोन डॉक्टरांची नेमणूक करण्याची आवश्यकता, मालवण नगरपालिकेकडून दवाखाना हस्तांतरित करून घेते वेळी 22 कर्मचाऱ्यांपैकी केवळ 13 कर्मचाऱ्यांना सेवेत घेणे,

यानंतर श्री शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

बाकी कर्मचा-यांच्या सेवेचा प्रश्न प्रलंबित रहाणे, रुग्णालयात एकही पुरुष चतुर्थश्रेणी कर्मचारी नसणे त्यामुळे महिला कर्मचा-यांना रात्री काम करावे लागणे, रुग्णालयात सोयीसुविधांचा असलेला अभाव त्यामुळे रुग्णाना योग्य उपचार मिळत नसल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष व त्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.

सभापती महोदय, सभागृहामध्ये जर सार्वजनिक आरोग्य खात्याचे मंत्री हजर असते तर त्यांना आपण या प्रश्नाच्या बाबतीत निर्देश देऊ शकला असता. तेव्हा या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना करण्यासाठी आपण शासनाला निर्देश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

--

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, मी खालील अत्यंत महत्वाच्या आणि सार्वजनिक निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई शहराला गेल्या काही दिवसांपासून तीन-चार दिवसा आड पाणीपुरवठा करण्यात येत आहे, नगरपरिषदेकडून पाणीपुरवठा करण्यासाठीचे वेळापत्रक प्रसिध्द केलेले नाही. ज्या दिवशी नळाला पाणी येणार त्या दिवशी पाणी येण्याची वेळ निश्चित नसल्यामुळे पाण्याच्या प्रतिक्षेत महिलांना दिवस घालवावा लागतो. पाणी पुरवठा वेळापत्रकाप्रमाणे ठरवून करण्याची स्थानिक रहिवाश्यांची सातत्याने होत असलेली मागणी. या विषयी कोणतीही कारवाई केली जात नसून नगरपरिषदेकडून होत असलेल्या पाणी पुरवठयाबाबत स्थानिक रहिवाशांमध्ये प्रचंड नैराश्याचे आणि संतापाचे वातावरण पसरलेले असून याबाबत शासनाने करावयाच्या उपाययोजनेसंबंधी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. धन्यवाद.

---

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाल्यानंतर सुरक्षेच्या बाबतीत याठिकाणी चर्चा झाली. त्याबाबतीत जेवढी नाराजी प्रकट झाली तेवढीच नाराची उपाहारगृहाच्याबाबतीत आमदारांकडून आणि खासकरुन कर्मचा-यांकडून व्यक्त करण्यात येत आहेत. या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित असताना मला हा औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली त्याबद्दल सभापती महोदय मी आपली आभारी आहे.

सभापती महोदय, तळमजल्यावरील उपाहारगृहामध्ये खाद्यपदार्थांचे दर वारेमाप वाढविलेले आहेत. चौकशी केल्यानंतर हे दर कमी केल्याचे सांगितले गेले. आधी ज्या कंत्राटदाराकडून उपाहारगृह चालविण्यात येत होते ते शंभर टक्के चांगल्या प्रकारे नाही पण ब-यापैकी चालविले जात होते आणि सेवा देणारे सर्व लोक मराठी होते. आता ज्या कंत्राटदारावर हे उपाहारगृह चालविण्याची जबाबदारी टाकलेली आहे तो हे उपाहारगृह आयनॉक्स सारख्या मल्टीप्लेक्समध्ये चालविल्या जाणा-या उपाहारगृहाप्रमाणे चालवित आहे. तसेच या उपाहारगृहातील संपूर्ण कर्मचारी वर्ग अमराठी आहे. याबाबत वृत्तपत्रातून देखील छापून आलेले आहे. या सर्व गोष्टी आपल्या अधिकारात घडत आहेत असे मला वाटते. या संदर्भात मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करु इच्छिते की, नागपूरला महिला बचत गटांना उपाहारगृहे चालविण्यास देण्यात येते आणि ते गट ब-या पैकी सेवा देतात असे अभिप्राय आपल्या कर्मचा-यांकडून आणि आमदारांकडून आलेले आहेत. तळमजल्यावर जे उपाहारगृह चालविण्यात येते त्याचा उपयोग केवळ आमदारानांच नाही तर विधानमंडळाचे कर्मचारी, पत्रकार यांना देखील होतो. एका बाजूला शासनाने धान्याचे भाव स्थिर ठेवले नसले तरी हे उपाहारगृह ना नफा ना तोटा या तत्वावर मराठी माणसाला चालविण्यास मिळावे अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

श्री. छगन भुजबळ : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत दोन दिवस वर्तमानपत्रातून देखील छापून येत होते. या विषयामध्ये मी निश्चितपणे लक्ष घालून संबंधित निर्णयकर्त्यांना सांगून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करील.

डॉ.नीलम गो-हे : धन्यवाद. पुढच्या आठवडयातील मंगळवार किंवा बुधवारपर्यन्त याबाबतीत निर्णय व्हावा.

--

...नंतर श्री. भोगले...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ. शी.** : राज्यातील कुष्ठरोग तज्ज्ञांना 15 महिन्यांपासून वेतन न मिळणे

**मु. शी.** :राज्यातील कुष्ठरोग तज्ज्ञांना 15 महिन्यांपासून वेतन न मिळणे याबाबत श्री.राजन तेली, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड)** : माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्यात कुष्ठरोग तज्ज्ञांची अधिसंख्य पदे भरण्यात येऊन त्यांच्या वेतन व भत्याबाबतची कार्यवाही मा.सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे यांनी आदेश देवूनही गेल्या 15 महिन्यांपासून या कुष्ठरोग तज्ज्ञांना वेतन देण्यात आलेले नाही. शारीरिक आणि सामाजिक समाजात घृणा निर्माण करणाऱ्या कुष्ठरोगासारख्या भयंकर असलेल्या रोगाच्या रुग्णांची मनोभावे सेवा करणाऱ्या या कुष्ठरोग तज्ज्ञांना वेतन देण्यात आले नसल्याने त्यांच्यावर फारच मोठा अन्याय करण्यात आला आहे. या कुष्ठरोग तज्ज्ञांवरील अन्याय दूर करण्यात यावा यासाठी या अतिमहत्वाच्या विशेष उल्लेखावर चर्चा करण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देऊन या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : परळी (जि.बीड) येथील तालुका लघु पशु सर्व चिकित्सालयाच्या इमारतीची दुरुस्ती होणे

**मु. शी.** : परळी (जि.बीड) येथील तालुका लघु पशु सर्व चिकित्सालयाच्या इमारतीची दुरुस्ती होणे याबाबत ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

बीड जिल्हयातील परळी शहरातील उड्डाण पुलाखाली असलेल्या तालुका लघु पशु सर्व चिकित्सालयाची इमारत मोडकळीस येणे, तसेच गेल्या अनेक वर्षापासून याठिकाणी असलेल्या जिल्हा परिषदेच्या पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-1 चे रुपांतर राज्य शासनाच्या तालुका लघु पशु सर्व चिकित्सालयामध्ये होऊन या पशु चिकित्सालयामध्ये सहाय्यक आयुक्त, पशुधन विकास अधिकारी ही पदे रिक्त असणे, तसेच सहाय्यक आयुक्त पद मंजूर झाल्यापासून रिक्त असणे याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन कार्यवाही करावी अशी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

---------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोंदिया येथील तंत्रनिकेतन पदविका महाविद्यालयात गोंदिया व भंडारा जिल्हयातील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरु करणे

**मु. शी.** : गोंदिया येथील तंत्रनिकेतन पदविका महाविद्यालयात गोंदिया व भंडारा जिल्हयातील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरु करणे याबाबत श्री.केशवराव मानकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे शैक्षणिक वर्ष 2010-11 पासून एसएससी व एचएससी नंतरच्या पदविका अभ्यासक्रमांची प्रवेशप्रकिया केंद्रीभूत पध्दतीने करण्यासंबंधी मा.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.10/एनजीपी/पदविका प्रवेश प्रक्रिया/2010/74, दिनांक 9.3.2010 अन्वये राज्यातील सर्व संस्थांना कळविण्यात येणे, परंतु गोंदिया आणि भंडारा जिल्हयातील औषध निर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम व तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमाची प्रवेशपक्रिया ही दरवर्षी साकोली आणि नागपूर याठिकाणी होणे, परंतु गोंदिया व भंडारा जिल्हयातील पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना गोंदिया, नागपूर आणि साकोली येथे जाण्यायेण्यासाठी आर्थिक तसेच मानसिक त्रासाचा सामना करावा लागणे, गोंदिया जिल्हयातील काही अतिदुर्गम ग्रामीण भागात वाहनांच्या अभावामुळे तेथील विद्यार्थ्यांना वेळेवर न पोहोचल्यामुळे प्रवेश पक्रियेला मुकावे लागणे, अशाप्रकारे गोंदिया आणि भंडारा जिल्हयातील पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता गोंदिया येथे नुकतेच सुरु केलेल्या तंत्रनिकेतन पदविका महाविद्यालयात गोंदिया आणि भंडारा जिल्हयातील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याची मंजुरी तात्काळ देण्याची आवश्यकता लक्षात घेता शासनाने तातडीने उपाययोजना करुन कार्यवाही करावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

---------

...4..



**पृ. शी.** : पूर्व प्राथमिक (बालवाडी) शिक्षकांना मिळणारे अपुरे वेतन व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु. शी.** : पूर्व प्राथमिक (बालवाडी) शिक्षकांना मिळणारे अपुरे वेतन व पालकांचे देणगीच्या नावाखाली होणारे शोषण याबाबत श्री.भगवानराव साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

आपल्या राज्यात पूर्वप्राथमिक (बालवाडी) ही संकल्पना आता उत्तम रितीने समाजाने स्वीकारली आहे. हम दो हमारे दो अशा मर्यादित कुटुंबातील वय वर्षे 4 ते 6 कालावधीत किशोरवयीन मुले मुली मोठया प्रमाणात बालवाडीत शिकत आहेत. मात्र या शिक्षणाबाबत राज्य सरकार पूर्णपणे उदासीन आहे. पूर्व प्राथमिक शिक्षणाला अनुदान देणे, मान्यता देणे, देखरेखीची व्यवस्था निर्माण करणे अशा कोणत्याही बाबी न झाल्यामुळे पूर्व प्राथमिक शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून प्रचंड प्रमाणात देणग्या घेतल्या जातात. प्रसंगी एक लाख रुपयांपर्यंत सुध्दा देणगी वसूल केली जाते. अभ्यासक्रम सुध्दा योग्यप्रकारे असत नाही. तेथे शिकविणाऱ्या शिक्षकाला मात्र 1000 ते 1200 रुपये इतके अल्प वेतन दिले जाते. त्यांना निवृत्तीवेतनाचा फायदा दिला जात नाही. महाराष्ट्रात स्वातंत्र्य मिळाल्यापासून आतापर्यंत बालवाडीमध्ये शिकविणारा शिक्षक पूर्णपणे उद्‌ध्वस्त होऊन या शिक्षण व्यवस्थेत शिकविण्याचे काम करीत आहे. मुलांच्या पालकांचे मात्र या माध्यमातून शोषण केले जात आहे. या प्रश्नाकडे शासनाने गंभीरतेने लक्ष देऊन योग्य ती उपाययोजना करावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

-------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे स्मारक उभारणे

**मु.शी.**: डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे स्मारक उभारणे याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती (श्री. जयप्रकाश छाजेड)** : माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"दिनांक 10 ऑक्टोबर, 2009 पासून डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांची जन्मशताब्दी सुरु झालेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले येथे जन्म घेतलेल्या या नर रत्नाने सन 1938 ते 1942 या दरम्यान जर्मन, जपान यांनी चीन देशावर केलेल्या युध्दात चीनमधील युध्दग्रस्त रुग्णांना वैद्यकीय मदत देण्याचे उल्लेखनीय काम केले. ही मानवतावादी सेवा बजावत असतानाच अथक परिश्रमामुळे त्यांचे दि. 8 डिसेंबर, 1942 रोजी चीन देशातच निधन झाले. चीन देशात त्यांची प्रतिमा मानव वेशातील देवता अशी आहे. ते सोलापूरचे होते. त्यांचे नातेवाईक त्यांच्या पत्नी वेळोवेळी सोलापूरला येऊन गेल्या आहेत. माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे, मुख्यमंत्री असताना त्यांनी डॉ. द्वारकानाथ कोटणीस सोलापूर येथे यांचे स्मारक व्हावे म्हणून काही निधी मंजूर केला होता. आजच्या तरुण पिढीला डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांच्या मानवतावादी कार्याची ओळख व्हावी, यादृष्टीने त्यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने त्यांचे स्मारक उभारणे अत्यंत निकडीचे आहे. म्हणून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या या बाबीकडे या विशेष उल्लेखाच्या सुचनेद्वारे मी या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो."

---------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

( प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला )

**तालिका सभापती** : राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आता सुरु होत आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे "ऑन लेग" आहेत. त्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल जो आभारप्रदर्शनाचा प्रस्ताव सभागृहात आलेला आहे त्यावर कालपासून चर्चा सुरु आहे. या चर्चेमध्ये शेवटी जो महत्वाचा मुद्दा उपस्थित केला होता तो म्हणजे रोजगार हमी योजनेच्या संदर्भात शासनाने एक चांगली भूमिका घेतली आहे. ती अशी की, रोजगार हमी योजनेवरील मजुराला अगोदर 60 रुपये एवढ्या दराने मजुरी दिली जात होती ती आता 100 रुपयेपर्यंत वाढविण्यात आली आहे. जसजशी महागाई वाढत जाते त्याप्रमाणात निदान काही प्रमाणात तरी शासनाला हा निर्णय घेणे भाग पडले आहे म्हणून मी शासनाचे अभिनंदन करतो. शेतकऱ्यांच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर गेल्या चार-पाच वर्षात विशेषत: विदर्भाच्या 6 जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात आत्महत्त्या झालेल्या आहेत, हा एक दुर्दैवी प्रकार राज्यात घडलेला आहे....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-03-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) R-1

SGJ/ MMP/ D/ 11:25

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

सभापती महोदय, त्या संदर्भात देशाचे माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी स्वत: पुढाकार घेऊन जवळ जवळ 3500 कोटी रुपयांचे पॅकेज दिले आणि राज्य शासनाने सुध्दा स्वतंत्रपणे पॅकेज दिले होते. हे पॅकेज देण्यामागील उद्देश असा होता की, जे शेतकरी आर्थिकदृष्टया अडचणीत आहेत त्यांना सहकार्य करावे, मदत करावी, त्यांच्या जीवनात स्थैर्य आणावे, आत्महत्या थांबाव्यात. शेतक-याला कर्जपुरवठा करण्यासाठी केंद्रशासनाने सुध्दा अत्यंत चांगली भूमिका घेतलेली आहे. मी जर उल्लेख केला नाही तर ते योग्य होणार नाही कारण गेल्या पाच वर्षापासून केंद्रशासनामध्ये कृषीमंत्री म्हणून माननीय शरद पवार हे कार्यरत आहेत आणि आता नवीन सरकारमध्ये सुध्दा ते कृषीमंत्री म्हणून कार्यरत आहेत. माननीय शरद पवार हे देशाचे कृषी मंत्री म्हणून काम करीत असतांना या देशाच्या इतिहासात देशातील शेतकरी जो कर्जबाजारी होता, अडचणीत होता त्या शेतक-याला कर्जबाजारीपणातून, अडचणीतून बाहेर काढण्याचे काम या देशाच्या कृषी मंत्र्यांनी तसेच कॉंगेस पक्षाने केलेले आहे. विदर्भातील शेतक-याच्या संदर्भात नव्हे, महाराष्ट्रातील शेतक-याच्या संदर्भातच नव्हेत तर संपूर्ण देशातील शेतक-याला कर्जातून आणि अडचणीतून बाहेर काढण्याच्या संदर्भातील एक महत्वाचा निर्णय केंद्रशासनाने घेतला. त्यावेळी देशाचे माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, त्यावेळचे अर्थमंत्री श्री. चिंदमबरम आणि कृषी मंत्री माननीय शरद पवार यांनी केंद्राच्यावतीने शेतक-यांच्या संदर्भात चांगला निर्णय घेतला होता. यामध्ये केंद्रशासनाने 71 हजार कोटी रुपये देशातील शेतक-यांकडे जे थकीत कर्ज होते ते माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. मी या ठिकाणी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही तर जी काही वस्तुस्थिती आहे ती सदनासमोर यावी यासाठी हे सर्व सांगत आहे. ज्यावेळी देशात एनडीएचे सरकार होते त्यावेळी देशातील शेतक-यांना कर्जपुरवठा करण्यासाठी केंद्रशासनाचा आऊट ले 88 हजार कोटी रुपयांचा होता. परंतु ज्यावेळी युपीए सरकार सत्तेवर आले तेव्हा पूर्वीचा जो 88 हजार कोटी रुपयांचा शेतक-यांना कर्जपुरवठा करण्यासाठी जो आऊट ले होता तो 1 टक्के होता. शेतीतून जो विकास व्हावयास पाहिजे होता त्याचा दर सुध्दा साधारणत: 1 टक्का एवढाच होता. शेतीला येणारा खर्च आणि त्यातून मिळणारे उत्पन्न याचे प्रमाण त्यावेळी फार व्यस्त होते. मला सांगावयास आनंद वाटतो की, या वर्षी केंद्रशासनाने शेतीसाठीची

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी......

तरतूद 88 हजार कोटी रुपयावरुन आता 3 लक्ष 25 हजार कोटी रुपयांपर्यंत नेली आणि तो आकडा या वर्षी 3 लक्ष 75 हजार कोटी रुपयांपर्यंत गेलेला आहे. देशातील शेतक-यांना कर्जातून बाहेर काढण्याची प्रभावीपणे भूमिका केंद्रशासनाने घेतली आहे. काल पर्यंत शेतीला इंडस्ट्रीजचा दर्जा मिळत नव्हता परंतु आता शेतीला इंडस्ट्रीजचा दर्जा मिळू लागल्यामुळे देशातील शेतक-यांचे आर्थिक उत्पन्नात वाढ झालेली आहे. आज महाराष्ट्रातीलच नव्हेतर संपूर्ण देशातील शेतक-यांच्या मालाला चांगला बाजारभाव मिळू लागला आहे. आज केंद्रशासनाने शेतीसाठी 3 लक्ष 75 हजार कोटी रुपयांच्या अर्थसहाय्याची तरतूद करुन ठेवली आहे. यापूर्वी देशातील शेतक-यांना 18 टक्के, 20 टक्के, 21 टक्के दराने कर्ज उपलब्ध होत होते परंतु युपीए सरकारने शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज पुरवठा उपलब्ध करुन दिलेला आहे. एवढेच नव्हेतर ज्या शेतक-याने 25 हजार रुपयांचे कर्ज घेतले असेल आणि त्या कर्जाची परतफेड तो शेतकरी व्यवस्थित करीत असेल तर 25 हजार रुपयांपर्यंतच्या कर्जावर कोणत्याही प्रकारचे व्याज आकारले जाणार नाही .

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी...

त्या शेतक-याने जर वेळेवर कर्ज फेडण्याची व्यवस्था केली तर 20 हजार रुपयापासून ते 3 लाख रुपयापर्यत 2 टक्के व्याजाने त्याला कर्ज उपलब्ध करुन दिले जाणार आहे. शेतक-याच्या उत्थानासाठी तसेच शेतीच्या विकासासाठी कार्यक्रम घेण्यात यावेत असे स्वप्न आम्ही सर्वजण पहात होतो त्याप्रमाणे माननीय राज्यपालांनी त्यांच्या अभिभाषणात राज्यातील जनतेसमोर स्पष्ट भूमिका मांडली आहे म्हणून मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते उपस्थित नाहीत त्यांनी काल एक प्रश्न उपस्थित केला होता. त्याच्याकडे लॅमिनेट केलेल्या पत्राची प्रत होती. 2000 सालापर्यत राज्यातील लोडशेडीग नाहीसे करण्यात येईल व राज्यामध्ये मोठया प्रमाणावर वीज पुरवठा करण्यात येईल असे वाक्य त्या पत्रात होते. अशा प्रकारचे पत्र त्यांना दिले गेले असेल ही बाब मी नाकारत नाही. काल त्याबाबतीत देखील चर्चा झाली होती. आपल्याकडे पैसे आहेत म्हणून सहा महिन्यात वा एक वर्षात आपण वीज निर्माण करु शकत नाही. वीज निर्मितीसाठी एक प्रोसेस ठरलेली असते.सभापती महोदय, या राज्याच्या विकासाच्या संदर्भात अडचणी येतील अशा काही दुर्देवी घटना घडलेल्या आहेत. त्यासाठी कोणते सरकार दोषी होते याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही.परतु ती वस्तुस्थिती मान्य करावयास पाहिजे. जवळजवळ 2200 मेगॅवॅटस वीज निर्माण करणारा दाभोळचा प्रकल्प असून अत्यंत चांगल्या भावनेने या राज्यात तो प्रकल्प आणण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. परतु तो प्रकल्प अरबी समुद्रात बुडविण्याचा निर्णय तत्कालिन सरकारने घेतला नसता तर आज या राज्यातील विजेची गरज पूर्णपणे भागवली गेली असती. अर्थात जे काही घडले होते ती वस्तुस्थिती असून त्यासबधी मी कोणालाही दोष देणार नाही. 1999 ते 2004 सालापर्यत या राज्यात सत्तेवर असलेल्या सरकारने एक युनिट देखील वीज निर्मिती केलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यावेळी त्यांनी वीज निर्मिती का केली नाही यासबंधी आपणा सर्वांना माहिती आहे. एनरॉन कंपनीचे दिवाळे निघाल्यानंतर काही प्रक्रिया पूर्ण करावयाच्या होत्या त्या सगळया प्रक्रिया पूर्ण् करीत असतांना राज्य सरकारने जर व्यवस्थित भूमिका घेतली नसती तर भुर्दड म्हणून या राज्य सरकारला साडे सत्तावीस हजार कोटी रुपये एनरॉन कंपनीला द्यावे लागले असते. त्यावेळी राज्य सरकारने कोर्ट कचे-या आणि आर्बिट्रेशनच्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी...

माध्यमातून साडेसत्तावीस हजार कोटी रुपयांचा खर्च वाचविला आहे ही बाब आपल्याला मान्य करावीच लागेल . त्यावेळी अरबी समुद्रात जो प्रकल्प बुडविण्यात आला होता त्या प्रकल्पातूनच आज या राज्याला विजेच्या बाबतीत तारण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच आज त्या प्रकल्पासाठी लागणारा गॅस देखील व्यवस्थितपणे उपलब्ध होत आहे. दाभोळ प्रकल्पाच्या माध्यमातून साडे चौदाशे मेगॅवेटस इतकी वीज राज्याला मिळत आहे.पुढील साहा महिन्यातसुध्दा आणखी 700 मेगॅवॅटस वीज उपलब्ध होणार आहे अशा प्रकारे एकूण 2100 मेगॅवॅटस वीज या प्रकल्पातून राज्याला मिळणार आहे.आणि त्यासाठी योग्य तो प्रयत्न केला जात आहे. 2010 सालापर्यत राज्याला लोडशेडीग मुक्त केले जाणार आहे असे या अगोदर सांगण्यात आलेले होते त्यानंतर 2012 सालापर्यत लोडशेडीग मुक्त केले जाणार आहे असे सांगण्यात आलेले असले तरी त्यासाठी राज्य सरकारकडे स्पष्ट असे धोरण आहे. राज्याला एवढी वीज उपलब्ध करुन देण्यात येईल की कोणत्याही परिस्थिती 2012 सालानंतर कोठेही लोड शेडीग राहणार नाही या दृष्टीने राज्य सरकारने धोरण आखलेले आहे. आज राज्यामध्ये कमी अधिक प्रमाणात लोडशेडीग सुरु आहे ते सुध्दा नाहीसे होईल असे धोरण राज्य सरकारने आखल्यामुळे मी राज्य सरकारचे अभिनंदन करतो.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री. छगन भुजबळ साहेब सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्या विभागाच्या संदर्भात एक विषय मी याठिकाणी मांडू इच्छितो. त्यांच्या विभागामार्फत राज्यातील महामार्गांचे चौपदरीकरण किंवा अष्टौपदरीकरण करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. मुंबई-नाशिक, मुंबई-बंगळुरु या महामार्गांचे चौपदरीकरण पूर्ण झाले आहे. आम्ही कोकणातील जनतेने काय पाप केले आहे? असा माझा त्यांना सवाल आहे. आज मुंबई-गोवा या महामार्गावर संपूर्ण राज्यामध्ये सर्वात जास्त अपघात होत असल्यामुळे ठिकठिकाणी मृत्यूचे सापळे झ ाले आहेत. या अपघातामध्ये निरपराध माणसे मरत आहेत. संपूर्ण राज्यामध्ये चांगल्या प्रकारच्या रस्त्यांचे जाळे विणण्याचा कार्यक्रम आपण जाहीर केला आहे. आपण महामार्गांच्या विकासाकरिता केंद्र सरकारशी भांडून निधी आणला. मुंबई-गोवा या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाला सुरुवात झाल्याचे दिसत नाही. वडखळपासून इंदापूरपर्यंत महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे असे आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचले आहे, परंतु अजून काही सुरुवात झालेली नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम आपण जलदगतीने हाती घेऊन या महामार्गावर ठिकठिकाणी असलेल्या मृत्यूच्या सापळयामधून प्रवास करणाऱ्या कोकणातील जनतेला भयमुक्त करावे.

सभापती महोदय, विमानतळांच्या बाबतीत सुध्दा माझे तेच म्हणणे आहे. आमचा सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केला जातो. परंतु या जिल्हयाच्या पर्यटन विकासासाठी मिळालेला निधी दुसरीकडे वळविला जातो. 750 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेल्या कोकणामध्ये पर्यटन विकासासाठी केंद्र शासनाने 250 कोटी रुपये पाच वर्षासाठी दिले होते. या जिल्हयामध्ये पर्यटन व्यवसायाला मोठया प्रमाणात चालना मिळावी असा त्यामागील उद्देश होता. त्याकरिता दरवर्षी 65 कोटी रुपये मिळणार होते. परंतु त्याचे पुढे काय झाले हे माहीत नाही. पर्यटन जिल्हा जाहीर करुन आमच्या सिंधुदुर्ग जिल्हयाला काय मिळाले? या जिल्हयामध्ये चिपी येथे विमानतळ उभारण्यासाठी यापूर्वी दहा वेळा भूमिपूजन करण्यात आले. युती सरकारच्या काळात दोन वेळा भूमिपूजन झाले. तेव्हा आपण आतातरी या विमानतळाच्या उभारणीसाठी निधी द्यावा. आज गोव्याच्या विमानतळावर विमाने उभी करण्यासाठी जागा नाही. आमच्या या विमानतळावर तरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

छोटी-मोठी विमाने येतील. परंतु त्याठिकाणी विमानतळ नसल्यामुळे "धोबी नाही आणि तलाव नाही" अशी धोबीतलावसारखी अवस्था झाली आहे. यानिमित्ताने विमानतळांच्या विकासाठी शासनाने निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी अभिनंदन करतो. त्याबाबत शासनाने लवकरात लवकर कारवाई करावी.

सभापती महोदय, मी या सभागृहामध्ये सात ते आठ वर्षे सदस्य म्हणून काम करीत आहे. दरवर्षी या सभागृहामध्ये माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण होत असते. यावर्षी आपल्या राज्यामध्ये नवीन राज्यपाल महोदय आले असून त्यांना मराठी येवो अथवा न येवो त्यांनी अभिभाषणाची सुरुवात व शेवटची वाक्ये मराठीमध्ये वाचून दाखविण्याचा अत्यंत प्रभावीपणे प्रयत्न केला. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

शेवटी नियमाप्रमाणे सर्व झाल्यानंतर म्हणजे पूजा संपल्यानंतर तीर्थप्रसाद वाटला जातो, तेव्हा मंत्र म्हटला जातो. गेल्या 50 वर्षाच्या काळापासून आमचा सीमा प्रश्न रेंगाळलेला आहे. त्याबाबतीत केंद्र शासनाने सुप्रीम कोटामध्ये दावा दाखल केलेला असून एकसंघ मराठी राज्य व्हावयास पाहिजे. आज आम्ही या राज्याच्या स्थापनेला 50 वर्षे पूर्ण झाली म्हणून सोहळे करीत आहोत. परंतु या कालावधीमध्ये आम्ही सीमावादाचा प्रश्न दूर करु शकलो नाही हे आमचे दुर्दैव आहे. 50 वर्षे संपूर्ण महाराष्ट्रात आम्ही एकोप्याने रहात होतो, पण आज दुर्देवाने या राज्यामध्ये त्याला कुठेतरी नख लावण्याचा प्रयत्न होत आहे. मी विदर्भाच्या विरोधात नाही. माझ्या पक्षाने भूमिका घेतलेली आहे आणि विदर्भाच्या जनतेला स्वतंत्र विदर्भ पाहिजे असेल तर आमची कोणतीही हरकत त्याठिकाणी रहाणार नाही. तुम्हाला मान्य करावयास पाहिजे. म्हणून कोणत्याही परिस्थितीत माननीय राज्यपालांचे अभिभाषण असो किंवा नसो,पण उद्या . . . .

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा हकरतीचा मुद्दा आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत आपले मत व्यक्त करीत असताना मला असे सांगावयाचे आहे की, सन्माननीय सदस्यांकडे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत आहे आणि त्यामध्ये सुस्पष्टपणे परिच्छेद दिलेले आहेत. त्यामध्ये सन्माननीय सदस्य ज्याचा उल्लेख करीत आहेत, तो भाग नाही. म्हणून सदरहू उल्लेख रेकॉर्डवर येऊ नये अशी माझी विनंती आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी याठिकाणी तो विषय आणण्याचा प्रयत्न करीत नाही. प्रश्न असा आहे की, अखंड महाराष्ट्रासाठी 105 हुतात्म्यांनी बलिदान दिलेले आहे . . . .

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विदर्भाच्या संबंधात उल्लेख केला आहे म्हणून मी सांगत आहे आणि या विषयाचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणा मध्ये कुठेही नाही. मलाही समजते, कारण मी देखील विधानसभेमध्ये आणि आता विधान परिषदेमध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या अनुषंगाने मते मांडलेली आहेत. मला जे वाटले ते मी सांगितले. सभापती महोदय, आपण त्याबाबत रुलींग द्यावे.

**तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड)** : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, आपले भाषण सुरु होऊन बराच वेळ झालेला आहे.

. . . .यु-2

20-03-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) U-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी एकच गोष्ट सांगू इच्छितो.

(काही सन्माननीय सदस्य आपसात बोलतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपसात चर्चा करु नये. सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल तेव्हा त्यांनी बोलावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मला शेवटचा मुद्दा मांडावयाचा आहे. या राज्याच्या विकासासाठी लागणारा निधी आहे, त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करीत असताना हे राज्य डोळयासमोर ठेऊन तरतूद केली पाहिजे. त्यामुळे राज्यातील कोणत्याही भागामधील लोकांमध्ये स्वतंत्र होण्याची भूमिका निर्माण होऊ नये आणि तशी त्यांनी ती घेता कामा नये अशा प्रकारची परिस्थिती आपण संपूर्ण राज्यामध्ये निर्माण करु या. ज्याप्रमाणे 1960 साठी हे राज्य ज्या प्रमाणे एकसंघ राहिले, तशाच प्रकारे हे राज्य यापुढेही एकसंघ राहील अशा प्रकारे आपण येथे कामकाज करु या अशी मी या चर्चेच्या निमित्ताने आशा व्यक्त करतो आणि सन्माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाला समर्थन देऊन मी माझे भाषण संपवितो.

----

**तालिका सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सूचना करु इच्छितो की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संबंधात अनेक सन्माननीय सदस्यांना भाषण करावयाचे असल्याने सर्वांना वेळेचे बंधन पाळावे लागेल.त्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी दहा-दहा मिनिटांमध्ये आपले भाषण संपवावे.

. . . .यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, दिनांक 18 मार्च 2010 रोजी या राज्याच्या नामदार राज्यपालांनी मध्यवर्ती सभागृहामध्ये केलेल्या अभिभाषणावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था ही बरोबर नाही असे राज्यातील सर्वसामान्य जनता म्हणते असे नाही तर या राज्यातील माननीय गृहमंत्रीच सांगत आहेत की, याठिकाणी मला संरक्षण मिळत नाही. माननीय श्री.छगन भुजबळसाहेब, याठिकाणी जे राज्य स्वत:च्या मंत्री महोदयांना संरक्षण देऊ शकत नसेल आणि सन्माननीय सदस्य श्री.भाई जगतापसाहेब, त्याबाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख नाही याचा मला खेद होत आहे. याठिकाणी मी निश्चितपणे सांगेन.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

सभापती महोदय, या राज्याचे गृहराज्यमंत्री मिडियामध्ये जाऊन सांगतात की, मी या राज्यामध्ये सुरक्षित नाही. माझा दुसरा आक्षेप असा आहे की, मंत्रिमहोदयांना राज्य शासनाबाबत जाहीररीत्या बोलण्याचा अधिकार नाही. त्यांनी गुप्ततेची शपथ घेतलेली आहे. मी गुप्तता राखीन अशी शपथ त्यांनी घेतलेली आहे. असे असताना या ते राज्य घटनेतील नियम धाब्यावर बसवित आहेत. अशा मंत्र्यांवर कारवाई झाली पाहिजे. ते दलित आहेत म्हणून त्यांना संरक्षण मिळत नाही. ते जाहीररीत्या सांगतात की, मी दलित आहे म्हणून मला चांगली वागणूक मिळत नाही. त्यांचा दुसरा आक्षेप असा आहे की, अधिकारी मला विचारत नाहीत. मी दलित आहे म्हणून अधिकारी माझे निर्णय, मी दिलेले आदेश पाळत नाहीत.

श्री. दिवाकर रावते : त्या संबंधित मंत्र्यांना सभागृहात बोलवावयास सांगावे. यावेळी ते समोर उपस्थित असले पाहिजेत.

श्री. जयंत प्र. पाटील : तो माननीय सभापतींचा अधिकार आहे. सभापती महोदय, या राज्याच्या राज्यमंत्र्यांना कमिशनर पत्र देऊ शकतो की, मी आपले निर्णय पाळू शकत नाही, आपले आदेश पाळू शकत नाही तर हे राज्य कोण चालवितो ? हे राज्य नोकर चालवितात काय ? आयएएस अधिकारी राज्य चालवितात की माननीय उपमुख्यमंत्री श्री. भुजबळ साहेब राज्य चालवितात असा माझा सवाल आहे. आपण या वरिष्ठ सभागृहामध्ये चर्चा करीत आहोत. या वरिष्ठ सभागृहामध्ये आपण जर त्याची दखल घेतली नाही तर हे आयएएस अधिकारी या ठिकाणी येऊन बसतील आणि राज्यकारभार करावयास लागतील. म्हणून या अधिवेशनात याबाबतीत निर्णय झाला पाहिजे. या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत मी अनेक वेळा बोललो आहे. राज्यामध्ये अनेक ठिकाणी हल्ले होत आहेत. लूटमार होत आहे. माननीय गृहमंत्री आर.आर.पाटील हे पोपटासारखे गोडगोड बोलतात पण प्रत्यक्ष अंमलबजावणी नाही. माननीय श्री. भुजबळ साहेब गृहमंत्री असताना बरे बोलत होते. मला असे वाटते की याबाबतीत खुलासा करावयास पाहिजे. माननीय उपमुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. राज्याच्या मंत्र्यांना तरी नियम सांगा. काय बोलावयाचे आणि काय बोलू नये हे त्यांना सांगावे. कॅबिनेटमधील भांडणे, पायाभूत सुविधा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. जयंत प्र. पाटील .....

समितीमधील भांडणे राजरोसपणे मिडियामध्ये येतात. मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर त्यांची माहिती बाहेर येते. हा कारभार कोण करीत आहे ? माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये याबाबत काही उल्लेख केला नाही याबद्दल मला खेद वाटतो. दलित मंत्री आहेत त्यांची काही दखल घेतली जात नाही याचा मला खेद होतो. मी माननीय उपमुख्यमंत्री श्री. भुजबळ साहेबांना सांगू इच्छितो की, मला भरपूर खेद होत आहे.

सभापती महोदय, मी निश्चितपणे सांगेन की, राज्यातील अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. मी चळवळीतून आलेला कार्यकर्ता आहे. मी चळवळीतून तयार झालेला, अभ्यासवर्गातून तयार झालेला कार्यकर्ता आहे. या पध्दतीचा राज्यकारभार चाललेला आहे ते पाहून मी दु:खद अंत:करणाने बोलतो की, मला आमदार म्हणून बोलण्यासाठी लाज वाटते. मी खऱ्या अर्थाने आणि दु:खद अंत:करणाने बोलतो की, मला आमदार म्हणून बोलण्यासाठी लाज वाटते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/ यापूर्वी श्री.बरवड 11:50

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.जयंत प्र.पाटील.....

मी कालच अलिबाग येथे गेलो होतो. त्याठिकाणी माझ्याकडे एक कार्यकर्ता मदतीच्या अपेक्षेने आला होता. परंतु त्याला मी सांगितले की, मी तुला मदत करु शकत नाही, मी हतबल आहे. मी त्याला न्याय देऊ शकत नाही. मंत्रिमहोदय, आपण नाशिकमध्ये राहता. परंतु आता तलाठयांच्या संपत्तीचा मुलभूत प्रश्न निर्माण झालेला आहे. एका तलाठयाचा बंगला 1 कोटीचा आहे. तलाठयाचे काम तलाठी करीत नाही. शासनाने तलाठयांची हस्त लिखिते तपासावीत. त्यांनी महिन्याला दोन हजार रुपये पगारावर सुशिक्षित बेकारांना नोकरीवर ठेवले आहे. ते लोक 7/12 चा उतारा देतात. तलाठी मात्र मोठया गाडीतून फिरतात. या राज्यातील एक आमदार, या सभागृहाचा एक प्रतिनिधी 7/12 उताऱ्याच्या कामासाठी तलाठयाकडे गेल्यावर ते माझ्याकडे पैसे मागतात. आमदार जयंत पाटील यांच्याकडे पैसे मागतात. हा जो गैरव्यवहार उघडपणे सुरु आहे तो शासनाने बंद केला पाहिजे. अन्यथा, या राज्यातील अधिकारी पैशाच्या जोरावर राज्यकर्ते होतील, आपल्या बायका, पोरांना लोकसभा, विधानसभेला उभे करतील आणि राज्यकर्त्यांच्या हातातील सत्ता त्यांच्या हातामध्ये जाईल. ही खरी या राज्याची शोकांतिका आहे. सभापती महोदय, रायगड जिल्हयाच्या जिल्हाधिकारीपदी पोस्टिंग मिळण्याची किंमत 10-15 कोटी आहे. सभापती महोदय, भ्रष्टाचाराचे आणखी एक उदाहरण मी सांगतो. माझ्या गाडीच्या ड्रायव्हरचे एन.ए.चे काम होते. त्या कामासाठी त्याच्याकडून 2 लाख रुपये घेतले गेले. तो मला म्हणाला, साहेब, काय चालले आहे, माझ्याकडून एन.ए.च्या कामासाठी 2 लाख रुपये घेतले. हे सांगण्याचा हेतू असा आहे की, तेथे असा भाव चालू आहे. सगळयांचे हेच दु:ख आहे, पण कोणी बोलत नाही. या राज्यामध्ये कोणतेही काम असेल तर पैसे दिल्याशिवाय एकही काम होत नाही. राज्यात प्रचंड भ्रष्टाचार सुरु आहे. परंतु त्याला सरकारला आळा घालता येत नाही, सरकार हतबल आहे. म्हणून मी मघाशी म्हणालो की, आमदार म्हणून बोलण्यासाठी मला लाज वाटते. मी आमदार आहे, परंतु मी कधी बूट वापरत नाही, मी पायात चप्पल घालतो. वर्षातून 4 वेळा कपडे घेतो. मी खादी टोपी घालत नाही. खादीचे कपडे वापरत नाही आणि बाकीचा रुबाब सुध्दा करीत नाही. परंतु आज सर्वसामान्य जनता लोकप्रतिनिधीकडे संशयाने बघत आहे. म्हणून

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्री.जयंत प्र.पाटील....

शासनाने ही सिस्टिम बदलली पाहिजे. त्यासंबंधी सभागृहात प्रामुख्याने चर्चा झाली पाहिजे. सभागृहात आपण एकमेकांवर आरोप, प्रत्यारोप करतो. परंतु बाहेर सर्वसामान्य जनतेच्या दु:खाकडे कोणी पहात नाही. याची चर्चा, याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही, याचा मला खेद वाटत आहे.

सभापती महोदय, मला अनेक मुद्दे मांडावयाचे आहेत, परंतु ते मी अर्थसंकल्पीय चर्चेच्या वेळी मांडीन. सभापती महोदय, याठिकाणी काम करीत असताना मला भीती वाटते. आपल्याकडे काही शिष्टाचार आहे. तहसीलदार आम्हाला फोटोपास देत नाही. मी त्यांच्याकडे अनेक वेळा मागणी केली आहे. तहसीलदार त्यांच्या कार्यालयात वर बसतात आणि सभापती खाली बसतात. सभापती खाली बसून त्यांच्याकडे मागणी करतात की, साहेब, आमचे हे काम करुन द्यावे. म्हणजे तहसीलदार मोठे की सभापती मोठे ? हे चित्र बदलण्याची आवश्यकता आहे. यासंबंधी सभागृहात गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे.

यानंतर श्री.ओटवणेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, आपण मला वेळ कमी दिलेला आहे. त्यामुळे मी 2-3 मुद्यांचा परामर्श घेणार आहे. गेल्या नागरपूरच्या अधिवेशनामध्ये दारू निर्मितीवरून सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि माझ्यात वाद झाला होता. मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांची नम्रपूर्वक माफी मागतो, दिलगिरी व्यक्त करतो. कोकणामध्ये काजूच्या बोंडाची विक्री होते. या बोंडावर प्रक्रिया केल्यानंतर दारू तयार होते. आपल्या शेजारच्या गोवा राज्यामध्ये काजू पासून मद्य निर्मिती करण्यात येते. पण येथे काजू पासून मद्य निर्माण करण्यावर बंदी आहे. करवंद, जांभूळ यापासून दारू निर्मिती होत असेल तर त्याला आमचा पाठिंबा आहे, असे मी म्हणालो होतो. पण आता मी तो विचार बदलला आहे. यासंबंधी मी अभ्यास केल्यानंतर हे किती भयानक आहे हे माझ्या लक्षात आले. मी सन्माननीय मंत्री श्री.जयदत्त क्षीरसागर यांना सांगू इच्छितो की, आपले सहकारी साखर कारखाने वाचविण्यासाठी शासनाने 600 कोटी रूपयांची सबसिडी दिली आहे. माननीय सदस्य श्री.अरूणभाई गुजराथी हे गांधीवादी आहेत. त्यांना धान्यापासून दारू निर्मिती करण्याचे प्रकल्प कोणाकोणाचे आहेत हे मी सांगू इच्छितो. एकूण 25 प्रकल्प आहेत. श्री.विलासराव देशमुख यांचा पुत्र श्री.नीरज विलासराव देशमुख यांचा मद्य निर्मितीचा कारखाना सुरू आहे. श्री.गोविंदराव आदिक यांच्या मुलाचा देखील कारखाना सुरू आहे. श्री.प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या मुलाचा देखील कारखाना सुरू आहे. श्री.गोपीनाथ मुंडे, श्री.गणेश नाईक यांचा देखील कारखाना सुरू आहे. त्यामुळे दारू निर्मितीबाबत शासनाने जो निर्णय घेतला आहे, तो बदलला पाहिजे. हे काय चालले आहे ? आज शासनाकडे वीज बिल भरायला पैसे नाहीत. रस्ते तयार करण्यासाठी पैसे नाहीत. असे असताना शासनाने 600 कोटी रूपयांची सबसिडी साखर कारखान्यांना दिलेली आहे. त्यापैकी 200 कोटी रूपये वाटले आहेत. त्यामुळे माझी या निमित्ताने मागणी आहे की, ही सगळी सबसिडी आपण काढून घेतली पाहिजे. काजू, करवंद, जांभूळ यांच्यापासून दारू निर्मिती होईल म्हणून मी आधी भाष्य केले होते. त्याबद्दल मी पुन्हा सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांची माफी मागतो. आदरणीय श्री.अण्णा हजारे यांनी त्यांच्या चळवळीच्या माध्यमातून धान्यापासून दारू निर्मितीच्या विरोधात आवाज उठविल्यामुळे शासनाला आपले धोरण बदलणे भाग पडत आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती चंद्रकांत पाटील)**

श्री.जयंत प्र.पाटील....

आज साखर कारखान्यांची स्थिती काय आहे ? साखर कारखान्यांवर 150 कोटीचे लोन आहे. ते साखर कारखाने 10 कोटी रूपयाला विकत घेण्याचा विक्रम आपले लोक करीत आहेत. हे खऱ्या अर्थाने बदलले पाहिजे. सर्वसामान्य जनतेला वाटले पाहिजे की, हे आपले सरकार आहे. राज्यकर्ते आपल्या भल्यासाठी, उन्नसाठी सरकार चालवित आहे. मात्र, असे चित्र येथे दिसत नाही, असे मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते.

येथे शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. कोकणातील शेत जमिनी उधाणामुळे नष्ट होतात. यावर बोलण्याची संधी मला काल मिळाली.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ MMP/ D/ पूर्वी श्री. ओटवणेकर 12:00

(श्री. जयंत प्र. पाटील...

सभापती महोदय, 740 कि.मी.च्या आमच्या सागरी किना-याला मागील 50 वर्षात कधी बसला नाही एवढा जबरदस्त तडाख फयान वादळाचा बसला आहे. त्यामध्ये हजारो एकर जमीन पाण्याखाली गेली. केवळ नजरअंदाजे 700 ते 800 कोटीचे नुकसान झालेले असताना त्याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये एका रुपयाच्या मदतीचा देखील उल्लेख नाही. कोकणावर नेहमीच अन्याय केला जातो. या निमित्ताने मी शासनाला विनंती करतो की, खास बाब म्हणून संपूर्ण बाहेरकाटे तातडीने बांधावेत. हे बाहेरकाटे न बांधल्यामुळे ज्यांची शेती 5 वर्षे नापिक राहाणार आहे त्यांना नुकसान भरपाई दिली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी धन्यवाद देतो. त्यांच्या पक्षाचे धोरण वेगळे आहे. अखंड महाराष्ट्र राहिला पाहिजे असे आमच्या पक्षाचे धोरण आहे. भाजपचे धोरण वेगळे आहे. त्यांना छोटी छोटी राज्ये हवी आहेत. आमचे म्हणणे असे आहे की, ज्या 105 हुतात्म्यांनी रक्त सांडून महाराष्ट्र निर्माण केला त्यांचे ते सांडलेले रक्त वाया जाता कामा नये. सभापती महोदय, मी अनेक वेळा सीमाप्रश्नासंबंधी या सभागृहामध्ये बोललो आहे. मध्यवर्ती सभागृहामध्ये होणा-या अभिभाषणामध्ये सीमाप्रश्नाचा उल्लेख झाला की ते अभिभाषण संपते आणि मग टाळ्या वाजविल्या जातात. गेल्या 8 वर्षापासून मध्यवर्ती सभागृहामध्ये हे असेच घडत असल्याचे मी पहात आहे. ..(अडथळा).. सन्माननीय वन मंत्री सभागृहामध्ये हजर होत आहेत. सभापती महोदय, सीमाप्रश्नासंबंधी राज्य शासनाने केन्द्र सरकार विरुध्द सर्वोच्च न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला असून त्या दाव्याला अजून केन्द्र सरकारने आपले म्हणणे सादर केलेले नाही. केन्द्र सरकार या महाराष्ट्रावर अन्याय करीत आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. मी माननीय वन मंत्री डॉ. पंतगराव कदम यांना विनंती करीन की, केन्द्रामध्ये कॉंग्रेस पक्षाचे सरकार असल्यामुळे, त्यांनी आपले वजन वापरुन महाराष्ट्र सरकारच्या बाजूने निर्णय घेण्यासाठी केन्द्र सरकारला भाग पाडावे. सभापती महोदय, बेळगाव, कारवार, निपाणी येथील सीमावाशीय मराठी बांधव गेल्या 50 वर्षापासून महाराष्ट्रामध्ये येऊ पहात आहेत. त्यांना या अखंड महाराष्ट्रामध्ये येण्याची संधी मिळावी, एवढे बोलून आणि मला बोलण्याची संधी दिली याबद्दल सभापती महोदय, आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

---

..2..

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणवर खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

कालपासून अनेक सन्माननीय सदस्यानी राज्यपालांच्या अभिभाषणावर आपापले विचार मांडलेले आहेत. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये एकूण 57 मुद्दे आहेत. हे महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरु आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये महाराष्ट्रातील जनतेला दिलासा देणा-या एकाही गोष्टीचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. नागपूरच्या अधिवेशनामध्ये सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा विषयक , शेती विषयक धोरणे जाहीर करण्यात येतील असे शासनाने सांगितलेले होते. परंतु कोणत्याही प्रकारचे धोरण नसलेले हे सरकार आहे असे राज्यपालांच्या अभिभाषणावरुन वाटते. नागपूरच्या अधिवेशनामध्ये धोरणे जाहीर करीत असताना कोणाला विश्वासात घेतले होते हे मला माहीत नाही. परंतु त्यापैकी एकाही धोरणाचा या अभिभाषणामध्ये उल्लेख नाही याचा खेद वाटतो. या महाराष्ट्राने आंतरराष्ट्रीय दर्जाचे अनेक क्रीडापटू घडविलेले आहेत. महाराष्ट्रातील खेळाडुंनी भारताचे नाव संपूर्ण जगामध्ये केले आहे. क्रीडा विषयक शासनाचे धोरण काय राहाणार आहे यासंबंध एक वाक्य देखील या अभिभाषणामध्ये नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर......

कुठेतरी आम्ही क्रीडा अकादमी सुरु करु असे म्हटले आहे. ज्या महाराष्ट्रातील खेळाडूंनी जगावर राज्य केले, खेळांमध्ये प्राविण्य मिळविले त्या संदर्भात उल्लेख केलेला नाही. सांस्कृतिक धोरणाच्या संदर्भात देखील कोणाला विश्वासात घेतलेले नाही. सांस्कृतिक धोरणाच्या संदर्भातील मसुदा तयार आहे असे म्हटले जाते. परंतु विरोधी पक्षातील लोकांना विश्वासात घेतले नाही आणि शासनाने सांस्कृतिक धोरणाचा मसुदा तयार केला. शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात शासन म्हणते की, आम्ही शैक्षणिक धोरण जाहीर करु. परंतु केवळ शालांत, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाबद्दल उल्लेख केला आहे. ज्या महाराष्ट्रामध्ये शिक्षण हा पाया आहे, महाराष्ट्राला पुढे न्यायचे असेल तर शिक्षण महत्वाचे आहे त्या संदर्भातील धोरण आवश्यक आहे. शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींना, शैक्षणिक क्षेत्रातील लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन शैक्षणिक धोरण जाहीर केले पाहिजे. त्याचा साधा उल्लेख देखील अभिभाषणात केलेला नाही. त्यामुळे कशाबद्दल आम्ही माननीय राज्यपालांचे अभिनंदन करायचे? शिक्षणाच्या संदर्भात या महाराष्ट्रामध्ये ज्या गोष्टी घडत आहेत, मग एटीकेटी असेल, विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न असेल, बेस्ट ऑफ फाईव्हचे धोरण असेल, मागील वर्षीचा ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा मुद्दा असेल, पूर्ण वेळ शिक्षणमंत्री या महाराष्ट्राला मिळत नाही यासारख्या दुर्दैवाच्या गोष्टी महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात घडत आहेत. परंतु शासन शिक्षणाच्या महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला तयार नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे हे सरकार कोणतेही धोरण नसलेले सरकार आहे की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पूर्वी शेतकरी आत्महत्या करीत होते. आता विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होत आहेत. त्या संदर्भात शासनाकडे कोणतेही धोरण नाही. या महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाला त्याच्या शेतीसाठी पाणी मिळत नाही, प्यायला पाणी मिळत नाही, उद्योग बंद पडत आहेत, रस्त्यांची सोय नाही, पुरेसा वीज पुरवठा उपलब्ध नाही. या महाराष्ट्रामध्ये असे काय आहे, ज्याबद्दल आम्हाला अभिमान वाटावा? या महाराष्ट्रामध्ये सरकारने काय केले आहे ज्याबद्दल आम्ही अभिनंदन करावे? एकाही विषयामध्ये राज्य सरकारने विशेष असे काही केलेले नाही. शेतकरी असो, शेतमजूर असो, मागासवर्गीय असोत, विद्यार्थी, महिला, उद्योजक यापैकी कोणाला समाधान मिळेल असे काही घडत नाही. म्हणून आम्हाला खेद व्यक्त करावासा वाटतो. या महाराष्ट्रामध्ये माणसे विकली जाऊ लागली आहेत. माणसे विकत घेऊ लागली. असे म्हणतात, पूर्वी कसे छान होते. आजचे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 12:05

श्री.संजय केळकर......

महाराष्ट्राचे राज्य हे धनदांडग्यांचा हाती आहे की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

सुरक्षेबाबतच्या अनेक उपाययोजना अभिभाषणामध्ये नमूद केल्या आहेत. अभिभाषणामध्ये जे नाही ते मी मांडणार नाही. जे आहे त्याबद्दल विचार मांडणे हे आमचे काम आहे. सुरक्षेच्या संदर्भात भूमिका मांडत असताना या महाराष्ट्रामध्ये आंदोलन करायचे की नाही अशा प्रकारची भीती संघटना आणि सर्वसामान्य माणसांमध्ये, राजकीय पक्षांना वाटू लागली आहे. आंदोलन केले की लाठीमार करायचा, अश्रूधुराच्या नळकांड्या फोडायच्या. ब्रिटिशांना लाजवेल अशा प्रकारचा अत्याचार पोलिसांच्या माध्यमातून करायचा अशी भूमिका महाराष्ट्र शासन घेत आहे. वसई येथील घटनेचा उल्लेख झाला. त्या संदर्भात वेगळी चर्चा होणार आहे. परंतु अत्यंत निर्दयपणे मारहाण केली गेली. सामान्य माणसांना लाठ्यांनी मारले गेले. मी प्रत्येक घरात जाऊन चौकशी केली. वाघोली गावातील 35 घरांमध्ये घुसून दारु पिऊन पोलिसांनी अत्याचार केले. त्या प्रत्येक घरातील प्रत्येक अत्याचारी माणसाला भेटून आलो. त्यावेळी लक्षात आले की, हे सुवर्ण महोत्सवी वर्षे आहे की अत्याचाराचे वर्ष आहे. 5 मार्च हा वसईतील नागरिकांच्या दृष्टीने काळा दिवस होता. महाराष्ट्र राज्य हे अग्रेसर राज्य आहे. महाराष्ट्राला लोकशाही परंपरा आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

अशा राज्यात अशा प्रकारचे अत्याचार पहायला मिळाले ही दुर्दैवाची गोष्ट आहे. 85 वर्षाचा म्हातारा, ज्याने अन्न व पाणी सुध्दा सोडल्याचे डॉक्टर सांगतात एवढ्या वयस्कर माणसाला सुध्दा पोलिसांनी सोडले नाही. अशा प्रकारचे हे शासन शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेऊन राज्य करीत असल्याचे सांगते आणि दुसऱ्या बाजूला मात्र पोलिसांमार्फत असे अत्याचार होत आहेत.

महोदय, आज मागासवर्गीयांवर सुध्दा हे शासन अत्याचार करीत आहेत. मागासवर्गीयांच्या विकासासाठी शासन कटिबध्द असल्याचे शासन म्हणते परंतु त्यांच्या शिष्यवृत्तीसाठी तीन-चार वर्षे लागतात तरी देखील त्यांना न्याय मिळत नाही. अशा अनेक मागासवर्गीय मुलांनी आमच्याकडे तक्रारी केल्या व त्यांना आम्ही न्याय मिळवून दिलेला आहे. दलित बांधवांसाठी शासन आर्थिक तरतूद करते असे म्हणते परंतु तो पैसा पूर्ण वापरला आहे काय हे शासनाने स्वत:लाच विचारुन पहावे.

महोदय, या राज्यात जो मागासवर्गीय आहे, ज्याच्याकडे जमीन नाही त्यांच्यासाठी इतक्या प्रकारच्या योजना शासनाने तयार केल्या परंतु त्या योजनांचा लाभ मात्र दलितांना मिळत नाही. मी स्वत: चार जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आणि समाजकल्याण अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली असता मला समजले की मागासवर्गीय अत्पल्पभूधारकांसाठी 2 ते 5 एकर जमीन शासनाकडून देण्यात येईल अशी एक योजना आहे. परंतु मागासवर्गीयांपैकी कुठल्या व्यक्तीला अशी जमीन शासनाने दिली त्याची माहिती शासनाने येथे दिली पाहिजे. ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांमध्ये एक इंच सुध्दा जमीन या लोकांना मिळालेली नाही, कसली योजना शासन राबविते हेच मला समजत नाही.

त्याचप्रमाणे मागासवर्गीयांना उपस्थिती भत्ता देऊन त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याची एक योजना आहे परंतु शासनाने किती विद्यार्थ्यांना असा उपस्थिती भत्ता दिलेला आहे त्याची नोंद शासनाकडे सुध्दा नाही. केवळ शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेऊन राज्य चालविण्याऐवजी अशा गोरगरिबांना लाभ कसा मिळेल याचा विचार शासनाने करणे आवश्यक आहे. आतापर्यंत किती लोकांना असा लाभ दिला याचा मात्र कुठेही उल्लेख दिसत नाही किंवा कुठल्याही प्रकारचे धोरण शासनाकडे नाही म्हणूनच आम्हाला खेद करावासा वाटतो. कारण हे शासन केवळ

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ......

पोकळ आश्वासने सभागृहात आणि बाहेरही देत बसते आणि अशा प्रकारे पोकळ आश्वासने देऊन राज्याचा विकास होणार नाही तर सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये अशा कितीतरी गोष्टी करता येण्यासारख्या आहेत, त्या शासनाने केल्या पाहिजेत. राज्याचा एके काळी संपूर्ण देशात जो अव्वल नंबर होता त्या राज्यात आज 2.10 लाख करोडचे कर्ज प्रत्येक माणसावर या शासनाने गेल्या दहा वर्षात करुन ठेवलेले आहे. राज्यात जन्माला आलेला प्रत्येक माणूस आज जवळपास 10 हजार रुपयाचे कर्ज डोक्यावर घेऊन या जगात येतो, अशी या राज्याची आजची स्थिती आहे म्हणूनच आम्हाला खेद वाटतो.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात फयान चक्रीवादळ तसेच अतिवृष्टीमुळे ग्रस्त झालेल्या लोकांना मदतीचा हात दिल्याचा उल्लेख आहे. परंतु कोकणात फयानग्रस्त लोकांना अजुनही मदत मिळाली नाही. यापूर्वी जेव्हा चर्चा झाली होती त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, अजुनही पंचनामे झालेले नाहीत. हे मी केवळ विधिमंडळात बोलत नाही तर प्रत्यक्षपणे माझ्याकडे तशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. कोकणातील राजापूर तालुक्यातील "भू" या गावात प्रत्यक्ष जाऊन मी परिस्थिती पाहून आलो आहे. या भागात नदी व नाल्यांची दिशा बदलली, अशा प्रकारे प्रवाह बदलल्यामुळे लोकांचे अतोनात हाल झाले व अशा बाधित लोकांना अद्यापही मदत मिळाली नाही. दुष्काळी परिस्थितीतील 121 तालुक्यांसाठी स्वतंत्र पॅकेज राबविण्यात येत असल्याचे सांगितले परंतु विकासापासून प्रत्यक्ष वंचित राहिलेल्या 8 तालुक्यांचाही विकास व्हावा म्हणून जो डीपीडीसीचा ठराव शासनाकडे गेला तो वर्षभरापासून मंत्रालयात धूळ खात पडलेला आहे, त्याबाबत काहीही निर्णय झालेला नाही.

महोदय, ठाणे जिल्हा विभाजनाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय स्वत: येऊन गेले. भौगोलिकदृष्ट्या मोठा असलेला ठाणे जिल्हा प्रशासकीय काम करण्यासाठी सुध्दा अडचणीचा ठरतो. जिल्हाधिकारी एखाद्या ठिकाणी केंद्र म्हणून जाऊन बसले तरी 110 किलोमीटरवर ते पोहचू शकत नाहीत. विधिमंडळात सुध्दा ठाणे जिल्ह्याबाहेरच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी जिल्हा विभाजनाच्या बाबतीत मागणी केली आहे, इतके प्रश्न ठाणे जिल्ह्याच्या बाबतीत निर्माण होत आहेत. कारण ठाणे जिल्ह्याचे विभाजन अत्यंत आवश्यक झालेले आहे. या जिल्ह्यातील

....3...



PFK/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. भोगले...... 12:10

श्री. संजय केळकर .......

प्रशासकीय सेवा कोलमटलेली आहे. इतर ठिकाणी जिल्ह्यांचे विभाजन शासनाने केले परंतु या जिल्ह्याकडे मात्र असे दुर्लक्ष का होत आहे याचा बोध होत नाही. माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री असताना त्यांनी आम्हाला चर्चेसाठी बोलावले होते आणि असेही ठरले होते की, 26 जानेवारी रोजी यासंबंधीची अधिकृत घोषणा करण्यात येईल. पण त्याबाबत अजुनही काहीच प्रयत्न नाही किंवा अभिभाषणातही उल्लेख नाही. या राज्यामध्ये शासनाने सन 2008-09 मध्ये 6359 कोटी एवढा खर्च करुन 3540 दशलक्ष घनमीटर एवढी सिंचन क्षमता निर्माण केल्याचे म्हटले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ...

महोदय, सर्वात जास्त व मोठी धरणे महाराष्ट्रात असतांनाही महाराष्ट्रातील ओलिताखालील क्षेत्र केवळ 5 टक्के एवढेच आहे. शासनाच्या चुकीच्या नियोजनामुळेच आज आपल्यावर जलसंकट ओढवलेले आहे. पाण्याच्या संदर्भात राज्य शासनाने शास्त्रशुध्द नियोजन केलेले नसल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. महाराष्ट्रात असे एकही गाव नाही की, त्या ठिकाणच्या जनतेला पाण्यासाठी वणवण फिरावे लागत नाही. त्यामुळे लघुपाणलोट क्षेत्र विकासाचे नियोजन आणि त्याची अंमलबजावणी व्यवस्थित होणे ही काळाची गरज आहे. परंतु यासंदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात कोठेही उल्लेख नाही. मोठमोठया धरणासाठी आम्ही एवढया कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी घेतली, अमुक केले, तमुक केले असे म्हटले जाते परंतु आज ठाणे जिल्हयाची लोकसंख्या जवळ जवळ 1.25 कोटी झालेली असतांना ठाणे जिल्हयात शासनाने एकही धरण उभे केलेले नाही, धरणासाठी एमएमआरडीएने पैसे दिलेले नाहीत. ठाणे जिल्हयात जी काही धरणे आहेत ती मुंबईसाठी पाणी पुरवठा करण्यासाठी आहेत. परंतु ठाणे जिल्हयाच्या धरणाच्या बाजूला राहणा-या लोकांना मात्र पाणी मिळत नाही. लघुपाणलोट क्षेत्र विकासाचे नियोजन आणि अंमलबजावणी केली तरच पाण्याचा आणि रोजगाराचा ठाणे जिल्हयाचा प्रश्न सुटू शकेल. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक पसंतीचे राज्य आहे, असे म्हटले जाते परंतु आज महाराष्ट्राची काय अवस्था आहे ? आज राज्यातील उद्योग बंद पडत आहेत, आजारी पडत आहेत परंतु या कारखान्यांना कोणत्याही प्रकारचे प्रोत्साहन शासनाकडून मिळत नाही. आम्ही विरोधी पक्षाचे सदस्य नेहमी सकारात्मक दृष्टया विचार मांडत असतो परंतु सत्ताधारी नेहमी म्हणत असतात की, विरोधक राजकारण करतात. राज्यात आज युवकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या पाहिजेत यासाठी आम्ही सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करीत असतांना देखील त्यास पाहिजे तसा सपोर्ट आम्हाला मिळत नाही. आज अन्य ठिकाणी आयटी पार्क उभारले गेले आहेत परंतु कोकणामध्ये कोणत्याही प्रकारचे आयटी पार्क उभारले गेले नाहीत. कोकणातील मुलांना पुणे, मुंबई, बंगलोर किंवा परदेशात आयटी शिक्षण घेण्यासाठी जावे लागते. कोकणात आयटी पार्क उभारण्यासाठी हे शासन एमआयडीसीच्या माध्यमातून साधी 25-30 एकर

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ......

जमीन सुध्दा उपलब्ध करुन देऊ शकत नाही. ज्या ज्या ठिकाणी एमआयडीसी आहेत व त्या ठिकाणी ज्या काही झोपडपट्टया आहेत त्या ठिकाणी एसआरए योजना राबवावी अशा प्रकारची कल्पाना पुढे येऊ लागली आहे. ठाणे जिल्हयातील बेलापूर पट्टयामधील उद्योगधंदे उध्वस्त झालेले आहेत. वागळे इस्टेट ही आशिया खंडातील सर्वात मोठी इस्टेट होती, त्या ठिकाणी पूर्वी सोन्याचा धूर निघत होता परंतु आता या ठिकाणी बंद पडलेल्या कारखान्याच्या जमिनीवर टोलेजंग इमारती बांधण्याचा डाव शासना चालला आहे की काय अशा प्रकारची भीती आम्हाला आता वाटू लागली आहे. ज्या ठिकाणी उद्योग बंद पडलेले आहेत त्या ठिकाणी नवीन नवीन इमारती होतातच आहेत परंतु एमआयडीसीमध्ये अशा प्रकारची योजना आणली तर उद्योग बाजूला राहतील व मोठया प्रमाणात त्या ठिकाणी सिमेंटची जंगले उभी राहतील म्हणून असा प्रकार राज्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, विद्युत प्रकल्पाच्या संदर्भात बरेच काही बोलले जाते परंतु कोकणात ज्याला छोटे जलविद्युत प्रकल्प उभे करावयाचे आहेत तो जेव्हा शासनाकडे जातो तेव्हा त्याला कोणत्याही प्रकारचे प्रोत्साहन दिले जात नाही. त्या ठिकाणचे अधिकारी त्या उद्योजकाला लाल फितीमध्ये गुंडाळून टाकतात व तो उद्योजक लाल फितीमधून बाहेर येऊ शकत नाही व पर्यायाने उद्योजक थकून जातो व जलविद्युत प्रकल्प तयार न करताच निघून जातो. जलविद्युत प्रकल्पासाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळत नाही, प्रोत्साहन दिले जात नाही. त्यामुळे माझी मागणी आहे की, जलविद्युत प्रकल्प उभे करण्यासाठी जे उद्योजक पुढे येतील त्यांच्यासाठी काही नियम शिथील केले तरच छोटे छोटे जलविद्युत प्रकल्प कोकणामध्ये उभे राहू शकतील.

सभापती महोदय, केंद्रशासनाच्या माध्यमातून जेएनएनयुआरएम योजनेच्या संदर्भात वर्तमानपत्रातून डांगोरा पिटला जात आहे. या योजनेमध्ये 35 टक्के केंद्रशासन, 15 टक्के राज्य शासन आणि उर्वरित निधी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून उभा केला जातो. देशातील कोणत्याही जिल्हात एवढया मोठया प्रमाणात महापालिका नाहीत तेवढया ठाणे जिल्हयात

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ......

महापालिका आहेत. ठाणे जिल्हयात 7 महापालिका आहे. परंतु जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून जे प्रकल्प येणार आहे त्यातील 50 टक्के पैसे स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उभे करण्याची त्यांची ताकद नाही. एमएमआरडीए कर्ज देण्यासाठी तयार आहे. खरे म्हणजे कर्ज काढून प्रकल्प उभे करण्याची व कर्ज फेडत बसण्याची ताकद या महानगरपालिकांमध्ये नाही त्यामुळे आपण कशा प्रकारच्या योजना राबविणार आहात ? कुठल्याही पध्दतीने स्थानिक स्वराज्य संस्थांना या योजनेचा उपयोग होऊ शकणार नाही. कारण या महानगरपालिकांची कर्ज फेडण्याची ताकद नसल्यामुळे या योजना अर्धवटच राहतील. कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था 50 टक्के पैसे उभे करु शकणार नाहीत. एमएमआरडीएच्या माध्यमातून ठाणे जिल्हयावर अन्याय झालेलाच आहे त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्ज म्हणून न देता स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान म्हणून दिले जावे अशा प्रकारची माझी मागणी आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ..

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने अनेक मुद्यांचा उल्लेख करता येण्यासारखा आहे. खाजगी क्षेत्राच्या सहभागातून बंदराचा विकास करण्यासबंधी तसेच जेटीच्या विकासासबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आला आहे .बंदराच्या विकासाच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता दिली जाते परंतु प्रत्यक्षात कामाला सुरुवात होत नाही. राज्याला 720 किलोमिटरचा समुद्र किनारा लाभला असून त्या ठिकाणी विविध बंदराच्या विकासाच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहेत. माझ्याकडे त्यासंबंधी जवळजवळ अर्धा डझन पत्रे आहेत परंतु त्याकामासाठी प्रत्यक्षात पैसे दिले जात नाहीत. तेव्हा बंदराचा विकास कसा करण्यात येणार आहे आणि मच्छिमारांच्या समुद्र किनाऱ्याच्या प्रश्नाला या शासनाकडून न्याय केव्हा देण्यात येणार असा प्रश्न निर्माण होत आहे.

सभापती महोदय, यानंतर मला शेवटचे दोन मुद्दे या ठिकाणी मांडावयाचे आहेत. उच्च आणि तंत्रशिक्षणाच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख् करण्यात आला आहे.या चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, राज्यात अनेक ठिकाणी मोठया प्रमाणावर या क्षेत्रात घोटाळे झालेले आहेत. त्यामुळे या क्षेत्रात मुलांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे शोषण होत आहे यासबंधी मी आपल्याला ठाण्याच्या पार्श्वनाथ महाविद्यालयाचे उदाहरण देत आहे. हे महाविद्यालय कोणासाठी उभे करण्यात आलेले आहे. अशा प्रकारचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्या महाविद्यालयात केवळ आर्थिक शोषणच केले जाते असे नाही तर लैगिक शोषण देखील केले जात आहे. पार्श्वनाथ महाविद्यालयातील पाच हजार विद्यार्थ्याचे नुकसान होऊ नये म्हणून बंद असलेले महाविद्यालय पुन्हा सुरु करण्यास सांगितले गेले आणि त्या ठिकाणी डायरेक्टर ऑफ टेकनिकल एज्युकेशन याची नियुक्ती केली याबद्दल माननीय उच्च शिक्षण राज्यमंत्री श्री राजेश टोपे यांना मी निश्चितपणे धन्यवाद देतो. या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, या महाविद्यालया प्रमाणे राज्यामध्ये इतरही ठिकाणी शिक्षण देणारे कारखाने सुरु करणारे असे अनेक शिक्षण सम्राट आहेत. ते शिक्षण सम्राट विद्यार्थ्याचे, शिक्षकांचे आणि पालकांचे आर्थिक शोषणच करीत आहेत तेव्हा त्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी व त्या ठिकाणचा दर्जा उंचाविण्यासाठी काही ठोस भूमिका शासन घेणार आहे काय असा प्रश्न मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचा आहे.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ..

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात अनेक विषयाचा उल्लेख जरी करण्यात आलेला असला तरी महाराष्ट्राला प्रगतीच्या बाबतीत शेवटच्या क्रमांकावर हे शासन नेणार आहे काय अशी भिती निर्माण झालेली आहे. मघाशी एका सन्माननीय सदस्यांनी विजेच्या संदर्भात बोलत असतांना 1995 सालातील उदाहरण दिले होते. इतके जुने उदाहरण ते का देत आहेत ? युतीच्या सरकारच्या काळातील उदाहरण देत असतांना आपले सरकार सुध्दा अनेक वर्षापासून सत्तेमध्ये आहेत तसेच आता सुध्दा आपले सरकार सत्तेमध्ये आले असतांना पुढील पाच वर्षे आपल्याकडे आहेत. याचा आपण देखील विचार करावयास पाहिजे. परंतु प्रत्येक वेळी युतीच्या शासनाने अमुक केले, तमुक केले असे सांगत आहात परंतु तुमचे सरकार इतक्या वर्षापासून सत्तेत होते तेव्हा तुम्ही काय केले ? विजेच्या बाबतीत तुम्ही एक युनिट देखील वीज निर्मिती केलेली नाही. वीज निर्मिती केन्द्राची जी क्षमता आहे त्या क्षमतेच्या 25 टक्केच फक्त वीज निर्मिती केली जाते तेव्हा त्या केन्द्राची योग्य पध्दतीने दुरुस्ती करण्यात यावी. असे मला या निमित्ताने सागावयाचे आहे. उरण केन्द्राची जेवढी वीज निर्मिती क्षमता आहे त्याच्या 50 टक्केसुध्द ावीज निर्मिती होत नाही. महाराष्ट्रातील सर्व सामान्य माणसाच्या दृष्टीने ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्या देण्याच्या बाबतीत राजकारण का केले जाते ? असे मला विचारावेसे वाटते. युतीच्या सरकारच्या काळातील उदाहरणे देण्यामध्ये आपल्याला आनंद वाटत असला तरी महाराष्ट्रातील जनता त्यामुळे सुखी होणार नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात एकूण 57 मुद्दे आहेत त्या प्रत्येक मुद्याबद्दल खेद व्यक्त करावा अशा प्रकारचे काम गेल्या दहा वर्षापासून हे शासन काम करीत आहे त्यामुळे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करुन मी माझे मनोगत संपवितो.

-----

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधान सभेने निवडलेले): सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 2 मध्ये असा उल्लेख करण्यात आला आहे की, " महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून माझे शासन 2015 पर्यत गाठावयाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तसेच पुढील पाच वर्षासाठी हाती घ्यावयाच्या योजना व त्यांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संकल्प मसुदा तयार करीत आहे शासनाच्या या कार्यास मी सुयश चिंतितो."

सभापती महोदय, या पूर्वी माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण केले होते त्यामध्ये कोकणासाठी दिलेल्या 5 हजार 332 कोटी रुपयांच्या पॅकेजचा उल्लेख केला होता आणि सदरहू पॅकेज पुढील तीन वर्षात वाटप केले जाईल असे सांगितले होते. त्यासाठी शासनाने जीआरसुध्दा काढला होता. प्रत्यक्षात 2009-2010 सालासाठी तरतूद करावयास पाहिजे होती परंतु पुरवणी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केलेली नाही. कोकण पॅकेज अंतर्गत ड्रेझर खरेदी करणे आणि प्रशासकीय इमारत बांधणे या दोन कामा व्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी 2009-2010 सालासाठी तरतूद करण्यात आला नाही त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

त्याचप्रमाणे अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 6 च्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे फयान चक्री वादळ आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबद्दल शासनाने घोषणा केली. फयान वादळाबद्दल या सभागृहामध्ये झालेल्या चर्चेच्यावेळी मंत्रिमहोदयांनी अनेक प्रकारच्या घोषणा केल्या. त्या अनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्हयासाठी जवळ जवळ 4 कोटींचे अनुदान वितरीत करण्यात आले. त्यामध्ये मच्छिमारांसाठी 1 कोटी 23 लाखाचे अनुदान वितरीत करण्यात आले. परंत 2 कोटी 77 लाखाचे अनुदान अजूनपर्यंत अखर्चित राहिले आहे, याचे कारण काय? सभापती महोदय, डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये नियम 93 अन्वये उपस्थित केलेल्या चर्चेच्यावेळी ज्या मच्छिमारांकडे जाळयांच्या पावत्या मिळत नाहीत त्यांच्याबाबतीत अनुदानाचे वाटप करीत असतांना पावतीची अट शिथिल करणार काय ? असे मी विचारले होते. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना सांगितले होते की, नैसर्गिक आपत्तीप्रमाणे जाळींचा पंचनामा करुन मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याची उपाय योजना शासन करीत आहे. परंतु अद्याप पर्यंत कोणतीही उपाय योजना शासनाने केलेली नाही. त्यामुळे अखर्चित राहिलेले 2 कोटी 77 लाख रुपये परत जातील की काय? अशी मला भीती वाटत आहे. त्याबाबत शासनाने योग्य ती दखल घेऊन उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे. अशाप्रकारे कोकणावर झालेला हा दुसरा अन्याय आहे.

सभापती महोदय, मागील वेळी झालेल्या अवकाळी पावसामुळे आंब्याचे नुकसान झाले त्याची भरपाई देण्याकरिता शासनाने 28 कोटींचे अनुदान मंजूर केले. परंतु ते कृषी संचालकांकडे 9 महिने पडून राहिले. ते पैसे रोखीने द्यावेत की, किटक नाशकाच्या, खताच्या रुपाने द्यावेत याबाबत निर्णय व्हावयास मार्च महिना उजाडला. त्याबाबत निर्णय झाल्यानंतर 13 कोटींचे खत मागविण्यात आले, परंतु ते निकृष्ट असल्यामुळे परत पाठविण्यात आले. त्यामुळे याहीवेळी नुकसान भरपाईसाठी मंजूर झालेला निधी परत जातो की काय अशी भीती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, फयान वादळ आणि अवकाळी पावसामुळे यावर्षी आंब्याचे पिक उशीरा येत आहे. देवगडचा आंबा जगप्रसिध्द आहे. जगभरातून परकीय चलन मिळवून देणारा हा आंबा बाजारात योग्यप्रकारे आलेला नाही. त्याची अनेक कारणे आहेत. शेतकऱ्यांनी आंब्याच्या झाडांवर केलेली फवारणी अवकाळी पावसामुळे वाहून गेली. त्याचप्रमाणे फयान वादळामुळे झालेल्या हवामान बदलामुळे आंब्याच्या झाडावर चिक नावाचा रोग पडला. त्यामुळे आंबा बागायतदार पूर्णपणे् चिंताग्रस्त झाला. यावर्षी आलेले पिक आपल्या पदरात पडेल की नाही? आणि आपण बाजारात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. परशुराम उपरकर....

पाठविलेला आंबा लोकांना खायला मिळेल की नाही अशा चिंतेत सापडला आहे. आणि म्हणून आंबा बागायतदारांना प्रति हेक्टरी 50 हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केल्यानंतर शासन 15 हजार रुपये नुकसान भरपाई जाहीर करते, 15 हजार रुपये नुकसान भरपाई जाहीर केल्यानंतर त्यामधील 60 टक्के म्हणजे 9 ते 10 हजार रुपये नुकसान भरपाई मिळते. म्हणजेच प्रत्येक झाडामागे 90 ते 100 रुपये शासन देते ही एकप्रकारची शोकांतिका आहे. त्याबाबत मागणी करुन सुध्दा शासनाने या गोष्टीकडे लक्ष दिले नाही म्हणून मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, त्यानंतर अभिभाषणातील 14 व्या मुद्यामध्ये सिंचन प्रकल्पासंबंधी उल्लेख करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील 16 प्रकल्प आज बंद स्थितीत आहेत. त्यामुळे त्या प्रकल्पांची किंमत चौपट झाली आहे. शासनाने 725 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केल्याबाबतचा जी.आर. काढला. परंतु त्यामधील एक नवा पैसाही मिळालेला नाही. यासंबंधीचे अधिक्षक अभियंत्यांचे पत्र माझ्याकडे आहे. सन 2007 पासून ठेकेदारांची 200 कोटींची बिले थकित पडलेली आहेत. त्यामुळे या अभिभाषणामध्ये पॅकेज आणि धरणाचा केलेला उल्लेख निष्फळ ठरलेला आहे. याबाबतीत सुध्दा शासनाने कोकणासाठी दुजाभावाची वागणूक दिली आहे. म्हणून मी यासंबंधी शासनाकडे खेद व्यक्त करीत आहे.

(यानंतर श्री. सरफरे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर . . . .

याठिकाणी अनेक वेळा देवगड मधील पवन ऊर्जा प्रकल्प सुरु करण्याच्या बाबतीत अनेक वेळा प्रश्न उपस्थित केले, परंतु माननीय मंत्री महोदयांकडून नेहमी असे सांगितले जाते की, आम्ही उपाययोजना करीत आहोत, तपासून पहातो अशा प्रकारची प्रशासकीय ढाच्यातील उत्तरे सभागृहामध्ये देण्यात आली. त्याचप्रमाणे कोकणातील समुद्राच्या लाटांवर निर्माण होणारे जे प्रकल्प आहेत, ते सुरु करण्याबाबतची घोषणा सदनामध्ये करण्यात आली. पण मध्यंतरी आलेल्या फयान वादळामुळे सदरहू प्रकल्प पूर्णपणे वाहून गेले आणि या प्रकल्पाच्या बाबतीत शासनाने कोणत्याही प्रकारे लक्ष दिलेले नाही. पण कोकणामध्ये जल विद्युतवर तयार होणारे अनेक प्रकल्प आणावेत अशी येथील कोकणी माणसाची मागणी आहे. तसेच कोकणी माणसाची दुसरी अशीही मागणी आहे की, कोकणावर अणू ऊर्जा आणि औष्णिक प्रकल्प लादण्यात येऊ नयेत. या प्रकल्पांमुळे कोकणातील आंबा, काजू या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होईल आणि तेथील बागायती पूर्णपणे नष्ट होतील. त्यामुळे जल विद्युत प्रकल्प आणावेत आणि औष्णिक प्रकल्प आणू नयेत अशा प्रकारची मी येथे मागणी करतो.

सभापती महोदय, कामगार हिताच्या संरक्षणासाठी दारिद्ररेषेखालील 14 लाख कुटुंबांना प्रत्येकी 30 हजार रुपयांचा इन्शुरन्स मिळावा यासाठी स्मार्ट कार्डची योजना आखण्यात आली. पण ही योजना 30 जानेवारी रोजी बंद झाली. कारण या योजनेच्या सॉफ्टवेअरमध्ये अनेक त्रुटी होत्या. ज्यांच्या घरामध्ये कर्ता पुरुष म्हणून वडील असतील किंवा कर्ती स्त्री म्हणून आई असेल आणि जर आई मृत झाली तर त्या सॉफ्टवेअरमध्ये पाच व्यक्तींच्या नावामध्ये संबंधित व्यक्तीचे नाव येत नसल्यामुळे संबंधित कामगार स्मार्ट कार्डच्या फायद्यापासून वंचित राहिलेले आहेत आणि अशा कोकणामध्ये हजारो व्यक्ती आहेत. या शासनाने याबाबतीत ज्या कंपनीला कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे, त्या कंपनीच्या सॉफ्टवेअरमध्ये त्रुटी असल्यामुळे दारिद्रयरेषेखाली असलेल्या अनेक लोकांना सॉफ्ट कार्डच्या फायद्यापासून वंचित रहावे लागणार आहे. याबाबतीत शासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील 32 क्रमांकाच्या मुद्याबाबत सांगावयाचे आहे. यामध्ये चिपी या गावामध्ये विमानतळ बांधण्याबाबत मुद्दा आहे. चिपीचे विमानतळ होणार आहे म्हणून तेथील लोकांनी उत्स्फूर्तपणे आपल्या जमिनी दिल्या.150 रुपये गुंठे या भावाने

. . . .2 ई-2

श्री.परशुराम उपरकर . . . .

या भावाने तेथील लोकांनी 272 हेक्टर जमीन दिली. पण याबाबतीत सरकारने फक्त दलालीचे काम केले. सरकारने लोकांकडून 150 रुपये गुंठे या भावाने जमिनी घेतल्या आणि एका खाजगी विकासकाला चढत्या भावाने या जमिनी दिल्यामुळे तेथील लोकांच्या मनामध्ये सरकारबद्दल असंतोष निर्माण झालेला आहे. या विमानतळाच्या कामाचे उद्‌घाटन तीन ते चार वेळा झाले आहे परंतु अजून तेथे विमानतळ सुरु होत नाही. हा विमानतळ कधी होणार असा प्रश्न आहे. त्याठिकाणी अनेक मंत्री महोदयांच्या नावाचे फलक लावण्यात आले आहेत. परंतु आता फलकावरील नावे देखील पुसत चालली आहे आणि या विमानतळाची स्थिती काय आहे हे सांगता येणार नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील 35 क्रमांकाच्या मुद्याबाबत सांगावयाचे आहे. याठिकाणी सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळसाहेब उपस्थित आहेत. कोकणातील चार जिल्हे आणि गोवा राज्य यांना जोडणारा 17 क्रमांकाचा जो महामार्ग आहे, त्यावर ब्रिटीश काळामध्ये बांधण्यात आलेले जे पूल आहेत, त्यांना 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. अशा वेळी ब्रिटीश कंपन्यांनी कळविले आहे की, या पुलांची आयुर्मर्यादा संपलेली आहे. तुम्ही नवीन पूल बांधा. पण त्याठिकाणी जो चौपदरी रस्ता करावयाचा आहे, परंतु त्याबाबतीत आम्ही निवडणुका आल्यानंतर सातत्याने पेपरमध्ये वाचतो,ऐकतो पण नंतर चौपदरी रस्त्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची उपाययोजना केली जात नाही.

श्री.छगन भुजबळ (खाली बसून) : 80 लाख रुपये एकरी मागणी करीत आहेत.. . . .

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, काल वर्तमानपत्रामध्ये आलेले आहे की, अनेक रस्त्यांची वळणे काढण्यासाठी दिल्लीमध्ये प्रस्ताव पडून आहेत, पण त्यासाठी मान्यता मिळत नाही. तसेच येथे असलेला जो सागरी महामार्ग आहे तो रुंद करण्यासाठी किंवा तेथील पुलाची जी कामे राहिलेली आहेत त्याकरता सुध्दा केंद्र शासनाकडून सातत्याने निधीची मागणी केली जाते परंतु निधी मिळत नाही. त्यामुळे याबाबतीत देखील शासनाकडून खुलासा होण्याची गरज आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ...

सभापती महोदय, अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 38 मध्ये दारिद्र्य रेषेखालील लोकांना घरे देण्याबाबतचा उल्लेख केलेला आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना रेशन कार्डावर स्वस्त धान्य मिळण्याची योजना आहे. पण आज सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 71 हजार दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना रेशन कार्ड मिळालेले नाही. त्यांना परत फॉर्म भरण्यासाठी अर्ज करावा लागतो ही शोकांतिका आहे. म्हणून याबाबतीत मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 42 मध्ये आरोग्याच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. कोकणातील आरोग्याची व्यवस्था पूर्णपणे बिघडलेली आहे. आज त्या ठिकाणी दवाखान्यामध्ये डॉक्टर्स असतील तर औषधे नाहीत आणि औषधे असतील तर डॉक्टर्स नाहीत अशी परिस्थिती आहे. दोन महिन्यापूर्वी मी एका दवाखान्यामध्ये गेलो असता यावर्षी कोणत्याही प्रकारचा औषध पुरवठा दवाखान्यांना शासनाकडून झालेला नाही असे डॉक्टरकडून ऐकावयास मिळाले. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी जी यंत्रसामुग्री आहे, सिटीस्कॅन मशीन आहे ती बंद स्थितीत आहे. त्या ठिकाणी ऑपरेटर देऊन कोकणातील आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी कोणत्याही प्रकारचा उल्लेख या अभिभाषणात केलेला नाही.

सभापती महोदय, या अभिभाषणामध्ये शालेय पोषण आहाराच्या बाबतीत उल्लेख आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अंगणवाड्यांना 1 हजार बचत गटांच्या माध्यमातून शालेय पोषण आहार देण्याचे काम चालू होते. सहा महिन्यांपासून या बचत गटांना 1 ते 2 कोटी रुपयांचे अनुदान न मिळाल्यामुळे शाळेतील मुलांना पोषण आहार चालू ठेवण्यासाठी बचत गटातील महिलांनी आपले दागिने गहाण ठेवल्याचे मालवण पंचायत समितीमध्ये उघड झालेले आहे. त्या महिला त्या ठिकाणच्या गट विकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत परंतु त्यांना वेळेवर अनुदान मिळत नाही. एका बाजूला बचत गटांना काम दिले अशा गोष्टी करावयाच्या आणि दुसऱ्या बाजूला ज्या बचत गटांना काम दिले त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला योग्य वेळी न दिल्यामुळे त्यांची फार अडचण होत आहे. याबाबतीत शासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. परशुराम उपरकर .....

सभापती महोदय, या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 55 मध्ये जनतेच्या दारी शीघ्रतेने न्याय पोहचावा यासाठी शासन वचनबद्ध आहे असे नमूद केले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दोडामार्ग आणि वैभववाडी या दोन तालुक्यांची निर्मिती झाली. दोडामार्ग तालुक्याची निर्मिती होऊन 9 ते 10 वर्षे झाली तसेच वैभववाडी तालुक्याची निर्मिती होऊन 20 वर्षे झाली परंतु या दोन्ही ठिकाणी न्यायालये नाही. तेथे न्यायालय होण्यासाठी या सभागृहामध्ये सातत्याने मागणी केली. वैभववाडीयेथील पक्षकारांना 100 किलोमीटरवरील कणकवली येथे तसेच तर दोडामार्ग येथील पक्षकारांना 100 किलोमीटरवरील सावंतवाडी येथे कामासाठी यावे लागते आणि न्याय मागण्यासाठी दिवसभर थांबून परत जावे लागते. त्या ठिकाणी न्यायालये चालू करण्याची प्रक्रिया पूर्ण होऊन त्यासंबंधीची फाईल मंत्रालयातील वित्त विभागाकडे धूळ खात पडलेली आहे अशी बातमी छापून आलेली आहे. एका बाजूला न्याय देण्याच्या बाबतीत शासन वचनबद्ध असल्याचे सांगावयाचे, तालुके निर्माण करावयाचे, तालुक्यात न्यायालय सुरु करण्याच्या बाबतीत घोषणा करावयाची पण ती न्यायालये सुरु करण्याच्या बाबतीत कोणतीही काळजी घ्यावयाची नाही एवढा निष्काळजीपणा या शासनाकडून होत असल्यामुळे तसेच माननीय राज्यपालांच्या या अभिभाषणामध्ये जे मुद्दे नमूद केलेले आहेत त्यांची योग्यरीतीने अंमलबजावणी होत नसल्यामुळे त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे मत व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, प्रामुख्याने मला दोन गोष्टींचा उल्लेख करावयाचा आहे. या सभागृहामध्ये माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ हे उपस्थित असल्यामुळे मी ही संधी घेत आहे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा उल्लेख आहे. त्यासाठी आम्ही वेगवेगळा प्रकारच्या योजना करीत आहोत, आमचे एस.आर.ए.चे इतके प्रकल्प सुरु आहेत, झ ोपडपट्टीतील लोकांना आम्ही घर देऊ इच्छितो. झोपडपट्टीतील लोकांसाठी अतिशय चांगली योजना राबविण्याचा प्रयत्न करीत आहोत असे सांगितले जाते. या योजनेतील भ्रष्टाचाराबाबत मी आता बोलू इच्छित नाही. पण ज्या सरकारी कर्मचा-यांनी शासनाची इमाने इतबारे 25-30 वर्षे सेवा केलेली आहे अशा सरकारी कर्मचा-यांची वसाहत वांद्रे येथे आहे. त्या सरकारी वसाहतीचा पुनर्विकास करण्यासाठी पायाभूत सुविधा समितीने मान्यता दिली असून त्या कामाचे आता टेंडर काढण्यात आले आहे. या सरकारी वसाहतीचा प्लॉट 138 एकराचा होता, आता तो केवळ 96 एकर इतका राहिला आहे. त्या जमिनीवर अतिक्रमण करुन झोपडपपट्टीतील लोकांनी या जमिनीचा काही भाग गिळंकृत केला आहे. त्या लोकांना सरकारने एस.आर.ए.योजनेखाली घरे बांधून दिली. शासनाने न्यायाधीशांच्या हौसिंग सोसायटीला परवानगी दिली, आयएएस, आयपीएस अधिका-यांच्या हौसिंग सोसायटीला परवानगी दिली. पण सरकारी कर्मचारी, पोलीस कर्मचारी यांना शासनाची वर्षानुवर्षे सेवा करुन सेवानिवृत्त झाल्यावर कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर अशा ठिकाणी क्वार्टर सोडून जावे लागते. सभापती महोदय, सरकारी अधिकारी व कर्मचा-यांच्या असोसिएशनने शासनाकडे एक प्रस्ताव दिलेला आहे. आम्हाला सरकारी दरामध्ये आम्ही जेथे राहतो तेथे घर बांधण्यासाठी परवानगी द्यावी, अनायसे कॉलनीच्या पुनर्विकासाचे काम होत आहे, त्यातील काही जमीन सरकारी कर्मचा-यांना दिली तर त्यातून हा प्रश्न सुटेल, अशी विनंती केलेली आहे. परंतु सरकारी कर्मचा-यांची विनंती धुडकावून शासनाने त्यांना राहत्या घरापासून वंचित करण्याचा घाट घातलेला आहे. सभापती महोदय, त्या भागामध्ये जे लोक कचरा वेचून आपले पोट भरत होते त्या लोकांना शासनाने एस.आर.ए.योजनेचे घर दिले आहे. पण जे कर्मचारी शासनाची सेवा करतात,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

ॲड.अनिल परब

कित्येक वर्षे सरकारी खोलीत राहतात, ज्यांनी ही कॉलनी फुलविली त्यांना मात्र निवृत्तीनंतर सरकारी घर सोडून जावे लागते. माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी ठरविले तर या कर्मचा-यांचा प्रश्न सुटू शकतो. ते या सभागृहाचे नेते आहेत, त्यामुळे सरकारी कर्मचा-यांची ते काळजी घेतील आणि सहानुभूतिपूर्वक त्या प्रस्तावावर विचार करतील अशी मला खात्री आहे. त्या प्रस्तावामध्ये सगळया गोष्टींची काळजी घेतलेली आहे. या इमारती 40 वर्षापूर्वीच्या आहेत. त्यामुळे या इमारतींचा पुनर्विकास करीत असताना तेथे राहणा-या कर्मचा-यांचा, कामगारांचा, पोलिसांचा घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी सहानुभूतीचे धोरण स्वीकारावे अशी मी राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चेच्या निमित्ताने संधी घेऊन माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्री हे आक्रमक नेते म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. अनेक आंदोलनामध्ये मी स्वत: एक कार्यकर्ता म्हणून भाग घेतलेला आहे. ज्यावेळी एखादा कार्यकर्ता किंवा आमदार आंदोलनामध्ये भाग घेतो त्या कार्यकर्त्यावर पोलिसांकडून आयपीसीचे कलम 151 लावले जाते. ज्यावेळी एखाद्या व्यक्तीकडून समाजाला धोका आहे, जो वॉन्टेड आहे, अशी व्यक्ती मुक्त राहिल्यामुळे समाजाला त्रास होऊ शकतो अशा लोकांना कलम 151 लावले जाते. मध्यंतरी शिवसेनेच्यावतीने मी एका आंदोलनात भाग घेतला होता. त्यानंतर मला कलम 151 लावण्यात आले. पोलिसांनी त्याची डायरी केली. मला कलम 151 खाली अटक करण्यात आल्यानंतर हे कलम लावता येत नाही असे सांगून सोडले. पण पुन्हा त्याच कलमाखाली अटक करताना कोणत्याही परिस्थितीत यांना सोडू नका, कलम 152 खाली अटक करावी असे आयुक्तांनी सांगितले असल्याचे सांगण्यात आले. यावर मी पोलिसांकडे विचारणा केली की, मी कोणता गुन्हा केला आहे, माझ्याविरुध्द कोणता गुन्हा नोंदला गेला आहे, माझ्यामुळे समाजाला धोका आहे काय ? मी जे आंदोलन केले आहे ते लोकांच्या भल्यासाठी केले आहे. त्यांच्या भल्यासाठी मी रस्त्यावर उतरण्याचा गुन्हा केला असेल.

यानंतर श्री.ओटवणेकर......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

अशा प्रकारे पोलीस आमच्या विरूद्ध दादागिरी करीत आहेत. आम्हाला अटकाव करीत आहेत. आमच्या विरोधात सतत तीन वेळा 151 कलम लावण्यात आले. त्यानंतर कलम 151 (3) लावण्यात आले. म्हणजे 15 दिवस कुठलेही कारण न देता आतमध्ये ठेवता येईल. अशा प्रकारे पोलीस दलाचा उपयोग राजकीय कार्यकर्त्यांना दाबण्यासाठी, मारण्यासाठी केला जात आहे. हा उपयोग दुसऱ्या कामासाठी केला असता तर बरे झाले असते. त्या दिवशी मला पकडण्यासाठी 50 पोलीस आले होते. मी काय अतिरेकी आहे. मला अटक करण्याच्या आधी उभे राहून किती पोलीस आले आहेत हे मी मोजले. कलम 151 ची कारवाई करण्यासाठी 50 पोलीस पाठविले जातात. हे या शासनाचे कर्तव्य. माझ्या सारख्या राजकीय कार्यकर्त्याला पकडण्यासाठी 50 पोलीस पाठविले जातात. हेच पोलीस दुस-या ठिकाणी कामाला लावले असते तर पोलीस दलावर टीका झाली नसती. मी काही अतिरेकी नाही. मी अतिमहत्त्वाचा असतो तर सहज पोलीस ठाण्यामध्ये जाऊन सगळे सांगितले असते. 50 पोलीस मला पकडायला आले होते. ज्या दिवशी श्री.राहुल गांधी मुंबईत आले, त्या दिवशी मी पोलिसांना सांगितले की, आम्ही फक्त काळे झेंडे दाखविण्याचा कार्यक्रम करणार आहोत. आम्हाला आपण जागा द्यावी. या देशातील पंतप्रधानांना काळे झेंडे आम्ही दाखविलेले आहेत. तो आमचा अधिकार आहे. परंतु, पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, तसे करता येणार नाही. मी त्यांना सगळे दाखले दिले. पंतप्रधानांना काळे झेंडे दाखविले आहेत. आम्हाला फक्त एक जागा द्यावी. त्या जागेत आम्ही उभे राहून काळे झेंडे दाखवू. कार्यक्रम संपल्यानंतर आम्ही निघून जाऊ. पोलीस म्हणाले आम्ही तुम्हाला तेथे उभे राहू देणार नाही. तेथे जमायला देणार नाही. तुम्ही तेथे जमलात तर आम्ही तुम्हाला तोडून काढू. मी म्हटले का ? ते म्हणाले की, तुमच्या पैकी एकाने कोणी दगड मारला तर सी.एम.साहेबांची खुर्ची जाईल. ही पोलीस अधिकाऱ्यांची उत्तरे आहेत. म्हणजे सी.एम.साहेबांची खुर्ची वाचविण्यासाठी आम्हाला तोडून काढा. अशा प्रकारची उत्तरे आपले अधिकारी देत आहेत. असे असताना आपण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये पोलिसांचा गौरव करीत आहात. मी हा विषय मुद्दामहून श्री.भुजबळ साहेबांच्या समोर मांडत आहे. कारण त्यांना या सगळ्या गोष्टीची चांगली जाणीव आहे. एखाद्या राजकीय कार्यकर्त्याला वसईमध्ये ज्या पद्धतीने तोडून काढले, रिलायन्स वीज दरवाढ विरोधात

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.अनिल परब....

आंदोलन करीत असताना आमच्या कदम ताईंचा डोळा पोलिसांनी फोडला. त्यांच्या डोळ्याचे पाच तुकडे झाले. अशा पद्धतीने मारहाण केली जाते. कुठल्या कायद्याप्रमाणे मारहाण केली जाते. हा विषय सभागृहात आला होता. वीज दर वाढ झाली म्हणून त्या बाईने आंदोलन केले. तिचा डोळा फोडला गेला. यासंबंधी शासनाला कुठलाही खेद नाही. याबद्दल काहीही बोलत नाही. अशा पद्धतीने पोलीस अत्याचार चाललेला आहे, राजकीय कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी चालली आहे, त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

.........

**तालिका सभापती (श्री.चंद्रकांत पाटील)** : मी काँग्रेस पक्षातर्फे बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांची नावे सांगतो. श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.उल्हास पवार, सर्वश्री सुरेश देशमुख, सुरेश नवले, सुभाष चव्हाण, राजन तेली, मोहन जोशी श्रीमती मधु जैन, श्रीमती अलका देसाई, श्री.एस.क्यू.जमा, ॲड् उषा दराडे, ॲड् वंदना चव्हाण, श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्री.राम पंडागळे, श्री.दिलीपराव सोनवणे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष भोईर.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना शासनाने अनेक धाडसी निर्णय येणाऱ्या पाच वर्षासाठी घेतले आहेत, त्याबद्दल मी शासनाचे सर्वप्रथम अभिनंदन करते. नागरिकांची सुरक्षा आणि संरक्षण यासाठी शासनाने नेहमीच प्राधान्य दिले आहे. हे प्राधान्य देत असताना पोलीस दलाला अनेक सुविधा प्राप्त करून देण्याचा विचारविनिमय माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. ओटवणेकर 12:50

श्रीमती मंदा म्हात्रे...

सभापती महोदय, आज राज्यामध्ये पुण्यातील जर्मन बेकरी येथे घडलेला बॉम्ब स्फोट असेल किंवा मुंबईमध्ये घडलेले बॉम्बस्फोट असतील, अतिरेक्यांचे हल्ल् असतील अशा घटनासंबंधीची पूर्व सूचना खब-यांमार्फत पोलिसांना मिळत असते. पूर्वी पोलीस दलामध्ये खबरे होते आणि ते अशा प्रकारच्या घातपाताच्या घटनांची माहिती पोलिसांना देत होते आणि अशा घटना घडवून आणणा-यांना वेळीच अटक केली जात असे. आजकाल पोलीस दलातील खब-यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. आज दहशतवाद हा संपूर्ण जगामध्ये फोफावत आहे. अशा परिस्थितीमध्ये खब-यांची संख्या आणि त्यांचे मानधन वाढविले पाहिजे. तसेच खब-यांकडून मिळणा-या माहितीची गुप्तता राखली गेली पाहिजे. खब-यांनी दिलेल्या माहितीची गुप्तता पाळली गेली नाही तर त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. पोलीस दलामध्ये खब-यांची संख्या कमी व्हायला लागल्यामुळे राज्यामध्ये अशा विघातक घटना घडत आहेत. शासनाने पोलीस दलामध्ये 55 हजार अतिरिक्त पदे निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देते. मी गेल्या तीन-चार वर्षापासून शासनाला सातत्याने एक सूचना करीत आले आहे. आपला समुद्र किनारा पाहिजे तेवढा सुरक्षित नाही. मुंबईवर हल्ला केलेले अतिरेकी हे समुद्रमार्गे मुंबईमध्ये शिरले. समुद्र किनारपट्टी सुरक्षित ठेवावयाची असेल तर समुद्र किनारी राहाणा-या कोळी समाजातील तरुण मुलांची पोलीस दलामध्ये भरती केली पाहिजे. कारण या तरुणांना समुद्राची, समुद्र किना-याची चांगली माहिती असते. बोटीतून फिरण्याची, समुद्रामध्ये पोहोण्याची त्यांना सवय असते. त्यांची होमगार्डमध्ये किंवा पोलीस दलामध्ये भरती करुन त्यांना प्रशिक्षण दिले तर ते किना-याची सुरक्षा अतिशय उत्तम प्रकारे ठेवू शकतील शिवाय कोळी समाजातील तरुणांची बेरोजगारीही दूर होण्यास मदत होऊ शकेल. या समुद्र किनारी असलेल्या कोळयांच्या वस्तीतील मुलांना पोलीस दलामध्ये सामावून घेण्यासाठी मी गेली चार वर्षे शासनाला सातत्याने सांगत आहे. आता जी पोलीस दलामध्ये अतिरिक्त पदे निर्माण करण्यात येणार आहेत त्यामध्ये मच्छिमार तरुणांना प्राधान्याने संधी द्यावी अशी मी शासनाला विनंती करते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी पोलीस कर्मचा-यांच्या वसाहती तसेच त्यांच्या गृहनिमाण सोसायटयासंबंधीचा उल्लेख या ठिकाणी केला. माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांच्याकडे जेव्हा गृहखाते होते तेव्हा पासून मी आमच्या

..2..

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. ओटवणेकर 12:50

श्रीमती मंदा म्हात्रे...

नवी मुंबईतील पोलीस कर्मचा-यांच्या वसाहतीचा मुद्दा मांडत आले आहे. नवी मुंबईमध्ये आमचे पोलीस कर्मचारी गेली 30-30 वर्षे 10 X 10 च्या पत्र्याच्या शेडमध्ये रहात आहेत. आता सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या पोलिसांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी कुठे राहायचे असा प्रश्न त्यांच्या समोर आहे. या महागाईच्या काळात घरांच्या किंमती गगनाला जाऊन भिडलेल्या आहेत. आता घरांच्या ज्या प्रचलित किंमती आहेत त्यामध्ये पोलिसांना घरे घेणे शक्य नाही. त्यांना नवी मुंबईमध्ये सिडकोच्या माध्यमातून घरे मिळावीत यासाठी सिडकोशी वारंवार पत्रव्यवहार करुन, संबंधितांशी बैठका घेऊन जेथे जेथे सिडकोचे गृहनिर्माण प्रकल्प उभे राहातील तेथे तेथे पोलीस कर्मचा-यांसाठी 200-200 घरे प्राधान्याने देण्यात यावीत, असा आग्रह धरलेला आहे. आज परिस्थिती अशी आहे की, नवी मुंबईतून मराठी माणूस दूर जात आहे. तेव्हा या निवृत्त होणा-या पोलिसांच्या घरांचा प्रश्न शासनाने सोडविला तर त्यांना ख-या अर्थाने दिलासा मिळू शकेल. नवी मुंबईमध्ये सी.बी.डी. विभाग बी.ओ.टी. तत्वावर घरे बांधून देण्यास तयार आहे परंतु त्यासंबंधीची फाईल शासन दरबारी पडून आहे. दुसरे असे की, जर सिडको बीओटी तत्वारवर घरे बांधून देत असेल तर त्यासही आमची हरकत नाही. घरे बांधण्यासंबंधी शासन दरबारी असलेल्या फाईलवर निर्णय घेतला जात नाही. नवीन विकासक आणून घरे बांधू नका असे सांगितले जाते. तेव्हा पोलिसांना निवृत्ती नंतर घरे मिळतील असे त्यांना आश्वासित करण्याची आवश्यकता आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ D/ KTG/ KGS/ 12:55

श्रीमती मंदा म्हात्रे.......

मुंबईमध्ये दहशतवादी हल्ला झाला, अनेक अधिकाऱ्यांनी हौतात्म्य पत्करले. आपल्या प्राणाची बाजी लावली. देशाला अनेक महत्वाच्या अधिकाऱ्यांना मुकावे लागले. नक्षलवादी भागामध्ये जे अधिकारी कर्मचारी कर्तव्य बजावतात त्यांना देखील नक्षलवादी कारवायामध्ये आपल्या प्राणाची आहुती द्यावी लागते. अशा दिवंगत कर्मचारी अधिकाऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत देत असताना दुजाभाव दाखविला जातो हे योग्य नाही. प्राण हे सर्वांचे सारखेच असतात. त्यामध्ये गरीब श्रीमंत असा भेदभाव करता येत नाही. नक्षलवादी कारवायांमध्ये शहीद झालेल्या पोलिसांच्या कुटुंबांना वेळेवर आर्थिक मदत दिली गेली पाहिजे.

सभापती महोदय, फयान चक्री वादळामुळे अनेक शेतकऱ्यांचे व मच्छिमारांचे नुकसान झाले आहे. त्यांना अद्याप आर्थिक मदत दिली गेली नाही. या मदतीचे लवकरात लवकर वाटप झाले पाहिजे. मत्स्य व्यवसाय क्षेत्रासाठी राज्य व केंद्र शासनाने खूप मदत केली आहे. परंतु समुद्र किनाऱ्यावरील व खाडी किनाऱ्यावरील मच्छिमारांसाठी ज्या जेटी बांधल्या जातात त्याबाबत शासनाने नवीन धोरण स्वीकारले आहे. यापुढे जेटीचे बांधकाम हे मेरिटाईम बोर्डामार्फत केले जाणार आहे. मेरिटाईम बोर्डाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्या भागात स्थानिक आमदार विकास निधीमधून कामे केली जातात. त्या कामाची स्थानिकांना माहिती असते. त्यामुळे यापुढे जेटीचे काम स्थानिकांकडून केले पाहिजे. जेटीच्या ठिकाणी गाळ साचला आहे. तो गाळ काढला गेला तर मच्छिमार बांधवांना खूप मदत होऊ शकते.

सभापती महोदय, राज्यामध्ये अनेक औद्योगिक प्रकल्पांना मान्यता दिली गेली आहे. ठाणे जिल्हा हा औद्योगिक क्षेत्रात सर्वात मोठा जिल्हा होता. तेथे सोन्याचा धूर निघायचा असे म्हटले जात होते. अनेक प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या. परंतु औद्योगिक प्रकल्प उभे राहिल्यानंतर त्या प्रकल्पांमध्ये प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना नोकरीत सामावून घेतले जात नाही. त्यांचे योग्य प्रकारे पुनर्वसन केले जात नाही. यापुढे औद्योगिक प्रकल्प निर्माण झाल्यानंतर त्या प्रकल्पामध्ये ज्यांच्या जमिनी संपादित केल्या जातील त्यांच्या वारसांना नोकरीमध्ये सामावून घेतले पाहिजे. प्रकल्प उभा राहण्यापूर्वी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाले पाहिजे. असे झाले तर शेतकरी प्रकल्पांना विरोध करणार नाहीत. मुंबई शहराचा विकास होत असताना ठाणे व नवी मुंबई शहराचा देखील नियोजनबध्द विकास झाला पाहिजे. जेएनएनयुआरएम अंतर्गत राबविण्यात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ D/ KTG/ KGS/ 12:55

श्रीमती मंदा म्हात्रे.......

येणाऱ्या योजना दूरगामी विचार करुन राबविल्या गेल्या पाहिजेत. या योजनांतर्गत झोपडपट्टयांच्या ठिकाणी घरकुले बांधल्यानंतर पुन्हा झोपड्या उभ्या राहणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. योजना राबविली जाते. झोपडपट्टीधारकांना घरकुले दिली जातात. ही घरकुले विकून पुन्हा दुसरीकडे झोपडी बांधण्याचे काम या लोकांकडून केले जाते. अशा वेळी त्या त्या भागातील अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रातील मोकळ्या जागांवर झोपड्या उभ्या राहणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. विभाग अधिकारी या झोपडपट्टीधारकांशी हातमिळवणी करतात. त्यांच्या झ ोपड्यांना अधिकृत क्रमांक देण्याचे काम केले जाते. शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, देहू आळंदी, पंढरपूर, शेगाव अशा धार्मिक क्षेत्रांसाठी 682 कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार केला असल्याचे अभिभाषणात नमूद केले आहे. कोल्हापूरची महालक्ष्मी आणि जेजुरी तीर्थक्षेत्राचा देखील या आराखडयामध्ये समावेश झाला पाहिजे. जेजुरी हे महाराष्ट्राचे आराध्यदैवत आहे. तेथे वयोवृध्द भाविक मोठया प्रमाणात येत असतात. त्याठिकाणी रोपवे सुविधा व्हावी म्हणून मी मागील तीन वर्षापासून मागणी करीत आहे. रोपवे सुविधा उपलब्ध झाली तर वयोवृध्दांना देवदर्शन करणे सोयीचे होईल. शासनाने अनेक चांगल्या प्रकारच्या योजना आणल्या आहेत. राज्य शासनाने पर्यावरणाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. आज आपण महागाईबद्दल बोलतो. परंतु महागाई कशामुळे वाढली याचा अभ्यास केला पाहिजे. पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. सर्वत्र काँक्रिटचे जंगल पसरत चालले आहे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/MMP/ D/ पूर्वी श्री. भोगले..... 13:00

श्रीमती मंदा म्हात्रे ......

झाडांची मोठ्या प्रमाणात तोड होत असल्याने तापमानातही वाढ होत चालली अशा प्रकारचे बदल वातावरणात होत आहेत. त्याचे परिणाम म्हणून अवेळी पाऊस, गारांचा पाऊस यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे व शेतीचेही नुकसान होत आहे या अनुषंगाने शासनाने ग्लोबल वॉर्मिंगचा विचार करुन जो उपक्रम घेतला आहे तो अत्यंत चांगला आहे एवढेच मी सांगू इच्छिते.

महोदय, खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून सागरी किनाऱ्यांचा विकास, धरणे तसेच बोट वाहतूक ही कल्पना अत्यंत चांगली आहे. त्याचबरोबर किनाऱ्याचे सुशोभीकरण सुध्दा झाले पाहिजे, अशी मी मागणी करीत आहे. नवी मुंबई येथे विमानतळाचा प्रश्न गेल्या 11 वर्षांपासून गाजत आहे. या भागात विमानतळ होणार म्हणून अनेक लोकांनी जागा घेतल्या परंतु या विमानतळाचा प्रश्न अजुनही मार्गी लागत नाही, त्यासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण निर्माण केले. आजच्या घडीला नवी मुंबई परिसरात सर्वात जास्त झोपडपट्टी आहे त्या ठिकाणी ही पुनर्वसन योजना लागू करुन विकास करण्याची गरज आहे. शासनाने गृहनिर्माण धोरण अद्यापही तयार केलेले नाही, ते ताबडतोबीने करावे अशी मी विनंती करते. तसेच आंतरजातीय विवाहांना उत्तेजन देण्याची शासनाची योजना आहे. सामुदायिक विवाहांना शासनाने मदत करण्याचे देखील ठरविले परंतु अशा योजनेचा प्रचार आणि प्रसार करण्याची गरज आहे. राज्यात ठाणे जिल्ह्यात आदिवासींची संख्या सर्वात जास्त आहे. नंदुरबार आणि इगतपुरी या ठिकाणी शासनाने क्रीडा ॲकेडमी निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे परंतु ठाण्यासारख्या आदिवासीबहुल जिल्ह्यात सुध्दा अशा प्रकारच्या ॲकेडमीची गरज आहे, जेणेकरुन ठाणे जिल्ह्यातील आदिवासीच्या मुलांनाही क्रीडा विषयाबाबत प्रोत्साहन मिळेल, त्याचा शासनाने विचार करावा. प्रत्येक जिल्हा पातळीवर शासकीय तंत्रनिकेतन आणि वैद्यकीय महाविद्यालय उभारुन गोरगरीब मुलांना मोफत व्यावसायिक शिक्षण मिळेल याबाबत प्रयत्न करावेत. तसेच प्रत्येक तालुका पातळीवर आयटीआय सेंटर्स स्थापन करावेत. शेवटचा मुद्दा मी मुद्दाम माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत म्हणून सांगू इच्छिते. कारण त्यांनी सुध्दा सीमा प्रश्नाच्या संदर्भात वेष बदलून अनेक आंदोलने केली आहेत. त्या काळापासून हा प्रश्न प्रलंबित आहे त्याचा कुठलाही निर्णय झालेला नाही. हा मुद्दा शासनाने लवकरात लवकर हाती घेऊन विचार करावा, एवढे बोलून आपण मला अधिक वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करते.

---------

( ....2

20-03-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) KK-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्यांना धरुन मी काही मोजक्याच मुद्यांना स्पर्श करुन हे अभिभाषण किती फसवे आहे हे दाखविण्याचा प्रयत्न करणार आहे. यातील चौथ्या मुद्यात राज्यातील नागरिकांच्या सुरक्षेबाबतचा उल्लेख केलेला आहे. 26/11/200 रोजी मुंबईवर अतिरेकी हल्ला झाल्यानंतर मुंबईत सागरी मार्गाने आक्रमण होऊ शकते असे समजल्यामुळे समुद्रातील 54 पॉईंटवर शासनाने गस्तीसाठी माणसे उभी केली असे माननीय गृह मंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते. मी त्यासंबंधीची संपूर्ण यादी काढली असता 12 व्या पाईंटवर मला एकही माणूस दिसला नाही त्यामुळे आपण भाषणातून जे सांगतो त्याची अंमलबजावणी होते की नाही याची कल्पना माननीय गृह मंत्र्यांना असते काय ? खरे म्हणजे 54 पॉईंट हा इतका सेन्सेटीव्ह असताना तेथे माणसांची रचना तर नाहीच .....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

पण ज्या भागातून कसाब आणि त्याचे साथीदार आले त्या कफपरेड भागातील सोमानी हायस्कुलच्या मागील समुद्रात बंधारा घालण्याचे काम अनाधिकृतपणे सुरु आहे. हा बंधारा शासनाच्या कोणत्या विभागामार्फत घातला जात आहे याची मी चौकशी केली. यासाठी मी आमदार म्हणून पत्रव्यवहार केला, माहितीच्या अधिकारानुसार माहिती घेतली, महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार केला, जिल्हाधिकारी कार्यालयाला, नगरविकास विभाग, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, एमएमआरडीए यांच्याशी पत्रव्यवहार केला परंतु उत्तर काही मिळाले नाही. कधी कधी मंत्रालय असते माननीय भुजबळ साहेबांकडे आणि अचानक जाते एमएमआरडीचे प्रमुख म्हणून माननीय चव्हाण साहेबांकडे. यामागे काय गौडबंगाल आहे हे आम्हाला कळत नाही. त्यामुळे मी पीडब्ल्यूडीच्या पत्तन विभागालाही पत्र लिहिले. या ठिकाणच्या समुद्रात भर घालून कालांतराने झोपडया बांधून त्या ठिकाणी एसआरए योजना आणावयाची आहे की, काय अशी आम्हाला आता शंका येऊ लागली आहे. असा प्रकार या आधी सुध्दा झालेला आहे. ज्या भागातून आतंकवादी आले होते, व पुढील काळात येण्याची शक्यता आहे यासंदर्भातील सगळी माहिती शासनाकडे असतांना तसेच एक लोकप्रतिनिधी यासंदर्भातील सर्व माहिती शासनाच्या निदर्शनास आणून देत असतांना या कामाच्या संदर्भात प्रत्येक विभाग त्याची दखल न घेता टोलवाटोलवी करीत आहे. आज तागायत हे काम कोणत्या खात्यामार्फत सुरु आहे याची साधी माहितीही मला मिळू शकलेली नाही. नरिमन पॉईंट, कफपरेड, कुलाबा या ठिकाणी शासनाकडून एमएमआरडीएचे विशेष नियोजन प्राधिकरण नेमले आहे त्यांच्याशी सुध्दा मी पत्रव्यवहार केला परंतु त्यांच्याकडूनही माहिती मिळू शकली नाही. बधवार पार्क, महात्मा फुले नगर, शिवशक्तीनगर या ठिकाणच्या झोपडपट्टी प्रमाणे हा बंधारा घातल्यामुळे या ठिकाणी 4-5 एकराचा भुखंड तयार झालेला आहे व अद्यापपावेतो हे काम थांबलेले नाही. या ठिकाणी माती टाकण्यासाठी येणारे डंपर्स आमदार निवासातून दिसत असतात. यासंदर्भातील सर्व माहिती मी दिलेली असतांना या कामाच्या संदर्भात कोणत्या मंत्र्यांची हातमिळवणी आहे, कोणत्या खात्याची हातमिळवणी आहे याची माहिती मिळत नाही. माननीय राज्यपाल महोदयांनी सुरक्षेच्या संदर्भात जी माहिती दिलेली आहे त्यांच्या नजरेत हा मुद्दा आला असेल तर त्याला सुरेख म्हणता येणार नाही.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ......

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी फयान चक्रीवादळाचा उल्लेख आपल्या अभिभाषणात केलेला आहे. फयान चक्रीवादळ निर्माण झाले होते तेव्हा माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात बैठक घेतली होती. खरे म्हणजे वादळाने एक पीक नष्ट होणे वेगळे आणि कोकणातील नारळाच्या बागाच्या बागा नष्ट होणे ही बाब वेगळी. कोकणातील नारळाच्य बागा नष्ट झालेल्या आहेत याबाबत आम्ही सभागृहात विषय उपस्थित केले होते. कोकणातील नुकसानभरपाई पोटी 212 ते 213 कोटी रुपये मिळणे अपेक्षित होते. माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात सांगितले आहे की, "माझ्या शासनाने बाधित कुटुंबाना अत्यावश्यक वस्तुंचा मोफत पुरवठा करण्याच्या सहाय्यकारी उपाययोजना करण्यासाठीची योजना तात्काळ हाती घेतली, प्रत्येक कुटुंबाला 1500 ते 3000 रुपयांची मदत देण्याचे मोठे काम तात्काळ केले." असा त्याचा अर्थ होतो. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. हे शासन आयपीएल सामन्यांचा टॅक्स माफ करते. आयपीएलच्या क्रिकेटमधून ललित मोदी, शाहरुख खान, प्रिती झिंटा मोठया प्रमाणात पैसे कमावित असतांना आयपीएलवरील 350 ते 800 कोटी टॅक्स माफ करावयाचा आणि आपल्या फयान वादळात सापडलेल्या जनतेला नुकसानभरपाई देण्यासाठी या शासनाकडे 1500 ते 3000 रुपये सुध्दा नाही त्यामुळे या शासनाला लाज कशी वाटत नाही? हा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, फयान वादळामुळे कोकणातील मच्छिमारांच्या 48 बोटींचे नुकसान झ ालेले आहे हे आपल्याच पंचनाम्यात शासनाने सांगितले आहे. 12 ते 30 लाखाची एक बोट अतसते. या मच्छिमारांनी शासनाकडे कोणत्यही प्रकारची मदत मागितली नाही, अनुदान द्या असेही म्हटले नाही तर आम्हाला कमी आणि सुलभ व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन द्या एवढेच कोकणातील मच्छिमारांचे म्हणणे आहे. मेहनत करुन तुमचे कर्ज परत फेडतो एवढेच कोकणातील मच्छिमारांचे म्हणणे आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

सभापती महोदय, अल्प भू धारक शेतक-यांना 2 टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल असा उल्लेख् माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे. त्यावेळी सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी जोर जोरात बाके वाजविली होती. या निमित्ताने मला कोकणातील मच्छिमारासबंधीचा एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. मच्छिमारांच्या ज्या काही अपेक्षा आहेत त्या केव्हा पूर्ण केल्या जाणार आहेत ?यासबंधीची काळजी वा चिंता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दिसून येत नाही त्यामुळे त्याला आम्ही कसे समर्थन द्यावयाचे ?

सभापती महोदय, विविध मागास भागाच्या विकासासंबंधीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे.दुष्काळी भागासाठी स्वतंत्र पॅकेज देण्यात आले असून आघाडी सारकारने पॅकेज हा शब्द बदनाम करुन टाकला आहे.निवडणुकाच्या अगोदर या सरकारने एक मंत्रिमंडळाची बैठक नाशिक येथे घेतली होती आणि त्यामध्ये अनेक निर्णय घेण्यात आले होते. त्यासबधी नंतर प्रेस कॉन्फरन्स घेऊन हे निर्णय जाहीर करण्यात आले होते. सन्माननीय उपमुख्यमंत्री ज्या अविर्भावात बेळगावला गेले होते त्या अविर्भावात ही प्रेस कॉन्फरन्स झाली होती.त्यावेळच्या बैठकीत घेतलेले निर्णय वृत्तपत्रातून जाहीर झाल्यानंतर उत्तर महाराष्ट्र आणि नाशिक भागातील सर्व मंडळी खूष होऊन गेली. त्याचप्रमाणे कोकणामध्ये सुध्दा एक मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात आली होती त्या बैठकीच्या निमित्ताने आलेल्या सर्वानी मासे खाल्ले. कोकणातील माणसाला असे वाटले की, मंत्र्यांनी मासे खाल्ले आहेत तेव्हा कोकणासाठी काही तरी मिळेल. जवळ जवळ साडेपाच हजार कोटी रुपयांच्या विविध योजनांची त्यावेळी घोषणा करण्यात आली होती. त्यामुळे त्या भागातील सर्व कार्यकर्ते खूष झाले होते. नर सेवा ही नारायण सेवा आहे असे समजून कोकणातील सर्वसामान्य माणसाची सेवा करण्यासाठी ते निघाले होते आणि साडेपाच हजार कोटी रुपयांची घोषणा झाल्यानंतर लोकांना असे वाटले की, आता आपल्या भागात विकासाची गंगा येणार आहे. वाडया आणि वस्त्या रस्त्यांनी जोडल्या जाणार आहेत ,पाण्याचा प्रश्न सुटणार आहे, बांधकामाचे प्रश्न सुटणार आहेत, धरणाचे प्रश्न सुटणार आहेत आणि कोकणामध्ये आबादीआबाद निर्माण होणार आहे असे तेथील लोकांना वाटले होते. पैसे न आल्यामुळे नंतर या कामांचे टेन्डर रद्द करण्यात आले होते. साडेपाच हजार कोटी रुपयाच्या

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ..

संदर्भात शासनाने फक्त घोषणा केली होती. निवडणुकीच्या अगोदरचे 100 दिवस आणि नंतरचे 150 दिवस अशा प्रकारे एकूण 250 दिवसाच्या कालावधीत कोणतेही काम झालेले नाही. दुष्काळी भागासाठी पॅकेज देण्यात येईल अशी घोषणा का करण्यात आली ? अशा प्रकारच्या घोषणा करुन शासन लोकांना का फसवत आहे ?

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात औषधी वनस्पतीचा उल्लेख केला आहे. डॉ. पतंगराव कदम यांच्याकडे वन खाते देण्यात आलेले आहे. वृक्ष तोड विरोधी कायदा करण्यात आला आहे परंतु सहयाद्रीच्या पट्टयातील रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या जिल्हयात मोठया प्रमाणावर वृक्षतोड सुरु आहे. जंगल तोड विरोधी जो कायदा करण्यात आला आहे त्याची विल्हेवाट लावून राजकीय आणि नोकरशाहीचे सर्व समर्थन घेऊन वृक्षाची तोड करुन त्याची लूट सुरु आहे . या पट्टयातील 40 गावे व्याघ्र प्रकल्पासाठी राखून ठेवण्यात आली असून या ठिकाणी बेकायदेशीर जंगलतोड सुरु आहे. तेव्हाशासनाने व्याघ्र प्रकल्पासाठी हे क्षेत्र खरोखर राखून ठेवलेले आहे काय याबाबतीत शंका निर्माण होते. सहयाद्री पर्वत रांगातील जैवविविधता आणि मुबलक वन संपदा लक्षात घेऊन केन्द्र सरकारने जागतिक नैसर्गिक ठेवा म्हणून सहयाद्री पर्वताला घोषित करण्याची युनिस्कोकडे मागणी केली असून ही मागणी 2010 साली मान्य होईल असे श्री जयरामन सांगत आहेत परंतु सहयाद्री पर्वताच्या रांगेतील विविध वन संपदेचे अस्तित्व बेकायदेशीर वृक्षतोडीमुळे संपुष्टात येत आहे. तेव्हा युनिस्कोचा जागतिक नैसर्गिक ठेवा कोणत्या राजकीय नेत्याच्या आशिर्वादाने संपत चालला आहे याचे उत्तर शासनाकडून मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, वन्य प्राणी आणि बिबटयासबंधीचे अनेक मुद्दे मांडण्यासारखे आहेत परंतु त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात झोपडपट्टी पुनर्वसनाचा उल्लेख करण्यात आला आहे. या संबंधी मला एवढेच सांगावयाचे आहे की, या योजनेतून झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन होत आहे की बिल्डरांचे पुनर्वसन होत आहे.? या संदर्भात मी आपल्याला एक उदाहरण देतो. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाने डीसीआर 33 प्रमाणे गोरेगाव (पूर्व) दिंडोशी येथे एसआरए योजना राबवली होती.

नंतर श्री.सरफरे ...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

गोरेगाव (पूर्व) दिंडोशी येथे एस.आर.ए. ची योजना राबविली. या योजनेंतर्गत झोपडपट्टीवासियांना घर मिळाले. आणि सेल कॉंपोनंट म्हणून 8 इमारतींमध्ये 874 फ्लॅट, 16 कमर्शिअल टेनामेंट हे विकण्यासाठी बांधण्यात आले. हे काम एका कॉट्रॅक्टरला देण्यात आले. आणि शेवटचे 5 टक्के काम शिल्लक राहिले असतांना त्याने ते काम सोडून दिले. पुन्हा त्या कामासाठी टेंडर काढण्यात आले त्यावेळी मुंबईतील रियल इस्टेटचे भाव सर्वोच्च पातळीवर असतांना हे टेंडर मंत्री ग्रुपला देण्यात आले. गोरेगाव (पूर्व) दिंडोशी येथे मंत्री ग्रुपला या कामासाठी 1791 रुपये प्रति स्क्वेअर फूट हा भाव देण्यात आला. म्हणजे माननीय सदस्य श्री. भाई जगताप आपणास कळेल की, यामध्ये कशाप्रकारे व्यवहार झाला आहे? त्याठिकाणी रेडी रेकनरचा रेट हा 4 हजार रुपयांपेक्षा जास्त असतांना आपल्या सरकारने 6 लाख 69 हजार 742 चौ.फूटाच्या बांधकामाचे टेंडर 5 हप्त्यामध्ये 132 कोटींना मंत्री ग्रुपला दिले. रेडी रेकनरच्या रेटप्रमाणे यामध्ये शासनाला 150 कोटी रुपये मिळाले असते. मंत्री ग्रुपला हा मलिदा कुणाच्या आशीर्वादाने मिळाला याचे उत्तर माननीय श्री. भुजबळ साहेबांनी सभागृहाला देण्याची गरज आहे. याच्या पाठिमागे अमूक मंत्री आहेत की, माननीय मुख्यमंत्री आहेत यामध्ये मला रस नाही. हे 150 कोटी रुपये शासनाच्या तिजोरीमध्ये आले असते तर अवेळी पावसामुळे बीड जिल्हयात शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबद्दल त्यांना भरभरुन पैसे देता आले असते. हे 150 कोटी रुपये कुणामार्फत कुणाच्या खिशामध्ये गेले याचे उत्तर मिळाले पाहिजे. त्याबाबतची कागदपत्रे माझ्याकडे आहेत. एस.आर.ए. योजना राबवून झोपडपट्टीवासियांचे भले करता की, बिल्डरांचे भले करता याचे उत्तर येण्याची गरज आहे. एस.आर.ए. योजनेमध्ये लोकांना सुविधा मिळाल्या पाहिजेत. पूर्वी 180 चौ.फूटाचे गाळे मिळत होते. परंतु झोपडपट्टीवासियांचा विषय प्रकर्षाने मांडल्यानंतर 180 वरुन 225 चौ.फूटापर्यंत वाढ करण्यात आली. त्यानंतर 269 चौ.फूटाचे गाळे देण्याचा निर्णय झाला. हा निर्णय झाल्यानंतर तो अंमलात आणण्याचे काम एस.आर.ए. योजनेच्या सी.ई.ओं. च्या पातळीवर व्हावयास पाहिजे. परंतु तसे झाले नाही. एस.आर.ए. ही योजना गृहनिर्माण खात्याच्या अखत्यारीत आहे. त्या खात्याकडे असलेल्या एस.आर.ए. च्या 40 फाईल्स नगर विकास विभागाने मागवून घेतल्या. या फाईल्सबाबत नगर विकास विभाग सँक्शन देणार आहे असे सांगण्यात आले. या सर्व फाईल्स वर्षा बंगल्यासमोरच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

श्री. विनोद तावडे....

फ्लॅटवर आल्या. त्यामधील 10 फाईल्स क्लिअर झाल्या. अजून 30 फाईल्स क्लिअर झालेल्या नाहीत. बहुधा त्या वाटाघाटीमुळे वेटींग लिस्टवर असाव्यात असा अंदाज आहे. 40 पैकी कोणत्या 10 फाईल्स क्लिअर झाल्या हे वर्षा बंगल्यासमोरच्या फ्लॅटमध्ये जे बसतात त्यांना माहीत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

सभापती महोदय, या सगळया गोष्टींमधून शासन जनतेला काय सांगू इच्छिते ? तुम्हाला काय घ्यावयाचे असेल ते घ्या हो.पण सामान्य झोपडपट्टीवासियांसाठी राबविण्यात येणारी योजना पुढे लांबत जाते, अरुणभाई, मुंबईतील एखाद्या तरुणाचे लग्न ठरत असेल, परंतु त्याचे झोपडपट्टी तील एस.आर.ए.च्या योजनेच्या माध्यमातून त्याचे घर होणार आहे असे लक्षात घेऊन अनेक कुटुंबामध्ये लग्न ठरली. पण एस.आर.ए.योजना या ना त्या कारणामुळे लांबल्यामुळे तीन लग्ने मोडल्याचे मला माहिती आहे. याचा असा परिणाम होत आहे. आम्हाला बिल्डरांमध्ये आणि तुम्ही काय करीत आहात यामध्ये मुळीच इंटरेस्ट नाही, म्हणजे तुमची कातडी इतकी निर्लज्ज म्हणजे खाऊन काही समाधान होतच नाही. परंतु त्यामुळे सामान्य तरुणाचा विवाह मोडत आहे, कारण त्याच्याकडे स्वत:चे घर नाही याची आम्हाला कुठेतरी चिंता वाटते. त्यामुळे आम्हाला येथे ही बाब पोटतिडकीने मांडावीशी वाटते. अशी परिस्थिती असताना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करावासा वाटतो. कारण आम्ही ते आदरणीय राज्यपाल असल्यामुळे तेवढेच करु शकतो. कारण ते येथे सरकारची भूमिका मांडत असतात. नंतर सदनामध्ये पुरवणी मागण्या चर्चेसाठी येणार आहेत. इतरही बरेच विषय आहेत, त्याबाबत मी नंतर बोलेनच. नंतर बजेट मांडण्यात येणार आहे. तसेच आम्ही मुंबई शहराच्या संबंधात येथे चर्चा उपस्थित करणार आहोत. याठिकाणी जे काही चाललेले आहे, त्याबाबतीत एकदा सगळे काही होऊनच जाऊ दे. पण या सगळया गोष्टींच्या बाबतीत जनतेला काहीतरी उत्तर मिळावे एवढीच माफक अपेक्षा आहे. तुम्ही आपसात मारामारी करा, तलवारी काढा, पॅचअप करा काय करावयाचे असेल ते करा. पण सामान्य माणसाला तरी त्याची झळ पोहोचू देऊ नका. परंतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यापलिकडे मी काही बोलू शकत नाही ही माझी विधीमंडळातील अडचण आहे. पण सरकारला या पलिकडे जाऊन काही सुनावण्याची गरज आहे एवढेच यानिमित्ताने सांगावेसे वाटते. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .2 ओ-2

श्री एस. क्यु. जमा ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण के धन्यवाद प्रस्ताव को समर्थन देने के लिए मैं यहां पर खड़ा हुआ हूं. यह एक कस्टमरी है. माननीय राज्यपाल महोदय अपने अभिभाषण में सरकार की विभिन्न योजनाओं की जानकारी देते हैं. इसलिए मेरा कहना है कि माननीय विरोधी पक्ष के माननीय सदस्यों को इस बारे में ज्यादा गंभीर और इतनी ज्यादा निंदा करने की आवश्यकता नहीं है.

माननीय सभापति महोदय पिछले दस सालों में हमारी महाराष्ट्र सरकार ने बहुत अच्छा काम किया है. उसी काम को आगे बढ़ाने की दृष्टि से माननीय राज्यपाल महोदय ने उसकी रुप रेखा अपने अभिभाषण में सदन के सामने रखी है. मैं इस अभिभाषण को समर्थन देने के लिए यहां खड़ा हुआ हूं. मैं यहां पर बहुत बातों का जिक्र नहीं करना चाहता . लेकिन जिन बातों पर बहुत ध्यान देने की जरुरत है उन्हीं बातों का जिक्र मैं यहां पर करुंगा. मैं विनती करना चाहूंगा कि सरकार उन विषयों पर आवश्यक कदम अवश्य उठाएगी.

मेरा मानना है कि महंगाई रोकने के संबंध में सरकार को कड़े कदम उठाने चाहिएं. जमाखोरी के संबंध में आने वाले समय में सरकार सख्त से सख्त कदम अवश्य उठाएगी. ताकि आम जनता में विश्वास बढ़े कि महंगाई को रोकने के लिए सरकार की ओर से कार्यवाही हो रही है.

माननीय सभापति महोदय, एक और विषय पर अनेक माननीय सदस्यों ने अपने विचार यहां पर रखे और वह विषय किसानों की आत्महत्या के बारे में है. मैं कहना चाहूंगा कि केंद्र सरकार तथा महाराष्ट्र सरकार की ओर से बहुत सारे पैकेज किसानों को दिए गए हैं. हमारा मानना है कि किसानों की आत्महत्या में कमी जरुर आयी है लेकिन पूरी तरह से रुक नहीं पायी है. इसलिए जरुरत इस बात की है कि सरकार की ओर से एक एक्सपर्ट कमेटी बनायी जाये और उस कमेटी को एक समयबद्ध कार्यक्रम दिया जाये. उस एक्सपर्ट कमेटी को 2 महीने का या कोई एक निश्चित समय दिया जाये कि वह कमेटी एक निश्चित समय में स्टडी करके सरकार को बताए कि इस पैकेज का फायदा कितने लोगों को हुआ है. और सरकार एक हाई पावर

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यु जमा जारी...

कमेटी बनाकर यह देखे कि क्या उस पैकेज में कुछ सुधार करने की जरुरत है या कुछ नयी योजना इस संबंध में लागू करने की जरुरत है. इस कमेटी के काम में इस बात का भी समावेश होना चाहिए कि हमारे पूर्वी विदर्भ के गोंदिया, भंडारा या नागपुर जैसे जिलों में जहां पर किसानों की आत्महत्याएं हो रही हैं उन किसानों को राहत पहुंचाने के लिए सरकार की ओर से किन नयी योजनाओं को लागू करने की आवश्यकता है.

माननीय सभापति महोदय मेरा तीसरा मुद्दा बिजली के बारे में है. यहां पर महाराष्ट्र को लोड शेडिंग से मुक्त करने की बात कही गयी है. माननीय राज्यपाल महोदय के अंग्रेजी अभिभाषण में क्लाज 17 में लिखा हुआ है कि सार्वजनिक और निजी सहयोग से भुसावल, धोपावे और डोण्डाइचा में शीघ्र ही विद्युत परियोजनाएं शुरु की जाएंगी. और उससे 3680 मेगा वॉट विद्युत तैयार की जाएगी उसके बाद नीचे लिखा हुआ है कि महाजेनको के मार्फत पारस, परली, भुसावल और चंद्रपुर में 3480 मेगा वॉट थर्मल उर्जा उत्पादन क्षमता की परियोजना के निर्माण का कार्य प्रगति पर है. यह रिपीटेशन लगता है और यह कन्फयूज करने वाली बात है. मेरा कहना है कि इस बारे में सरकार को स्पष्टीकरण देना चाहिए कि हकीकत में कितना पावर जेनरेशन होने वाला है. सरकार को बताना चाहिए कि इसमें थर्मल पावर, हाइड्रो पावर तथा गैस बेस कितनी पावर निर्माण होने वाली है. इस चीज का स्पष्टीकरण होना यहां पर जरुरी है.

सभापति महोदय, लोड शेडिंग के बारे में महाराष्ट्र सरकार या एम.ई.आर.सी. का जो निर्णय है उसको देख कर लगता है कि यह निर्णय अर्बन बेस्ड है. हम पूना और नागपुर जैसे बड़े शहरों को जीरो लोड शेडिंग करने की बात कर रहे हैं. कुछ जगहों पर यह काम हुआ भी है. लेकिन हमारा कहना है कि जीरो लोड शेडिंग की सबसे ज्यादा आवश्यकता ग्रामीण क्षेत्रों में है. किसानों के यहां पर पंप तो लग गए हैं लेकिन उन पंपों को बिजली नहीं मिल रही है.जिसकी वजह से उनकी खेती के लिए बिजली की व्यवस्था नहीं हो पा रही है. इस बारे में शासन को पुनर्विचार करना चाहिए कि हमें सिर्फ शहरों में बड़े लोगों को सुविधा देने के लिए जीरो लोड शेंडिंग करना है या ग्रामों में जहां पर हमें ग्रामीण आर्थिक व्यवस्था को मजबूत करना है वहां पर

...4

श्री एस. क्यु जमा जारी...

जीरो लोड शेडिंग करना है. हमारे किसानों की आर्थिक हालत ठीक नहीं है उसको सुधारने के लिए गांवों में जीरो लोड शेडिंग करने के बारे विचार किया जाना आवश्यक है. हमारे विदर्भ में एनटीपीसी का एक हजार मेगा वॉट का एक पावर प्रोजेक्ट आ रहा है. उसके लिए लेंड एक्वीजिशन का काम हो गया है लेकिन उससे संबंधित किसी बात का जिक्र माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में नहीं है. जनवरी महीने में केंद्रीय उर्जा मंत्री महोदय ने उसकी क्षमता एक हजार मेगा वॉट से बढ़ाकर 2250 मेगा वॉट करने की बात कही है लेकिन उस बारे में माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में कोई जिक्र क्यों नहीं है उसकी जानकारी सरकार द्वारा सभागृह में दी जानी चाहिए,ऐसी मेरी विनती है.

मैं यह भी कहना चाहूंगा कि करीब 20-25 प्राइवेट पावर प्रोजेक्ट विदर्भ में आने वाले हैं. लेकिन जो एन्वायरनमेंटलिस्ट तथा वहां की जनता है उसमें बहुत रोष है, वहां के जन प्रतिनिधियों में भी बहुत रोष है. विदर्भ में थर्मल पावर प्रोजेक्ट पहले से हैं. वहां और पावर प्रोजेक्ट लाने का मतलब है कि वहां के पर्यावरण पर काफी असर पड़ेगा और वहां की खेत जमीन पर उसका बहुत असर पड़ेगा. इसलिए हमारी मांग है कि ये पावर प्रोजेक्ट ऐसी जगह पर लाने चाहिए जो कि रुरल एरियाज हैं, बैकवर्ड एरियाज हैं तथा जहां पर बंजर भूमि है. कहने का मतलब यही है कि विदर्भ में नये पावर प्रोजेक्ट की जरुरत नहीं है.

मैं एक बात की ओर सरकार का ध्यान आकर्षित करना चाहता हूं कि महाराष्ट्र सरकार की ओर से केंद्र सरकार को एक निवेदन जाना चाहिए कि हमारे विदर्भ में जो कोयला और मिनरल हैं वह हम दूसरे स्टेट को दे रहे हैं. कोल ब्लाक्स हमने प्राइवेट कंपनी को या ज्वाइंट वेंचर कंपनी को दिए हैं. प्राइवेट कंपनी हमारा कोयला कर्नाटक ले जा रही हैं. लेकिन जब यहां पर एनटीपीसी को एक हजार मेगा वॉट बिजली बनाने के लिए कोयला चाहिए तो वे हमें वेस्टर्न कोल फील्ड उड़ीसा से लिंक कर रहे हैं. जिसकी वजह से ट्रांस्पोर्टेशन कॉस्ट बहुत बढ़ जाएगी. इस बारे में महाराष्ट्र सरकार को केंद्र सरकार से बात करनी चाहिए. कोल ब्लॉक्स

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यु जमा जारी...

देने के बारे में इस तरह की पॉलिसी होनी चाहिए कि पहले हमें अपने यहां पर बिजली निर्माण के लिए जितना कोयला चाहिए वह पहले हमें मिले और उसके बाद यदि सरप्लस कोल ब्लॉक्स हों तो वह कोयला हमें दूसरी स्टेट को देना चाहिए. आज एनटीपीसी को अपनी जरुरत के लिए कोयला लाने के लिए महानदी से लिंक अप किया गया है वह बहुत कास्टली होगा यदि एनटीपीसी, ट्रांस्पोर्टेशन का कुछ पैसा बचा कर डब्लू.सी.एल. को दे तो कोयला स्पॉट पर मिल सकता है. राज्य सरकार को इस बारे में केंद्र सरकार से बात करनी चाहिए.

सभापति महोदय, सिंचन के बैकलॉग के बारेमें बहुत ज्यादा उल्लेख यहां पर नहीं है. लेकिन विदर्भ के इरीगेशन बैकलॉग के बारे में यहां पर बहुत चर्चा हुई है. राजनीतिक बातों की चर्चा मैं यहां पर नहीं करना चाहता.

(भाषण जारी श्री शर्मा के पास....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा का भाषण जारी (पूर्वी देवदत्त)

माननीय मुख्यमंत्री महोदय ने पिछले नागपुर अधिवेशन में 23 दिसम्बर को 10 हजार करोड़ रुपए का स्पेशल पॅकेज देने की घोषणा की थी और यह कहा था कि यह पॅकेज 3 साल में पूरा होगा. इसको मॉनीटर करने के लिए और इसको निश्चित समय में पूरा करने के लिए सचिवालय में एक स्पेशल सेल बनाया है. लेकिन माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में इस बात का कोई जिक्र नहीं है. संविधान के अनुच्छेद 371 के अनुसार राज्यपाल महोदय की तरफ से विदर्भ के इरीगेशन के लिए पैसा देने के बारे में राज्य सरकार को निदेश दिए जाते हैं. विदर्भ का इरीगेशन बढ़ाने के बारे में माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में कोई जिक्र नहीं है. इसलिए शासन की ओर से इस बारे में स्पष्ट रुप से बताना चाहिए कि विदर्भ के इरीगेशन के बॅकलॉग के बारे में क्या किया जाएगा. विदर्भ में मिनरल्स काफी मात्रा में पाए जाते हैं. इनको निकालने के बारे में और इन पर आधारित उद्योग बढ़ाने के बारे में माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में कोई जिक्र नहीं है, इसलिए सरकार को इस बारे में ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, हमारे माननीय उद्योग मंत्री ने बंद उद्योगों के बारे में, चाहे वह स्मॉल स्केल इन्डस्ट्री हो, चाहे वह मीडियम स्केल इन्डस्ट्री हो या लार्ज स्केल इन्डस्ट्री हो, इन सब को चालू करने के बारे में, इनको पुनर्जीवित करने के बारे में कहा गया है, लेकिन शासन की तरफ से अभी तक ऐसी कोई योजना हमारे सामने नहीं आई है. बंद उद्योगों को चालू करने के बारे में सरकार को योजना बनानी चाहिए, जिससे बंद उद्योगों का पुनर्वसन किया जा सके और लोगों को रोजगार मिल सके.

सभापति महोदय, एस.ई.जेड. में एफ.डी.आई. का पैसा आया है और केन्द्रीय सरकार ने एस.ई.जेड. के लिए जमीन लेने की नीति में परिवर्तन किया है. केन्द्रीय सरकार का कहना है कि एग्रीकल्चरल जमीन और छोटे किसान की जमीन का अधिग्रहण नहीं करना चाहिए. कम इरीगेटेड जमीन लेनी चाहिए या फिर बहुत से तालुकों में एम.आई.डी.सी. ने जमीन ली है और वहां पर उद्योग धन्धे न आने की वजह से उसका इस्तेमाल नहीं हो रहा है, लोगों ने उस जमीन पर गो-डाउन बनाकर छोड़ दिए हैं, ऐसी एम.आई.डी.सी. की जमीन जिसका इस्तेमाल नहीं हो रहा है, उसको वापस लेना चाहिए और उसका इस्तेमाल एस.ई.जेड. के लिए करना चाहिए. केन्द्रीय सरकार की यह एक अच्छी नीति है.

. . . PP 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा

सभापति महोदय, हमारे लेबर डिपार्टमेंट ने कामगारों की भलाई के लिए कई कानून बनाए हैं, लेकिन लेबर डिपार्टमेंट की मशीनरी बहुत कमजोर है. इसमें रिक्त पद बहुत तादाद में हैं और इनको भरा नहीं जा रहा है. महाराष्ट्र में हमने निजी सुरक्षा गार्डों के प्रोटेक्शन के लिए कानून बनाया है, घर में काम करने वाली मोलकरिन बाई की भलाई के लिए हमने कुछ दिन पहले ही कानून पास किया है, कृषि क्षेत्र में काम करने वाले असंगठित मजदूरों की भलाई के लिए हमने कानून पास किया है, लेकिन इन कानूनों को लागू कराने के लिए हमारे पास मॅन पावर की कमी है, इसलिए लेबर डिपार्टमेंट उतना सक्षम नहीं है. लेबर डिपार्टमेंट के रिक्त पदों को भरने के लिए और इसको मजबूत बनाने के लिए महाराष्ट्र शासन को विशेष ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, हमने अनप्रोटेक्टेड वर्कर्स के लिए तो कानून बनाया है, लेकिन मुंबई, पुणे, नागपुर और नाशिक जैसे शहरों में कॉल सेन्टर्स में आउट-सोर्सिंग के जरिए रिलायन्स और दूसरी प्राईवेट कंपनिया पढ़े-लिखे लड़के-लड़कियों से काम करा रही है. इसमें काम करने वाले 81 प्रतिशत से ज्यादा लोग महाराष्ट्रियन हैं. लेकिन इन लोगों को कोई संरक्षण नहीं है. अगर ये लोग यूनियन बनाने की बात करते हैं तो इनको नौकरी से निकाल दिया जाता है. इस प्रकार से पढ़े-लिखे लोगों का शोषण हो रहा है, इसलिए इन लोगों के संरक्षण के लिए महाराष्ट्र शासन को विशेष कानून बनाना चाहिए.

सभापति महोदय, मेरा समय खत्म हो गया है. इसलिए अन्त में मैं नागपुर के मिहान प्रकल्प के बारे में कहना चाहता हूँ कि इसके बारे में चर्चा बहुत हो गई है, अब सरकार को यह प्रकल्प जल्दी से जल्दी पूरा करना चाहिए. मैंने जो मुद्दे उठाए हैं, उनके ऊपर सरकार जरुर ध्यान देगी, इस उम्मीद के साथ मैं अपना भाषण खत्म करता हूँ.

. . . . .

. . . भाषण पूर्ण, नंतर श्री. भोईर यांचे मराठी भाषण (श्री. खंदारे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष भोईर ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, आदरणीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी व माझे विचार प्रकट करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, एक गोष्ट मी याठिकाणी नमूद करु इच्छितो की, मागील 3 निवडणुकांमध्ये विरोधी पक्षाला विरोधी बाकावर बसण्याचा जनतेने कौल दिला आहे. विरोधी पक्ष चांगल्या गोष्टीला चांगल्या प्रकारे विरोध करु शकतो म्हणून 3 वेळा विरोधी बाकावर बसण्याची संधी जनतेने तुम्हाला प्राप्त करुन दिली आहे. या शासनाने विविध चांगल्या योजना आखल्या आहेत त्याचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात आहे. या योजनांबाबत विरोधकांकडून विरोध व खेद व्यक्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या भाषणामध्ये 27 योजनांचा उल्लेख आहे. परंतु त्यामध्ये 100 योजना माझ्या शासनाने नमूद केल्या असत्या तरी त्याला विरोध करण्याची विरोधकांना संधी घेतली असती. विरोधकांना मी एवढेच सांगू इच्छितो की, विरोधकांची भाषणे जनतेला आवडतात म्हणून लोकांना तुम्हाला विरोधी बाकावर बसविले आहे.

यानंतर श्री.ओटवणेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष भोईर....

महाराष्ट्र राज्याचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. महाराष्ट्र हे प्रगत आणि पुरोगामी राज्य आहे. आमचे शासने विविध योजना पूर्ण करण्यास कटिबद्ध आहे. शासन प्रगतीकडे झेपावत असताना, कल्याणकारी योजना राबवत असताना राज्याला दहशतवाद आणि नक्षलवादाला सामोरे जावे लागत आहे. महाराष्ट्राची जनता धैर्याने, धीरोदात्तपणाने, सामाजिक वीण न उसविता अमानुष अरिष्टावर समर्थपणे मात करीत आहे. आमचे कर्तव्यदक्ष शासन निरपराध नागरिकांचे जीवित आणि मालमत्तेचे रक्षणासाठी अग्रक्रम देत आहे, त्यामुळे मला शासनाचे मनापासून अभिनंदन करायचे आहे. येथे पोलीस घरकुलासंबंधी देखील चर्चा झाली. शासनाच्यावतीने मला येथे सांगण्यास आनंद होतो की, मी सिडकोमध्ये असताना निर्णय घेतला आहे की, ज्यावेळी सिडकोच्या मार्फत घर संकुलाचा प्रकल्प राबविला जाईल त्यावेळी 10 टक्के घरे पोलिसांना दिली जातील. अशा प्रकारचा प्रस्ताव मागच्या दोन महिन्यापूर्वीच तयार करून तत्संबंधीचा निर्णय माझ्या बैठकीतच घेतला. हा प्रस्ताव मी शासनाकडे पाठविला असून मला खात्री आहे की, ह्या प्रस्तावास माझे शासन नक्कीच मंजुरी देईल. 24 तास काम करणाऱ्या पोलिसांना चांगल्या प्रकारची घरे मिळावीत हे उद्दिष्ट ठेवून मी निर्णय घेतलेला आहे. तेच उद्दिष्ट माझ्या शासनाचे देखील आहे.

सभापती महोदय, आणखी एक महत्त्वाची गोष्ट मी प्रामुख्याने सांगणार आहे. किनारपट्टीचे संरक्षण करण्यासाठी आपण नोकर भरती करणार आहोत. यासाठी आपण वेगळा सेल निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते. किनारपट्टीचे संरक्षण करायचे असेल आणि त्यासाठी आपण पोलीस भरती करणार असाल तर यामध्ये आपण कोळी व आगरी समाजाच्या मुलांची निवड केली पाहिजे. यामध्ये आपण कोळी व आगरी समाजाच्या मुलांना प्राधान्य दिले तर मला खात्री आहे की, 26/11 च्या हल्ल्यावेळी अतिरेक्यांनी ज्याप्रमाणे समुद्र किनाऱ्याचा फायदा घेतला तो त्यांना पुन्हा घेता येणार नाही. यासाठी या दोन्ही समाजातील तरूणांचा उपयोग पोलीस दलासाठी केला तर त्याचा आपल्याला निश्चितच फायदा होऊ शकेल, असे माझे स्वत:चे मत आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष भोईर....

मानवनिर्मित येणाऱ्या संकटांवर आमचे शासन परिणामकारकपणे मुकाबला करीत आहे. पाणलोट क्षेत्रामध्ये विकास प्रकल्प, रोजगार हमी योजनेतील वाढीव मंजुरी, अल्पभूधारकांच्या हितासाठी घेतलेले निर्णय आणि करण्यात आलेली अंमलबजावणी अभिनव अशी आहे. इतकेच नव्हे तर शासनाने शेतकऱ्यांना अल्प व्याजदराने पीक कर्जे देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा आम्हा सर्व सदस्यांना आनंद होत आहे. शेतकऱ्यांना दोन टक्के दराने व्याज मिळणार असल्यामुळे त्यांची नक्कीच उन्नती होणार आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये सदैव अग्रेसर राहिलेल्या मागास भागात विराट औद्योगिक प्रकल्पांना मान्यता देऊन औद्योगिक समतोल साधण्यात आला आहे. आज आमच्या येथील एमआयडीसीमधील छोटे-छोटे कारखाने बंद पडले आहेत. तेथे आय.टी.पार्क करण्यात यावे अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री.संयज केळकर यांनी केली आहे. माझ्या शासनाने ठाणे भागामध्ये एमआयडीसीमध्ये आय.टी.पार्कसाठी काम करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून 20 ते 25 लाख चौ.फूटाचे आय.टी.पार्क तयार होत आहे. येथे आय.टी.पार्क झाल्यानंतर सुशिक्षित बेरोजगारांना त्याचा निश्चितच फायदा होईल. म्हणूनच मला येथे शासनाचे अभिनंदन करावेसे वाटते.

सभापती महोदय, भार नियमन मुक्त करण्यासंबंधीच्या संकल्पनेमध्ये अनेक गोष्टी येथे आलेल्या आहेत. त्यासाठी माझे शासन अत्यंत चांगल्या पद्धतीने उपाययोजना करीत आहे. असे असले तरी ग्रामीण भागातील भार नियमन कमी करणे गरजेचे आहे. त्यासाठी माझ्या राज्य शासनाने उपाययोजना करावी अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुभाष भोईर...)

मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय दर्जा बहाल करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नांची पराकाष्ठाकरीत आहे. अनेक कालबद्ध योजना आकार घेत आहेत. एसआरअेच्या माध्यमातून मुंबई शहरातील झोपडपट्टयांचे निर्मूलन करण्याचे काम शासनाने हाती घेतलेले आहे. यानुषंगाने मला शासनाला एक सूचना करावयाची आहे. ठाणे आणि मुंबई शहरामध्ये अनेक वर्षापासून असलेल्या अनधिकृत इमारती आज अत्यंत धोकादायक स्थितीमध्ये आहेत. ज्याप्रमाणे एसआरअे योजनेखाली झोपडपट्टीवासीना नवीन घरे दिली जात आहेत त्याप्रमाणे या धोकादायक स्थितीमध्ये असलेल्या अनधिकृत इमारतीमधील रहिवाशांना घरे बांधून दिली तर त्यांना ख-या अर्थाने दिलासा मिळू शकेल. मला खात्री आहे की, या धोकादायक अनधिकृत इमारतीमधील लोकांना शासन नक्कीच मदत करील.

सभापती महोदय, सौर ऊर्जेच्या वापरामध्ये ठाणे महानगरपालिकेने पहिला क्रमांक पटकावलेला आहे. ठाणे महानगरपालिकेने ज्या प्रमाणे सौरऊर्जा प्रकल्प राबविलेला आहे त्याप्रमाणे तो संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यासाठी हे शासन कटिबद्ध आहे. सौर ऊर्जेचा वापर शासकीय इमारती, हॉस्पिटल्स इत्यादी ठिकाणी केला तर विजेमध्ये फार मोठी बचत होईल. याबाबतीत देखील माझे शासन पाठपुरावा करील असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, सच्चर समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने राज्य शासनाने अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. अल्पसंख्याक विद्यार्थ्यासाठी मोफत गणवेश, उपस्थिती भत्ता, शिष्यवृत्ती, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तंत्रनिकेतने यांच्यामार्फत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना दर्जेदार तंत्रशिक्षण देण्यासाठी अनेक उपाययोजना शासनाने केलेल्या आहेत. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करुन अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाला चालना दिलेली आहे. सर्व समाज घटकांना बरोबर नेत असताना अल्पसंख्याक मुस्लिम समाजाला बाजूला न ठेवण्याची भूमिका माझ्या शासनाने घेतलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 57 मुद्यांचा उल्लेख केलेला असून त्या सर्व मुद्यांवर अतिशय विस्तृतपणे बोलता येण्यासारखे आहे. परंतु मला वेळेचे बंधन आहे. सभागृहामध्ये मला पहिल्यांदाच बोलण्याची संधी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुभाष भोईर...

मिळत आहे. या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे, यांच्यासारखे सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक अनुभवी सदस्य आहेत. त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा आणि मौलिक विचारांचा फायदा मला नक्कीच होईल, माझ्या ज्ञानामध्ये भर पडण्यास मदत होईल. मी ठाणे महानगरपालिकेमध्ये गेली 25 वर्षे विरोधी पक्षाचा नेता म्हणून काम करीत होतो. या सभागृहामध्ये जनतेच्या कल्याणाची आणि विकासाची कामे होतील, राज्याला प्रगतीपथावर नेणारी कामे होतील अशी अपेक्षा बाळगून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला पाठिंबा देऊन आणि सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

----

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात अनेक वेगवेगळे मुद्दे आपण सभागृहामध्ये मांडत असतो. काही वेळेला प्रत्यक्ष परिणाम झालेला दिसतो. काही वेळेला असा प्रश्न पडतो की, या सभागृहामध्ये जे काही मुद्दे मांडतो त्याचा किती उपयोग होतो? परंतु नवीन सन्माननीय सदस्य मघाशी बोलत असताना या सदनातील प्रघात म्हणून म्हणाले असतील, आम्ही महान व्यक्ती आहोत. खरे म्हणजे या सभागृहामध्ये कशा पध्दतीने वेळ नसताना कसे बोलायचे याचे प्रशिक्षण मिळते. त्यातून हळूहळू आपण अनेक मुद्दे माडतो. आपण ज्यावेळी समाजात वावरतो त्यावेळी कोणाला मुद्दे ऐकायला वेळ नसतो. अशा वेळेला सभागृहामध्ये मुद्दे मांडल्यानंतर निश्चितपणे काही वेळेला परिणाम होतो असा अनुभव मला मागील 5-6 वर्षात आलेला आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण होत असताना आपण खूप अपेक्षा ठेवतो. परंतु पूर्णपणाने अपेक्षाभंग म्हणता येईल अशा प्रकारचे हे भाषण आहे. वृत्तपत्रात आम्ही वाचले होते की, राज्य सरकारचे व्हिजन काय असणार आहे या संदर्भात बरेच दिवस सह्याद्री अतिथीगृहात प्रेझेंटेशन चालले होते. त्यामागील दृष्टीकोन महाराष्ट्र राज्य स्वत:कडे कसे पाहते हे समजून घ्यायचा होता. त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये फार मोठा वादविवाद चालू होता. 14 फेब्रुवारी हा व्हॅलेंटाईन डे म्हणून साजरा केला जातो. तो कसा जोरदार महाराष्ट्रात साजरा होतो या संदर्भात वाहिन्या आणि दुकानदार विशेष तयारीमध्ये असताना त्यांच्या व्हॅलेंटाईन डे च्या आनंदाला फार मोठी चपराक बसली. 13 फेब्रुवारी या आदल्या दिवशी जर्मन बेकरीमध्ये स्फोट झाला. जर्मन बेकरीतील स्फोटाच्या आदल्या दिवशी माय नेम इज खान हा चित्रपट प्रदर्शित होणार होता. 14 तारखेचा व्हॅलेंटाईन डे आणि दोन दिवसाच्या मधल्या काळात कायदा व सुव्यवस्था किती चांगली आहे याचे सर्टिफिकेट देण्याचा प्रयत्न सरकार करीत असताना 13 फेब्रुवारीला जर्मन बेकरीमध्ये स्फोट झाला. लोक मृत्युमुखी पडले. या स्फोटानंतर अनेकांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. भेटी देऊन काय साध्य होते? खरे आहे. एका अर्थाने भेटी देऊन काही साध्य होत नाही. परंतु काही तासामध्ये जे लोक तिथे पोहोचले त्यापैकी बेकरीच्या ठिकाणी मी भेट दिली नाही परंतु हॉस्पिटलमध्ये डॉक्टर्स आणि पेशंट तसेच मृत्युमुखी पडले त्यांच्या कुटुंबियांना मी निश्चितपणे भेट दिली. याबद्दल माननीय राज्यपालांनी दु:ख व्यक्त केले ते योग्यच आहे. परंतु मला लक्ष वेधावयाचे आहे की, पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या कुटुंबियांना 5 लाख रुपयाचे चेक दिले ते चेक 8 ते 10 मार्चपर्यंत वटले नव्हते. मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ D/ 13:45

डॉ.नीलम गोऱ्हे...........

स्वत: योगिता पानसरे आणि तिच्या आई वडिलांची 8 मार्च रोजी भेट घेतली. रोख मदत केली. त्यांना सहज विचारले की, तुमच्या बँकेमध्ये 5 लाख रुपये जमा झाले का? त्यांनी पैसे जमा झाले नाही असे सांगितले. अल्पशिक्षित असल्यामुळे बँक बूक अपडेट केले नसेल म्हणून मी विचारले, वेल्हे शाखेत जाऊन चौकशी करावी की चेक कॅश झाला का? आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपण सुशिक्षित लोक आहोत. स्थानिक पातळीवर पैसे ट्रान्सफर व्हायला 24 तास ते जास्तीत जास्त तीन दिवसांपेक्षा जास्त वेळ लागता कामा नये. परंतु तीन दिवसांऐवजी जवळजवळ एक महिना झ ाला तरी सुध्दा योगिता पानसरे हिच्या नावावर 5 लाख रुपये जमा झाले नव्हते. काँग्रेस पक्षाने 1 लाख रुपये दिले ते सुध्दा जमा झालेले नव्हते. मला अतिशय वाईट वाटते. सरकार लगेच जाहीर करते. परंतु याबद्दल काही लोक म्हणाले, तुम्ही का खेद व्यक्त करता? मग याबद्दल आनंद व्यक्त करायचा का? बॉम्बस्फोटामध्ये जे लोक मृत्युमुखी पडले त्यांच्या कुटुंबियांना वेळेवर आर्थिक भरपाई मिळू शकत नाही. मदत दिली जाते ती वेळेवर मिळत नसेल तर त्या कुटुंबाने पुढील जीवन कसे जगायचे हा प्रश्न आहे. गुजरानी, जहांगीर आणि रुबी हॉस्पिटलमधील डॉक्टर्स व कर्मचारी यांनी प्रयत्नांची शिकस्त केली. डॉक्टर्स व कर्मचारी यांचे आभार मानले पाहिजेत. कोणत्याही बिलाची अपेक्षा न ठेवता डॉक्टर मंडळी अहोरात्र काम करीत होती. बॉम्बस्फोटामध्ये जी माणसे मृत्युमुखी पडतात त्यावेळी ज्या पध्दतीने शवविच्छेदन करावे लागते, शरीराच्या प्रत्येक अवयवाचा एक्स-रे काढावा लागतो. ती व्यवस्था ससून रुग्णालयामध्ये नसल्यामुळे आदल्या दिवशी रात्री मृत्युमुखी पडलेल्यांचे शवविच्छेदन व्हायला सायंकाळचे 5 वाजले होते. सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.रमेश बागवे यांनी शवविच्छेदन गृहाला भेट दिली. आम्ही स्वत: तेथील लोकांशी बोललो. त्यांचे कसे सांत्वन करायचे? तुमच्या नातेवाईकांचे लवकरात लवकर शवविच्छेदन करण्यासाठी तत्परता दाखविणार आहेत म्हणून दिलासा द्यायचा की काय करायचे? प्रत्येक वेळी आम्ही म्हणतो की, आपत्ती निवारण कक्ष काम करीत असतात.......

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ......

परंतु असे बॉम्बस्फोट घडल्यानंतर डेड बॉडी मिळायला इतके तास लागत असतील तर अजून त्या नातेवाईकांच्या दु:खावर डागण्या देणे हा प्रकार असतो. जर्मन बेकरीतील स्फोटामध्ये अनेक नेपाळी मजूर मृत्युमुखी पडले आहेत. हे नेपाळी लोक रोजगारासाठी मुंबई आणि पुण्यात आले असून त्यांची मागणी अशी आहे की, दिल्लीप्रमाणे मुंबईतही नेपाळ कौन्सिलेट असावे, जेणेकरुन त्यांच्या संदर्भात कुठलाही कायदेशीर प्रश्न निर्माण होईल, तेव्हा त्यांना मदत होऊ शकेल. तसेच या नेपाळी मजुरांची नोंद कुठेही नाही. या सगळ्यात कळस म्हणजे जर्मन बेकरीत झालेल्या स्फोटातील आरोपी अद्यापही पोलिसांना सापडलेले नाहीत. आम्ही वेगवेगळी विधाने याबाबतीत वाचतो. एटीएसचे प्रमुख श्री. रघुवंशी यांच्यावर कारवाई होणार काय ? हे देखील वाचतो. स्वत: गृह राज्यमंत्री श्री. बागवे साहेबांनी सुध्दा वेगवेगळी विधाने केली. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे अशा बातम्या ज्यावेळेस वेगवेगळ्या चॅनल्सच्या माध्यमातून आपण पाहतो ते पाहून हे अतिरेकी सुध्दा उपहास आणि कुचेष्टेने म्हणत असतील की काय ही हिंदुस्तानमधील माणसे आहेत, आम्ही जाऊन ठिकठिकाणी स्फोट घडवितो आणि असे स्फोट झाल्यानंतर सुध्दा हे लोक एकमेकांवर ताशेरे ओढतात म्हणूनच या अतिरेक्यांना असे कृत्य करण्यात यश येते त्याबद्दल मला खेद वाटत आहे.

महोदय, पुढचा मुद्दा पोलिसांसंबंधीचा आहे. आम्ही पोलिसांसाठी कशी कशी व्यवस्था केली हे त्यात म्हटले आहे. माननीय राज्यपालांनी त्यासंदर्भात असे म्हटले आहे की, पोलिसांसाठी शासनाने अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि चिलखत पुरविणे व पोलीस दलाचे आधुनिकीकरण करणे यासाठी शासनाने प्रयत्न केले आहेत. त्याचप्रमाणे आधुनिकीकरणासाठी मात्र 200 कोटीची मागणी केली असता फक्त 103 कोटीवर बोळवण करण्यात आली. 26/11 च्या हल्ल्यात मृत्युमुखी व जखमी झालेल्या पोलिसांकडे पुरेशी साधनसामुग्री नसल्याने तसेच बुलेटप्रुफ जॅकेट्स नव्हती त्याचे उत्तर अद्यापही मिळाले नाही. अशा वेळेस प्रश्न असा उपस्थित होतो की, पुरेसा निधी जर पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी दिला जात नसेल तर शासनाने त्याबाबतची राजकीय इच्छाशक्ती दाखविण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे पोलीस रिफॉर्म्स अस्तित्वात येणार असल्याचे सांगण्यात आले. कारण केवळ शस्त्रास्त्रे व साधनसामुग्रीचाच हा प्रश्न नाही तर गेल्या तीन वर्षांपासून

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

सातत्याने प्रश्न चर्चेला येतो त्यावेळी माननीय गृहमंत्री सांगतात की पोलिसांबाबत केंद्रीय समितीने ज्या सुधारणा सुचविल्या, त्यात राजकीय हस्तक्षेप असणार नाही, बदली आणि बढतीच्या संदर्भात कोणताही हस्तक्षेप केला जाणार नाही. त्यांचे नियंत्रण केवळ राजकारणातून होऊ नये यासंदर्भात पोलीस रिफॉर्मची गरज आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील क्र. 16 हा मुद्दा एसईझेडच्या संदर्भातील आहे. यात 57 एसईझेडचा समावेश आहे. सरकार असे म्हणते की, या एसईझेडना आम्ही परवानगी दिलेली आहे. परंतु त्यासंदर्भात जी माहिती समोर आली त्यावरुन एसईझेडच्या संदर्भात महालेखापाल आणि रिझर्व्ह बँकेने वारंवार फेरविचाराचे सल्ले दिले आहेत आणि जानेवारी, 2010 मध्ये या एसईझेडना 6 महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. या एसईझेडमुळे महसुलाची हानी किती झाली याची आकडेवारी पाहिली तर 3.50 लाख करोडचा महसूल बुडाल्याचे केंद्रीय उत्पादन शुल्क मंडळाने नुकसान जो अहवाल केंद्राला सादर केला त्यात म्हटले आहे. यामध्ये अनेक ठिकाणच्या एसईझेडना लोकांनी विरोध केला आणि खासकरुन माहिती व तंत्रज्ञान आणि बंदरे यांचे एसईझेड सोडले तर अन्य एसईझेडवर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही. त्यामुळे केवळ ठिकठिकाणच्या जमिनी बळकवावयाच्या आणि भूखंड गिळंकृत करणाऱ्या लोकांचा राजमार्ग तयार झाला आहे. रायगडजवळ होऊ घातलेल्या एसईझेडसंबंधीचा निर्णय अद्याप अनिर्णित आहे. त्याचप्रमाणे खेडमधील एसईझेडबाबत शेतकरी अजुनही संभ्रमावस्थेत आहेत. तेथे पहिल्या टप्प्याचे काम सुरु झाले असून निम्मे पैसे मिळाले आणि पुढील प्रकल्प होणार की नाही हे कोणालाच माहीत नाही. आमचा मुळात या एसईझेडच्या कल्पनेला विरोध नाही परंतु आधुनिकीकरण आणि शेती यांचा समतोल विकास साधला गेला पाहिजे, अशीच मागणी आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ....

पिकाखालील जमिनी एसईझेडसाठी घेतल्या जाणार नाहीत असे सरकारतर्फे सांगण्यात आले होते. शासनाने यासंदर्भात वेळोवेळी आश्वासने दिलेले असतांनाही आज सुध्दा पाण्याच्या खालच्या व पिकाच्या खालच्या जमिनी एसईझेडकरिता घेंतल्या जात आहेत. रत्नागिरी जिल्हयामध्ये माडबन या ठिकाणी कोकण विनाशकारी समितीने यासंदर्भात आंदोलन केलेले आहे. त्यांचे हेच म्हणणे आहे की, तुम्ही जर चांगल्या जमिनी एसईझेडसाठी देणार असाल तर यातून शेतक-यांचा विकास कसा काय होऊ शकतो ?

सभापती महोदय, असांस्कृतिक पध्दतीने राज्यशासन सांस्कृतिक धोरण तयार करीत आहे असे वाटू लागले आहे. त्याचे कारण असे आहे की, "माय नेम इज खान" या चित्रपटाचा प्रश्न शासनाने फार प्रतिष्ठेचा केला होता. हा चित्रपट सर्व जनतेने बघितलाच पाहिजे इतका प्रतिष्ठेचा विषय शासनाने केला होता. माननीय गृह राज्यमंत्री श्री. बागवे यांनी अधिकृतरित्या, पोलीस फोर्स घेऊन, रिकाम्या सभागृहात जाऊन ब-याच दिवसाने शांतपणे सिनेमा बघितलेला आहे. "माय नेम इज खान" या चित्रपटाच्या संदर्भात अहमदाबादच्या दहशत विरोधी पथकाने लक्षात आणून दिले आहे की, अतिरेकी लोक त्यांच्या लोकांना प्रशिक्षण देण्यासाठी "माय नेम इज खान" हा चित्रपट दाखवण्याचे काम करतात व त्यासंदर्भातील पुरावे इंडियन एक्सप्रेसमध्ये आणि आजच्या "सामना" या वर्तमानपत्रामध्ये दिलेले आहेत.

सभापती महोदय, शासनाच्या सांस्कृतिक धोरणाबद्दल असे म्हणावेसे वाटते की, सरकारचे स्वत:चे सांस्कृतिक धोरण काय आहे याचा मसुदा शासनाने जनतेसमोर मांडावयास पाहिजे होता. कुठलेही धोरण जेव्हा ठरवले जाते त्यावेळेला ते धोरण फक्त जनतेचे नसते. जनतेच्या संदर्भात शासनाने काय पावले उचलली आहेत याची माहिती जनतेसमोर आणावयास पाहिजे होती व मग सांस्कृतिक धोरण ठरवावयास हवे होते. सांस्कृतिक धोरणाच्या संदर्भात पूर्वी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सूचना केली होती की, सांस्कृतिक धोरणाच्या संदर्भात आमदारांना सुध्दा विश्वासात घेण्याची आवश्यकता आहे. आमदारांकडे सांस्कृतिक माहिती नसते असे सरकारला वाटत असावे असे मला वाटते. विरोधी पक्षाच्या आमदारांना सोडा परंतु सत्ताधारी पक्षाच्या

....2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.......

आमदारांना सुध्दा या शासनाने विश्वासात घेतलेले दिसत नाही. परंतु विरोधी पक्ष किंवा राजकीय चौकटीच्या बाहेरचे जे लोक आहेत त्यांच्याकडून सुध्दा शासनाने सांस्कृतिक धोरणाच्या संदर्भात सूचना घ्यावयास पाहिजे होत्या असे मला वाटते्.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात 27 नंबरचा मुद्दा हा तीर्थ क्षेत्र विकासाच्या संदर्भात आहे. यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, मांढरदेवी येथे दुर्घटना झाल्यानंतर शासनाने सांगितले होते की, तीर्थक्षेत्र विकास मंत्र्याची नेमणूक केली जाईल. सप्तश्रृंगी गडावर अनेक वेळा दरडी कोसळून मोठया प्रमाणात भाविकांचे मृत्यू झालेले आहेत. प्रत्येक तीर्थस्थळाला जात असतांना, शिर्डीला जात असतांना मोठया प्रमाणात अपघात होऊन भाविक मृत्यू पावत असतात. वारीच्या वेळेस सुध्दा अशीच परिस्थिती आहे. गुरु-ता-गद्दीच्या कार्यक्रमासाठी कोटयावधी रुपयांची कामे झाली परंतु नांदेडमध्ये गुरु-ता-गद्दीचा कार्यक्रम होऊन सहा महिने झ ााल्यानंतर कामे पूर्ण झाली अशी परिस्थिती आहे. प्रत्येक कामामध्ये अशी परिस्थिती का होते याचा सुध्दा विचार होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मला असे वाटते की, तीर्थक्षेत्र विकास मंत्रालय असणे फार आवश्यक आहे. तुळजापूर, पंढरपूर,शेगाव या तीर्थस्थळाचा विकास कुठपर्यंत आला आहे याबद्दलची श्वेतपत्रिका काढली जाणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या शेवटी संयुक्त महाराष्ट्राच्या अगोदर महिला, अंगणवाडया तसेच बचतगट यासाठी एक पॅरा तरी असावयाचा परंतु यावेळेस हा पॅरासुध्दा अदृष्य झालेला आहे. महिला विकासामध्ये अंगणवाडी हा एक कंपोनंट आहे. महिला विषय कायदे, महिला विषयक धोरणे, महिला विषयक योजना यासंदर्भात सरकार काय म्हणते हे कळले पाहिजे. तुम्ही जर नियोजन आयोगाचे अहवाल वाचले तर आपल्याला दिसून येईल की, 90 पर्सेंट बजेट अंगणवाडीवर खर्च होत असेल तर 8.8 मिलियन स्त्रिया एकटया महाराष्ट्रात असतांना त्यांच्यासाठी शासनाने काय व्यवस्था केलेली आहे ? याची माहिती आम्हाला कोठेच दिसून येत नाही. घाटावर जसे भिकारी बसलेले असतात तसे महिलांच्या तोंडावर काही तरी योजना फेकायच्या आणि नंतर सांगावयाचे की, आम्ही तुम्हाला बचत गट दिले. परंतु आता



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे......

महिला सुध्दा हिंसक बनत चालल्या आहेत. स्त्रियांना हिंसेच्या मार्गावर नेण्याचा प्रयत्न करु नका असे मला म्हणावयाचे आहे. सन्माननीय महिला व बाल विकास मंत्री सभागृहात उपस्थित आहेत जेंडर रिस्पॉन्सीव्ह बजेट याचा विचार या वेळच्या अर्थसंकल्पात आला पाहिजे अन्यथा "रोज मरे त्याला कोण रडे" असे होता कामा नये. शेतक-यांच्या आत्महत्या, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, काल चंद्रपूर येथे दोन मुलींनी आत्महत्या केलेल्या आहेत. महिलांच्या आक्रोशाकडे लक्ष देण्यास कोणाला वेळ नसेल, पुन्हा त्यावर हस्यास्पद बोलत असू तर मला असे वाटते की, पुढच्या विधानसभेचे चित्र बदलल्याशिवाय तुमची भूमिका बदलणार नाही असे मला वाटते.

धन्यवाद.

-----

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ D/ KTG/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 14.00

श्री.केशवराव मानकर (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,सर्व प्रथम मी विदर्भाच्या संबंधी या ठिकाणी माझे विचार मांडणार आहे. . माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 5 च्या अनुषंगाने सर्व प्रथम माननीय गृह मंत्री श्री आर.आर. पाटील यांचे मी अभिनंदन करतो. नक्षलवादी भागातील जिल्हयाचे पालक मंत्र्यांचे नेतृत्व स्वीकारण्याची त्यांनी हिंमत दाखवली व नक्षलवादी भागातील नक्षलवाद्यांच्या कारवाया रोखण्यासाठी 2355 निरनिराळया दर्जाची नवीन पदे निर्माण केली त्याचबरोबर पोलीस कर्मचाऱ्यांसाठी मदत करणाऱ्यांना वित्तीय प्रोत्साहन दिले आणि गडचिरोली जिल्हयाच्या विकासासाठी विशेष पॅकेज देखील मान्य केले आहे.या पॅकेज अंतर्गत उपजीविका व शिक्षण यासाठी नवीन संधीची निर्मिती, पोलीस आणि वन विभागातील नोकऱ्यांसाठी भरतीपूर्व प्रशिक्षण तसेच जिल्हयातील आरोग्य व प्रशासकीय यंत्रणांमध्ये सुधारणा इत्यादीवर लक्ष केन्द्रीत करण्यात आले आहे.

सभापती महोदय, नक्षलवादी कारवाया रोखण्यासाठी वरीलप्रमाणे उपाययोजना करीत असतांना मला खेद व्यक्त करावासा वाटतो की, राज्याच्या एका कोपऱ्यात गडचिरोली जिल्हा आहे परंतु नक्षलवादी क्षेत्र आंध्र प्रदेश, छत्तीसगड आणि मध्य प्रदेश या तीन राज्यास लागून आहे. महाराष्ट्रातील गोदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या चारही जिल्हयास नक्षलवाद्यांनी वेढा घातलेला आहे. 2009 साली नागपूरला अधिवेशन सुरु असतांना सालेकसा तालक्यात राहणाऱ्या रघुनाथ मरकाम या तरुणाला नक्षलवाद्यांनी ठार मारले. रघुनाथ मरकाम हा नक्षल दलमचा पूर्व सैनिक होता . शासनाच्या धोरणानुसार त्याने नक्षल दलम सोडले होते त्याला पोलिसांकडून संरक्षण मिळाले नसल्यामुळे नक्षल दलमच्या कार्यकर्त्यानी सालेकसा येथील त्याच्या घरी जाऊन त्याला ठार मारले .नक्षलवाद्यांच्या भितीमुळे त्या भागातील अनेक शाळा आज ओस पडलेल्या आहेत असे मला अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते. नक्षलवाद्याच्या भितीमुळे त्याभागातील शाळा आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थी जात नाही.प्रत्येक गावामध्ये 25-25 च्या संख्येने हे नक्षलवादी जातात आणि बैठका घेऊन गावातील लोकांना असे सांगतात की, तुमच्या गावातील दहा मुले वा मुलीनी आमच्या चळवळीत सहभागी झाले पाहिजे त्यामुळे आपल्या तरुण मुला मुलींना घेऊन गावा तील पालक बाहेर गेले असल्यामुळे ती गावे ओसाड पडलेली आहेत. आदिवासी भागातील ही व्यथा मी या ठिकाणी मांडत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ D/ KTG/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे

श्री.केशवराव मानकर......

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या निमित्ताने मला माननीय गृह मंत्री श्री आर.आर. पाटील यांना असे सांगावयाचे आहे की,फक्त गडचिरोली जिल्हयाकडे आपण लक्ष केन्द्रीत न करता गोदिया, भंडारा व चंद्रपूर या जिल्हयाकडेसुध्दा अधिक लक्ष द्यावे. आणि त्या जिल्हयातील लोकांना अधिक संरक्षण द्यावे. संरक्षण देण्याचे काम राज्य सरकारचे आहे .मी यापूर्वी देखील खब-यांच्या संदर्भात एक मुद्दा मांडला होता. जे खबरे आहेत त्यांना पोलिसांचे संरक्षण देण्यात यावे , त्याना सरकारी नोकरी देण्यात यावी. आणि त्यांचे मानधन वाढवून देण्यात यावे. मानधन वाढवून देण्याचा निर्णय घेण्यात आला ही आनंदाची गोष्ट आहे परंतु या खबऱ्यांना सुरक्षा दिल्याशिवाय कोणताही खब-या पोलिसांकडे काम करणार नाही. खब-यांना सुरक्षा देण्याचा निर्णय घेतला असता तर मी त्याचे स्वागतही केले असते त्याबद्दल मला कमीपणा वाटत नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असतांना मी फक्त एक दोन मुद्यासंबंधी माझे विचार मांडणार आहे.माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमाक 42 मध्ये असा उल्लेख करण्यात आला आहे की, " राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत 2012 पर्यत सर्व प्राथमिक आरोग्य केन्द्रात तसेच खाजगी रुग्णालयात एकात्मिकृत समुपदेशन व तपासणी केन्द्र उपलब्ध करुन देण्यात येईल. " एड्स नियंत्रणा सारखा महत्वाचा कार्यक्रम राज्य सरकार राबवत आहे परंतु मला खेदाने नमूद करावेसे वाटते की, एड्स सारख्या रोगासंबंधी काम करणाऱ्या एड्स नियंत्रण कर्मचाऱ्यांना अद्याप शासकीय सेवेत नियमित करण्यात आलेले नाही.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/ 14:05

श्री. केशवराव मानकर....

त्यांना त्यावेळी मानधन दिले गेले. एड्स सारख्या रोगावर नियंत्रण करण्याचे महत्वाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपण सेवेत सामावून घेतले असते तर तुमच्या या अभिभाषणाला अजून वजन प्राप्त झाले असते. एवढेच नव्हेतर आदिवासी विभागामध्ये काम करणारे कर्मचारी, आदिवासी बांधवांना आदिवासी भत्त्यापासून वंचित ठेवले आहे. त्यांना आदिवासी भत्ता मिळत नाही, ही किती दुर्दैवी बाब आहे. खरे म्हणजे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये यांसबंधी उल्लेख नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो. माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेले आदेश कचऱ्याच्या टोपलीमध्ये टाकले जातात. हा कार्यक्रम राष्ट्रीय पातळीवर यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत समिती स्थापन करण्याबाबत दिनांक 24 फेब्रुवारी 2009 रोजी माननीय राज्यपाल महोदयांनी आदेश दिले होते. त्या समितीचे पुढे काय झाले? ती समिती कां नेमली गेली नाही? नेमली असेल तर त्या समितीने आतापर्यंत काय काम केले आहे? याचे उत्तर शासनाने दिले पाहिजे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये मांडलेल्या विषयाच्या संदर्भात शासनाकडून आपल्याला न्याय मिळत नाही. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गामधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम दिली जाईल असे जाहीर करण्यात आले. इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना 1998-99 पासून केंद्र सरकारने ही योजना लागू केली. मध्यप्रदेश, कर्नाटक व केरळ राज्यांमध्ये 100 टक्के शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना दिली जाते. तर मग आपण आपल्या राज्यामध्ये 100 टक्के लाभ कां देत नाही? आपण इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय कां करता? अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्ती जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गांना राज्यामध्ये 52 टक्के आरक्षण आहे. हा समाज जर जागा झाला तर हे सरकार सत्तेवर राहू शकणार नाही. आणि म्हणून मी मागणी करतो की, इतर मागासवर्गीयाना सुध्दा आपण 100 टक्के शिष्यवृत्ती दिली पाहिजे. सभापती महोदय, 1 लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या व्यक्तीच्या पाल्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये फक्त 50 टक्के शिष्यवृत्ती मिळते ही गोष्ट मला खेदाने नमूद करावीशी वाटते. याकरिता मी माननीय राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करु शकत नाही. कारण आपण माझ्या विद्यार्थ्यांवर अन्याय करीत आहात. केंद्र सरकारच्या धोरणाप्रमाणे आपण ही योजना राज्यामध्ये राबविली पाहिजे. आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गामधील विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला पाहिजे अशी मागणी करतो. . . XX 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/ 14:05

श्री. केशवराव मानकर....

सभापती महोदय, हमें अलग विदर्भ क्यों मांगना चाहिए ? हमें अलग विदर्भ इसलिए मांगना चाहिए कि राज्यामध्ये फयान चक्रीवादळ आले. त्यावेळी आपण फक्त कोकणचा विचार केला. विदर्भामध्ये अवकाळी पाऊस आला त्याबाबत काय केले? त्याठिकाणी शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांना आपण न्याय दिला नाही. तेथील शेतकरी आज अंधारात आहे, त्याचे घर मोडले, पडले तरीसुध्दा त्याला काहीही भरपाई दिली नाही. मी स्वत: शेतकरी आहे. अवकाळी पाऊस झाल्यामुळे शेतातील धानाचे पिक वाया गेले आहे. मी स्वत: आज लाल तांदूळ खात आहे. त्या लाल तांदळाचे सँपल सुध्दा मी आपणास आणून देतो. आज विदर्भामध्ये एचएमटी हा तांदूळ पिकविला जातो. अवकाळी पावसामुळे त्याचा रंग लाल झाला आहे. विदर्भातील जनता हा लाल तांदूळ खात असतांना, मी आणि माझे कुटुंब चांगला तांदूळ खाऊ शकत असतांना तो लाल रंगाचा तांदूळ खात आहे. आणि हे शासन शेतकऱ्याकडील तो तांदूळ नॉन एफ.ए.क्यू. म्हणून नाकारीत आहे. हा तांदूळ नाकारुन आपण शेतकऱ्यांवर जो अन्याय करीत आहात तो आपण थांबविला पाहिजे. युती शासनाच्या काळात काळी ज्वारी स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तर मग या राज्यामध्ये लाल तांदूळ कां घेतला जात नाही? हा माझा प्रश्न आहे. फयान वादळामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले आहे त्यांच्यावर झालेला अन्याय आपण दूर केला पाहिजे. शासनाने अंजनगाव, मोरगाव व अंजनी या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला. परंतु शासनाकडून त्यासाठी काहीही मिळाले नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

मी विरोध करीत नाही, मी याचे स्वागत करतो. पण ही 200 शेततळी कोणाला देणार आहात असा प्रश्न आहे. एकाच तालुक्यात 200 शेततळी देणार आहात काय ? हा सत्यनारायणाचा प्रसाद आहे काय ? माझी अशी सूचना आहे की, असे करु नका. सरकारची मुदत पाच वर्षाची आहे आणि जर सरकारला शेतकऱ्यांचे हित पहावयाचे असेल तर त्यासाठी पाच वर्षाचे धोरण आखावयास पाहिजे. एका तालुक्यामध्ये किमान दोनवर एक शुन्य वाढविण्याची आवश्यकता आहे. कमीतकमी पाच वर्षा मध्ये तालुक्यांमध्ये दहा हजार शेततळी होऊ शकतात आणि ज्याठिकाणी वरथंबी जमीन आहे, त्याच ठिकाणी शेततळी दिली पाहिजेत आणि तेथील शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला पाहिजे.जेथे सिंचनाची व्यवस्था आहे, तेथे शेततळी देता कामा नयेत.

सभापती महोदय, शासनाने मजूरांची रोजी 100 रुपये वाढविली आहे, पण ही बाब नवीन नाही. आमच्या शेतामध्ये काम करण्यासाठी मजूर येतो, त्याला आम्ही तर केव्हापासूनच 100 रुपयांपेक्षा जास्त मजुरी देत आहोत. त्यामध्ये काही नवल नाही आणि शासनाचे अभिनंदन करण्याची गरज नाही. परंतु एपीएल च्या लोकांना जे रेशनमधून जे धान्य मिळते, त्याचे दर वाढलेले आहेत आणि रोजंदारीमध्ये जी वाढ झालेली आहे, त्याचा शेतीवर देखील विपरीत परिणाम होणार आहे. म्हणून आमची मागणी आहे की, धान उत्पदन करणारे शेतकरी जी पिके काढत आहेत, त्या पिकांना उत्पादन खर्चाच्या आधारावर भाव देण्याची गरज आहे. त्याशिवाय शेतकरी जेऊ शकत नाही. विदर्भातील जो शेतकरी आहे, तो अन्याय सहन करणारा शेतकरी आहे असे तुम्ही ठरविलेले आहे. आपण विदर्भातील सहा जिल्ह्यांसाठी पॅकेज जाहीर केले. राष्ट्रीय समविकास प्रकल्प हा अल्पभूधारकांच्या शेतीला किफायतशीर करणारा आहे, मग यामध्ये आपण विदर्भातील पाच जिल्हे का सोडून दिले ? याचे मला उत्तर हवे आहे. अल्पभूधारकाची शेती सुधारावयाची असेल, त्यांना न्याय द्यावयाचा असेल तर संपूर्ण विदर्भातील संपूर्ण 11 जिल्ह्यांचा विचार केला पाहिजे.पण जर आपण तसा विचार करु शकत नसाल तर मग आम्हाला आमचा वेगळा विदर्भ देऊन टाकावा आणि आम्ही खुशाल तेथील कारभार चालवू, आम्ही "जय विदर्भ" म्हणू. माननीय मुख्यमंत्र्यांनी डिसेंबर महिन्यामध्ये नागपूर येथील अधिवेशनाच्या वेळी 10 हजार रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे. त्याबाबतीत काय झाले ? 10 हजार कोटी रुपयांच्या अनुषंगाने काहीच झाल्याचे दिसत नाही. अहो, डोळयांनी त्यातील एक पैसाही दिसत नाही अशा प्रकारे खोटे पॅकेज जाहीर

. . . .2 वाय -2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

करुन काय उपयोग आहे ? मी याठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत खेद व्यक्त करतो. सभापती महोदय, यानंतर केवळ दोन-तीन मुद्दे मांडणार आहे. मी माझे भाषण लवकर संपवतो. मी जास्त वेळ घेणार नाही.

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, अजून काही सन्माननीय सदस्यांना देखील भाषण करावयाचे आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने फक्त दोन-तीन मुद्दे मांडणार आहे. याठिकाणी पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी 25,000 रुपयांपासून 3 लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जासाठी केवळ 2 टक्के इतके व्याज आकारण्यात येणार आहे. त्यांना सवलत दिली जाणार आहे. पण अगोदर बँकांसाठी नियम करावयास पाहिजे. डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटीव्ह बँक 14 टक्के व्याज घेत आहे. यासंबंधात कडक निर्बंध घाला, कडक कायदा आणावा आणि अशा प्रकारे जर बँका काम करीत असतील तर त्या बरखास्त कराव्यात व तेथे प्रशासक नेमावा अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, माझा शेवटचा एक मुद्दा आहे की, महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त विद्युत निर्मिती कुठे होत असेल तर ती विदर्भामध्ये होत आहे. पण दिव्याखाली अंधार याप्रमाणे विदर्भातील जनता अंधारामध्ये आहे. आम्ही 20 ते 45 मे.वॅ.विजेचे उत्पादन करतो. जर तुम्ही आम्हाला अधिक 1200 मे.वॅ.वीज उपलब्ध करुन दिली तर आमच्या भागामध्ये एक सेकंद देखील लाईट जाणार नाही आणि शेतकऱ्यांचे पंप 24 तास सुरु रहातील एवढी आमच्याजवळ विजेची क्षमता आहे. आम्हाला जर अधिक वीज दिली तर गडचिरोली जिल्ह्यामध्ये 18 प्रकारची खनिजे सापडतात, त्या ठिकाणी लाखो लोकांना रोजगार मिळू शकेल अशी स्थिती विदर्भामध्ये आहे. विदर्भ "सुजलाम् सुफलाम् आहे. तेथे खनिजे आहेत, पाणी आहे, वीज आहे. परंतु असे असतानाही आम्ही महाग दराने वीज विकत घेत आहोत. म्हणून मी माननीय राज्यपालांना विनंती करतो, दंडवत करतो, प्रणाम करतो आणि मागणी करतो की, तुम्ही आमच्यावर गेली 50 वर्षे अन्याय केला आहे. पण आम्ही आता अन्याय सहन करणार नाही आणि वेगळे विदर्भ राज्य घेतल्याशिवाय रहाणार नाही. म्हणून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत खेद व्यक्त करुन मी आपली रजा घेतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी भरपूर वेळ दिला, त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो.

-----

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. या अभिभाषणाचे समर्थन करीत असताना मी सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांचे हे अभिभाषण म्हणजे महाराष्ट्रातील विकासाचा संकल्पित आराखडा आहे. हे अभिभाषण म्हणजे विकासाचे गर्भगृह आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण महाराष्ट्राला दिशा देणारे आहे. हे दिशादर्शक अभिभाषण आहे.

सभापती महोदय, काही माणसे रातआंधळी असतात. काहींना दिवसा दिसते. आमच्या काही सन्माननीय सदस्यांना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोणतीच चांगली गोष्ट दिसत नाही. बहुदा ते ठार आंधळे असावेत अशा निष्कर्षाप्रत मी आलो आहे. माननीय राज्यपालांनी महाराष्ट्रातील जनतेला शुभेच्छा दिलेल्या आहेत आणि राज्य शासनाला त्यांच्या कार्यामध्ये सुयश चिंतिलेले आहे. म्हणून मी माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक आभार मानतो, अभिनंदन करतो. महाराष्ट्रातील जनता संकटसमयी धैर्य आणि युध्दप्रसंगी शौर्य दाखवू शकते. धैर्य आणि शौर्य यांचा संगम पहावयाचा असेल तर महाराष्ट्रातील जनतेकडे पहावे लागेल. माननीय राज्यपालांनी महाराष्ट्रातील जनतेला शुभेच्छा दिल्या म्हणून मी प्रथमत: माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. जर्मन बेकरीवर झालेला हल्ला असेल, महाराष्ट्रात झालेले बॉम्बस्फोट असतील किंवा अतिरेक्यांचे हल्ले असतील या सर्व घटनांमध्ये महाराष्ट्रातील जनता निधड्या छातीने पुढे आली आणि छातीचा कोट करुन राज्य शासनाने महाराष्ट्रातील जनतेचे संरक्षण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला म्हणून मी राज्य शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मरण करणारे राज्य आहे. मला एका गोष्टीचा खेद होतो की, माझे भाषण चालू असताना शिवसेनेचा एकही सन्माननीय सदस्य उपस्थित नव्हता. आता काही सन्माननीय सदस्य उपस्थित झालेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे चोवीस तास सभागृहामध्ये बसलेले असतात परंतु दुर्दैवाने ते उशिरा आले, पण हरकत नाही. सभापती महोदय, रस्त्याच्या कडेला जी चिलखती वाहने दिसतात त्यांची रंगसंगती पाहिल्यानंतर माझ्यासारख्याला कुतूहल



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ......

वाटते. रस्त्याच्या कडेला मला आबा उभे असलेले दिसतात. महाराष्ट्रातील जनतेचे संरक्षण करण्यासाठी हे शासन सक्षम आहे, हे शासन समर्थ आहे. राज्य शासन जनतेचे संरक्षण करण्यासाठी त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. म्हणून मी माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 37 हजार 500 शेततळी पूर्ण झ ााल्याचा उल्लेख आहे. 27 हजार शेततळी पूर्ण होणार आहेत. राज्य शासन प्रत्येक तालुक्यामध्ये 200 शेततळी पूर्ण करणार आहे.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

माझी राज्य शासनाला यानिमित्ताने विनंती आहे की, तालुका घटक गृहित धरु नये, त्याऐवजी गाव घटक गृहित धरला तर या शेततळयांची संख्या वाढेल आणि महाराष्ट्रामध्ये एकही टँकर भविष्यात लावण्याची आवश्यकता भासणार नाही. म्हणून शेततळयांचा कार्यक्रम शासनाने युध्द पातळीवर राबवावा अशी मी आग्रहाची विनंती शासनाला करणार आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात 129 विशाल पाणलोट उभे करण्याचा उल्लेख आलेला आहे. त्यातून 24.86 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. हा क्रांतिकारी निर्णय आहे, अभूतपूर्वक पाऊल आहे. त्यासाठी राज्यपालांचे अभिनंदन केले पाहिजे. या योजनेतून 24.86 लाख हेक्टर जमीन पाण्याखाली आणली जाणार आहे त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढणार आहे, अन्नधान्याचे उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने रोजगार हमी योजनेच्या मजुरीचा दर 66 रुपयांवरुन 100 रुपयांपर्यंत वाढविला आहे. राज्य शासनाची भावना आहे की, या राज्यातील गोरगरीबांना योग्य ती मजुरी मिळाली पाहिजे. या राज्यातील गोरगरीबांच्या मुखात अन्नाचा घास गेला पाहिजे. 'वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे.' आमचा श्रीहरी हा आम आदमी आहे, आमचा श्रीहरी हा सामान्य माणूस आहे, आमचा श्रीहरी गरीब कुटुंबातील माणूस आहे. त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न शासनाने सोडविलेला आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतक-यांना 25 हजार रुपयापर्यंत बिनव्याजी कर्ज दिले जाणार आहे. तसेच 3 लाखापर्यंत 2 टक्के दराने कर्ज दिले जाणार आहे. 25 हजार रुपयांऐवजी 50 हजार किंवा 1 लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देता येईल काय याचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी मी शासनाला विनंती करतो. कारण हे शासन शेतक-यांचे प्रातिनिधीक शासन आहे. हे शासन शेतक-यांचे प्रतिनिधीत्व करणारे शासन आहे. या शासनाचा आत्मा हा शेतकरी आहे. या शेतक-यांच्यादृष्टीने मी शासनाला विनंती करणार आहे.

2...

NTK/ KGS/ KTG/

प्रा.सुरेश नवले....

सभापती महोदय, या अभिभाषणामध्ये एक अभूतपूर्व योजना अंतर्भूत आहे, कदाचित विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना ती दिसली नाही. महाराष्ट्र शासनाने 12,8,906 घरे विविध योजनांच्या माध्यमातून उभी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे विरोधकांनी या योजनांची गोळाबेरीज करावी. या योजनेमुळे राज्यातील दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना घर नाही असे चित्र दिसणार नाही. महाराष्ट्रातील प्रत्येक दारिद्रय रेषेखालील व्यक्तीला घर मिळवून देण्याचे काम शासन करणार आहे. त्यामुळे या घरामध्ये राहणारा सामान्य माणूस शासनाला आशीर्वाद दिल्याशिवाय राहणार नाही आणि पुढील 25 वर्षे विरोधकांना सत्तेत बसण्याची संधी मिळणार नाही.

सभापती महोदय, या अभिभाषणात राजीव आवास योजनेचा उल्लेख केलेला आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्याला झोपडपट्टीतून मुक्त केले जाणार आहे. या राज्यात एकही झोपडी दिसता कामा नये, प्रत्येक माणूस आरसीसीच्या घरात रहावा यादृष्टीकोनातून ही योजना आणली आहे. रोटी, कपडा और मकान हा आमच्या शासनाचा संकल्प आहे. त्यादृष्टीने शासन राज्यातून झोपडपट्टीचे पूर्णपणे निर्मूलन करुन महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला घर देण्याचे काम करणार आहे.

यानंतर श्री.ओटवणेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला घर देण्याचे पवित्र कार्य हे राज्य शासन करणार आहे. त्यामुळे महत्मा फुले असोत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर असोत ते जेथे असतील तेथे त्यांना आनंद वाटल्याशिवाय राहणार नाही. ते म्हणतील काय माझे शासन आहे. माझ्या विचारांचे हे राज्य शासन आहे. छत्रपतींना सुद्धा आनंद होईल. तलवार न चालविता लेखणीच्या बळावर महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाला आनंदी करण्याचा संकल्प या राज्य शासनाने सोडला म्हणून छत्रपतींना आनंद झाल्याशिवाय राहणार नाही. माननीय बाळासाहेबांना देखील आनंद होणार आहे. कारण ते देखील छत्रपतींचे नाम स्मरण करतात. शाहू महाराजानां देखील आनंद होणार आहे.

**उप सभापती** : आज आपण प्रस्तावावर 3.00 तास चर्चा करणार होतो. 3.00 तास संपलेले आहेत. अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. शेवटचे सदस्य बोलेपर्यंत सभागृह सुरू ठेवायचे काय ? कारण परवा फक्त उत्तर होणार आहे. सभागृहाच्या अनुमतीने शेवटचे सदस्य बोलेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, मराठवाड्याचा अनुशेष आहे. शासनाने शासकीय महाविद्यालय व रूग्णालय यांना 50 कोटी रूपयाचे अनुदान जाहीर केले आहे. त्यामुळे मराठवाड्यातील रूग्णांना आणि विद्यार्थ्यांना याचा निश्चितपणे फायदा होणार आहे, म्हणून मी माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. महाराष्ट्रामध्ये 12608 अंगणवाड्या आणि 3640 लहान अंगणवाड्या उभा करण्याचा संकल्प राज्य शासनाने सोडलेला आहे. त्याबद्दल देखील मी माननीय राज्यपालांचे जाहीर अभिनंदन करतो. कुपोषित बालके असणे हा मानवाला कलंक आहे. म्हणून राज्य शासनाने असे ठरविले आहे की, पूर्वी कुपोषित बालकांना 2 रूपये दिले जात होते, त्या ऐवजी 4 रूपये आणि जे अतिकुपोषित आहेत त्यांना 4 रूपये ऐवजी 6 रूपये देणे. हा जो निर्णय घेतला आहे त्याबद्दल देखील माननीय राज्यपालांना मी मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, नंदूरबार जिल्ह्यामध्ये क्रीडा संकुल, इगतपुरी येथे क्रीडा अकादमी उभी करून महाराष्ट्रातील तरूणांना वेगळ्या प्रकारची दिशा देण्याचा संकल्पसुद्धा राज्य शासनाने सोडला आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले............

सच्चर समितीच्या माध्यमातून या राज्यातील जे अल्पसंख्यांक आहेत, त्यांचाही उत्कर्ष व्हावा ही शासनाची भावना आहे. सर्वधर्मीयांना न्याय देण्याचे काम आम्ही करू. या राज्यामधील कुठलाही माणूस हा धार्मिकतेच्या कारणावरून वंचित राहणार नाही हा महाराष्ट्र राज्याचा संकल्प आहे. मग तो हिंदू असेल, जैन असेल, बौद्ध असेल, मुस्लीम असेल, पारशी असेल, इसाई असेल. या सगळयांना न्याय देण्याची भूमिका राज्य शासनाची आहे. कारण शेवटी ज्या विचाराने राज्य शासन चालले आहे, त्या विचारांचा मूळ गाभा हा तो आहे. त्यामुळे या राज्यातील अल्पसंख्यांकांच्या मुलांचा विकास व्हावा हीच आमची अपेक्षा आहे. त्यासाठी त्यांना गणवेष देणे, शिष्यवृत्ती देणे यासंबंधी राज्य शासनाने धोरण जाहीर केले आहे त्यामुळे मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो.

माध्यमिक विभागातील सर्वात्तम पाच मुलांसाठी योजना जाहीर केली आहे. ही योजना शिक्षण विभागाने जाहीर केली आहे. शालांत परीक्षेसाठी ही योजना जाहीर केली आहे. या योजनेचा निश्चितपणे मुलांना फायदा होणार आहे. पाचामुखी परमेश्वर, पंचपरमेष्ठी त्याचाच हा परिपाक आहे. तसेच प्रशिक्षित स्वयंसेवकांची नियुक्ती प्रत्येक गावात करण्याचा संकल्प राज्य शासनाने केलेला आहे. त्याबद्दल मी राज्य शासनाला मनापासून धन्यवाद देतो. शेवटी मी 2-3 मुद्दे येथे सांगणार आहे. येथे आम्हाला देखील जास्त वेळ मिळाला पाहिजे. कारण विरोधी पक्षातील सदस्य तास भर बोलले आहेत.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. ओटवणेकर 14:30

(प्रा. सुरेश नवले...

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. निळाशार समुद्र, हिरवी गर्द झाडी, पहाडी काळजाची माणसे, अतिशय निष्पाप, माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे आणि माननीय राज्यमंत्री महोदय श्री. भास्कर जाधव यांच्यासारखी...(अडथळा).. या सर्व गोष्टींचा वैशिष्ट्यपूर्ण असा संगम आपल्याला सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पहायला मिळतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली ही भूमी असून त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून हातामध्ये समशेर न घेता महाराष्ट्राचा कायापालट करण्याचा जो संकल्प माननीय मुख्यमंत्री आणि माननीय महसूल मंत्र्यानी जाहीर केलेला आहे तो प्रत्यक्ष साधला गेल्या शिवाय रहाणार नाही . आम्ही सर्व शक्तीनिशी त्यांच्या पाठीशी आहोत. अपेक्षा एवढीच आहे की 2013मध्ये तेथे विमानतळ व्हावे आणि माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांच्या सिंधुदुर्ग महोत्सवाला विमानाने जाता यावे. 2013 मध्ये तेथे विमानतळ झाल्या शिवाय राहाणार नाही. कारण हे राज्य क्रियाशील आहे, गतिशील आहे, कार्यक्षम आहे आणि विरोधी पक्ष हा दुर्दैवाने निष्क्रिय आहे. सभापती महोदय, मागील चार वर्षाच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा परिणाम काय झालेला आहे ? तर जी शिवसेना पहिल्या क्रमांकावर होती ती आज चौथ्या क्रमांकावर गेली आहे. त्या पक्षाची किती घसरण असावी ? सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावतेसाहेब, तुमच्या पक्षाची जी घसरण झालेली आहे त्याबद्दल मला तुमची कीव येते. तुम्ही शिवसेनेचे एकेकाळी नेते होता. राहूल गांधीला तुम्ही अडवायला गेलात. पण राहूल गांधी डोक्यावर पाय ठेवून निघून गेला. राहूलला अडविण्याची हिंमत तुम्ही दाखवू शकला नाहीत. कारण महाराष्ट्र शासन हे समर्थ आणि सक्षम आहे. या राज्यामध्ये जे जे गुंडगिरी करतील त्या गुंडगिरीचा नि:पात करण्याची क्षमता आमच्या राज्य शासनामध्ये आहे.

सभापती महोदय, मी 2012 सालाची वाट पहात आहे. 2012 साली महाराष्ट्र राज्य हे भारनियमनमुक्त होणार आहे. तो भारनियमनमुक्त महाराष्ट्र कसा असेल याचे संकल्पचित्र माझ्या डोळयासमोर उभे रहाते म्हणून 2012 सालाची मला अपेक्षा आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 2012 पर्यंत महाराष्ट्र भारनियमनमुक्त करु असा संकल्प केलेला आहे. तो संकल्प शासनाने पूर्ण करावा एवढीच माझी अपेक्षा आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

सभापती महोदय, मोनोरेल आणि मेट्रोरेल प्रकल्प मुंबईमध्ये होत आहेत. मोनोरेलची चाचणी भारतामध्ये पहिल्यांदाच मुंबईमध्ये घेण्यात आली. मोनोरेल आणि मेट्रोरेल म्हणजे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची युती कायम राहिली तर पुढील 25 वर्षे विरोधी पक्षाला सत्ता मिळू शकणार नाही. तशी त्यांनी अपेक्षाच करु नये. मेट्रोरेल ही बुडाशी नेते आणि मोनोरेल ही वरुन जाते. वरच्याचा आणि खालच्याचा संयोग होतो तेव्हा लोक हातामध्ये हात घालून जावू शकतात...(अडथळा)..कृषी विकास प्रकल्प राबविण्याचे धोरण राज्य शासनाने जाहीर केलेले आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.........

त्यामध्ये 1200 गावांना फायदा होणार आहे, 20 लाख लोकांना फायदा होणार आहे. दूध उत्पादनामध्ये वाढ व्हावी म्हणून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये संकल्प सोडला आहे. माझी शासनाला विनंती आहे की, महाराष्ट्रामध्ये दूधामध्ये भेसळ केली जाते ही बाब अतिशय गंभीर आहे. आमच्या बीड जिल्हयामध्ये दूधामध्ये भेसळ झाल्याचा दुष्परिणाम एवढा झाला की, कुत्र्यांच्या अंगावरील केस निघून गेले. तालुका दूध संघाच्या बाजूला कुत्रे दूध प्यायचे. मी असे ऐकले होते की, दूध प्यायल्यामुळे माणसांच्या केसाची वाढ चांगली होते. परंतु तालुका दूध संघाच्या आजूबाजूला दूध प्यायलेल्या कुत्र्यांच्या अंगावरचे केसच निघून गेले.

सभापती महोदय, निसर्ग उद्यान आणि वन उद्यान राज्य शासन प्रत्येक जिल्हयामध्ये उभे करणार आहे. सांस्कृतिक धोरणाचा मसुदा राज्य शासनाने तयार केला आहे. परंतु या राज्यातील विचारवंतांना, या राज्यातील साहित्यिकांना, या राज्यातील धुरिणांना, या राज्यात समाजकारण करणाऱ्यांना या धोरणाचा मसुदा तयार करीत असताना विश्वासात घ्यावे ही अपेक्षा आहे. सगळ्यात महत्वाचा मुद्दा म्हणजे माननीय राज्यपाल महोदयांनी सांगितले आहे की, राज्य शासन सीमा प्रश्न सोडविण्यासाठी जोमाने प्रयत्न करणार आहे. जोमाने म्हणजे काय? सुप्रीम कोर्टात ही केस चालविणारे जे वकील आहेत त्यांना जोमाने काम करण्यास सांगितले पाहिजे. मराठी भाषेत "कारभारी जरा दमानं" अशी एक लावणी आहे. त्या सुप्रीम कोर्टातील वकिलांनी ही लावणी ऐकली असावी आणि त्यानुसार अनुकरण करीत असावेत. माझी शासनाला विनंती आहे की, अंग घामाने भिजून गेले आहे. सभापती महोदय, आपण रसिक आहात. महाराष्ट्राचे रसिकवंत सभापती आपल्याला लाभले आहेत. त्यामुळे शासनाने सीमा प्रश्न सोडविण्यासाठी जरुर ते प्रयत्न करावेत अशी विनंती करतो आणि माननीय राज्यपालांचे अभिनंदन करुन आपली रजा घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, काही बाबी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये समाविष्ट व्हायला पाहिजे होत्या अशी अपेक्षा विदर्भातील जनतेची होती. नक्षलवादी कारवायांचा बिमोड करण्यासाठी शासनाने अनेक उपाययोजना जाहीर केल्या आहेत. नक्षलवाद विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, आंध्रप्रदेश आणि छत्तीसगढ राज्याच्या सीमेवर मोठया प्रमाणात फैलावला आहे. राज्य शासनाने नक्षलवादी कारवायापासून हे जिल्हे मुक्त व्हावेत, त्या भागाचा विकास व्हावा असे धोरण आखले आहे. परंतु जोपर्यंत विदर्भातील पाटबंधारे, उद्योग, स्थानिक रोजगार, शासकीय सेवेतील नोकऱ्यांबाबतचा अनुशेष दूर होत नाही तोपर्यंत या भागातील नक्षलवाद कमी होणार नाही. आज विदर्भात 1.40 लाख शासकीय नोकऱ्यांचा अनुशेष आहे. हा अनुशेष त्वरित भरुन काढला पाहिजे. स्थानिक सुशिक्षितांना शासकीय सेवेत सामावून घेतले पाहिजे. अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी अल्पदरात वीज पुरवठा, पीक कर्ज 2 टक्के व्याज दराने देण्याची योजना शासनाने तयार केली आहे. विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. ही बाब गांभीर्याने घेऊन यापुढे शेतकरी आत्महत्या करणार नाहीत, त्यांना जीवन जगणे सुसह्य व्हावे म्हणून शासन उपाययोजना करीत आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. विदर्भ हा मागासलेला असल्यामुळे वेगळा विदर्भ झाल्याशिवाय विदर्भाचा अनुशेष दूर करणे आवश्यक आहे, सुशिक्षित बेरोजगारांची समस्या, उद्योगांमध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. नववीन उद्योग त्या भागात येण्यासाठी महाराष्ट्र शासन त्यांना अनेक सवलती देत आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी .......

शासनाने विदर्भात किती उद्योग येत आहेत आणि त्यात किती स्थानिक लोकांना टेक्नीकल, पदवीधर, लिपीक किंवा ड्रायव्हर या पदांसाठी संधी दिली जाते याची माहिती घ्यावी. कारण वस्तुस्थिती अशी आहे की, एका एका कारखान्यात ऑटोमेटिक प्लांट येत असून पाच-दहा स्थानिकांना देखील नोकरीसाठी प्राधान्य दिले जात नाही. ज्यावेळेस संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली तेव्हा अनेक हुतात्मा झाले असे आपण म्हणतो परंतु आमचे नागपूर संयुक्त महाराष्ट्रात विलीन होण्यापूर्वी एक स्वतंत्र राजधानीचे ठिकाण होते, स्वतंत्र राज्यपाल आणि स्वतंत्र मुख्यमंत्री होते. या संयुक्त महाराष्ट्राचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून आपण साजरे करीत आहोत त्याच वेळेस हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की, विदर्भ विलीन झाल्यानंतर जो नागपूर करार झाला त्यानुसार विदर्भासाठी काय केले ? ज्या वैधानिक विकास मंडळाची मुदत एप्रिल, 2010 मध्ये संपत आहे त्याला मुदतवाढ देण्यासंबंधीचा कुठलाही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दिसत नाही. आमचे सन्माननीय सदस्य गुरुजी सध्या सभागृहात उपस्थित नाहीत. मी त्यांना सांगितले असते की, विदर्भातच आत्महत्त्या का होतात आणि कोकणात का होत नाहीत ? खरे तर कोकणात आत्महत्त्या न होण्याचे कारण म्हणजे कोकणातील प्रत्येक घरातील व्यक्ती मुंबईत नोकरीला आहे आणि एखादी व्यक्तीच गावाला शेती करते. परंतु विदर्भात मात्र नोकऱ्याच नाहीत तसेच सिंचनाची सुध्दा व्यवस्था नाही. निसर्गावर अवलंबून असलेली शेती सुध्दा पावसाच्या पाण्यामुळे खराब होते. पांढऱ्या रंगाचा तांदूळ लाल रंगाचा होतो......अडथळा.......विदर्भात दोनच जिल्ह्यांमध्ये दारुबंदी घोषित केलेली आहे परंतु त्यासंदर्भात माझे येथे बोलणे उचित होणार नाही म्हणून मी बोलत नाही. विदर्भाच्या विकासासाठी असलेल्या विदर्भ वैधानिक विकास मंडळाला शासनाने मुदतवाढ दिल्याचे या अभिभाषणात दिसत नाही. कदाचित शासनाची अशी इच्छा असेल की, वेगळ्या विदर्भासंबंधीचा ठराव सभागृहात पारित करावयाचा असेल. वास्तविक वैधानिक विकास मंडळाला 10 वर्षांची मुदतवाढ एकदाच देऊन टाकायला पाहिजे होती. अशा प्रकारे विदर्भ विकासाचे अनेक प्रश्न आहेत. त्यात मुख्य म्हणजे विदर्भात जे लहान उद्योग चंद्रपूर, गोंदिया, नागपूर व अमरावतीसारख्या ठिकाणी आहेत त्यापैकी 70 ते 90 टक्के उद्योग आज बंद पडलेले आहेत. मोठ्या उद्योगांना लागणारा कच्चा माल व सुटे भाग मात्र राज्यातील लघु उद्योगांकडून न

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी .....

घेता पंजाब व दिल्लीसारख्या शहरातूनच मागविण्यात येतात हे या राज्याचे व विदर्भाचे दुर्दैव आहे, म्हणून येथे लहान उद्योग येत नाहीत. विदर्भात थर्मल पॉवर स्टेशन्स निर्माण केलेले आहेत. यातून निघणाऱ्या राखेपासून विटा बनविणाऱ्या उद्योगांना शासनाने चालना द्यावी आणि विदर्भातील जनतेला न्याय द्यावा अशी विनंती करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी पुन्हा आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया ( अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकरण संस्था ) : सभापती महोदय, मी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषणाच्या संदर्भात अभिनंदन केलेले आहे, अनेक सन्माननीय सदस्यांनी खरी वस्तुस्थिती सदनाच्या समोर ठेवली तर अनेक सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या संदर्भात खेद व्यक्त केला आहे. राज्यातील लोडशेडींगच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या संदर्भात मी प्रकाश टाकणार आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात 12 लक्ष घरे विविध योजनेमार्फत या राज्यातील गोरगरिबांना देण्यात येणार आहे असे सांगितलेले आहे परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, 7.35 लक्ष घरे महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त देण्यात येणार आहे अशीही माहिती दिलेली आहे. यातील 75 हजार घरे नवबौध्दांसाठी, 70 हजार घरे आदिवासी जनतेसाठी, 2 लक्ष 73 हजार 976 घरे आयआरडीपी मधील दुर्बल घटकांसाठी तर 1.25 लक्ष घरे अल्पबचतगटासाठी देण्यात येणार आहे अशी माहिती दिलेली आहे. या शासनाने केवळ गटच गट निर्माण करुन त्याची बेरीज 12 लाखावर आणून ठेवली आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये 269 चौरस फूटाचे घर 70 हजार रुपयात दिले जाणार आहे असा उल्लेख आहे. यामध्ये 70 हजार रुपये राज्यशासन देणार आहे. जवाहरलाल अर्बन मिशन अंतर्गत 80 टक्के केंद्रशासन, 10 टक्के राज्यशासन आणि 10 टक्के लाभार्थ्यांचा वाटा आहे हे आम्हाला मान्य आहे .

सभापती महोदय, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या माझ्या मतदार क्षेत्रात 22 महापालिका आणि एक महानगरपालिका आहे. या राज्यशासनाने 50 कोटी रुपये अकोला जिल्हयाला युवायडीएसएसएमटी अंतर्गत अंडर ग्राऊंड सिस्टीम साठी दिले आणि त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेसमध्ये भांडणे सुरु झाली. यातून आपल्याला 5-10 कोटी रुपये कसे मिळतील यासाठी ही भांडणे सुरु झालेली आहेत. गोरगरिबांच्या झोपडपट्टीकडे या ठिकाणच्या कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या लोकांचे लक्ष नाही. या ठिकाणी 8 कोटी रुपये घरकुलांसाठी दिले हे आम्हाला मान्य आहे परंतु दोन वर्षापासून हे 8 कोटी रुपये करंट

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया ....

अकाऊंटमध्ये पडलेले आहेत. यामध्ये माननीय आयुक्तांनी 78 लाख रुपये इतर खात्यामध्ये ट्रान्सफर करुन वापरुन घेतलेले आहेत. या ठिकाणी ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल होतो परंतु या ठिकाणी कोणत्याही घरकुलाचे काम झालेले नाही. अकोल्याच्या 24 झोपडपट्टयांमध्ये घरकुले झालेली आहेत. ही जी घरकुले झालेली आहेत ती सुध्दा अत्यंत निकृष्ठ दर्जाची तयार करण्यात आलेली आहेत. यामध्ये 35 लक्ष रुपये सर्व्हेअरला दिलेले असून आता ते सांगत आहेत की, आम्ही आता झोपडपट्टी बांधू शकत नाही. अभ्यास नसल्यामुळे आम्ही झोपडपट्टी बांधू शकत नाही असे ते सांगतात. जवाहरलाला अर्बन मिशन काय आहे याची आम्हाला माहिती नाही असेही ते सांगतात.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया...

जे.एन.आर.यु.एम, आय.एच.एल.डी.पी. आणि यु.आय.डी.एस.एस.एम.टी. सबंधी अधिका-यांना माहिती नाही.वाल्मिकी आंबेडकर निवासी योजनेचे पैसे केन्द्र सरकारकडून आले होते परंतु ते पैसे राज्य सरकारने खर्च केलेले नसल्यामुळे ते पैसे परत गेलेले आहेत. ही योजना राज्य सरकार राबवू शकले नाही असे मला अत्यत खेदाने म्हणावेसे वाटते.

सभापती महोदय, जे.एन.आर.यु.एम. अंतर्गत एकात्मिक गृह निर्माण योजना, बी.यु.एस,पी, आणि यु.आय. डी.एस.एस.एम.टी योजना राबविण्यात येत आहेत.अशा विविध योजनांसाठी 28 हजार कोटी रुपये मिळणार आहेत असे मागच्या वेळी आम्हाला सांगण्यात आले होते.हे पैसे नगरपालिकांना देण्यात येणार असून त्यातून झोपडपट्टी मुक्त होईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. परंतु प्रत्यक्षात काहीही काम झालेले नाही उलट उरलेल्या झोपडयांवरील पत्रे उडून गेले आहेत आणि या योजनेसाठी पैसे खर्च झालेले नाहीत.याबाबतीत मी आपल्याला अकोला महानगरपालिकेचे एक उदाहरण देणार आहे. अकोला महानगरपालिकेच्या एका झोपडपट्टीत राहणा-यांना व्यक्तीला 270 फुटाचे घरकूल देण्यात आले होते. त्या घरामध्ये संडास बांधण्यात आला होता या घराची पाहणी करण्यासाठी तत्कालीन पालक मंत्री श्री वसंत पुरके आणि आयुक्त यांच्या बरोबर मी देखील गेलो होतो. त्या वेळी आम्ही असे विचारले की हा संडास घरामध्ये बांधण्यात आला आहे परंतु त्याचा आऊटलेट कोठे आहे ? तेव्हा म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला असे सागितले की, आम्ही याची पहाणी केली नाही." त्या घरात राहणा-या महिलेला आम्ही असे विचारले की," घरामध्ये संडास बांधण्यात आला आहे परतु आऊटलेट काढण्यात आलेला नाही तेव्हा त्याचा वापर कसा करता ? " तेव्हा त्या महिलेने आम्हाला असे सांगितले की, "आमच्याकडे जेव्हा पाहुणे येतात तेव्हा ते या संडासचा वापर करतात आणि नंतर डब्याचा वापर करुन आम्ही ती घाण बाहेर फेकून देतो." अकोला महानगरपालिकेतील ही परिस्थिती आहे. 70 हजार रुपयांमध्ये घर बांधून होत नाही असे मी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो. प्रती स्केअर फूट 500 रुपयापेक्षा जास्त बांधकामाचा खर्च येत असतांना 70 हजार रुपयामध्ये घरकूल कसे बांधण्यात येणार आहे ? या घरकूल योजनेसाठी लक्षावधी रुपयांची, कोटयावधी रुपयाची तरतूद करण्यात आल्याचे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात येतो.

2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया...

अर्थसंकल्पामध्ये ज्या प्रमाणे विविध योजनांसाठी कोटयावधी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचा उल्लेख केला जातो तशाच प्रकारे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख केला जात आहे. यापूर्वीच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात जो उल्लेख करण्यात आला होता तोच उल्लेख पुन्हा या वर्षीच्या अभिभाषणात करण्यात आलेला आहे. दोन्हीही अभिभाषणात काहीही फरक असल्याचे दिसून येत नाही.असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, हे सरकार झोपडपट्टीचे निर्मूलन करण्यासाठी निघालेले आहे. परंतु ती जागा ग्रीन झोनमध्ये असल्यामुळे तेथे जागा देता येत नाही. असे अनेकदा सांगण्यात येते. जागा मिळण्या सबंधीचा प्रस्ताव पाठविला परंतु ही जागा ग्रीन झोनमध्ये असल्यामुळे देता येणार नाही असे नंतर कळविण्यात येते. काही वेळा ती जागा रेल्वेची, वन विभागाची वा संरक्षण विभागाची असल्यामुळे या कामासाठी जागा दिली जात नाही. माझ्या भागातील 22 नगरपालिकांपैकी एकाही ठिकाणी ही योजना राबविली गेली नाही.अकोला, बुलढाणा आणि वाशिम या तीन जिल्हयामध्ये कोणत्याही ठिकाणी प्रत्यक्षात ही योजना राबविण्यात आलेली नाही. फक्त कागदोपत्री ती योजना दाखविण्यात आलेली आहे.महागाईच्या काळात 75 हजार रुपयामध्ये 270 फुटाचे घर कसे बांधून होईल ? तेव्हा यासाठी अधिक तरतूद करण्यात यावी असे मला सांगावयाचे आहे. ही घरे बांधण्याकरिता पाच वर्षाचे नियोजन करण्यात आलेले आहे असेही शासनाकडून सांगण्यात येते परंतु त्याप्रमाणे योजना पूर्ण करणे शक्य होणार नाही असे मला दुर्दैवाने म्हणावेसे वाटते.

सभापती महोदय, सपूर्ण देशात महाराष्ट्र हे असे एक राज्य आहे की ज्या राज्यात महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिग ॲक्ट आणि गुंठेवारी रेग्युलेशन ॲक्ट हे एकमेकांना क्रॉस करणारे आहेत. इतर कोणत्याही राज्यात अशा प्रकारचे कायदे नाहीत. माननीय नगरविकास मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, एखाद्या व्यक्तिचा दहा हजार स्केअर फुटाचा प्लॉट असेल आणि त्याला नियमाप्रमाणे परवानगी घ्यावयाची असेल तर जवळजवळ 16 एन.ओ.सी. घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारे 16 एन.ओ.सी. प्राप्त केल्यानंतर जर त्याने घर बांधावयाचे ठरविले तर त्याला फक्त एक एफ.एस.आय. देण्यात येईल असे सांगण्यात येते. दुस-या व्यक्तिचा बाजूला जर दहा हजार स्केअर फुटाचा प्लॉट असेल तर त्याला 5 एफ.एस.आय. दिला जातो व त्यावर बांधकाम

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया...

करण्यास सांगितले जाते. शासनाकडून असे सांगण्यात येते की, गुंठेवारी रेग्युलराईज करुन घेण्यात यावे. नगरविकास राज्यमंत्री या ठिकाणी उपसित आहेत मी त्यांना विचारु इच्छितो की गुठेवारीसबंधीचा कायदा आपण कशासाठी केला होता .? गोर गरीब व्यक्तीने 200 स्केअर फुटाच्या दोन खोल्या बांधल्या असतील तर गुंठेवारी रेग्युलेशलन ॲक्टनुसार ते बांधकाम रेग्युलराईज करता यावा व सबंधित गरीब व्यक्तीला न्याय देता यावा यासाठी शासनाने तो कायदा तयार केला होता परंतु आज प्रत्यक्षात या गरीब माणसाला न्याय दिला जात नाही उलट धनाढय लोक गुंठेवारी रेग्युलेशन ॲक्ट नुसार दहा दहा एकराचे मोठे लेआऊटस पास करुन घेण्यासाठी शासनाची दिशाभूल करीत असतात .या लोकांनी एम.आर.टी.पी. ॲक्टची चौकट विस्कळीत करुन टाकलेली आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया...

या शासनाचे राज्याकडे लक्ष नाही. माननीय नगरविकास मंत्र्यांनी सुध्दा या राज्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आपण झोपडपट्टी निर्मूलन करण्याच्या मार्गावर निघालेले आहात, तरमग खऱ्या अर्थाने आपण गरिबांना न्याय देणार आहात की नाही? विदर्भामधील अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ आणि वर्धा या पाच जिल्हयामध्ये गेल्या 5 वर्षामध्ये 5 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या. ही बाब या शासनाला भूषणावह नाही आणि अभिनंदणीय नाही. या आत्महत्त्या झाल्यानंतर केंद्र शासनाने 2 पॅकेज जाहीर केले. पहिल्यांदा 3700 कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले, त्यानंतर 5227 कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. परंतु हे पॅकेज उशिरा जाहीर करण्यात आले. शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्यानंतर त्यांच्या कुटुंबाला त्याचा लाभ मिळाला की नाही? हा खरा प्रश्न आहे. सिंचनासाठी 2200 कोटींची तरतूद करण्यात आली परंतु 1 कोटीसुध्दा सिंचनावर खर्च झाले नाहीत. विदर्भामध्ये भयानक परिस्थिती असतांना आपण या ठिकाणी कव्वालीचा मुकाबला करीत आहोत. शेतकऱ्याचे म्हणणे ऐकून घेण्यास आपणास फुरसत नाही. 5227 कोटी रुपये हे कोणत्या पाईपलाईनमध्ये अडकले आहेत याचे उत्तर देण्याची आवश्यकता आहे? याठिकाणी सांगण्यात आले की, गरीब शेतकऱ्यांना गुरे-ढोरे देण्यासाठी 5 हजार, 10 हजार कोटी रुपये खर्च केले. परंतु त्याठिकाणी एक वेगळी सिस्टीम राबविण्यात आली. त्यामध्ये 50 गुरे-ढोरे विकत घेण्यात आली ती शेतकऱ्याच्या घरासमोर उभी करण्यात आली. त्यांचे फोटो काढण्यात आले. त्या बिचाऱ्या शेतकऱ्याला 10 टक्के सुध्दा त्याचा लाभ दिला गेला नाही. अशाप्रकारे लाभार्थी शेतकऱ्यांना गुरे दिल्याचे फोटो काढून पुरावा तयार करावयाचा आणि त्यानंतर ती गुरे दुसऱ्या शेतकऱ्याच्या दाराजवळ उभी करुन त्यांचा फोटो घ्यावयाचा अशाप्रकारची ही सिस्टीम आहे. त्यामुळे आपण 5227 कोटी रुपये कोणत्या मार्गाने खर्च केले आहेत हे सांगावे. पाच जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी पॅकेजची रक्कम द्यावी म्हणून वारंवार विनंती केली तरी त्यांना ती रक्कम मिळाली नाही. कोणत्याही कृषी अधिकाऱ्याला किती रकमेचे पॅकेज आहे याचीही माहिती नाही. तेव्हा राज्य शासनामध्ये जर हिंमत असेल तर या पॅकेजसंदर्भात आपण श्वेतपत्रिका जाहीर करावी. आपण या 5227 कोटींच्या पॅकेजची थट्टा चालविली आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/ D/ MMP/

श्री. गोपीकिसन बाजोरिया...

सभापती महोदय, मी अगोदर फक्त दोनच मुद्यांवर बोलणार होतो, परंतु याठिकाणी 57 विषयांवर बोलण्यासारखी स्थिती आहे. शाळकरी मुलांना पोषण आहार योजना लागू करण्यात आली. परंतु त्यामधून त्या मुलांना काय दिले जाते? याकडे कुणाचेही लक्ष नाही. शाळेतील मुलांना पोषण आहार दिला जात नाही. फक्त ठेकेदारांचे भले करण्यासाठी ही योजना राबविली जात आहे. याबद्दल मी खेद व्यक्त करीत आहे. याकरिता आपण राज्यामध्ये एक सिस्टीम राबविली. कंझ्यूमर मार्केटींग फेडरेशनला हे काम देत असतांना इतर ठेकेदारांशी साटेलोटे करुन 35 जिल्हयांमध्ये त्यांना ठेका देता. त्यामुळे गोरगरीब मुलांपर्यंत हा पोषण आहार पोहोचत नाही.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ D/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:00

श्री.गोपीकिसन बाजोरिया . . . .

सभापती महोदय, पोषण आहारामध्ये अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी यादी दिली जाते. मागच्या वर्षी डाळीचा पुरवठा करण्याच्या बाबतीत टेंडर भरण्यात आले होते. त्यामध्ये सुध्दा कॉन्स्पिरसी करण्यात आली. डाळीची किंमत 60 रुपये आहे आणि आपण 80 रुपयांचा ठेका घेतलेला आहे. जर किंमत 85 रुपये झाली तर शासनच कॉन्स्पिरसी करुन हाय कोर्टमध्ये जाते आणि जोपर्यंत डाळीची किंमत कमी होत नाही, तोपर्यंत त्यावर स्टे आणला जातो. हे काय चालले आहे आणि आम्ही याठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्याबद्दल अभिनंदन करावयाचे काय ? आणि आम्ही कव्वालीच्या मुकाबल्यामध्ये सहभागी व्हावयाचे काय ? सभापती महोदय, नाही. आम्ही मुळीच यामध्ये सहभागी होणार नाही. मी याबाबत खंत व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, अनेक प्रश्न आहेत. विजेचा प्रश्न आहे, त्यावर जास्त बोलणार नाही. महत्वाचे असे दोनच प्रश्न होते. एक प्रश्न शेतकऱ्यांबाबतचा आहे आणि याठिकाणी माननीय नगरविकास मंत्री उपस्थित आहेत. त्यांना सांगू इच्छितो की, यु.आय.डी.एस.एस.एम.टी., आय.एच.एस.डी.पी., बी.यु.आय.एस.पी. आणि जवाहरलाल अर्बन रिन्युअल मिशन या योजनांची खऱ्या अर्थाने 227 नगरपालिकांमध्ये माननीय मंत्री महोदयांनी माहिती दिली असती तर या योजना कोलमडल्या नसत्या. यासाठी सर्व पैसे उपलब्ध होत असून, ते दुसऱ्या अकाऊंटमध्ये ट्रान्सफर होत आहेत. परंतु सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवलेसाहेब, मी आपल्याला सांगू इच्छितो की, गोरगरीबांना 12 लाख नाही तर 1200 घरे सुध्दा मिळणार नाहीत अशी माझी खात्री आहे. म्हणून याबाबतीत तीव्र चिंता व्यक्त करतो आणि मी माझे भाषण याठिकाणी थांबवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

----

3 आय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मृगजळामागे धावावयास लावणारे हे भाषण आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी ते मृगजळ काय आहे हे दोनच मुद्यांच्या आधारे व्यक्त केले आहे. अनेक प्रकारची आश्वासने द्यावयाची आणि लोकांना त्यामागे धावावयास लावावयाचे. मला हे मान्य आहे की, अशा प्रकारे आश्वासने पूर्ण न करता सुध्दा कॉंग्रेस सत्तेवर आलीह. एक म्हण आहे की,ज्याला प्रसिध्दी चांगली करता येते, त्याच्या चिंध्याही विकल्या जातात आणि ज्याला प्रसिध्दी करता येत नाही, त्याचे सोनेही विकले जात नाही. त्यामुळे याबाबतीत कॉंग्रेस कौशल्य मानलेच पाहिजे की, त्यांना पोकळ आश्वासने दिल्यानंतर सुध्दा मते मिळतात आणि आम्ही देखील आगामी काळामध्ये ते कौशल्य शिकू. परंतु माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे पूर्णपणे मृगजळाच्या पाठिमागे धावावयास लावणारे आहे. यातील एकही गोष्ट व्यवहारामध्ये येऊ शकेल अशी नाही आणि एकही गोष्ट अशी नाही की जी आतापर्यंत व्यवहारामध्ये आलेली आहे. याठिकाणी शिक्षण क्षेत्रातील काही गोष्टींबाबत उल्लेख करावयाचा झाला तर किती खोटी आश्वासने द्यावयाची ? गेल्या वर्षभरा तील किमान सहा आश्वासनांच्या बाबतीत असे सांगता येईल की, ज्यामध्ये आश्वासने देऊन एका अर्थाने फसविले गेले. महाराष्ट्रामध्ये 28 हजार शिक्षक असे आहेत की, ज्यांना गेली दहा वर्षे पगार मिळालेला नाही. या सदनामध्ये जुलैमधील अधिवेशनाच्या वेळी एक दिवसभर सर्व शिक्षकांनी, पदवीधर आमदारांनी सभागृहातील कामकाज रोखून धरले. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांना सदनामध्ये यावे लागले. त्यावेळी असे आश्वासन देण्यात आले की, आम्ही "कायम विनाअनुदानित" यामधील "कायम" हा शब्द काढू. हा शब्द नावाला काढला. परंतु कायम विनाअनुदानित शिक्षकांना पगार मिळण्यासाठी जी प्रक्रिया सुरु करावी लागते, ती प्रक्रिया एक वर्ष झाले तरी अद्याप सुरु झालेली नाही. कायम विनाअनुदानितमुळे माध्यमिक शिक्षकांना एका अर्थाने न्याय मिळाला असे म्हणता येईल परंतु उच्च माध्यमिक शिक्षकांना अजून न्याय मिळालेला नाही. कायम विनाअनुदानित शिक्षकांच्या बरोबरीने शिक्षकेतर अनुदान 2003 पासून देण्यात आलेले नाही, त्या विषयाच्या संदर्भात देखील आश्वासन दिले. त्यामुळे शाळांची स्थिती अत्यंत दयनीय झालेली आहे. 2003 पासून काही शाळांना शिक्षकेतर अनुदान म्हणून काही लाखो रुपयांचे अनुदान मिळावयाचे आहे. याबाबतीत असे सांगण्यात आले की, आम्ही या अधिवेशनामध्ये मंत्रिमंडळापुढे हा प्रस्ताव आणणार आहोत. परंतु

. . . .3 आय-3



APR/ KGS/ D/ 15:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अजूनही त्याचा काही पत्ता नाही. शिक्षक सेवकांच्या मानधनाच्या बाबतीत तोच मुद्दा आहे. आठ दिवसापूर्वी असे वातावरण निर्माण करण्यात आले की, शिक्षक सेवकांचे मानधन वाढणार आहे. डी.एड.च्या शिक्षकांना तीन हजार रुपये मिळतात आणि 3800 रुपये किमान वेतन आहे. परंतु ते किमान वेतन सुध्दा डी.एड.च्या शिक्षकांना मिळत नाही. आम्ही तीन हजार रुपयांचे मानधन वाढविणार आहोत, माध्यमिक शिक्षकांना मिळणारे 4000 रुपयांचे मानधन वाढविणार आहोत आणि उच्च माध्यमिक शिक्षकांचे मिळणारे 5000 रुपयांचे मानधन वाढविणार आहोत अशी घोषणा करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात वित्त विभागाने टेक्नीकल अडचण काढलेली आहे असे सांगून चार दिवसापूर्वी असे घोषित करण्यात आले की, एका अर्थाने नजिकच्या काळामध्ये शिक्षक सेवकांना हे वाढीव मानधन मिळणार नाही. याबाबतीत एक ना दोन अशा अनेक गोष्टी सांगता येतील. डिसेंबरमध्ये झालेल्या नागपूर येथील अधिवेशनामध्ये सदनामध्ये कोल्हापूरच्या चित्रनगरीसाठी 350 कोटी रुपये मान्य केले.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील .....

परंतु आता दीड वर्ष होत आले तरी त्या चित्रनगरीचे साधे टेंडर सुध्दा सरकारला काढता आले नाही. म्हणजे एका अर्थाने खोटी आश्वासने द्यावयाची आणि त्या खोट्या आश्वासनांच्या मागे जनतेला धावावयास लावावयाचे अशा प्रकारचा जो काही काँग्रेसचा शिरस्ता आहे तोच या माननीय राज्यपालांच्या भाषणातून पुन्हा दिसून येतो. या अभिभाषणात अनेक प्रकारची आश्वासने दिली गेली आहेत. 10 वर्षापूर्वी असे म्हटले गेले होते की, आम्ही मोफत वीज देऊ. मोफत वीज तर लांबच राहिली पण विकत सुध्दा वीज मिळत नाही. आता पुन्हा एकदा माननीय राज्यपाल आपल्या भाषणामध्ये आश्वासन देत आहेत की, 2012 पर्यंत वीज देणार आहोत. मघाशी सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी असे म्हटले की, दिवसा सुध्दा आपण बल्ब लावून फिरणार इतकी वीज 2012 मध्ये देणार आहेत, जी गेल्या 10 वर्षात त्यांना ती देता आली नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये शेततळ्यांचा उल्लेख केला आहे. इतकी शेततळी निर्माण करणार आहोत, पाणलोट क्षेत्र निर्माण करणार आहोत याबाबत उल्लेख केला आहे. दहा वर्षापूर्वी कृष्णा खोरे विकास महामंडळ बंद पडले आहे त्या कृष्णा खोऱ्याची पूर्तता अजून झालेली नाही. युतीच्या काळामध्ये लोकांकडून कर्ज काढून युतीच्या शासनाने पश्चिम महाराष्ट्रात मोठे धाडस केले. तो प्रकल्प सुध्दा पूर्ण करता आला नाही आणि आता हे शासन हजारो शेततळी आणि पाणलोट निर्माण करणार आहेत. म्हणजे एका अर्थाने खोट्या आश्वासनांचा पाऊस माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिसतो. एका बाजूला गावातील मजुराचा जो 66 रुपये पगार आहे तो 100 रुपये केल्याची घोषणा अभिभाषणामध्ये केली गेली आहे परंतु त्या गावामध्ये राहणाऱ्या बेरोजगार तरुणांच्या बाबतीत काय करणार ? घटनेमधील मुलभूत अधिकारांमध्ये आपण सरकार म्हणून तरुणांना रोजगार देणार नसलो तर त्यांना बेरोजगार भत्ता देण्याची तरतूद आहे. हा बेरोजगार भत्ता महाराष्ट्रातील तरुणांना मिळत नाही. पण दुसऱ्या बाजूने ज्या सेवायोजन कार्यालयाच्या आधारे तो किमान आशेवर राहतो की मला केव्हा तरी नोकरी मिळणार आहे त्या सेवायोजन कार्यालयाला आपण करियर गाईडन्स ब्युरोमध्ये कन्व्हर्ट करुन टाकले. म्हणजे खाजगी सेक्टरला आपण एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजसाठी कंपल्शन करावयाचे सोडून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ......

शासन सुध्दा एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजपासून दूर जात आहे आणि एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज बद करुन आपण त्या ठिकाणी करियर गाईडन्स सुरु करण्याचा विचार करु लागलो. या महाराष्ट्रातील तरुणांना बेरोजगार भत्ता मिळाला पाहिजे. महाराष्ट्रामध्ये तालुका केंद्रामध्ये एमआयडीसी असावी असा विषय अनेक वेळा आला. अनेक आश्वासने दिली गेली पण महाराष्ट्रातील शिरुर सारखे, अकलूज सारखे दोन चार तालुके सोडले तर 350 तालुक्यांपैकी जवळजवळ 340 तालुक्यांमध्ये एक तर एमआयडीसी सुरु झालेली नाही किंवा सुरु होऊन बंद पडलेली आहे. जोपर्यंत तालुका केंद्रामध्ये तेथील तरुणांना रोजगार देत नाही, त्या गावामध्ये पिकणाऱ्या धान्यावर प्रक्रिया करणारा उद्योग त्याला सुरु करुन देत नाही, त्याची कोणतीही औद्योगिक पार्श्वभूमी नसल्यामुळे त्याला चार टक्के वार्षिक व्याज दराने कर्ज देणार नाही, आदिवासी भागाप्रमाणे 12-12 वर्षे सेल्स टॅक्स कलेक्ट करुन वापरण्याची परवानगी देणार नाही, हाऊसिंगचा तीन तीन वर्षाचा ड्राय पिरियड असतो त्याप्रमाणे व्यवसाय सुरु केल्यानंतर पहिली तीन वर्षे त्यांनी हप्ते भरले नाहीत तरी चालतील फक्त व्याज त्याने भरावे अशा प्रकारची सुविधा देणार नाही तोपर्यंत ग्रामीण भागातील तरुण हा उद्योजक होणार नाही. त्यांच्या तालुका केंद्रामध्ये आपण एमआयडीसी सुरु करणार नाही, त्याला कमी दराने कर्ज पुरविणार नाही, सुरुवातीच्या काळामध्ये त्याला सर्व प्रकारचा सपोर्ट देऊन बुस्ट करणार नाही त्यामुळे मग तो रोजगार मिळत नाही म्हणून शहरामध्ये येतो. ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येचे जे 70-30 प्रमाण होते ते आज 53-47 वर आलेले आहे. ही बाब भूषणावह आहे असे मला वाटत नाही. कारण शहरामध्ये तो मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित होऊन शहरातील समस्या तर वाढत आहेत परंतु गावामधील जी संस्कृती आहे ती सुध्दा संपत आहे. एका अर्थाने तो झोपडपट्टीमध्ये येऊन राहतो. त्या झोपडपट्टीच्या विकासाच्या केवळ आपण वल्गनाच करतो. त्याचे धिंडवडे या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया यांनी काढले आहेत. मला असे वाटते की, एका अर्थाने खोट्या आश्वासनांचा भर या संपूर्ण अभिभाषणामध्ये असल्यामुळे मी माननीय राज्यपालांच्या या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, येत्या आठवडाभरामध्ये एक मुद्दा सभागृहामध्ये यावयाचा आहे. संपूर्ण

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP

श्री. चंद्रकांत पाटील ......

महाराष्ट्रामध्ये पोलीस राज चालू आहे. वसईचा उल्लेख अगदी ताजा आहे परंतु सहा महिन्यांपूर्वी मिरज येथे झालेल्या दंगलीचे भूत पुन्हा एकदा पोलीस अधिकारी उकरुन काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. एका बाजूने चार महिन्यापूर्वी नागपूरच्या अधिवेशनामध्ये सरकारने मान्य केले होते की, निरपराध नागरिकांवरील खटले आम्ही काढून घेणार परंतु नव्याने शिवसेनेचे मिरज शहरप्रमुख श्री. विकास सूर्यवंशी यांच्या ब्रेन मॅपिंगच्या परवानगीसाठी शासन न्यायालयात गेले. न्यालयालयाने थप्प्ड मारली. न्यायालयाने स्टे दिला. परंतु ती थप्पड कमी पडली म्हणून की काय नगरसेवक श्री. मकरंद देशपांडे यांच्या ब्रेन मॅपिंगसाठी प्रशासन मिरज कोर्टामध्ये गेलेले आहे. हे कशासाठी चालले आहे ? सहा महिन्यापूर्वी दंगल झाली. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा मोठ्या अभिमानाने उल्लेख केला त्या शिवाजी महाराजांचा फोटो लावण्यासाठी सुध्दा या शासनाची परवानगी लागते. त्या फोटोला सुध्दा विरोध केला जातो. दंगली उसळतात आणि ती दंगल शांत झाली आणि पुन्हा एकदा लोक सुखाने नांदावयास लागल्यानंतर प्रशासन पुन्हा एकदा ब्रेन मॅपिंगची मागणी करुन भूत उकरुन काढत आहे.

यानंतर श्री. खंदारे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

हा जो पोलिसी अत्याचार चालला आहे त्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये एका गोष्टीचा उल्लेख का करण्यात आला नाही याबद्दल आश्चर्य वाटते. राज्यपाल केवळ आश्वासन देण्यामध्ये मश्गुल राहिले आहेत असे वाटते. या राज्यात मागील काही दिवसांपासून विद्यार्थी, तरुण मोठया प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. त्याचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात करणे गरजेचे होते. या आत्महत्यांमुळे संपूर्ण समाज हादरुन गेलेला आहे. या प्रश्नाच्या खोलामध्ये जाण्याची आवश्यकता आहे. पण त्याचा साधा उल्लेख सुध्दा केलेला नाही. एका अर्थाने जो प्रसिध्दी करु शकतो त्याची चिंधी सुध्दा विकली जाते असा प्रकार या अभिभाषणामध्ये असल्यामुळे मी राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करतो आणि माझे बोलणे संपवितो.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, महामहिम राज्यपाल यांच्या अभिभाषणाबद्दल मांडलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी व माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यपालांनी पद स्वीकारल्यानंतर त्यांचे हे पहिले अभिभाषण आहे. तसेच आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर आघाडी सरकारचे सुध्दा हे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. राज्यपालांनी अनेक योजनांची अंमलबजावणी करण्याचा मसुदा या अभिभाषणातून जाहीर केला आहे. या संपूर्ण भाषणामध्ये आम आदमी हा केंद्रबिंदू असल्याचे दिसत आहे.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेचे प्रणेते वि.स.पागे यांच्या शताब्दीच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाने त्यांचे स्मरण केलेले आहे. त्यांनी पहिल्यांदा प्रदेश काँगेसमध्ये या योजनेचा संकल्प मांडला. त्यानंतर या योजनेची अंमलबजावणी राज्यात सुरु झालेली आहे. या योजनेच्या मजुरांची मजुरी 66 रुपयांवरुन 100 रुपयांपर्यंत वाढविली आहे. परंतु या योजनेत काही त्रुटी आहेत. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या योजनेखाली काम केलेल्या मजुरांच्या तक्रारी आहेत, त्याकडे शासनाने विशेष लक्ष दिले पाहिजे, त्यासाठी पाठपुरावा झाला पाहिजे. या योजनेतील भ्रष्टाचारासंबंधी सुध्दा तक्रारी येत आहेत.

सभापती महोदय, शासनाने 221 तालुक्यांसाठी स्वतंत्र पॅकेज दिलेले आहे. या निर्णयाबद्दल मी शासनाचे स्वागत करतो. यातील प्रत्येक तालुक्यांना किमान 200 शेततळी दिलेली आहेत. शेतकरी, शेतमजुरांना या शेततळयांच्या माध्यमातून रोजगार मिळणार आहे. गेल्या महिन्यामध्ये काही भागामध्ये अवकाळी पाऊस पडला. त्यामुळे आंब्याचे पीक धोक्यात आले आहे. रब्बीचे पीक वाया गेले आहे. शासनाने या शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, अनुसचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आदि प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्मक, शाळेची फी सरळ बँकेमार्फत मिळणार आहे. त्यामध्ये कोणतीही गडबड होणार नाही याची दक्षता घेतलेली आहे. त्यासाठी दरवर्षी 1700 कोटी रुपयांचे वितरण होणार आहे. या योजनेचा 16 लाख विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे. या समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थी उच्च पदावर जावोत, आयएएस, आयपीएस अधिकारी होवोत अशी शासनाची धारणा आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.सुभाष चव्हाण.......

सभापती महोदय, मी यानिमित्ताने नियोजन आयोगाचे माजी सदस्य डॉ.भालचंद्र मुणगेकर यांचे अभिनंदन करतो. भारताच्या माननीय राष्ट्रपतींनी त्यांची नुकतीच राज्यसभेवर नियुक्ती केली आहे. डॉ.मुणगेकर हे दलित चळवळीतील, आंबेडकरवादी आहेत त्यांनी हे सर्व भोगले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील मुणगे गावातील या विद्यार्थ्याला अशा सवलती दिल्या नसत्या तर असे महान नेते देशात निर्माण झाले नसते, त्यामुळे मी त्यांचा गौरव करतो. देशामध्ये हे एकमेव राज्य आहे की, या राज्यात अनुसूचित जाती/जमातीच्या लोकांना जास्तीत जास्त लोकांना आर्थिक मदत देण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे असे मी नेहमी म्हणतो.

यानंतर श्री.ओटवणेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण ....

"दलित व आदिवासींच्या निधीला कात्री" या शीर्षाखाली दिनांक 10 मार्चच्या दै.सकाळमध्ये बातमी आली आहे. राज्याची 25 हजार कोटीची योजना केंद्रीय नियोजन आयोगाच्या सूचनेचा भंग तरतुदीत 50 टक्के रक्कम म्हणजे किमान 2600 कोटीची कात्री लावण्याचा प्रस्ताव नियोजन विभागाने वित्त विभागाकडे पाठविला आहे. ते समजल्यानंतर आपल्याच राज्यातील दलित मंत्री किंवा त्या खात्याचे मंत्री एकत्र होऊन मुख्यमंत्र्यांना भेटले. मी देखील वित्त मंत्र्यांना ताबडतोब पत्र देऊन भेटलो. आघाडी सरकारला दलित समाजाने, दबलेल्या समाजाने घवघवीत मताने मताधिक्य दिले आहे म्हणून आपण परत सत्तेवर आलो आहोत. जे दोन वर्षाप्रमाणे घडले तसे इकडचा निधी तिकडे वळवू नका. खबरदार, अनुसूचित जातीच्या निधीला आपण स्पर्श कराल तर. हा निधी त्या विभागासाठी राखून ठेवलेला आहे. तो त्याच विभागाला मिळाला पाहिजे. हे मी आवर्जून, खंबरीपणे आणि जाहीरपणे या निमित्ताने सांगत आहे.

सभापती महोदय, ऊर्जा विभागावर विरोधी पक्षाकडून प्रचंड टीका होते. कोकणातील आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.केळकर म्हणाले की, शासनाने गेल्या 10 वर्षात वीज निर्मितीसाठी काय केले ? श्री.केळकर हे कोकणातील आहेत. त्यांना मी येथे नारळाच्या झाडाचे उदाहरण देऊ इच्छितो. नारळाचे झाड लावल्यानंतर त्यास नारळ लागण्यासाठी 10 ते 15 वर्षे लागतात. तेव्हा वीज निर्मितीचा कोणताही प्रकल्प हाती घेतल्यानंतर तो उभा राहण्यासाठी किमान 5 वर्षे तर जास्तीत जास्त 25 वर्षे लागतात. ह्या दहा वर्षामध्ये तुमच्या नंतर आम्ही सत्तेवर आल्यानंतर जे काम केले आहे, त्याचा उल्लेख मा.राज्यपाल्यांच्या भाषणात आला आहे. या देशाचा औद्योगिक, आर्थिक विकास व्हावयाचा असेल तर ऊर्जा हा महत्त्वाचा घटक आहे. आपला विकासाचा दर स्थिर ठेवायचा असेल, वाढवायचा असेल तर ऊर्जा हे एक महत्त्वाचे माध्यम आहे. निवडणुकीच्या पूर्वी आमचे आधाडी सरकार सत्तेवर येण्यापूर्वी 15 दिवस अगोदर आमच्या नेत्या सन्माननीय श्रीमती सोनिया गांधी सोलापूर येथे एनटीपीसीच्या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यासाठी आल्या होत्या. त्यांनी संपूर्ण देशाला आश्वासित केले होते की, 2012 पर्यंत हे राज्य, हा देश संपूर्णत: भार नियमन मुक्त होईल. त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. भुसावळ, थोपाणी, दोंडाई, उरण,पारस,परळी,चंद्रपूर,इत्यादी ऊर्जा प्रकल्पातून किमान 90हजार मे.वॅ.ऊर्जा आपल्याला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

मिळणार आहे. इथेच येऊन आम्ही थांबलो नाही. हा महाराष्ट्र शासनाचा भाग झाला. केंद्र सरकारच्या मालकीच्या ज्या काही कंपन्या आहेत त्यापैकी एनटीसीपी एक आहे. ही कंपनी म्हणजे नवरत्न आहे. लाखो-करोडो रूपयांची उलाढाल ही कंपनी करते. या कंपनीचे दोन मोठे प्रकल्प महाराष्ट्रात होत आहे. सोलापूर येथे 3500 मे.वॅ.चा प्रकल्प आहे. मौदा नागपूर येथे प्रकल्प आहे. तसेच पॉवर ग्रीडचे 3-4 प्रकल्प आहेत. केंद्राकडून काही प्रकल्प मिळत आहेत. राज्याकडून काही प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत. श्री.सुशीलकुमार शिंदे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांना राज्यातील ऊर्जाची जाणीव आहे. ते ऊर्जा मंत्री झाल्यानंतर त्यांनी ताबडतोब हे प्रकल्प महाराष्ट्रामध्ये दिले. या सगळ्यांची बेरीज केली तर संपूर्णत: भारनियमन मुक्त भारत नव्हे तर महाराष्ट्र होणार आहे. ही जाणीव विरोधी पक्षाला असताना सुद्धा ते टीका करत असतात. श्री.सुशीलकुमार शिंदे ऊर्जा मंत्री झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी श्री.राणे साहेबांशी संभाषण करून त्यांनी कोकणासाठी गिरये येथे प्रकल्प दिला. पण तो प्रकल्प अजून होत नाही. याचे कारण विरोधी पक्ष आहे. आपण प्रकल्पाचे काम सुरू करण्यास मदत करीत नाही. मग कसा प्रकल्प होणार ? प्रकल्प दिला जात आहे. पण तो होत नाही. यापूर्वी विरोधी पक्षाचे देखील केंद्रात ऊर्जा मंत्री होते. त्यांनी महाराष्ट्रासाठी किती प्रकल्प दिले ? ते कोकणातीलच होते. श्री.सुरेश प्रभु हे कोकणातीलच होते. ते मोठमोठी भाषणे देत होते. मोठे विचारवंत आहेत. मोठे विचार मांडायचे. पण त्यांनी काहीच केले नाही. सन्माननीय सदस्य श्री.केळकर बोलले म्हणून मला एवढे विस्तृतपणे सांगावे लागत आहे. येत्या 2-3 वर्षात आपण पूर्णपणे भारनियमन मुक्त होणार आहोत.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

सभापती महोदय, सच्चर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. हे राज्य आणि देश धर्मनिरपेक्ष असून एकसंध आहे. काँग्रेसची, आमच्या आघाडी सरकारची भूमिका सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची आहे. मुंबई शहराचा झपाट्याने विकास होत आहे. युतीचे सरकार असताना तसेच त्यांच्या पक्षाचे पंतप्रधान असताना राज्याला 10 कोटी देखील केन्द्राकडून मिळाले नव्हते. परंतु गेल्या 5 वर्षामध्ये मुंबई शहरामध्ये 55 हजार कोटीची कामे चालू आहेत. भारतामध्ये पहिल्यांदा मोनोरेल आणण्याचा मान महाराष्ट्राला मिळालेला आहे. या मोनोरेलमध्ये राज्यातील आम आदमी, सामान्य माणूस बसणार आहे. आम आदमी हा या राज्य शासनाचा केन्द्रबिंदू आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे. चिपी येथे विमानतळ व्हावे यासाठी माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे हे जीवाचे रान करीत आहेत. विमानतळ करण्याच्या बाबतीत खूप अडचणी आहेत. लोक जागा देण्यास तयार नाहीत. सांगाल ती किंमत देण्यास शासन तयार आहे. अशा प्रकारच्या काही अडचणी आल्यामुळे प्रकल्प पुढे गेला आहे. माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे हे काँग्रेस पक्षात आल्यानंतर कोकणाचा कायापालट झ ालेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील लोक कोकणातील रस्ते पाहाण्यासाठी येतात इतके सुंदर रस्ते कोकणामध्ये झालेले आहेत. याचे श्रेय हे आमच्या शासनाला, आमचे नेते श्री.नारायण राणे यांना आहे.

शेतक-यांना 25 हजारापासून 3 लाखपर्यन्त अल्पदराने पीक कर्ज देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. हे चांगले काम आहे की वाईट काम आहे ? विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी काळा चष्मा लावलेला असल्यामुळे या गोष्टी त्यांना दिसणार नाहीत. आम आदमीसाठी अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. अनुसूचित जाती आणि नवबौध्द यांना 75 हजार आणि आदिवासींना 70 हजार घेरे मोफत देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. आमचा केन्द्रबिंदू हा आम आदमी आहे.

हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये शासनाने सांस्कृतिक धोरण जाहीर केलेले आहे. राज्याचे सांस्कृतिक धोरण उद्याच्या दस्तऐवजाचा ठेवा असणार आहे.त्यातून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण

या राज्याची संस्कृती काय आहे हे समजणार आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिलात त्याबद्दल आपले आभार मानून आणि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला समर्थन देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. लक्षवेधी सूचना मी दिलेली असताना, त्या सूचनेवर माझे नाव असताना इतरांना बोलण्याची भरपूर संधी मिळाली आणि मला मात्र ती मिळाली नाही याची खंत मला आहे. ..(अडथळा).. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावतेसाहेब यांना मी सांगू इच्छितो की, तुमचे भाषण आम्ही मन लावून ऐकतो. आपल्या भाषणामध्ये अतिशय चांगले मुद्दे असतात, ....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे.........

तुमच्या भाषणाचे अवलोकन करतो आणि घरी जाऊन देखील विचार करतो की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्यासारखे आम्हाला बोलता येईल का? सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी संपूर्ण महाराष्ट्राचा आराखडा त्यांच्या अभिभाषणामध्ये चांगल्याप्रकारे मांडला आहे. हे राज्य संपूर्ण देशामध्ये पहिल्या क्रमांकावर यावे, या राज्याचा सर्वांगीण विकास व्हावा, या राज्यातील विविध घटकांचा व विविध विभागांचा सर्वंकष विकास व्हावा अशा प्रकारचे हे अभिभाषण आहे. मला हे भाषण ऐकून व वाचून खूप आनंद वाटला. परंतु दुसरीकडे माझी खंत आहे आणि मला दु:ख होते की, या संपूर्ण अभिभाषणामध्ये प्रामुख्याने एक-दोन महत्वाच्या गोष्टींचा उल्लेख झालेला नाही. मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला समर्थन देत असताना दलितांवर लिहिणाऱ्या वृत्तपत्रांमधून विशेषत: महानायक व सम्राट या वृत्तपत्रांमधून सातत्याने मागील आठ दिवस बातम्या छापून येत आहेत. राज्यातील अनेक जिल्हयांमध्ये लोक रस्त्यावर उपोषणाला बसले आहेत. कारण जवळजवळ 850 कोटी रुपयांचा मागासवर्गीय विभागाचा निधी अन्यत्र वळविण्याचे काम सुरु झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी हा मुद्दा मांडला आहे. हे पहिल्यांदा होत आहे असे नव्हे तर मागील वर्षी सुध्दा असा प्रकार घडला आहे. फक्त मोठमोठी आकडेवारी दाखविली जाते. दलितांसाठी मोठमोठया योजना जाहीर करायच्या, परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना निधी मात्र दुसरीकडे वळवायचा हे सांगताना मला अत्यंत दु:ख होते आणि खेद वाटतो. एका बाजूला हा वंचित समाज शासनाकडे आशेने पहात असताना आजही हा पददलित समाज अतिशय जीर्ण अवस्थेत जिणे जगत आहे. घरामध्ये सायंकाळचे अन्न शिजविण्याची ददात असताना त्यांच्या हक्काचा निधी वळविण्याचे शासनाचे धोरण चुकीचे आहे असे मला वाटते. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी एसआरए योजनेचा मुद्दा मांडला. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांचे देखील मी अभिनंदन करतो. त्यांनी सुध्दा एसआरए योजनेचा मुद्दा उपस्थित केला. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी झोपडपट्टीधारकांना 225 चौ.फुटाऐवजी 275 चौ.फुटाच्या घरामध्ये न्यायचा संकल्प सोडला त्यावेळी सभागृहात दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले होते. एसआरए योजना संपूर्ण मुंबई शहरात सुरु आहे. मध्यंतरी या योजनेला खीळ बसली होती. परंतु आता शासनाला आणि आदरणीय मंत्रीमहोदयांना दोन तीन विकासक असे दिसले की, त्यांना मोठमोठया योजना मंजूर करुन दिल्या आहेत.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे .....

त्यात एक बिल्डर तर असा आहे की, ज्याला जवळपास 100 एकर जमीन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधकाम करण्यासाठी शासनाने दिली, याचाही विचार करावा. या बिल्डरने कांदिवली येथील हनुमान नगरमधील लोकांची फसवणूक केली आहे. गेल्या 15 वर्षात त्याने एक फूट देखील बांधकाम या भागात केलेले नाही. अशा प्रकारे गरिबांची फसवणूक करणाऱ्या बिल्डरला गरिबांचीच घरे बांधण्यासाठी शासनाने 100 एकर जमीन देण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. मी या निमित्ताने माननीय राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या बिल्डरचे नाव किरण हिमानी असे असून त्याचे नाव मुंबई महानगरपालिकेच्या काळ्या यादीमध्ये समाविष्ट आहे. असे असताना याच बिल्डरला एवढे मोठे काम देण्याची गरज काय आहे ? माझी अशी मागणी आहे की, या काळ्या यादीत असलेल्या किरण हिमानी या बिल्डरची चौकशी करावी. हा माणूस कोण आहे आणि राज्यात विशेषकरुन मुंबईत त्याने कशा प्रकारचे काम केलेले आहे की त्याचे नाव महापालिकेने काळ्या यादीत टाकले आहे ? कांदिवलीमधील झोपडपट्टी धारकांना शासनाने घरांची स्वप्ने दाखविली परंतु या बिल्डरला काम दिल्यामुळे त्या लोकांना पुन्हा अडचणीत आणण्याचे काम शासन का करीत आहे हे मला समजत नाही. त्याचप्रमाणे एससी आणि एसटीच्या लोकांना 75 लाख घरे देण्याचे काम शासन करणार असेही अभिभाषणात म्हटले आहे. ही घरकूल योजना खरे तर निवडणुकीच्या अगोदर तयार करण्यात आली त्यामुळे जिल्ह्या-जिल्ह्यातून दलित, नवबौध्द, गोरगरीब लोकांना वाटले की, आम्हाला आता निश्चित घरे मिळणार. परंतु एक-एक जिल्हाधिकारी कार्यालयात पाहिले तर 10-10, 15-15 हजार अर्ज पडून आहेत, अद्यापही त्यांना घरे मिळाली नाहीत. अशा प्रकारे गरिबांची किती फसवणूक करणार याचा खुलासा व्हावा. नगर जिल्हयात किती जमीन अशा घरकूल योजनेसाठी संपादित केली यासंबंधीची माहिती शासनाने द्यावी, नांदेड जिल्ह्यातील किती घरकुल योजनांसाठी जमिनीचे संपादन झालेले आहे याचीही माहिती मिळावी अशी मी अपेक्षा करतो. खरे तर घरकूल योजनेसंबंधी शासनाचे कोणत्याही प्रकारचे नियोजन नाही. दुसरीकडे मात्र जनता आम्हाला विचारते की, आपण आमदार आहात, आपण आम्हाला मदत करावी. आम्ही गेल्या 16 महिन्यांपासून अर्ज केलेला आहे त्या माध्यमातून आम्हाला घरकूल मिळणार की नाही, त्यावेळेस आम्हाला उत्तर देताना पंचाईत होते. एका बाजूला

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे .....

खूप सारे दाखववायाचे, शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेऊन राज्य करावयाचे आणि प्रत्यक्षात मात्र वेगळीच कृती करावयाची ही माझी खंत आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून बरेच विकासाचे मुद्दे आलेले आहेत पण दलित आणि मागासवर्गीयांवर जे अत्याचार होत आहेत त्यांचे निवारण करण्यासाठी एकही मुद्दा शासनाकडून आलेला नाही, याचे दु:ख होत आहे......अडथळा.... बीड जिल्हा देखील अन्यायग्रस्तच आहे. मराठवाडयाचे नेते आमचे मित्र माननीय श्री. दिवाकर रावते तसेच माननीय श्री. विक्रम काळे सुध्दा आहेत...

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे .....

सभापती महोदय, बीड जिल्हयामध्ये दलितांची फार बिकट अवस्था आहे. बीड जिल्हयामध्ये तर दलितांना खेचून, बदडून काढले जाते. दलितांच्या मुली शाळेत चालल्या असतील तर त्यांचा विनयभंग केला जातो. त्यामुळे राज्यामध्ये काय चालले आहे ते काही समजत नाही. आज दलितांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण मिळत नाही. औरंगाबाद मधील पालगावामध्ये एका दलित मुलाचे प्रेम एका सुवर्ण मुलीशी झाले तेव्हा दलिताच्या मुलाला वेशीत ठेचून मारले गेले. कोल्हापूर मध्ये दलिताची मुलगी सीईटीच्या परीक्षेला जात असतांना तिला शेतात ओढून तिच्यावर बलात्कार केला गेला. या मुलीला अधिका-यांनी दवाखान्यात नेण्याऐवजी घरी सोडले आणि घरुन दवाखान्या नेत असतांना या मुलीचा वाटेतच मृत्यू झाला. त्यामुळे हे शासन दलितांना न्याय देणार आहे की नाही ? दलितांची रक्षा केली जाणार आहे की, नाही ? माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणास समर्थन देत असतांना, पाठिंबा देत असतांना अपेक्षा करतो की, या शासनाचा एक डोळा तरी दलितांच्या वस्तीकडे जाईल की, नाही ? भंडारा येथे एक दलित महिलेला, तिच्या मुलाला आणि मुलीला मारुन त्यांना पाण्यामध्ये फेकून देण्यात आले होते. त्यामुळे शासनाने दलितांकडे लक्ष द्यावे, नजर टाकावी अशी विनंती आहे. आमच्या मुली-बाळी आता ब-या दिसायला लागल्या आहेत. शासन दलितांची शाळेची फी भरते परंतु एक वेळेस शासनाने दलितांच्या शाळेची फी भरली नाही तरी चालेल परंतु आमच्या दलित गरिबांच्या अब्रूचे आपण संरक्षण करावे एवढेच या निमित्ताने दु:खीत अंतकरणाने सांगतो आणि माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचे समर्थन करतो, पाठिंबा देतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

-----

यानंतर श्रीमती मधू जैन यांचे हिंदी भाषण श्री. देवदत्त यांच्याकडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन (महाराष्ट्र विधान सभा सदस्यों द्वारा निर्वाचित ) : माननीय सभापति महोदय, माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण के अभिनन्दन प्रस्ताव का समर्थन करने के लिए मैं यहां पर खड़ी हुई हूं. हमने माननीय सदस्यों की बहुत सारी बातों को सुना है. कुछ माननीय सदस्यों ने कहा कि इसके अंदर सब कुछ गलत है या कुछ है ही नहीं, या इस में कुछ दम नहीं है. उनका यह कहना स्वाभाविक ही है. क्योंकि जब हम इसको पढ़ते हैं तो एक बात हमारे ध्यान में आती है कि यह अभिभाषण साधारण आदमी के लिए है या आम आदमी के लिए है. और यहां पर बैठे हुए जो विरोधी पक्ष के नेतागण हैं वे आम आदमी नहीं हैं वे सब तो श्रीमंत लोग हैं. इसीलिए शायद उनको उनके मतलब की कोई चीज इस अभिभाषण में नहीं दिखायी दी होगी. इसीलिए यूपीए सरकार की जो योजनाएं हैं, उनका विरोध करने का काम उन्होंने यहां पर किया है. वैसे भी उनका काम भी तो विरोध करना ही है.

माननीय सभापति जी, मैं यहां पर कुछ मुद्दों को संक्षेप में उठाना चाहती हूं. माननीय विरोधी पक्ष के सदस्यों ने यहां पर सुरक्षा का मुद्दा उठाया. लेकिन मैं कहना चाहूंगी कि इस अभिभाषण में पुलिस फोर्स के आधुनिकीकरण और उनके वाहनों के आधुनिकीकरण पर भी बहुत जोर दिया गया है. पुलिस फोर्स में 55 हजार नये पदो का निर्माण किया गया है ताकि इस बात का पता लगाया जा सके कि क्रिमिनल्स की कहां पर कौन सी गतिविधियां चल रही हैं. गडचिरोली और नक्सलग्रस्त इलाके में सुरक्षा के बारे में विशेष ध्यान दिया गया है

कृषि के क्षेत्र में देखें तो वहां पर भी बहुत सारी बातें की गयी हैं. सबसे बड़ी बात तो यही की गयी कि पीक कर्ज की वसूली रोकी गयी. जहां तक शेततळी का संबंध है मैं बताना चाहूंगी कि 37500 शेततळी का विकास कार्य पूरा हो चुका है. और अभी 27 हजार शेततळी बनाने का काम चालू है. इसके अलावा ग्रामीण रोजगार हमी योजना के अंतर्गत हर तालुका में दो सौ शेततळी बनाने का काम अगले कुछ वर्षों में पूरा कर दिया जाएगा. सिंचन के क्षेत्र में देखें तो 129 मेगा वाटरशेड प्रोजेक्टस को विकसित करने का निर्णय लिया गया है. यह काम अगले कुछ वर्षों में कर दिया जाएगा. जिसके द्वारा 24.86 लाख हेक्टेयर जमीन को सिंचन की सुंविधा उपलब्ध होगी. महाराष्ट्र की रोजगार हमी योजना के अंतर्गत काम करने वाले मजदूर को ..

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ DD/ 15:40

श्रीमती मधु जैन का भाषण जारी...

पहले 66 रुपए मजदूरी मिलती थी उसको 50 प्रतिशत से भी ज्यादा बढ़ाकर 100 रुपए कर दिया गया है. अल्प भू धारकों के लिए इन्टीग्रेटेड फार्मिंग को प्रमोट करने की योजना भी सरकार की है. किसानों को अपनी फसल का उचित दाम दिलाने के लिए सरकार ने कांट्रेक्ट फार्मिग सिस्टम भी शुरु किया है. खास तौर से विदर्भ के कुछ माननीय सदस्य बोल रहे थे कि उनकी तरफ ध्यान नहीं दिया गया है. इसलिए मैं बताना चाहूंगी कि विदर्भ के आपदग्रस्त 6 जिलों में 593 करोड़ रुपए की एक योजना बनायी है जिससे 12 सौ गांवों में करीब 20 लाख लोगों को इस योजना का फायदा होगा. इसी प्रकार से जो अनाज पैदा होगा उसको रखने के लिए गोदामों का नवीनीकरण किया जा रहा है. उस उत्पादन से किसानों को कर्ज भी मिल सकेगा. उसी तरह से दूध उत्पादन बढ़ाने के लिए और सिंचन क्षमता बढ़ाने के लिए योजनाए बनायी गयी हैं. इस तरह से देखा जा सकता है कि कृषि के क्षेत्र में काफी योजनाएं सरकार की ओर से बनायी जा रही हैं. यह अभिभाषण एक तरह से एकात्मिक और सर्वांगीण विकास का अहवाल है. इस अहवाल में सुरक्षा की योजनाए हैं, सिंचन की योजनाएं हैं और कृषि विकास की योजनाएं भी है.

सभापति महोदय, अब मैं औद्योगिक विकास के बारे बोलना चाहूंगी. मैं बताना चाहूंगी कि पिछले 5 सालों में 169 औद्योगिक मेगा प्रोजेक्ट सेंक्शन किए गए हैं. जिसमें से 51प्रोजेक्टस में उत्पादन शुरु हो चुका है तथा बाकी प्रोजेक्टस पूरे किए जाने का काम चालू है. मुझे सबसे ज्यादा गर्व इस बात का है कि यदि सबसे ज्यादा एफडीआय कहीं पर आया है तो वह महाराष्ट्र के अंदर आया है. और इस सब के बाद भी विरोधी पक्ष में बैठे भारतीय जनता पार्टी और शिवसेना के हमारे भाई यहां पर असुरक्षा महसूस करते हैं. जबकि विदेशी कंपनियां यहां पर निवेश करते समय अपने आप को असुरक्षित महसूस नहीं करती हैं.वे कंपनियां यहां पर आराम से निवेश कर देती हैं. यह बात ठीक है कि कुछ हादसे होते हैं और कुछ हादसे हुए हैं लेकिन ये हादसे तो अमेरिका जैसे देश में भी हुए हैं.इस तरह की बातें तो हर जगह पर होती हैं और उन पर काबू भी किया जाता है, नियंत्रण भी किया जाता है.इसलिए हमारे भाई जब असुरक्षा की बात

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन का भाषण जारी..

करते हैं तो मुझे लगता है कि उनको असुरक्षा इस चीज से नहीं है कि आतंकवादी लोग हमला करेंगे बल्कि इनको असुरक्षा तो इस बात से है कि हमारी यूपीए की सरकार इतना अच्छा काम कर रही है कि अगले 25 सालों तक भी हमारे वे भाई सत्ता में नहीं आ पायेंगे. इस तरह की असुरक्षा उनके मन में घर कर गयी है, इसी लिए हमारे कुछ माननीय सदस्य इस अभिभाषण का विरोध कर रहे हैं.

अब मैं इलेक्ट्रीफिकेशन के बारे में बात करना चाहूंगी. मैं बताना चाहूंगी कि इस बारे में हमारी सरकार ने 2012 तक न सिर्फ लोड शेडिंग खत्म करने का वादा किया है बल्कि हर गांव में सोलर लेंप्स दिये जाने का निश्चय भी सरकार ने किया है. इसीलिए मैंने कहा कि यह आम आदमी का बजट है और क्योंकि कुछ माननीय सदस्य यह बात सुनना भी पसंद नहीं करते इसलिए वे सभागृह से बाहर जा रहे हैं. क्योंकि वे तो आम आदमी में आते ही नहीं हैं. इसलिए उनको इस अभिभाषण में कुछ अच्छा दिख ही नहीं सकता.

मैं बताना चाहूंगी कि मुंबई को अन्तर्राष्ट्रीय दर्जे का शहर बनाने के लिए नये-नये सार्वजनिक परिवहन प्रकल्प लगाये जा रहे है. संसार में सबसे बड़ा पब्लिक प्राइवेट पार्टिसिपेशन का मेट्रो रेल प्रोजेक्ट भी यहां पर आ रहा है. यह हमारे लिए बहुत ही गर्व की बात है. मोनो रेल के बारे में भी यहां पर माननीय सदस्य बोल चुके हैं और सार्वजनिक परिवहन की जो योजना है उसकी वजह से यात्रियों को बहुत फायदा होगा. सन् 2003 में एक ट्रेन के अंदर 5500 लोग यात्रा करते थे लेकिन इस योजना की वजह से अब सन् 2013 में एक ट्रेन में यात्रियों की संख्या सिर्फ 2 हजार हो जाएगी. इस तरह से हमारे यहां पर ट्रेने बढ़ायी जा रही हैं और उससे संबंधित नियोजन किया जा रहा है.

यदि हम पर्यावरण की बात करें तो मौसम का जो बदलाव हो रहा है उस संबंध में भी टेरी संस्था के साथ मिलकर एक स्टडी की जा रही है. साथ ही हर जिले में दो फॉरेस्ट इको पार्क बनाए जाने की योजना सरकार की है. इसलिए पर्यावरण की ओर भी इस सरकार का ध्यान

...4

अशुद्धित प्रत/प्रकाशनार्थ नहीं

श्रीमती मधु जैन का भाषण जारी..

है. जहां तक हाउसिंग का प्रश्न है महाराष्ट्र राज्य निर्माण के स्वर्ण जयंती वर्ष में सरकार ने सन् 2009 से 2012 तक 7 लाख 35 हजार घरों का निर्माण करने का निर्णय किया है. यह कहना बहुत आसान है कि अभी तक कुछ नहीं हुआ है. मैं कहूंगी कि यह बात सच नहीं है कि अभी तक कुछ नहीं हुआ है. इस बारे में पुरावे दिए जा सकते हैं कि कितना काम कहां पर हुआ है. यह काम एक दिन में नहीं हो सकता है और न ही यहां पर यह कहा गया है कि ये सब योजनाएं एक साल के अंदर बन जायेंगी या 6 महीने के अंदर बन जायेंगी.यह कार्यक्रम तो तीन साल का है.

( इसके बाद श्री शर्मा के पास भाषण जारी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. .श्रीमती मधु जैन का भाषण जारी (पूर्वी देवदत्त)

सब से बड़ी चीज यह है कि सरकार आधुनिकीकरण के लिए ई-गवर्नेंस के ऊपर जोर दे रही है. एक माननीय सदस्य ने यह कहा था कि भ्रष्टाचार बहुत बढ़ गया है. भ्रष्टाचार एक अन्तर्राष्ट्रीय सामाजिक समस्या है, इसके बावजूद भी इसको कम करने का तरीका यह है कि लोगों को ज्यादा से ज्यादा माहिती मिले. केन्द्रीय सरकार के "राइट टू इन्फोर्मेशन एक्ट" के द्वारा हमें माहिती प्राप्त करने का अधिकार दिया गया है. इसको आगे बढ़ाते हुए महाराष्ट्र राज्य ने ई-गवर्नेंस के द्वारा सभी माहिती जल्दी से जल्दी लोगों तक पहुंच सके, इसके लिए महाराष्ट्र के 35 जिलों के मुख्यालयों में और 316 तालुकों के मुख्यालयों में सेतु केंद्र बनाए गए हैं. इसके अतिरिक्त गांव स्तर पर 3615 सेतु केंद्र बनाए गए हैं. इससे निश्चित रुप से पारदर्शकता आएगी और भ्रष्टाचार कम होगा.

सभापति महोदय, सड़क मार्ग के चौपदरीकरण के बारे में 246 किलोमीटर का कार्य पूरा हो चुका है और 2315 किलोमीटर सड़क मार्ग के चौपदरीकरण का कार्य सरकार के द्वारा किया जा रहा है.

सभापति महोदय, एक माननीय सदस्य ने कहा था कि प्रसाधनगृह नहीं बांधे गए हैं. अगर हम आंकड़ों के आधार पर देखें तो हमें मालूम होता है कि 56 लाख 13 हजार वैयक्तिक प्रसाधनगृह बांधे गए हैं. केवल इतना ही नहीं, आंगनवाड़ी योजना के द्वारा कुपोषित बालकों के ऊपर भी ध्यान दिया गया है. हम यह बात महसूस करते हैं कि ई-गवर्नेंस की स्कीम के तहत सेन्ट्रल कम्प्यूटर सिस्टम से हमें डेटा बँक जल्दी से जल्दी मिले. सरकार द्वारा कहां पर कितना खर्च हो रहा है, यह जानकारी अच्छी तरह से देखकर हम उसके ऊपर कंट्रोल रख सकेंगे.

सभापति महोदय, मैं एक सुझाव देना चाहती हूँ कि महिलाओं के लिए विशेष रुप से ध्यान दिया जाए सरकार के द्वारा "जेंडर सेंसिटिव बजट" बनाया जाए. सरकार के द्वारा एस.सी., एस.टी., ओ.बी.सी. और अल्पसंख्यकों की तरफ विशेष ध्यान दिया जाता है. इसलिए मेरी मांग है कि महिलाओं का विचार करते हुए "जेंडर सेंसिटिव बजट" होना चाहिए. इस बात का उल्लेख माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में नहीं है.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . 3R 2

. .श्रीमती मधु जैन जारी

सभापति महोदय, बहुत सी योजनाओं और सिंचन प्रकल्पों के लिए केन्द्र सरकार की तरफ से निधि प्राप्त होती है. केन्द्र सरकार की निधि का पूरा इस्तेमाल करते हुए राज्य के सिंचन प्रकल्पों को जल्दी से जल्दी पूरा किया जाना चाहिए.

सभापति महोदय, अन्त में मैं एक ही बात कहना चाहूँगी कि अपना अपना चश्मा है. इस हॉल के अन्दर 6 लाइट्स बंद हैं. कुछ लोगों को 6 बंद लाइट्स ही दिखती हैं, उन्हें जली हुई लाइट्स की रोशनी नहीं दिखती है. विरोधी पक्ष से मेरी गुजारिश है कि वे एक बेलेन्स व्यू लेकर सब चीजों को देखें. जय हिन्द, जय महाराष्ट्र.

. . . . . .

. . .भाषण पूर्ण. नंतर श्रीमती रणदिवे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.वंदना चव्हाण (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महामहीम राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी आणि याठिकाणी मांडण्यात आलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, वास्तविक मी या सभागृहामध्ये 26 तारखेनंतर आले असते तर कदाचित निवडणूक झाली असती. पण बिनविरोध निवड झाल्यानंतर, मी माझे हे भाग्य समजते आणि सुवर्ण अक्षरात लिहून ठेवावा असा तो दिवस आहे की, ज्यादिवशी महामहीम राज्यपाल यांनी या राज्याला एक रोड मॅप दिला, त्यादिवशी त्यांच्या अभिभाषणाच्या वेळी मी येथे उपस्थित राहू शकले. सर्वसामान्य नागरिकांमध्ये वावरताना एक गोष्ट दिसून येते. त्यांना असे वाटत असते की, शासन असेल किंवा महानगरपालिका असतील या फायर फायटींग करीत असतात. ज्यावेळेला एखादा दहशतवादी हल्ला होतो किंवा एखादी नैसर्गिक आपत्ती येते, तेव्हा शासन पुढे येऊन ठोस निर्णय घेऊन त्याची ठोस अंमलबजावणी करण्यास सुरुवात करते. मला अतिशय आनंद वाटतो की, आपण 21 व्या शतकात वावरत असताना 2020 साली भारत देश एक सुपर पॉवर होईल असे स्वप्न पहात आहोत. अशा वेळी महाराष्ट्र राज्य हे सर्व देशामध्ये एक अग्रेसर राज्य आहे असे दिसून येईल. यासाठी माननीय राज्यपाल यांनी रोड मॅप तयार करुन आपल्याला नेमक्या कोणत्या स्ट्रॅटेजी करावयाच्या आहेत, कोणत्या योजना राबवावयाच्या आहेत या पध्दतीचा विचार महामहीम राज्यपाल यांनी आपल्या भाषणात केलेला आहे. मला आनंद वाटतो की, यासाठी व्हिजन डॉक्युमेंट तयार केलेले आहे. 2015 साली आमचा महाराष्ट्र कुठे असेल आणि त्यादृष्टीने कोणते विविध विषय असावेत, मग त्यात शेतकरी, गरीब व्यक्ती, अपंग व्यक्ती, तसेच आरोग्य, शहरीकरण, न्यायव्यवस्था अशा विविध अंगी घटकांना संबोधण्याचा, स्पर्श करण्याचा या रोड मॅप मध्ये प्रयत्न केला असून, त्याबद्दल उल्लेख केलेला आहे. त्यामुळे आपल्यालाच नव्हे तर राज्यातील संपूर्ण नाररिकांना निश्चित एक दिलासा मिळेल असे मला वाटते. गेली दोन-अडीच वर्षे हवामानातील बदल, ग्लोबल वॉर्मिंग, जागतिक तापमानातील वाढ या विषयांवर मी काम करीत आहे. मला 2005 साली मॉन्ट्रीअल येथे जाण्याची संधी मिळाली, त्याठिकाणी जगभरातील सर्व महापौर आले होते. त्यावेळी प्रत्येक महापौर आपापल्या शहरांमध्ये, प्रत्येक मंत्री, आमदार आपापल्या राज्यामध्ये, प्रत्येक खासदार, केंद्रीय मंत्री इ.आपापल्या देशामध्ये आम्ही कार्बनचे उत्सर्जन कशा प्रकारे कमी करणार आहोत, ग्लोबल वॉर्मिंगचे संकट आहे त्याला कसे तोंड देणार आहोत याबाबत विचारविनिमय .....

. . . .3 एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वंदना चव्हाण . . . .

करीत होते. आतापर्यंत आपल्याला वाटत होते की, जागतिक तापमान हा विषय असा आहे की, उत्तर आणि दक्षिण ध्रुवावर काहीतरी होत आहे. तिथला ग्लॅशिअर्स वितळत आहे आणि त्यामुळे समुद्राची पातळी वाढत आहे. परंतु हे सर्व तेथे होत आहे, मग त्याचे आपल्याला काय ? असे वाटत होते. पण आता हा विषय आपल्या शहरातच नाही तर घरामध्ये येऊन ठेपलेला आहे. मी पुण्यासारख्या शहरातून येथे येते. त्याठिकाणी आतापर्यंत सर्वांना दोन वेळा मुबलक प्रमाणात व्यवस्थित पाणी मिळत होते. महाराष्ट्र राज्यात पाण्याच्या बाबतीत सर्वात जर कोणी सुखी असेल तर ते पुणेकर आहेत असे म्हटले जात होते. पण आज या पुणे शहरात सुध्दा पाऊस व्यवस्थित न पडल्यामुळे एक वेळ पाणी येते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, जर घरी कोणी पाहुणे येणार असतील तर संबंधितांना जेवणासाठी थांबवून घ्यावयाचे की नाही याचा दोन वेळा विचार करावा लागतो.कारण प्लेट धुण्यासाठी सुध्दा पाणी नसते अशी स्थिती आज पुण्यासारख्या शहरामध्ये निर्माण झालेली आहे. आता तर या विषयाचा फटका सर्वांनाच बसू लागला आहे आणि असे लक्षात येऊ लागले आहे की, आता आपल्याला दुष्काळ असेल, अतिवृष्टी असेल, वादळ असेल, विविध आजार असतील, या सर्व गोष्टींना सामोरे जावे लागत आहे. म्हणून आदरणीय पंतप्रधान साहेबांनी डॉ.मनमोहन सिंग साहेबांनी 2008 मध्ये नॅशनल ॲक्शन प्लॅन ऑन क्लायमेंट चेंज" बनवला आहे. त्या अनुषंगाने आज मिशन्स् तयार केल्या आहेत. ज्याच्यामध्ये आपल्या प्रत्येक राज्याचे, शहराचे कार्बन ईमिशन कसे कमी करावयाचे याकडे आपल्याला लक्ष द्यावे लागणार आहे व त्यासाठी आराखडा तयार केला आहे. मला अतिशय अभिमान वाटतो, आनंद वाटतो की, "टेरी" या संस्थेचे मुख्य डॉ.राजेंद्र पचौरी आहेत, ज्यांना इंटर गव्हर्मेंट पॅनेल ऑन क्लायमेट चेंज यासाठी "नोबल पुरस्कार" मिळालेला आहे.या संस्थेला बरोबर घेऊन याबाबत एक आराखडा तयार करण्यासाठी महाराष्ट्र राज्याने पुढाकार घेतलेला आहे.दुसऱ्या कोणत्याही राज्याने हे काम केलेले नाही.त्यादृष्टीने राज्याने आपल्या कामास सुरुवात केली आहे.एवढेच नव्हेतर शहरातील हवेची गुणवत्ता व त्याचा आरोग्याशी असलेला संबंध काय आहे इ. गोष्टी सुध्दा प्रकर्षाने पुढे आणण्यासाठी एक स्टडी तयार केलेला आहे.आपण प्रदूषणाबाबत नेहमी बोलतो.मी महापालिकेमध्ये 15 वर्षे काम केले आहे.ज्यावेळी मी प्रदूषणाच्या विषयावर बोलावयाचे,त्यावेळी कधी कधी टीका होत असे की,हा हाय-फाय विषय आहे, हा फॅशनेबल विषय आहे,आम्हाला याचे काय? गरीबांना ..

. . . .3 एस-3

श्रीमती वंदना चव्हाण . . . .

याचे काय ? पण आज आपल्या लक्षात येते की, प्रत्येक नागरिकाचे आरोग्य व्यवस्थित रहाणे आवश्यक आहे. परंतु याचा सर्वात जास्त फटका जो सगळयात जास्त व्हल्नरेबल असेल, जो गरीब घटक असेल, त्यांना बसणार आहे. त्याचवेळी ही गोष्ट देखील निदर्शनास आली की, हा मुख्य विषय सर्व लोकांशी निगडित आहे आणि त्याकडे आपल्याला लक्ष द्यावेच लागणार आहे. याठिकाणी हे बोलत असताना मला आवर्जून सांगितले पाहिजे की, काल येथे काही प्रश्न उपस्थित आले. तसेच प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये सुध्दा जवळजवळ 30 ते 35 प्रश्न असे होते की, जे क्लायमेट चेंज आणि जागतिक तापमानतील वाढ याच्याशी निगडित होते. मग ते फयानचे वादळ असेल, खार पाण्याचा प्रश्न असेल, वृक्षतोडी संबंधातील प्रश्न असेल. या पध्दतीचे विषय यामध्ये घेण्यात आले होते. तसेच असे म्हटले गेले आहे की, जर आपल्याला या विषयाला हात घालावयाचा असेल तर दोन गोष्टी प्रकर्षाने कराव्या लागतील असे मला वाटते. क म्हणजे मिटीगेशन आणि दुसरे अडॉपशन.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. वंदना चव्हाण ....

मिटीगेशन म्हणजे ज्या ज्या गोष्टींमुळे कार्बन उत्सर्जित होत आहे, कार्बन वाढत आहे ते कमी करावयाचे हे राज्य शासनाचे काम एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला ॲडॅप्टेशन म्हणजे ज्या काही गोष्टी होणार आहेत त्याला व्यवस्थित सामोरे जाण्यासाठी शास्त्रीय पध्दतीने त्याचे व्यवस्थित नियोजन करणे हे त्यामध्ये लिहिले गेले आहे. त्यामध्ये अनेक गोष्टी मांडत असताना सार्वजनिक वाहतुकीचा विषय आहे. ज्या गाड्यांमुळे अत्यंत मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते त्या खाजगी गाड्या कशा कमी वापरता येतील आणि सार्वजनिक वाहतुकीचा कसा जास्त प्रसार होईल हे मुख्यत्वे त्यामध्ये येते. मी याचा विस्ताराने उल्लेख करत नाही कारण माननीय राज्यपालांचे अभिभाषण आपल्याकडे आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 21, 22 आणि 23 मध्ये मुंबईमध्ये सार्वजनिक वाहतुकीवर कसा भर दिलेला आहे, त्याला कसे महत्व दिलेले आहे याबाबत लिहिले आहे. मला या ठिकाणी फक्त एकच गोष्ट नमूद करावयाची आहे की, मुंबईत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारत असताना इतर शहरांमध्ये सुध्दा सार्वजनिक वाहतूक कशी सुधारता येईल याकडे सुध्दा लक्ष देण्याची गरज आहे. ही बाब यामध्ये थोडीफार मिसिंग आहे. त्याची अंमलबजावणी कशी करता येईल याकडे आपल्याला लक्ष द्यावे लागणार आहे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा विषय विजेचा आहे. भारतातील 77 टक्के वीज औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पातून येते आणि औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पामध्ये कोळसा जाळला जातो. ज्या ठिकाणी कोळसा जाळला जातो त्या ठिकाणी कार्बन डायॉक्साईड हवेत जाते आणि ते पुन्हा क्लायमेट चेंजला कॉन्ट्रिब्यूट होते. हे करीत असताना आपल्याला एका बाजूला 2012 साली लोड शेडिंगमुक्त राज्य पाहिजे आहे कारण त्यामुळेच आपली प्रगती होते आणि आपल्याला ते गरजेचे आहे पण त्यांच्या बरोबरीने जलविद्युत आणि सौरऊर्जा यावर सुध्दा आपल्या शासनाने भर दिलेला आहे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. जलविद्युत प्रकल्पाच्या माध्यमातून आधीच निरा देवधरला एक प्रकल्प पूर्ण झाला आहे आणि त्या माध्यमातून 6 मेगावॅट वीज निर्मिती व्हावयास लागली आहे. इतर जे दोन प्रकल्पाच्या ठिकाणी 11.5 मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. हे प्रकल्प सुध्दा पूर्णत्वाच्या जवळपास आलेले आहेत. सौरऊर्जेच्या बाबतीत सुध्दा या अभिभाषणामध्ये असे लिहिले आहे की,

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. वंदना चव्हाण ......

कम्युनिटी स्टडी युनिट हे प्रत्येक खेड्यामध्ये झाले पाहिजे ज्यामध्ये 90 टक्के खर्च शासन देईल आणि 10 टक्के खर्च जिल्हा परिषद देईल. मला या ठिकाणी आवर्जून सांगावयाचे आहे की, सौर ऊजा असेल ती खेड्यांमध्ये तर पाहिजेच आहे पण इतर शहरांमध्ये सुध्दा ते होण्याच्या दृष्टीने इको हाऊसिंगचा अंतर्भाव या अभिभाषणामध्ये केला आहे हे आपल्याला दिसून येते. रिन्यूएबल सोर्सेसला सुध्दा कसे महत्व देता येईल यावर सुध्दा भर दिलेला आहे. एकच छोटे उदाहरण देऊ इच्छिते. मला जर्मनीला जाण्याची एक संधी मिळाली होती. त्या ठिकाणी सूर्य फारसा बाहेर येत नाही तसेच फारसे ऊन पडत नाही. त्या ठिकाणी ढगाळ हवामान असते. त्या ठिकाणी एखाद्या दिवशी सूर्य बाहेर आला तर त्यांना जणू काही तो सुट्टीचा दिवस वाटत असतो. पण अशा परिस्थितीत सुध्दा त्या ठिकाणी प्रत्येक घरावर सोलर पॅनल लावून वीज निर्मिती होते. जर अशा देशात ते होत असेल तर आपल्याकडे मुबलक सौर ऊर्जा निर्माण करणे शक्य असून अत्यंत मोठा वाव आपल्याकडे आहे असे मला आवर्जून सांगावयाचे आहे. म्हणून रिन्यूएबल सोर्सेसकडे सुध्दा आपल्याला यापुढच्या काळामध्ये लक्ष द्यावे लागणार आहे.

सभापती महोदय, यामध्ये शहरीकरणाचा विषय आहे. आज जगामध्ये 50 टक्के लोकसंख्या शहरात राहते. मला अजूनही आठवते की शाळेमध्ये असताना आमचे शिक्षक सांगावयाचे की, 80 टक्के भारत हा खेड्यांमध्ये राहतो, ग्रामीण भागात राहतो. दहावीला येईपर्यंत 75 टक्के भारत ग्रामीण भागात राहतो असे म्हटले जावयाचे. कॉलेजमध्ये आल्यानंतर 60 टक्के भारत ग्रामीण भागात राहतो असे म्हटले जावयाचे आणि आता जगभर 50 टक्के लोक शहरात राहतात. त्यामुळे अनेक आव्हानात्मक समस्या आपल्यासमोर आलेल्या आहेत. त्यामध्ये जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये आपल्याला वेगवेगळ्या प्लांटसाठी मिळत आहेत. महास्वर्णजयंती नगरोत्थान महाअभियान नव्याने आपल्या राज्यामध्ये आपण सुरु करीत आहोत. इको फ्रेंडली हाऊसिंग सुरु करीत आहोत. इको व्हिलेजेसच्या बाबतीत आदरणीय मंत्रिमहोदय श्री. जयंत पाटील यांच्या एक दोन ठिकाणच्या भाषणात ऐकले. माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी असे प्रकल्प केलेले आहेत की, ज्या ठिकाणी ग्रामीण भाग आहे त्या ठिकाणी झाडे लावण्याचे काम मोठ्या प्रमाणावर

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. वंदना चव्हाण .....

होणार आहे. या पध्दतीचे काम सुध्दा करण्याची गरज आहे आणि त्याचा सुध्दा उल्लेख या अभिभाषणामध्ये केलेला आहे.

सभापती महोदय, कृषीच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे पाणी मिळत नाही, पाऊस पडत नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करतात. अशा वेळी त्यांना मुबलक पाणी मिळेल, आपल्याला अन्नटंचाईचे संकट भासणार नाही, किमती वाढून गगनाला भिडू लागल्या आहेत, ते होणार नाही यादृष्टीने काही ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे )**

यानंतर श्री.खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/ KGS/ KTG/ यापूर्वी श्री.बरवड 16:00

ॲड.वंदना चव्हाण....

यादृष्टीने काही खास पावले उचलण्याची गरज आहे. मला अतिशय आनंद होत आहे की, सर्वंकष अभ्यास करुन या डॉक्यूमेंटमध्ये 129 वॉटर शेडस्चे प्रकल्प, स्मॉल फार्मिंग जेथे आयटी टेक्नोलॉजी सुध्दा पोहोचेल. 20 लाख लोकांपर्यंत प्रकल्प पोहोचतील. 1200 गावांमध्ये हे प्रकल्प पोहोचतील असे कार्यक्रम केलेले आहेत. 25 हजार रुपयांपर्यंत बिनव्याजी क्रॉप लोन दिले जाणार आहे. अतिरिक्त सिंचन क्षमता 1.75 लाख हेक्टरपर्यंत पोहोचणार आहे. अन्नधान्याची टंचाई उद्‌भवू शकते याचा विचार करुन वेअर हाऊस निर्माण होणार आहेत. त्यादृष्टीने 5 हजार गोडाऊन्स तयार करावयाचे आहेत. या पध्दतीच्या काही ठोस योजना या अभिभाषणात आहेत आणि त्या कौतुकास्पद आहेत. मघाशी म्हटल्याप्रमाणे सगळयात फटका गरीबांना बसणार आहे. गरीबांना चांगली घरे नसतील तर त्यांच्या घराच्या बाजूला जी घाण असते, त्यातून जी रोगराई पसरते, परंतु शासन गरीबांसाठी वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून 12 लाख घरे बांधून देणार असल्यामुळे रोगराईला आळा बसण्यास मदत होणार आहे. हे सुध्दा अत्यंत महत्वाचे आहे. गरीबांना काम मिळण्यासाठी 169 नवीन प्रकल्प मागास भागात सुरु होणार आहेत. ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, क्लायमेंट चेंजच्या बाबत बोलत असताना लोकांमध्ये जनजागृती निर्माणा व्हावी. ही जनजागृती कॉलेजच्या मुलांमधून, शाळांच्या माध्यमातून पोहोचावी यासंबंधीचा उल्लेखही या अभिभाषणात केलेला आहे. एनएसएसचे स्डुडंटस् असतील, बॉईज स्काऊटस् असतील, गर्ल्स गाईडस् असतील यांच्या माध्यमातून सुध्दा हे काम करता येईल असे मला वाटते.

सभापती महोदय, या अभिभाषणात तीनच गोष्टींचा अंतर्भाव व्हावा असे मला वाटते. तेवढे सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. एक म्हणजे सेफ्टी, सिक्युरिटीसाठी या डॉक्यूमेंटमध्ये अनेक गोष्टी नमूद केलेल्या आहेत. पण मला आवर्जून सांगावयाचे आहे की, पोलीस ऑफिसर्सची किंवा शासकीय यंत्रणेची अकाऊंटिबिलिटी नसेल तर कितीही पैसे दिले तर कोणतीही योजना वा उद्दिष्टय साध्य होणार नाही. म्हणून गुड गव्हर्नन्सचे जे 7 परामर्श आहेत त्यात अकाऊंटिबिलिटी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



NTK/ MMP/ D/ KGS/ KTG/

ॲड.वंदना चव्हाण....

व ट्रान्सपरन्सी हे सगळयात महत्वाचे आहेत. म्हणून पोलीस विभागामध्ये ही अकाऊंटिबिलिटी यावी असे माझे मत आहे. विशेषत: 26 नोव्हेंबर नंतर आपल्याला जे काही बघावयास मिळाले आहे ते पाहता ही अकाऊंटिबिलिटी असलीच पाहिजे. त्या पध्दतीचे निकष गुड गव्हर्नन्समध्ये आले पाहिजेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई यांनी जेंडर बजेटमध्ये काही लिहिले गेले नाही असे म्हटले होते, ते खरे आहे. ज्यावेळी आम्ही महानगरपालिका वा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून सांगत असतो की, संसदेमध्ये किंवा विधिमंडळामध्ये महिलांसाठी 33 टक्के किंवा 50 टक्के आरक्षण ठेवून चालणार नाही. विकासाचा सगळा फायदा महिलांपर्यंत पोहोचला पाहिजे. म्हणून ते करावयाचे असेल तर जेंडर बजेट केले पाहिजे.

सभापती महोदय, भ्रष्टाचारासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपले मत मांडताना हतबलतेचे दर्शन घडविले. मला वाटते की, एखाद्या एमएलसीने इतके हतबल होऊन सांगावे की, आमच्यासमोर भ्रष्टाचार चालतो आणि आम्हाला सुध्दा दोन लाख रुपये द्यावे लागतात. सन्माननीय सदस्य हतबल होणार असतील तर राज्यातील जनता हतबल होतील. राज्यात कायदा आहे, सुव्यवस्था आहे, अशा भ्रष्टाचारासंबंधी लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे तक्रार करु शकतो. यासंबंधीच्या कायद्याचा आपण पुरेपुर उपयोग करुन घेतला पाहिजे.

सभापती महोदय, क्लायमेंट चेंज इश्यू असा आहे की, कोणतीही प्रगती होत असताना तो चष्मा घालूनच आपल्याला प्रगती करावी लागेल आणि ज्यावेळी आपण हा चष्मा घालू त्यावेळी धर्म, जात, भाषा या सगळया गोष्टी नगण्य होतील. कारण मानवतेच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झ ालेला आहे. ख-या अर्थाने भावी पिढीला चांगले भविष्य द्यावे लागेल आणि ते या अभिभाषणातून लिहिले आहे त्याचा मला अत्यंत आनंद होत आहे, त्यामुळे मी पुन्हा राज्यपालांचे मनापासून आभार मानते, अभिनंदन करते. त्यांनी एक चांगला रोड मॅप आमच्यासमोर ठेवून आम्हाला एक चांगले दर्शन घडविलेले आहे. एवढे बोलून मी येथेच थांबते. धन्यवाद.

-------

यानंतर श्री.ओटवणेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. ओटवणेकर 16:10

(श्री. भगवानराव साळुंके...

मग आईला "मम्मी", वडिलांना "डॅडी" असे म्हणत, गळयात नेकटाय, पायात बूट, स्कूलबस मधून मुलाची वरात, आणि अनुदानित शाळेतील आमचे मास्तर घरात, अशी शिक्षणाच्या क्षेत्राची अवस्था झालेली आहे. सरल्पस शिक्षक निर्माण होत आहेत. करा फी गोळा हे या शासनाचे धोरणच आहे. आमचे राज्यकर्ते दररोज छत्रपती शाहू महाराज, म.जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा जयघोष करतात आणि संदेश मात्र चुकीचा देतात. पहिला संदेश त्यांनी असा दिलेला आहे की, Total and gradual withdrawal of financial participation and not to invest single paisa on education. शिक्षणावर पैसा खर्च न करता हळूहळू शिकणातील आर्थिक सहभाग काढून घेतला जात आहे. म्हणजे वेतनेतर अनुदान नाही, इमारत भाडे नाही, शिक्षकांवर खर्च करायचा नाही. नवीन तुकडी द्यायची झाली तर ती कायम विनाअनुदान तत्वावर द्यायची, असे नाना प्रकार आता सुरु झालेले आहेत. एका बाजूला मराठी माध्यमाच्या शाळा, बहुजन समाजाच्या शाळा, हरिजन समाजाच्या शाळा, मध्यमवर्गीयांच्या शाळा, मोफत शिक्षणाच्या या शाळा बंद पाडल्या जात आहेत आणि दुस-या बाजूला "करा फी गोळा आणि चालवा तुमच्या शाळा" असा संदेश दिला जात आहे. यातून भयानक घटना या महाराष्ट्राच्या मातीत घडत आहेत. राज्यकर्त्यांनो कृपाकरुन या प्रश्नाकडे पक्षीय दृष्टीकोनातून बघण्याचे पाप आपल्या हातून घडत आहे. मित्रानो, आज तुम्ही खेड्यापाडयामध्ये जाऊन पाहिले तर मध्यमवर्गीयांच्या शाळा बंद पडून अर्थपायाधिष्ठित शिक्षण व्यवस्था निर्माण केली जात आहे.या अर्थपायाधिष्ठित शिक्षण व्यवस्थेमुळे एक प्रचंड चातुर्वर्ण्य तयार झाला आहे. हा चातुर्वर्ण्य मी सभागृहामध्ये दुस-यांदा मांडून सर्वांचे लक्ष वेधित आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे. आंतरराष्ट्रीय शाळा महाराष्ट्रामध्ये निघत आहेत. इण्टरनॅशनल स्कूलचे कोणी कितीही समर्थन केले तरी मित्रानो ते तुमच्या आणि माझ्या बौध्दिक दिवाळखोरीचे लक्षण आहे असे मी नम्रपणे सभागृहामध्ये सांगत आहे. या निघणा-या आंतरराष्ट्रीय शाळांची महिन्याची फी एक लाख रुपयाच्या घरात आहे. मुलाच्या शिक्षणावर वर्षाला 10 लाख रुपये खर्च करणारा पालक वर्ग फार थोडा आहे. तो पालकवर्ग कशा पध्दतीने पैसा कमावतोय आणि मुलाच्या शिक्षणावर खर्च करतोय हे बघणे हा देखील मोठा गंभीर विषय तुमच्या आमच्या समोर आलेला आहे. या मुंबईमध्ये 22, पुण्यात 18 आणि कोल्हापूरात 3 इंग्लीश मिडियम स्कूल्स, आंतरराष्ट्रीय

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे...

शाळा आहेत. या आंतरराष्ट्रीय शाळांना अब्जाधीशांच्या शाळा असे म्हटले जाते. मुलाच्या शिक्षणावर वर्षाला 10 लाख रुपये खर्च करणारा पालक हा अब्जाधीशच असू शकतो. जेथे माझा सहवास जास्त आहे त्या सातारा जिल्ह्यातील पाचगणी तालुक्यामध्ये अशा प्रकारच्या 40 आंतरराष्ट्रीय शाळा आहेत. कॉन्व्हेण्ट स्कूल, इंग्लिश मेडियम स्कूल, सी.बी.एस.ई. पॅटर्न स्कूल अशी शाळांची गोंडस नावे आहेत. वर्षाला दीड लाख रुपये फी घेणा-या या शाळा आहेत. कोटयधीश असणारा पालकवर्गच मुलाच्या शिक्षणावर दीड लाख रुपये खर्च करु शकतो. मध्यमवर्गीय आणि लक्षाधीशांच्या शाळा आता निरनिराळया समाजसेवी संस्थाचे कार्यकर्ते काढत आहेत. या शाळांना चाणक्य ॲकॅडमी, एकलव्य ॲकॅडमी, ज्ञानेश्वर ॲकॅडमी अशी गोंडस नावे दिली जात आहेत आणि शाळेची फी मात्र 50 हजार रु. घेतली जात आहेत. सेमी इंग्लिश मेडियम, इंग्लिश मेडियम, रेसिडेन्शियल स्कूल, सैनिक पॅटर्न अशी या शाळांची नावे आहेत. खरे तर या शाळांची नोंदणी सरकार दरबारी प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळा अशीच आहे. पण बाहेर वेगवेगळया नावाने मार्केटिंग करुन ही मंडळी प्रचंड पैसा कमवित आहेत. मित्रानो, जी मंडळी साखर कारखाने काढण्याकरिता सरकारकडे धावत येत होती, सूत गिरण्या काढण्याकरिता सरकारकडे धावत येत होती, पतसंस्था, सहकारी बँका काढण्यासाठी सरकारकडे धावत येत होती त्या मंडळींनी साखर कारखान्यांची, सूत गिरण्यांची, पतसंस्थांची आणि सहकारी बँकांची काय वाट लावलेली आहे हे तुम्हा आम्हाला माहीत आहे. आता हीच मंडळी शाळा काढत सुटली आहेत. महाराष्ट्रामध्ये गोंडस नावाने या नवीन शाळा काढलेल्या आहेत. या शाळा वर्षाला प्रत्येक विद्यार्थ्यामागे कमीत कमी 50 हजार रु. घेत आहेत. आता जमाना वेगळा आलेला आहे. पूर्वी घरामध्ये चार-पाच मुले असायची, एखाद दुसरा मुलगा शिकत होता आणि बाकीची शेती करीत होते. आज "हम दो आणि हमारे दो" चा जमाना आला. माझ्या मुलाला आणि मुलीला चांगले शिक्षण दिले पाहिजे अशा प्रकारची भावना अगदी मोलकरणीपासून सर्व आईवडिलांच्या मनात असते. कर्जबाजारीपणा करुन पालक आपल्या मुलांना अशा शाळेत घालत आहे आणि मार्केटिंग टॅक्टीक्समुळे, इंग्लिश मेडियमचे जे नवीन फॅड आलेले आहे त्यामुळे हा पालक पूर्णपणे लुबाडला जात आहे, पालकाचे आर्थिक शोषण केले जात आहे. आता लक्षाधीशांच्या शाळा निघून जनसामान्यांच्या, गरिबांच्या शाळा दिवसेंदिवस बंद पाडल्या जात आहेत. शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव घेऊन गरिबांच्या, बहुजनांच्या, हरिजनांच्या, मध्यमवर्गीयांच्या

..3..



MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. ओटवणेकर 16:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे

शाळा बंद पाडल्या जात आहेत. मला असे वाटते की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये या बाबत लक्ष वेधले गेले असते तर अधिक बरे झाले असतं आणि हे सरकार ख-या अर्थाने पुरोगामी विचाराचे सरकार आहे असे म्हणायला वाव राहिला असता. परंतु दुर्दैवाने हे पाप मात्र तुमच्या-आमच्या हातून घडत आहे. हे पाप होऊ नये म्हणून तुम्हा-आम्हाला युध्दपातळीवर एकत्र येण्याची आवश्यकता असून त्याकडे मी आपले लक्ष वेधून मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. जय हिंद !

---

...नंतर श्री. भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, फयान चक्री वादळामुळे आणि अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेले कोकणातील जे मच्छिमार बांधव आहेत त्यांना शासनाने अतिशय चांगला दिलासा दिला त्याबद्दल मी शासनाला मनापासून धन्यवाद देतो. परंतु कोकणातील चारही जिल्हयांमध्ये मच्छिमारांना जरी शासनाने दिलासा दिलेला असला तरी पहिल्यांदा जे मच्छिमार समुद्रात बेपत्ता होते, दोन महिन्याच्या काळात जे मच्छिमार घरी परतले नाहीत त्यांच्या कुटुंबांना एक-एक लाख रुपये मदत दिली याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. बऱ्याच मच्छिमारांना अजूनही काही प्रमाणात मदत मिळालेली नाही. काही अधिकारी चुकीचे काम करीत आहेत, काही अधिकाऱ्यांच्या चुकीच्या धोरणामुळे मदत मिळण्यास अडचणी येत आहेत. काही अधिकारी पुरावे म्हणून पावत्यांची मागणी करीत आहेत. अगोदरच मच्छिमार गेली चार वर्षे दुष्काळाच्या छायेत आहेत. सातत्याने दुष्काळी परिस्थिती त्यांच्यावर ओढवल्यामुळे मच्छिमार बांधवांना दिलासा देण्याचे शासनाचे काम आहे. त्यादृष्टीने त्यांना योग्य ती मदत केली पाहिजे. मी गेल्या वर्षीच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये एक विषय उपस्थित केला होता. कोकणात मातीची घरे मोठया प्रमाणात आहे. अतिवृष्टीमुळे किंवा पाऊस पडल्यानंतर एखादी भिंत पडल्यास कालांतराने ते पूर्ण घर पडले जाते. शासनाच्या धोरणानुसार त्या घराचे मुल्यांकन केले जाते आणि जास्तीत जास्त 2400 रुपये इतकी अल्प मदत दिली जाते. या 2400 रुपयामध्ये एक ट्रक माती आणायची झाला तरी शक्य होत नाही. माझी शासनाला नम्र विनंती आहे की, एक जरी भिंत पडली तरी पूर्ण घराचा पंचनामा करुन पूर्ण घरासाठी रक्कम दिली तर खऱ्या अर्थाने कोकणातील गोरगरीब जनता, गरीब शेतकरी यांना दिलासा मिळेल. फयान चक्री वादळ झाले आणि अतिवृष्टी झाली, त्यामुळे कोकणातील दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या घरांचे नुकसान झाले, त्यांना मदत करण्यासाठी व त्यांच्या घराची पुनर्बांधणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून शासनाकडे 2.5 कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव पाठविण्यात आला. तो प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे प्रलंबित आहे. माझी शासनाला नम्र विनंती आहे की, या प्रस्तावाचा तातडीने विचार करावा. फयान वादळ झाले, अतिवृष्टी झाली त्या काळात मोठया प्रमाणात रस्ते वाहून गेले, पूल वाहून गेले, शाळांच्या इमारतींची पडझड झाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 16:15

श्री.राजन तेली........

कोकणातील बागायतींचे नुकसान झाले. परंतु बागायतदार शेतकऱ्यांना कोणतीही नुकसानभरपाई मिळालेली नाही. त्याचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 11 मध्ये माननीय राज्यपालांनी शेतकऱ्यांना अल्प व्याजदराने पीक कर्ज व कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्यांना 25 हजार रुपयांपर्यंत व्याजमुक्त आणि 2 टक्के दराने 25 हजार ते 3 लाख रुपयांपर्यंत कर्ज देण्याचे कबूल केले आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. या योजनेमध्ये कोकणातील मच्छिमारांचा उल्लेख नाही. सातत्याने आम्ही सूचना करीत आहोत की, मच्छिमार बांधव गेली चार वर्षे दुष्काळाचा सामना करीत आहेत. वेगवेगळया नैसर्गिक आपत्तींचा सामना करीत आहेत. आपल्या माध्यमातून शासनाला नम्र सूचना करु इच्छितो की, या मच्छिमार बांधवांचा कर्ज योजनेमध्ये समावेश करुन घेण्याबाबत जरुर विचार करावा आणि त्यांना दिलासा द्यावा.

सभापती महोदय, अभिभाषणातील मुद्दा क्रमांक-13 मध्ये पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकासात कमीत कमी 6 टक्के विकास दर गाठण्याचे शासनाने धोरण आखले आहे. मी शासनाचे याबद्दल अभिनंदन करतो. परंतु कोकणातील चारही जिल्हयांचा विचार केला तर पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसायाची स्थिती फार अडचणीची आहे. युती सरकारच्या काळात जसा दोन जिल्हयांसाठी वेगळा प्रकल्प राबविण्यात आला होता त्याच धर्तीवर कोकणातील चारही जिल्हयांमध्ये वेगळा प्रकल्प राबविता येईल का याचा जरुर विचार व्हावा. त्या भागातील दूध संकलन आणि पशुसंवर्धन क्षेत्रातील रोजगाराला चालना मिळण्यासाठी नवीन प्रकल्प राबविण्याचा विचार होणे आवश्यक आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली........

महोदय, शासनाने सन 2008-09 मध्ये 6390 कोटी रुपये खर्च करुन 3540 दशलक्ष घन मीटर पाणी साठवण क्षमता असलेली 1.47 लाख हेक्टर इतकी अतिरिक्त सिंचनक्षमता निर्माण केली आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. तसेच चालू वर्षात देखील 1.75 लाख हेक्टर अतिरिक्त सिंचनक्षमता निर्माण करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. मी कोकणातील सिंचनाच्या बाबतीत सातत्याने पाटबंधारे विभागाच्या अनुषंगाने प्रश्न उपस्थित करीत असतो. सन 1997-98 मध्ये कोकणात छोट व मोठे मिळून जवळपास एकूण 90 सिंचन प्रकल्प आहेत त्यांना जोपर्यंत पुरेसा निधी मिळत नाही तोपर्यंत कोकणातील सिंचना क्षमतेत वाढ होणार नाही. म्हणून अशा प्रकारे कोकणातील सिंचन क्षमता वाढवावयाची असेल तर पुरेसानिधी दिला जावा, अशी माझी मागणी आहे. आजही कोकणात फक्त 3 टक्के एवढीच सिंचन क्षमता आहे. संपूर्ण राज्याचा विचार केला तर सरासरी 16 टक्के राज्याची सिंचनक्षमता आहे, ही तफावत दूर करण्याची गरज आहे.

शासनाने सन 2012 पर्यंत संपूर्ण राज्य भार नियमनमुक्त करण्याचा संकल्प केला असल्याचे अभिभाषणात म्हटले आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांचा विचार केला तर हे दोन्ही जिल्हे पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहेत. या जिल्हयात राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत विजेची चोरी होत नाही, लोक प्रामाणिकपणे विजेचे बिल भरतात आणि विजेचा वापर देखील अल्प स्वरुपातच होतो. माझी शासनाला विनंती आहे की, या दोन्ही जिल्ह्यांचा पर्यटनाच्या दृष्टीने विचार करुन या जिल्ह्यांना भारनियमनापासून मुक्त करण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे, अशी सूचना करतो.

सभापती महोदय, राज्यातील शहरांचा नियोजित व एकात्मिक विकास सुनिश्चितपणे व्हावा यादृष्टीने महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान महाअभियान राबविण्याचे शासनाने ठरविले आहे. ही शहरांच्या दृष्टीने अतिशय चांगल्या प्रकारची योजना असून शहरांचा नियोजनबध्द विकास व्हावा म्हणूनच ही योजना शासनाने आणली आहे, त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. परंतु त्याचबरोबर "क" वर्गीय नगरपालिकांच्या बाबतीत शासनाने कोणता विचार केला याचा उल्लेख यामध्ये नाही. आमची कणकवली नगरपालिका ही "क" वर्गीय नगरपंचायत असून ती आठ वर्षापूर्वी स्थापन झाली आहे. आज त्या ठिकाणी सर्वसामान्य नागरिकांना कोणत्याही सुविधा ही

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .......

नगरपालिका देऊ शकत नाही, कारण तिचे उत्पन्न मुळातच 45 लाख एवढेच आहे. म्हणून राज्यातील अशा अनेक "क" वर्गीय नगरपालिका अथवा नगरपंचायती असतील त्यांची परिस्थिती देखील यापेक्षा वेगळी नसावी. अशा नगरपंचायतींमध्ये रिझर्व्हेशनखाली जे भूखंड असतील ते डेव्हलप करण्याच्या दृष्टीने तसेच पायाभूत सुविधा देण्याच्या दृष्टीने त्यांनाजास्तीत जास्त फायदा कसा करुन घेता येईल याचाही शासनाने विचार करावा, अशी मी विनंती करीत आहे.

महोदय, वनौषधींचे संवर्धन व विकास याला चालना देण्यासाठी महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या अधिनस्त एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला त्याबाबत मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु आमचे रत्नागिरी व सिंधुदुर्ग असे जे दोन जिल्हे आहेत ते वनौषधीचे माहेरघर म्हटले तरी चालेल. त्या ठिकाणी असलेल्या वनौषधीबाबत केंद्रशासनाकडून सर्व्हेक्षण देखील करण्यात आले आणि जागतिक पातळीवर सुध्दा असे सर्व्हेक्षण होत आहे. हे करीत असताना ज्याप्रमाणे केरळ राज्यात वनौषधीच्या आधारे कारखाने तयार झाले तसे कारखाने कोकणातील या दोन जिल्ह्यांमध्ये निर्माण केले किंबहुना त्यांना प्राधान्य दिले आणि रोजगार निर्मिती केली तर निश्चितपणे जनतेच्या आर्थिक विकासात सुध्दा भर पडेल आणि सर्वसामान्य शेतकऱ्याला सुध्दा दिला मिळेल, यादृष्टीने शासनाने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

महोदय, यानंतर खाजगी क्षेत्राच्या सहभागातून सागरी बंदरांचा विकास करण्याचा शासनाचा विचार आहे. माझी अशी सूचना आहे की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील "चीपी" या ठिकाणी विमानतळ प्रस्तावित असल्याचा अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे......

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

मी आपल्या माध्यमातून शासनाला एकच सांगतो की, इतर जे काही प्रस्ताव असतील आणि त्यांच्या जागा शासनाच्या ताब्यात नसतील तर त्याचा काही उपयोग नाही. परंतु सिंधुदुर्ग जिल्हयातील 282 हेक्टर जागा चार वर्षापूर्वीच शासनाच्या ताब्यात आलेली आहे. त्यामुळे यासंदर्भात कालबध्द कार्यक्रम तयार करुन 18 महिन्यात, दोन वर्षात या ठिकाणी विमान कधी उतरणार आहे याची माहिती शासनाने या ठिकाणी दिली तर बरे होईल.

सभापती महोदय, पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महत्वाच्या रस्त्याच्या चौपदरी करणाच्या कामाच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणात उल्लेख करण्यात आलेला आहे त्यामुळे मी शासनास मनापासून धन्यवाद देतो. परंतु मुंबई-गोवा हा जो 17 नंबरचा राष्ट्रीय महामार्ग आहे याचा विचार शासनाने करावा, अशी विनंती करतो.

प्रत्येक कुटुंबाला पिण्याचे स्वच्छ पाणी पुरविण्यासाठी राज्यात राज्य पुरस्कृत आणि केंद्रपुरस्कृत बरेच प्रकल्प शासन राबवित आहे परंतु आपल्या माध्यमातून मी मुद्दाम सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, जलस्वराज्य योजनेवर कोणाचाही अंकुश राहिलेला नाही. जलस्वराज्य योजनेसाठी हजारो कोटी रुपये केंद्रसरकारकडून येत असतात परंतु जलस्वराज्य योजनेमध्ये अधिका-यांची मनमानी चालत असते. जलस्वराज्यचे अधिकारी कुठल्याही लोकप्रतिनिधींना विश्वासात घेत नाहीत. म्हणून माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, या प्रकल्पाअंतर्गत जे अधिकारी मनमानी करतात, भ्रष्टाचार करतात त्यांना जर आळा घालावयाचा असेल तर जिल्हापरिषदेच्या किंवा येथील सर्व लोकप्रतिनिधींना जलस्वराज्यच्या मोठया योजनेमध्ये सामावून घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. जलस्वराज्य योजनेच्या प्रकल्पासाठी काही तंत्रज्ञ घेतलेले आहेत त्यामध्ये एमएसडब्ल्यू, एमकॉम, बी.एससी. आहेत, बी.ई. आहेत. हे लोक पाच वर्षापासून या ठिकाणी काम करीत आहेत. परंतु जलस्वराज्य योजनेचा दुसरा टप्पा आता येणार आहे त्यामुळे जलस्वराज्य योजनेच्या प्रकल्पासाठी या लोकांना कामावर घेतले तर बरे होईल.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त शासनाने सन 2009 ते सन 2012 या तीन वर्षात शासनाने 7.35 लक्ष घरे बांधून देण्याचा निर्णय घेतलेला आहे, मी या निर्णयाचे स्वागत करतो. त्याच बरोबर राजीव गांधी टप्पा-एक आणि राजीव गांधी टप्पा - दोनच्या

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

संदर्भातील पूर्ण राज्याचा अभ्यास केला तर बँकेचे अधिकारी आपल्याला सहकार्य करीत नसल्याचे दिसून येईल. ही योजना अतिशय चांगली आहे. परंतु या योजनेसाठी आपण कितीही आदेश काढले तरी खालच्या बँका आपल्याला सहकार्य करीत नाहीत त्यामुळे तशा प्रकारच्या सूचना आपल्या लेव्हलवरुन कराव्यात, अशा प्रकारची विनंती मी आपल्या माध्यमातून करीत आहे.

सभापती महोदय, मी गेल्या वेळी सुध्दा कोकण रेल्वेचा विषय या सभागृहात उपस्थित केला होता. मुंबईतील मोनो रेल आणि मेट्रो रेल्वेचे मी स्वागत करतो. कोकण रेल्वेसाठी कोकणातील भूमिपुत्रांनी जागा दिल्या. आज कोकणामध्ये केवळ कोकण कन्या 11.00 वाजता धावते परंतु या रेल्वेत कोकण वासीयांना जागा मिळत नाही. आमदार म्हणून आम्हाला सीट मिळतात परंतु सर्वसामान्य लोकांचे फारच हाल होतात. कोकण रेल्वेच्या संदर्भात मी मागच्या वेळेस एक प्रस्ताव आणला होता त्यावेळी माननीय मंत्रीमहोदयांनी कबूल केले होते की, कोकणातील सर्व आमदारांना एकत्रित करुन दिल्लीमध्ये जाऊन रेल्वेमंत्र्यांची भेट घेऊ व आपली मागणी मान्य करुन घेऊ. माझी आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे की, मागील काही महिन्यापूर्वी माजी केंद्रीय रेल्वेमंत्री श्री. लालू यादव यांनी गरीब रथ नावाची रेल्वे सुरु केली होती. परंतु ही कोकण रेल्वेची गाडी मुंबईतून रत्नागिरी-मडगाव आणि कारवार येथे थांबते. कोकण रेल्वेसाठी जास्तीत कोकणवासीयांची जमीन गेलेली आहे त्यामुळे लांब पल्ल्याच्या ज्या गाडया आहेत त्या कोकणातील प्रमुख स्थानकांवर थांबणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आमच्याकडे ठाकर समाज कमी प्रमाणात आहे. ठाकर समाज हा एस.टी. मध्ये येतो. या लोकांना 35 वर्षापूर्वी एस.टी.चे दाखले मिळालेले आहेत. परंतु या लोकांची कास्ट व्हॅलेडीटी केली जाते त्यावेळी या लोकांवर सातत्याने अन्याय केला जातो. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, या ठाकर समाजाला आपल्या माध्यमातून न्याय मिळवून द्यावा अशी माझी अपल्या माध्यमातून विनंती आहे.

सभापती महोदय, पर्यटनाच्या संदर्भात शासनाने चांगले धोरण जाहीर करण्याची आवश्यकता आहे. 1998 मध्ये युती शासनाच्या काळात सिंधुदुर्ग जिल्हा हा देशातील एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला होता. आज गोवा, राजस्थान, केरळ हे राज्य आज



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

पर्यटनावरच चालत आहेत. त्यामुळे पुढील काळात सिंधुदुर्ग जिल्हा हा देशाला आणि राज्याला आर्थिक क्षेत्रात मोठी मदत करुन देऊ शकतो. म्हणून माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, पर्यटनाच्या माध्यमातून एक चांगले धोरण राज्यशासनाने सिंधुदुर्ग जिल्हयासाठी राबवावे आणि चांगल्या प्रकारचे काम करावे अशी विनंती करतो व मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे. मी रिझर्व्हेशन शिवाय येथपर्यत येऊन पोहाचली असल्यामुळे या चर्चेत भाग घेण्याकरिता परवा नाव दिले असतांनाही मला बोलण्याची संधी आज मिळाली आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मी जास्त बोलणार नाही परंतु काही गोष्टीचा येथे उल्लेख करणे गरजेचे असल्यामुळे मी थोडक्यामध्ये माझे विचार माडणार आहे. माननीय राज्यपालांनी आघाडी सरकारचा सर्वांगीण विकासाच्या संदर्भातील पुढील 5 वर्षाचा आदर्श मॅप आपल्या सर्वासमोर ठेवला आहे. तो मॅप पहात असतांना काही चांगल्या गोष्टीचा उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजते आणि त्या कर्तव्य भावनेतून मला प्रथम हे सांगावयाचे आहे की, राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरु असून राज्यातील विकासासाठी आणि जनतेच्या भल्यासाठी सरकार अनेक धोरणे व योजना राबविणार आहे या योजना राबवत असतांना राज्याच्या सुरक्षा या विषयाला अधिक अग्रक्रम द्यावा लागेल असे मला वाटते. त्याकरिता केवळ फोर्स वन आणि फोर्स टूची घोषणा करुन चालणार नाही तर त्यासबंधी प्रत्यक्षात कृती व्हावयास पाहिजे. राज्याचे प्रमुख ही कृती करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करते. मुंबई शहरातील काही ठिकाणे अतिरेक्यांच्या हिटलीस्टवर आहेत. मघाशी एका सन्माननीय सदस्यांनी असे सागितले की, आपण एकमकेकांचे चेहरे एकमेकाविरुध्द करुन वेगवेगळे सूर लावून बोलत असतांना ज्यांनी हे दहशतवादी हल्ले घडवून आणले आहेत ते मात्र मनातल्या मनात आनंद व्यक्त करीत असतील तेव्हा त्यांना अशा प्रकारे आनंद व्यक्त करु देता कामा नये असे मला या ठिकाणी आवर्जून सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 21 संबंधी मला बोलावयाचे आहे. या परिच्छेदात असे सांगण्यात आले आहे की, " माझे शासन.मुंबई शहराचा कालबध्द रीतीने विकास करुन त्यास आंतराष्ट्रीय दर्जाचे शहर बनविण्यासाठी वचन बध्द आहे." सभापती महोदय, देशाचे पंतप्रधान माननीय डॉ.मनमोहन सिंग हे विकासाचे धोरण पुढे धेऊन जाणारे आहेत व ते वित्त मंत्री होते तेव्हा पासून त्यांनी मुंबई शहरासाठी एक दिशा देण्याचे काम केलेले आहे.त्याचा एक भाग म्हणून मेट्रो आणि मोनो रेलचा प्रकल्प मुंबई शहरामध्ये आज येऊ घातला आहे. केन्द्रीय माहिती व तंत्रज्ञान मंत्री श्री गरुदास कामत यांचेसुध्दा यामध्ये तेवढेच योगदान आहे हे देखील मी या ठिकाणी आवर्जून सांगणार आहे.

2..

श्रीमती अलका देसाई..

त्यांच्या बरोबर काम करण्याची आणि तेथील चर्चेत भाग घेण्याची मला संधी मिळाली होती असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, शहरातील उपनगरे वाढत आहेत परंतु तेवढया प्रमाणात उपनगरी रेल्वे सेवा तेवढया क्षमतेने काम करीत असतांना दिसून येत नाही. येथून पुढच्या काळात मेट्रो आणि मानो रेल झाल्यानंतर उपनगरातील वाहतूक काही प्रमाणात सुखकर होईल परंतु तोपर्यत शहरातील जे रस्ते आहेत ते सुध्दा अधिक चांगले होण्याची गरज आहे. परंतु प्रत्यक्षात तसे होतांना दिसत नाही. देशातील एक नबरचे शहर म्हणून मुंबई शहराकडे लोक पहात असतात आणि लोकांनीसुध्दा याच दृष्टीकोनातून मुंबई शहराकडे पहावे अशी माझ्या सारख्या लहानशा कार्यकर्त्याची अपेक्ष्ां आहे.

सभापती महोदय,माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 37 मध्ये असा उल्लख करण्यात आला आहे की," केन्द्र पुरस्कृत संपूर्ण स्वच्छता अभियान राबण्यिात आपले राज्य आघाडीवर असून आतापर्यत सुमारे 56,13,000 इतकी वैयक्तिक प्रसाधनगृहे बांधण्यात आली आहेत." आतापर्यत अमुक इतकी स्वच्छतागृहे बांधण्यात आली आहेत असे सांगितले जाते परंतु त्या स्वच्छतागृहाची अवस्था कशी आहे हे या ठिकाणी भाषण करणा-यांनी वा इतरांनी जाऊन पाहिले आहे काय ? काय या ठिकाणी भाषण करणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी वा इतरांनी त्याची अवस्था जाऊन पाहण्याची गरज आहे असे मला वाटते.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

अस्वच्छतेचे साम्राज्य म्हणजे काय हे आपल्याला पहावयास मिळेल. मुंबई शहराला जो अपुरा पाणी पुरवठा होत आहे तो पुरेसा करणे गरजेचे आहे. आज या शहरामध्ये मल्टि स्टोअरेड 25-25 मजल्यांच्या दोन हजार इमारती उभ्या आहेत. त्यांना पाण्याचा पुरवठा केला जात असल्यामुळे लोकांना कमी पाणी मिळत आहे. आज खेडोपाडी पाण्याचे प्रचंड दुर्भिक्ष्य असल्यामुळे त्या विषयावर आपल्याला स्वतंत्र चर्चा करता येईल. मुंबई शहराला स्वच्छ ठेवण्यासाठी या पाण्याचा उपयोग झाला पाहिजे.

सभापती महोदय, अभिभाषणातील मुद्या क्रमांक 40 च्या संदर्भात या शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत घर बांधणीचा मोठा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. या निमित्ताने मला असे सुचवावयाचे आहे की, मुंबई शहरामध्ये हाऊसिंग बोर्डाच्या मोठ मोठया वसाहती आहेत. तेथील इमारतींची आज काय अवस्था झाली आहे हे पहाणे अत्यंत गरजेचे आहे. हाऊसिंग बोर्डाच्या, रिपेअरिंग बोर्डाच्या, स्लम बोर्डाच्या, गिरणी कामगार किंवा इतर कामगारांसाठी बांधलेल्या इमारतींचा समावेश रिपेअरींग आणि रिकंस्ट्रक्शन योजनेमध्ये करण्याची गरज आहे. त्याकरिता या सभागृहामध्ये ठराव मांडून त्या लोकांना न्याय देण्यात यावा. या शहरामध्ये मालकी हक्काच्या काही इमारती आहेत. गिरगाव सारख्या भागामध्ये अशा अनेक इमारती आहेत. त्या इमारतीलगत असलेली गटारे फुटलेली आहेत, पाईपलाईन तुटलेली आहे, सर्व घाण रस्त्यावर येत आहे, त्यामुळे तो सर्व परिसर अस्वच्छ होत आहे. त्या इमारतीच्या मालकाला मिळणाऱ्या टॅक्स किंवा सेसच्या उत्पन्नामधून तो नवीन इमारत बांधू शकत नाही. अशा इमारतींची पुर्नबांधणी होणे आवश्यक आहे. शासनाने ही योजना नियमाच्या चौकटीमध्ये बसविण्यासाठी आम्हाला चर्चेला बोलाविले पाहिजे. किंवा मंत्री, अधिकारी यांच्या पातळीवर ही चर्चा झाली पाहिजे व या इमारतींच्या पुनर्बाधणीचा प्रश्न सोडविला पाहिजे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल आभार मानतांना मी माझे विचार याठिकाणी विदित करीत आहे.

सभापती महोदय, झोपडपट्टी पुनर्वसन म्हणजे काय? मी हाऊसिंग बोर्डाच्या इमारतीमध्ये रहात असल्यामुळे या मुंबई शहराच्या आजूबाजूला पाहिलेतर झोपडपट्टयांचे पुनर्वसन किती झाले आहे हे मला माहीत नाही. परंतु मुंबई शहराला मोठ मोठया झोपडपट्टयांचा विळखा बसत चालला आहे. याबाबत आपले जिल्हाधिकारी, महानगरपालिकेचे आयुक्त काय करीत आहेत? मी मुंबई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्रीमती अलका देसाई...

महानगरपालिकेमध्ये नगरसेवक असतांना फक्त आयुक्त संपूर्ण महानगरपालिकेचा कारभार संभाळीत होते. आज चार-चार अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, उपायुक्त हा कारभार संभाळीत आहेत. वॉर्ड ऑफिसर्सना सुध्दा आपण वरिष्ठ श्रेणीचा दर्जा दिला आहे. ही सर्व मंडळी काय करीत आहेत? पोलीस खाते काय करीत आहे? या सर्व विभागांमध्ये सुसूत्रता आणून मुंबई शहराला गलिच्छ शहर म्हणून घोषित न करता ते चांगले आंतरराष्ट्रीय शहर करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी आपणास याठिकाणी एक उदाहरण देऊ इच्छिते. एका बाजूला आपण पर्यावरणाचा ऱ्हास होता कामा नये म्हणून सांगतो. परंतु त्याच वेळी 15-15 एकरावर अनधिकृत बांधकामे होत आहेत. यामध्ये सर्व पक्षांच्या दादा आणि लिडर लोकांचा हात आहे. एकीकडे आपण कंठशोष करुन सांगतो की, या शहरामध्ये एकही नवीन झोपडी होऊ देणार नाही. त्याचवेळी आपल्यासारखे निवडून आलेले लोकप्रतिनिधी ही कामे करण्यामध्ये अग्रेसर आहेत, त्यासाठी हे शासन काय करणार आहे? आमच्यासारख मंडळींना याविरुध्द आवाज उठवावा लागतो. आणि हे करीत असतांना आपल्या जीविताला देखील धोका निर्माण होतो. या मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय दर्जा देत असतांना झोपडपट्टीपासून या शहराला वाचविण्यासाठी आपण काय करणार आहात? त्याकरिता आपल्याजवळ नियोजनबध्द कार्यक्रम नाही, झोपडपट्टयांचे पुनर्वसन करीत असतांना त्याबाबत कुठेही उल्लेख केलेला दिसत नाही.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ KTG/ 16:40

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी याठिकाणी फार मोठे भाषण करणार नाही. कारण आम्हीच आपल्याकडे लिहून दिलेले होते की, प्रत्येक सन्माननीय सदस्यांना भाषणासाठी 10-10 मिनिटांचा वेळ देण्यात यावा.

**तालिका सभापती** : आपण सांगितल्याप्रमाणेच सर्व सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यासाठी दहा-दहा मिनिटांचा वेळ दिलेला आहे.

श्रीमती अलका देसाई : अभिभाषणाच्या पान क्र,14 वरील मुद्दा क्र.44 वर एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत केंद्र शासनाने नवीन 102 प्रकल्प व 12,608 अंगणवाडया, तसेच 3640 लहान अंगणवाडया मंजूर केलेल्या आहेत, याचा मला आनंद आहे. हा सरकारचा चांगला व स्तुत्य उपक्रम आहे. परंतु अंगणवाडीतील मुलांना चांगले जेवण मिळते काय ? त्यांच्यापर्यंत चांगल्या प्रकारचे जेवण पोहोचते काय ? हे पहाण्याची जबाबदारी जे पहिल्या क्रमांकाचे अधिकारी किंवा शेवटच्या स्तरावरील अधिकारी असतात, त्यांची असते. परंतु ते आपले दायित्व पार पाडतात काय? याबाबतीत अधिकाऱ्यांकडे चौकशी केल्यावर असे उत्तर दिले जाते की, हे काम माझे नाही आणि साहेब बैठकीमध्ये आहेत. तेव्हा या प्रश्नाकडेही लक्ष द्यावे. मी या मुद्यांशी इंटरलिंक असलेला पुढील मुद्दा येथे मांडत आहे.आज महागाईने कहर केलेला आहे.आपल्याला असे दिसून येते की, सरकारने काहीं लोकांना पांढरे काडे, काही लोकांना ऑरेंज कार्ड दिले आहे आणि दारिद्र रेषेखालील गरीब लोकांसाठी पिवळे कार्ड दिलेले आहे. त्यानुसार त्या कार्डावर गरीब लोकांना महिन्याला दहा कि.तांदूळ व गहू व दोन कि.साखर मिळेल अशी घोषणा केली. पण एका कार्डामध्ये एकच युनिट असते असे शासनाला वाटते काय ? प्रत्येक कार्डामध्ये 7-7, 10-10 युनिट असतात. घरामध्ये बायका-मुले असतात. मग अशा वेळी एकदा 10 कि.तांदूळ व गहू दिला म्हणजे सर्व काही दिले असे आहे काय ? मी महामहीम राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या अनुषगांने सुचवू इच्छिते की, प्रत्येक युनिटसाठी 10 कि.तांदूळ, 10 कि.गहू आणि 2 कि.साखर देण्यात यावी जेणेकरुन त्या घरातील लोकांचे महिनाभर पोट भरु शकेल. असे झाले तरच सर्वसामान्य गरीब लोकांचे जीवन सुकर होणार आहे. जर या लोकांचे जीवन सुकर झाले नाही तर आपण काम करताना कुठेतरी चुकत आहोत का ? असा प्रश्न निर्माण होईल.तेव्हा आपल्याकडून जनतेमध्ये तशा प्रकारचा संदेश जाता कामा नये.महामहीम राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये चा्ंगला रोड मॅप दिलेला आहे.पण वरील बाबी यामध्ये दिसून येत नाहीत.त्यामुळे मी कदाचित ते मुद्दे मांडले ...

. . . .4 सी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई . . . .

असतील आणि त्यामध्ये माझे कदाचित चुकले असेल तर मला माहिती नाही. पण महामहीम राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभाराचे भाषण करताना शासनाने या मुद्यांचा त्यात समावेश करावा असे मला सुचवावयाचे आहे.

-----

. . . . 4 सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ KGS/ KTG/ 16:40

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर मी माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी उभा आहे. सन्माननीय राज्यपाल महोदयांचे जे अभिभाषण आहे, त्यातील सर्वात शेवटचा मुद्दा हा महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या बाबत आहे. मला असे वाटते की, गेल्या 5 वर्षापासून सातत्याने प्रत्येक वर्षी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणांमध्ये हा मुद्दा शेवट असतो आणि हा प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत प्रयत्न सुरु आहेत, लवकरात लवकर हा प्रश्न सुटेल अशा प्रकारचा एक विश्वास महाराष्ट्रातील जनतेला दिला जातो. परंतु दरवर्षी हा विषय माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये येत आहे आणि यावर्षी असे म्हटलेले आहे की, यासंबंधात आम्ही न्यायालयात दावा दाखल केला आहे. हा प्रश्न सोडविण्याच्या संबंधात आम्ही प्रयत्न करीत आहोत. मी अशी अपेक्षा व्यक्त करतो की, पुढच्या वर्षी सन्माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात हा विषय येणार नाही आणि जर तो आलाच तर तो पहिल्या क्रमांकावर असेल. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये या भागातील जनतेला लवकरात लवकर न्यायालयाकडून न्याय मिळावा म्हणून शासनाने आपले मनोगत व्यक्त केले आहे. तसेच काही सायंकालीन न्यायालये सुरु करण्याचा शासनाचा मनोदय असल्याचे व्यक्त केले आहे. पण आज जी न्यायालये सुरु आहेत, ती योग्य त्या पध्दतीने सुरु आहेत काय ? त्याठिकाणी केवळ न्यायालयाची इमारत बांधली म्हणजे न्यायालयाची सोय झाली असे म्हणता येणार नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

अनेक वर्षापूर्वी बांधलेल्या ज्या इमारती आहेत त्यांची डागडुजी करणे, दुरुस्ती करणे या दृष्टीकोनातून शासनाने दखल घेण्याची आवश्यकता आहे. शिक्षण विभागासाठी शासनाने वेगळे शाळा न्यायाधिकरण दिलेले आहे. शिक्षण सेवकांसाठी वेगळे वन मॅन कमिशन आहे. आता शिक्षण सेवकांच्या बाबतीत असलेल्या वन मॅन कमिशनचा कारभार संपलेला आहे. ती प्रकरणे शाळा न्यायाधिकरणाकडे यावयास पाहिजेत पण ही प्रकरणे तिकडे वर्ग झालेली नाहीत. लोक वैयक्तिकरीत्या अर्ज करुन तिकडे प्रकरणे वर्ग करुन घेत आहेत. शासनाने यासंदर्भात निर्णय घेऊन वन मॅन कमिशनकडील सगळी प्रकरणे शाळा न्यायाधिकरणाकडे वर्ग केली पाहिजेत. न्यायाधिकरणाचे काम जवळजवळ 80 कमी झालेले आहे. कारण शिक्षकांना कमी करण्याची प्रकरणे खूप कमी झालेली आहेत. सुपरसेशनची काही प्रकरणे येतात. 100 टक्के काम होते ते 20 टक्क्यावर आलेले आहे. न्यायाधिकारणाचे काम कमी झालेले आहे. न्यायालयामध्ये आलेल्या प्रकरणाचा चार-चार वर्षे, सहा सहा वर्षे निकाल लागत नाही. 16-16 वर्षे निकाल लागत नाही. ही प्रकरणे साधारणत: सहा महिन्यांच्या आत निकाली निघावीत यादृष्टीकोनातून विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शासनाने सांस्कृतिक धोरण जाहीर करण्याचे निश्चित केलेले आहे. शासनाने क्रीडा धोरण जाहीर करण्याचे निश्चित केले आहे. या राज्यामध्ये क्रीडा धोरण असून त्यासाठी एक समिती गठीत झालेली आहे. शासनाने त्यांच्याकडून अहवाल मागितलेला आहे. आता त्याचा विचार सुरु झालेला आहे. याचा अर्थ राज्य शासनाचे क्रीडा धोरण सुध्दा ठरलेले नाही. एका बाजूला विद्यार्थी आत्महत्या करीत आहेत. मला एका गोष्टीचे वाईट वाटते. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. छोट्यामोठ्या मुलांच्या आत्महत्या होत आहेत. दीड महिन्यामध्ये 82 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. हा विषय शासनाला संवेदनशीलतेचा वाटला नाही काय की ज्यामुळे या विषयाचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये केला नाही ? मला आठवते की, एका आठवड्यामध्ये 13 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या होत्या त्यासंदर्भात नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये 12 डिसेंबर 2005 ला मी हा विषय उपस्थित केला होता. कोवळ्या लहान मुलांनी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. रामनाथ मोते ......

आत्महत्या करणे ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. या आत्महत्यांची वेगवेगळी कारणे असू शकतात. अभ्यासाचे ओझे असेल, परीक्षा पध्दती जाचक वाटत असेल, पालकांच्या अपेक्षा असतात की माझा पाल्य डॉक्टर किंवा इंजिनियर झाला पाहिजे तसेच त्यांच्या घरची कौटुंबिक परिस्थिती अशा अनेक गोष्टी याला कारणीभूत असू शकतात. परंतु या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने उपाययोजना केली पाहिजे असा विषय मी 12 डिसेंबर, 2005 ला मांडला होता. अद्याप त्याबाबतीत मला शासनाने उत्तर दिलेले नाही. त्याबाबतीत शासन काय करणार आहे हे मला कळविण्यात आलेले नाही. आता सुध्दा आत्महत्येच्या या महत्वाच्या विषयाला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये स्पर्श करण्यात आलेला नाही. आपण क्रीडा धोरण ठरवित आहोत. आपल्याला क्रीडा संकुले करावयाची आहेत. क्रीडा, संगीत, कला या बाबी विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या आहेत. त्यांच्या जीवनामध्ये आनंद देणारे संगीत, क्रीडा, कला या सारखे विषय वातावरण बदलू शकतात आणि त्यातून मोठ्या प्रमाणावर आत्महत्या रोखण्याचे काम, मुलांच्या मनावरील ओझे कमी करण्याचे काम, त्यांचा ताणतणाव कमी करण्याचे काम होऊ शकते. त्यादृष्टीकोनातून विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याच्या संदर्भात शासनाने योजना केलेली आहे परंतु ही सुध्दा अत्यंत फसवी योजना आहे. आम्हाला शाळेमध्ये गेल्यानंतर मतासाठी किंवा व्होटबँकसाठी ही फसवी योजना शासनाने आणली आहे काय अशा प्रकारची भावना लोकांकडून ऐकावयास मिळते. ज्या पध्दतीने ही योजना लोकांपर्यत पोहोचावयास पाहिजे ते होत नाही. त्या ठिकाणी हजारो विद्यार्थी अर्ज करतात आणि 10 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळते. म्हणजे 990 विद्यार्थी नाराज होतात. त्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही. खऱ्या अर्थाने या अल्पसंख्यांकांना मदत करावयाची असेल, त्यांना शिष्यवृत्ती द्यावयाची असेल, त्यांना खऱ्या अर्थाने जीवनामध्ये उभे करावयाचे असेल तर योग्य त्या प्रमाणात निधी देण्याची आवश्यकता आहे. केवळ योजना आणि त्याची घोषणा करुन चालणार नाही तर त्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत आहे काय,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते......

त्यासाठी पुरेसा निधी देतो आहे काय याचाही विचार होण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र राज्याचे हे दुर्दैव आहे की, गेले दोन वर्षे कायम स्वरुपी शिक्षण मंत्री मिळालेले नाहीत. गेल्या 2 वर्षात 4 शिक्षण मंत्री झाले आहेत. सन्माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी हा पदभार स्वीकारला आहे. परंतु कृषी विभागाबरोबर या विभागाचा अतिरिक्त कार्यभार त्यांच्याकडे दिलेला आहे. हा विभाग क्लिष्ट असल्यामुळे कोणी घेण्यास तयार नव्हते अशी माहिती मिळाली नाही. किंबहूना, तशी भावना सगळयांची झालेली आहे. या राज्याचे शिक्षण धोरण निश्चित करण्याची आवश्यकता आहे. गेल्या 2-3 वर्षांचा विचार केला तर लक्षात येईल की, शिक्षण क्षेत्रासंबंधी किंवा शैक्षणिक विषयासंबंधी शासन उदासीन झाले आहे काय असे वाटते. आमचा विरोध असताना शिक्षण सेवक योजना राज्यात लागू केली. मागील 10 वर्षापासून शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये वाढ केलेली नाही. अप्रशिक्षित व मागासवर्गीय अशा शिक्षकांची 3 वर्षे पूर्ण झाली असतील त्यांना वेतनश्रेणी देण्यास शासन तयार नाही. गेल्या 7 वर्षापासून संस्था चालकांचे वेतनेतर अनुदान बंद केले आहे. मध्यंतरी शासनाने आश्वासन दिले होते की, 552 कोटी रुपये तातडीने दिले जातील. परंतु अद्याप ती रक्कम मिळालेली नाही. या देशाच्या सन्माननीय राष्ट्रपती महोदया, त्यांचे यजमान श्री.शेखावत हे संस्था चालक संघटनेचे अध्यक्ष आहेत. त्यांनी मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली, शिष्टमंडळाने भेट घेतली. सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शालेय शिक्षण विभागाला दोन वर्षापूर्वी आदेश दिले. राज्य शासनाच्या पदाधिका-यांना आदेश दिले की, या संस्था चालकांना अनुदान द्यावे. शिक्षकेतर कर्मचा-यांचा आकृतिबंध एस.एस.कोडप्रमाणे लागू करावा. त्यासंबंधी सुध्दा कोणताही निर्णय झालेला नाही. या शासनाला यासंदर्भात केवळ घोषणा करावयाची आहे, पण कोणतेही आश्वासन पूर्ण करावयाचे नाही. नवीन शाळांच्या संदर्भात शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

सभापती महोदय, सध्या नवीन शाळांना परवानगी देत असताना केवळ इंग्रजी माध्यमाच्या शाळांना परवानगी मिळते. महाराष्ट्रामध्ये मराठी माध्यमाच्या शाळांना परवानगी द्यावयाची नाही असे शासनाचे धोरण ठरले आहे काय ? यासंबंधी निर्णय होण्याची आवश्यकता आहे. इयत्ता

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते......

पहिलीपर्यंत आलेल्या 100 विद्यार्थ्यांपैकी उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची टक्केवारी केवळ 10-11 टक्के इतकी आहे. जवळजवळ 90 टक्के विद्यार्थी 11 वी पर्यंत किंवा महाविद्यालयीन शिक्षणानंतर गळतात. पुढील उच्च शिक्षण देणा-या ज्या संस्था आहेत त्या एक तर विना अनुदानित आहेत किंवा कायम विना अनुदानित आहेत. शासनाकडून त्यांना कोणतेही अनुदान मिळत नाही. अशा शिक्षण संस्थांमधून इंजिनिअरिंग किंवा मेडिकलचे शिक्षण घेणा-या सर्वसामान्यांची मुले भरमसाठ फी असल्यामुळे शिक्षण घेऊ शकत नाही. लाखे रुपयांची फी भरण्याची त्यांची आर्थिक ताकद नसते. या भरमसाठ फीवाढीसंबंधी किंवा नफेखोरी करणा-या संस्था चालकांसंबंधी शासनाने विचार केला पाहिजे. राज्य शासनाने सेमी इंग्रजी धोरण सुरु केले असले तरी ते खाजगी शाळांसाठी सुरु केले आहे. सर्वसामान्यांची मुले जिल्हा परिषदेच्या शाळांमधून शिकत आहेत, महानगरपालिका, नगरपालिकांच्या शाळांमधून शिकत असतील त्यांना सुध्दा इंग्रजीतून शिक्षण मिळू नये काय, त्यांना गणित व विज्ञान हे विषय इंग्रजीतून शिकण्याची संधी मिळू नये काय, म्हणून सेमी इंग्रजीचा फायदा सर्वसामान्यांच्या मुलांना सुध्दा होण्याची आवश्यकता आहे. म्हणून असे म्हणालो की, एकूणच शैक्षणिक धोरणासंबंधी शासनाला विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दुसरा एक महत्वाचा विषय आहे. सर्वशिक्षा अभियान अंतर्गत या राज्यात खूप पैसा येत आहे. त्याचा योग्य त्या पध्दतीने विनियोग होण्याची गरज आहे. परंतु सध्या योग्य त्या पध्दतीने या निधीचा विनियोग होत नाही. आजही 43 हजार शाळांमध्ये मुलींसाठी प्रसाधनगृहे नाहीत. 14,835 शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. 3,380 शाळांमध्ये फळाही नाही. 1 लाखापेक्षा अधिक शाळाबाह्य मुले आहेत. 4,303 शाळा एकशिक्षकी आहेत.

यानंतर श्री.ओटवणेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.रामनाथ मोते....

या राज्यामध्ये शिक्षणाच्याबाबतीत आमचे धोरण कुठे तरी चुकेते की काय याचा फेर विचार करण्याची आवश्यकता आहे. आज शैक्षणिक धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. याचा कुठेही उल्लेख माननीय राज्यपाल्यांच्या अभिभाषणामध्ये नाही. सांस्कृतिक धोरण, क्रीडा धोरण यांचा उल्लेख आला आहे. पण शिक्षणाच्या धोरणाचा कोणताही विचार करण्यात आलेला नाही. तेव्हा शैक्षणिक धोरणाचा विचार होण्याची देखील आवश्यकता आहे. एवढ्या मुद्यावर बोलून मी येथेच थांबतो.

.................

**उप सभापती** : आता शेवटचे दोनच सन्माननीय सदस्य बोलावयाचे बाकी आहेत. एक म्हणजे श्री.विक्रम काळे आणि दोन म्हणजे डॉ.सुधीर तांबे. सोमवारी यावर उत्तर होणार आहे. श्री.दिवाकर रावते साहेब आपणच मला सांगितले होते सर्वांची भाषणे होईपर्यंत सभागृह सुरू ठेवावे. मी सभागृहाला दुपारी 2.30 वाजता सभागृह शेवटच्या सदस्यांचे भाषण पूर्ण होई पर्यंत सुरू ठेवायचे काय ? असे विचारले होते त्यावेळी आपण त्यास हरकत नाही असे सांगितले होते. म्हणून मी माझा निर्णय त्यावेळी दिला होता.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सोमवारी बोलायला मिळेल म्हणून काही सदस्य घरी गेले आहेत. सोमवारी अधिक लोड येऊ म्हणून मी काही म्हणालो नाही. सोमवारी कोणालाही बोलू देऊ नका असे मी म्हटलेले नाही.

**उप सभापती** : सोमवारी बोलू नका असे आपण म्हणालेला नाहीत हे मी मान्य करतो. शेवटच्या सदस्यांचे भाषण होईपर्यंत सभागृह सुरू राहील असे मी सांगितले होते. परवा म्हणजे सोमवारी यावर उत्तर होणार आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आपल्या भाषणास सुरूवात करावी.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या राज्याचे नूतन राज्यपाल यांनी नूतन अधिवेशनाच्या निमित्ताने पहिल्यांदाच अभिभाषण केले असून अभिभाषणाचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

महाराष्ट्र राज्य निर्मितीचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत. त्या निमित्ताने सर्वांना आनंद व्हायला पाहिजे. आम्हा सर्वांना एक गोष्ट पहायला मिळाली की, राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे होत असताना सामान्य माणूसाला केंद्र बिंदू मानून या शासन काही महत्त्वाचा योजना हाती घेण्याचे ठरविले आहे. मंत्रालयामध्ये काही कामासाठी जायचो तेव्हा आम्ही पहात होतो की, मंत्रिमंडळाच्या बैठका खूप वेळ चाललेल्या आहेत. पूर्वी मंत्रिमंडळाची बैठक 2 ते 3 तास चालायची. मात्र गेल्या काही दिवसांपासून दिवसभर मंत्रिमंडळाची बैठक सुरू असते. यासंबंधी आम्ही विचारणा केली असा आम्हाला असे समजले की, आज ह्या विभागाचे व्हिजन डॉक्युमेंट आहे, म्हणून वेळ लागला. पहिल्यांदाच या राज्यामध्ये प्रत्येक विभागाचे व्हिजन डॉक्युमेंट तयार केले गेले आहे असे मला वाटते. येत्या पाच वर्षामध्ये लोकांसाठी काय करायचे आहे, कोणती विकासाची कामे करावयाची आहेत, यासाठी व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात आले. मग ते शिक्षण विभागाचे असेल, बांधकाम विभागाचे असेल, कृषि विभागाचे असेल. ही सर्वांच्या दृष्टीनी अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. हे व्हिजन डॉक्युमेंट खात्याने तयार केलेले असेल तरी ते प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने तयार केले पाहिजे. जिल्ह्यातील विकासाचा कार्यक्रम काय आहे, त्यादृष्टीने व्हिजन डॉक्युमेंट तयार झाले पाहिजे. तालुक्याचे विकासाचे व्हिजन डॉक्युमेंट तयार झाले पाहिजे. एवढेच नव्हे तर प्रत्येक गावाचे विकासाचे व्हिजन डॉक्युमेंट भविष्यात तयार केले पाहिजे. ग्रामीण भागातील जो शेवटचा माणूस आहे त्याच्या पर्यंत विकासाचा लाभ पोहचावयाचा असेल, त्याच्या सुख-सुविधेसाठी आपल्याला काही योजना करावयाचा असतील तर त्या नीटपणे आखणे आवश्यक आहे आणि प्रभावीपणे त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक असेल तर त्याप्रमाणे व्हिजन डॉक्युमेंट होणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. ओटवणेकर 17:00

(श्री. विक्रम काळे....

सभापती महोदय, विकासाच्यादृष्टीने सर्वात महत्वाची कोणती गोष्ट असेल तर ती रस्ते होय. जोपर्यन्त चांगले रस्ते होणार नाहीत तोपर्यन्त विकासाच्या विविध गोष्टी लोकांपर्यन्त जाऊन पोहोचणार नाहीत. या निमित्ताने मला नमूद करावेसे वाटते की, महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे होत असताना आजही अनेक खेडी पक्क्या रस्त्यापासून वंचित आहेत. भविष्यात एक ठोस असा कृती कार्यक्रम आखून प्रत्येक गाव, प्रत्येक पाडा, प्रत्येक तांडा पक्क्या रस्त्याने जोडला गेला पाहिजे. एवढेच नाही तर जिल्हांतर्गत रस्त्यांचे, दोन जिल्ह्यांना जोडणा-या रस्त्यांचे चौपदरीकरण केले पाहिजे. लोक टोल भरण्यास तयार आहेत. रस्ते चांगले असतील तर डिझेलची बचत होते, वेळेची बचत होते हे लोकांना माहीत झालेले असल्यामुळे लोक टोल भरण्यास तयार आहेत. बीओटी तत्वावर हे रस्ते बांधण्यास हरकत नाही. पण जिल्हया-जिल्ह्याला जोडणा-या रस्त्यांचे चौपदरीकरण होणे अत्यंत आवश्यक असून त्यासाठी शासनाने कृती कार्यक्रम हाती घ्यावयास पाहिजे. मराठवाड्याच्या मागासलेपणाबद्दल, त्याच्या विकासाबद्दल या सभागृहामध्ये सातत्याने बोलले जाते. परळी-बीड-नगर, सोलापूर-उस्मानाबाद-जळगाव, नांदेड-यवतमाळ-नागपूर हे रल्वेमार्ग होण्यासाठी सातत्याने मागणी केली जात आहे. हे रेल्वेमार्ग झाले की उद्योगाला आणि विकासाला चालना मिळेल. भविष्यात हे रेल्वेमार्ग पूर्ण होण्याच्या दृष्टीने त्या रेल्वेमार्गांचा विकास आराखड्यामध्ये समावेश होणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, नागरिकांची सुरक्षा आणि संरक्षण करण्यास हे शासन कटिबद्ध आहे असे अभिभाषणामध्ये नमूद केलेले आहे. या महाराष्ट्रामध्ये नेहमी जनतेच्या भावना भडकविण्याचे, त्यांना डिवचण्याचे काम होत असते. या गोष्टीचा बिमोड करण्यासाठी पोलिसांची 55 हजार रिक्त पदे भरण्याचा एक क्रांतिकारी निर्णय शासनाने घेतलेला आहे. याबद्दल मी माननीय गृहमंत्र्यांचे अभिनंदन करतो. पोलिसांच्या भरतीमध्ये पूर्वी भ्रष्टाचार होत होता. आता ही भरती पारदर्शक केलेली आहे. कोणत्याही आमदाराचा फोन किंवा कोणाचीही शिफास चालत नाही. जो अर्हताप्राप्त उमेदवार असेल त्याला योग्य तो न्याय मिळेल. सभापती महोदय, या निमित्ताने मी आणखी एका गोष्टी उल्लेख करु इच्छितो, तो म्हणजे जेव्हा ्ग्रामीण भागातील सामान्य माणूस पोलीस स्टेशनमध्ये आपली तक्रार नोंदविण्यास जातो त्यावेळी त्याची अवहेलना केली जाते, त्याची तक्रार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विक्रम काळे....

नोंदवून घेण्यास टाळाटाळ केली जाते. अशा प्रकारच्या गोष्टींना प्रतिबंध करण्यासाठी, पोलीस स्टेशनमधील कारभार निकोप पध्दतीने होण्यासाठी सर्व पोलीस स्टेशन्स संगणकाने जोडली गेली पाहिजेत. यासंबंधी अभिभाषणामध्ये उल्लेख असावयास पाहिजे होता, पण तो दिसत दिसत नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्र हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी हा केन्द्रबिंदू मानून राज्य शासन नेहमी विकास आराखडा तयार करीत असते. शेतक-यांच्या अडचणीच्या वेळी हे राज्य सरकार नेहमीच त्याच्या पाठीशी उभे राहिलेले आहे. फयान वादळ असो, गारपीट असो, अवकाळी पाऊस असो, अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये शासनाने शेतक-याला नेहमी मदत करण्याची भूमिका घेतलेली आहे. या निमित्ताने मी माननीय केन्द्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार यांचे अभिनंदन करतो. भारत स्वतंत्र होऊन जवळपास 60 वर्षे झाली. इतक्या वर्षामध्ये कोणत्याही राजकीय नेत्याने घेतला नाही असा क्रांतिकारी निर्णय केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी घेतला. त्यांनी शेतक-यांचे 72 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. सन्माननीय सदस्य हे सत्ताधारी पक्षातील असोत वा विरोधी पक्षातील असोत, त्यांना ही बाब नाकारुन चालणार नाही. चांगल्याला चांगले म्हटले पाहिजे. 72 हजार कोटीचे कर्ज माफ करण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

तुम्ही आम्ही शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी अभ्यास करतो. त्यांच्याविषयी बोलतो. मला वाटते, आतापर्यंत कोणत्याही शासनाने अशा प्रकारचा निर्णय घेतला नव्हता. 2 टक्के व्याजदराने कर्ज देण्याचा निर्णय आतापर्यंतच्या स्वातंत्र्योत्तर काळात कोणत्याही शासनाने घेतला नव्हता. एवढ्या कमी व्याजदरात शेतकऱ्यांनी कोणीही कर्ज दिलेले नाही. इतका चांगला निर्णय अभिभाषणामध्ये समाविष्ट झालेला आहे. 25 हजार रुपयांपर्यंतचे कर्ज बिनव्याजी देण्याचा क्रांतीकारक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे याबद्दल शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. सातत्याने ओरड केली जात होती की, शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला योग्य तो भाव मिळत नाही. यावर्षी या राज्यामध्ये, या देशामध्ये कधी नव्हे तो चांगला भाव शेतकऱ्यांच्या मालाला मिळाला. ऊसाला 2100 रुपये भाव मिळाला. कदाचित पुढील वर्षी तो 2500 रुपयांपर्यंत जाईल. शेतकऱ्यांना एवढा भाव कधी मिळाला नव्हता. आज सोयाबीनला 2100 रुपये, तूर पिकाला 4000 रुपये भाव मिळाला. शेतकरी उन्हातान्हात राबतो, दिवसभर अंगमेहनत करुन घाम गाळतो, त्याच्या पिकाला भाव मिळण्याचे काम झाले. याचे श्रेय आघाडी सरकारला आणि केंद्रातील सरकारला व केंद्रीय कृषिमंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांना जाते. शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका घेण्यात आली आहे.

उद्योजकांच्या दृष्टीने महाराष्ट्र हे पहिल्या पसंतीचे राज्य आहे. मोठमोठे उद्योग या राज्यात येत आहेत. जवळजवळ 169 मेगा प्रकल्पांना मान्यता देण्याचे काम झालेले आहे. हे उद्योग उभारीत असताना ज्या ज्या भागात उद्योग उभे राहतील, शहरामध्ये नवीन फॅक्टरी उभी राहणार असेल तर त्या उद्योगामध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले पाहिजे अशा प्रकारचा कायदा भविष्यामध्ये राज्य सरकारने आणण्याची गरज आहे. जेणेकरुन त्या भागातील उमेदवारांना रोजगार मिळण्याची संधी उपलब्ध होईल. विजेच्या बाबतीत माननीय राज्यपाल महोदयांनी अभिभाषणात उल्लेख केला आहे. 2012 पर्यंत राज्य विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणार आहे. निश्चितपणे आम्हाला त्याचा अभिमान वाटतो. नुकत्याच लोकसभा आणि विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. विरोधकांनी विजेचा मुद्दा उचलून धरला होता. दहा वर्षे सत्तेत असताना विजेच्या बाबतीत का प्रगती केली नाही असा मुद्दा मांडला होता. लोकांना विश्वास ठेवला आहे. लोकांनी हे नाकारलेले नाही. वीज अशी वस्तू नाही की जादूची कांडी फिरवली आणि वीज

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

निर्माण झाली. वीज प्रकल्प उभारण्यासाठी काय कष्ट घ्यावे लागतात, किती अडचणी येतात हे तुम्हा आम्हा सर्वांना माहित आहे. जनतेने सुध्दा अनुभवले आहे. सरकारने धोरण आखले. मोठमोठे प्रकल्प हाती घेतले. 2012 पर्यंत आखलेल्या योजनेप्रमाणे निश्चितपणे राज्य विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणार आहे. आम्ही त्या दिवसाची वाट पहात आहोत. हा दिवस कधी येणार आहे त्याची सर्व जनता वाट पहात आहे. आज अभिवचन सरकारने दिले आहे त्यावर सामान्य जनतेचा विश्वास आहे. म्हणूनच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये आघाडी सरकारला जनतेने कौल देण्याचे काम केले आहे. म्हणून आम्ही त्या दिवसाची वाट पहात आहोत. सोनीयाचा दिवस, उजेडाचे चांदणे असलेला दिवस, दिवस असलेली रात्र कधी येणार याची जनता वाट पहात आहे. तो दिवस नक्की येईल हे मला याठिकाणी नमूद करावेसे वाटते. राज्यातील दारिद्र्य रेषेखालील जनता आहे त्या जनतेला 15 रुपयांमध्ये विजेचे कनेक्शन दिले जाणार आहे. आपण हे कधी वाचले किंवा पाहिले होते का? 15 रुपयांमध्ये विजेचे कनेक्शन देण्याची योजना राज्य सरकारने आणली आहे. राजीव गांधी विघुतीकरण योजनेंतर्गत फक्त वीज कनेक्शन नाही तर घरामध्ये एक सीएफएल बल्ब सुध्दा दिला जाणार आहे. म्हणजे विजेचे कनेक्शन मिळाल्यानंतर बल्बसाठी पैसे देण्याची गरज नाही. केंद्र सरकारची ही योजना असली तरी त्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी तेवढे मोठे मन असले पाहिजे. केंद्रात सुध्दा आमचेच सरकार आहे. जे चांगले आहे त्याला चांगले म्हटले पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळात 15 रुपयांमध्ये कधी वीज कनेक्शन मिळालेले नव्हते.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ......

महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सांगितले की, तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्याचे शासनाने मान्य केले व त्यानुसार शेगांवच्या विकासाला 360 कोटीचा निधी देण्याचे शासनाने मान्य केले. नुकतेच तुळजापूर भवानी देवस्थानचा विकास करण्यासाठी शासनाने प्राधिकरण स्थापन झाले आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या तुळजापूर या तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी मोठया प्रमाणात निधी देण्याचे काम झालेले आहे. त्याच धर्तीवर पंढरपूर देवस्थानचाही विकास होणे आवश्यक आहे. तेथे येणाऱ्या विठ्ठलाच्या भक्तांना सोई-सवलती मिळण्यासाठी हा विकास होणे आवश्यक असून त्याचेही प्राधिकरण शासनाने स्थापन करावे त्यासाठी निधी देऊन या देवस्थानचा विकास करावा आणि त्यासंबंधीचा उल्लेख किमान पुढील अभिभषाणत यावा, अशी माझी मागणी आहे.

राज्यातील गोरगरिबांना चांगली घरे मिळाली पाहिजेत, कारण हे गरीब चांगली घरे बांधू शकत नाहीत म्हणून शासनाने घरकूल योजना आणली आहे. एसआरएच्या माध्यमातून शहरातील झोपडपट्टयांचे निर्मुलन करण्यासाठी सुध्दा प्राधिकरणाची स्थापना केलेली आहे. संपूर्ण मुंबई सुंदर आणि स्वच्छ करावयाची असेल, मुंबईचे शांघाय करावयाचे असेल या झोपडपट्टयांचे निर्मुलन होणे आवश्यक आहे. त्यात जो गरीब वर्ग राहतो त्याला तेथून उठविले तरी हरकत नाही परंतु त्यांना चांगली घरे देण्याचे काम सुध्दा शासनाने भविष्यात तातडीने करावे अशी माझी विनंती आहे.

महोदय, शासनाने एससी आणि एसटी या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँकांमार्फत शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला तो अत्यंत स्तुत्य आहे. परंतु ही शिष्यवृत्तीची रक्कम लवकर मिळाली पाहिजे. तसेच या मुलांना त्या त्या वर्षातच फीचा परतावा सुध्दा मिळाला पाहिजे. अन्यथा बऱ्याच वेळा असे घडते की, पदवी घेऊन मुले बाहेर पडतात तरी देखील त्यांना फीचा परतावा मिळत नाही ही खेदाची बाब मला नमूद करावीसी वाटते, याकडे शासनाने लक्ष घालावे. कारण हे मागासवर्गातील विद्यार्थी खिशातून पैसे घालूनन आपले शिक्षण पूर्ण करतात परंतु त्यांना फीचा परतावा लवकर मिळत नाही तो मिळण्याबाबतच्या सूचना संबंधितांना द्याव्यात अशी माझी मागणी आहे.

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .......

सच्चर समितीच्या शिफारशींनुसार अल्पसंख्यांकांच्या बाबतीत विविध विकास योजनांची अंमलबजावणी करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्या अनुषंगाने मुस्लीम समाजाचा विकास करावयाचा असेल पहिली गोष्ट म्हणजे संपूर्ण मुस्लीम वर्गातील मुलांना शिक्षणाच्या प्रक्रियेत आणले पाहिजे. कारण आजही मुस्लीम समाजातील मुले, ज्यांच्या हातात पाटी आणि पेन्सिल पाहिजे ती मुले छोट्या छोट्या दुकानांमध्ये काम करताना दिसतात. या समाजातील मुलांना संपूर्ण शैक्षणिक सवलती शासनाने दिल्या पाहिजेत. त्यांच्या उर्दु माध्यमाच्या ज्या शाळा आहेत त्यांना अनुदान दिले पाहिजे आणि उर्दु अंगणवाड्यांची निर्मिती सुध्दा केली पाहिजे.

तसेच शासनाने राज्यातील संपूर्ण शाळांना संगणक पुरविण्याची योजना घेतलेली आहे, ही अभिनंदनीय बाब आहे. कारण एकेकाळी बोलले जायचे की ज्याला लिहिता-वाचता येते तो साक्षर परंतु या नवीन व संगणकाच्या युगात मात्र ज्याला संगणक येतो तोच खरा साक्षर असे म्हटले जाते. अशा प्रकारे सर्व शाळांना संगणक देण्यासंबंधीचा जरी निर्णय घेतला असला तरी विना अनुदानित शाळांना संगणक खरेदी करण्यासाठी आमदार निधीतून मदत करता येत नाही. कारण शासनाच्या नियमानुसार अनुदानित शाळांनाच आमदार निधीतून संगणक देता येतो. हा निर्णय अजब प्रकारचा आहे. कारण ज्याला जेवायला मिळत नाही त्यालाच जेवण मिळाले पाहिजे. अनुदानित शाळांना शासनाकडून संगणक मिळतोच परंतु विना अनुदानित शाळांना मात्र अशा प्रकारचे बंधन घालणारा निर्णय शासनाने घेतला आहे त्यात बदल करावा. जेणेकरुन भविष्यात अशा शाळांना आमदार निधीतून संगणक पुरविता येतील अशी मी अपेक्षा करतो.

महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या बाबतीत "कायम विना अनुदानित" असा जो निर्णय होता त्यातील "कायम" हा शब्द काढून टाकला त्याबाबत मी त्यांचे अभिनंदन करतो. सन 2012 मध्ये अशा कायम विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याची शासनाने घोषणा सुध्दा केली ......

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

यासंदर्भात जी.आर. काढला परंतु आजपर्यंत मूल्यांकनाच्या कामाला सुरुवात झालेली नाही. मूल्यांकन करावे अशी मागणी सातत्याने शिक्षक आमदाराकंडून केली जात आहे. किमान मूल्यांकन जरी सुरु झाले तरी त्यांना अनुदान मिळणार याची खात्री त्या शाळेतील शिक्षकांना होईल. आज वेतनेतर अनुदान बंद आहेत. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय महामहिम राज्यपालांच्या अभिभाषणाचे समर्थन करण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. मराष्ट्र राज्याच्या निर्मितीचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असतांना नियोजन बध्द आराखडा सन 2015 पर्यंत तयार करण्यात आलेला आहे. या राज्याच्या विकासाची गती गतिमान करण्यासाठी नियोजन पध्दतीने सर्वंकष बाजूने विचार करुन या शासनाचे आगामी धोरण आखण्यात आलेले आहे. त्याबद्दल मी सर्वप्रथम माननीय राज्यपाल महोदयांचे मनापासून अभिनंदन करतो. या शासनाने सुरक्षा व्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे. महाराष्ट्र राज्य नव्हे, देश नव्हे तर संपूर्ण जगच आज आंतकवादाच्या आणि दहशतवादाच्या ज्वालामुखीवर बसलेले आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. त्यामुळे सुरक्षा व्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य देणे अतिशय महत्वाचे आहे. आतंकवादी घटना आणि दहशवादी घटना घडत असतात त्यांना आळा घालण्यासाठी शासनाने जी पावले उचलली आहेत व जो निर्धार शासनाने केलेला आहे त्यासाठी मी शासनाचे अभिनंदन करतो. आतंकवादाचा मुकाबला करण्यासाठी शासनाने पोलीस दलाचे अत्याधुनिक करण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यासाठी शासनाने 55 हजार पोलिसांच्या पदाच्या निर्मितीचा प्रस्ताव देखील तयार केलेला आहे. त्यामुळे या सगळया गोष्टी निश्चितपणे अभिनंदनीय आहेत. त्याच प्रमाणे नक्षलवादाच्या रुपाने आपल्या देशात अजून एक आतंकवाद निर्माण होऊ पहात आहे. नक्षलवादाचे स्वरुप सुध्दा दिवसेंदिवस उग्र होत चालले असल्यामुळे त्याला सुध्दा आळा घालण्याचा शासनाने निर्धार केलेला आहे. नक्षलग्रस्त जिल्हयामध्ये नवीन 2355 पदे निर्माण करण्यात आलेली आहेत त्याबद्दल मी शासनास धन्यवाद देतो. एक गोष्ट आपण निश्चितपणे लक्षात घेतली पाहिजे की, दहशतवादाचा आणि आतंकवादाचा मुकाबला हा केवळ शस्त्रास्त्राच्या माध्यमातून होऊ शकत नाही तर त्याच्या मुळाशी जाण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. दुर्दैवाने आपण बघतो की, समाजामध्ये अशा प्रकारचे प्रश्न निर्माण केले जात आहेत. आतंकवाद, दहशतवादाचे परकीय आक्रमण आपल्या देशावर झालेले आहे. असे परकीय आक्रमण आपल्या देशावर होत असतांना आपल्या देशामध्ये सामंजस्य, शांतता आणि धार्मिक सलोखा कसा राहील हे बघण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. विशेषत: ही राजकीय पक्षांची ही जबाबदारी आहे हे मला निश्चितपणे या ठिकाणी सांगितले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे .....

पाहिजे. आपण बघतो की, राजकीय स्वार्थासाठी अशा प्रकारचे प्रश्न निर्माण केले जातात. कधी भाषेचा मुद्दा निर्माण केला जातो तर कधी प्रांत वादाचा मुद्दा निर्माण केला जातो तर कधी धर्म आणि जातीचे मुद्दे निर्माण केले जातात. या मुद्यामुळे आपल्या देशात अशांतता निर्माण होत असते.

श्री. दिवाकर रावते : आपला मराठीच्या मुद्यावर विरोध आहे असे आपण जाहीर करावे.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, मराठीच्या मुद्यावर राजकारण करण्यास माझा विरोध आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, भाषेच्या मुद्यावरुन राजकारण करण्याला माझा विरोध आहे. भाषेच्या मुद्यावरुन राजकारण करुन समाजामध्ये अशांतता निर्माण करण्याला कोणत्याही भारतीय नागरिकाचा विरोधच असणार आहे आणि त्यामध्ये काही गैर आहे असे मला वाटत नाही. भाषेच्या मुद्यावरुन मारझोड करणे, एक प्रकारची दहशत निर्माण करण्यास माझा निश्चितपणे विरोधच आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला हे सांगावयाचे आहे की, या देशामध्ये जी सत्तांतरे झालेली आहेत ती आर्थिक मुद्यांवर झालेली आहेत. धार्मिक मुद्यांच्या बाबतीत लोकांच्या भावना कितीही भडकविल्या तरी सुध्दा या देशातील जनता इतकी सुज्ञ आहे की ती कोणत्याही प्रकारे या गोष्टीला बळी पडत नाही हे आतापर्यंत सिध्द झालेले आहे. म्हणून मला आपल्याला हे सांगावयाचे आहे की, राज्यकर्त्यांनी एक प्रकारची आचारसहिता निर्माण करण्याची गरज आहे. कारण आपण सर्वजण जबाबदार घटक आहोत आणि या देशात शांतता आणि सलोखा निर्माण करणे व तो राखून ठेवणे् ही आपली जबाबदारी आहे. या देशातील समाजामध्ये ज्या मुद्यामुळे फुट पडेल असे मुद्दे जर आपण उपस्थित केले नाहीत तर निश्चितपणे दहशतवाद आणि आतंकवादाला आळा घालण्यासाठी त्याची मोठी मदत होणार आहे असे मला अत्यंत नम्रपणाने येथे नमूद करावयाचे आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी सुरक्षा व्यवस्थेला प्राधान्य दिले आहे त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करीत आहे.

सभापती महोदय, त्याचबरोबर कृषी क्षेत्राबद्दल जी धोरणे आखलेली आहेत वा जी आखली जात आहेत त्याबद्दल मला माननीय राज्यपालांचे अभिनंदन करावयाचे आहे. राज्य शासनाने कृषी क्षेत्राच्या बाबतीत पुढील पाच वर्षाचा जो आराखडा तयार केलेला आहे तो अत्यंत महत्वाचा आणि क्रांतिकारक आहे. राज्य सरकारने शेततळी निर्माण करण्याचा कार्यक्रम तयार केलेला आहे.सिंचन क्षेत्राच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे गेल्या काही वर्षामध्ये मोठी धरणे बांधूनसुध्दा सिंचन क्षेत्रात लक्षणीयरीत्या वाढ होऊ शकलेली नाही.परंतु सिंचनासाठी जर आपण पाणलोटाचा उपक्रम प्रभावीपणे राबविला, शेततळी निर्माण करण्याचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला तर मोठयाप्रमाणावर सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे.

सभापती महोदय, जवळजवळ 37 हजार शेततळी निर्माण करण्यासंबंधीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आलेला आहे. परंतु हयासाठी करण्यात आलेली तरतूद अत्यंत तुटपुंजी आहे तेव्हा मोठया प्रमाणावर शें्ततळी निर्माण करण्यासाठी भरीव तरतूद करण्यात यावी असे मला सुचवावयाचे आहे. विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत किंवा अन्य ठिकाणाचा शेतकरी अडचणीत आलेला आहे तेव्हा त्याच्या शेतीला पाणी दिले तर त्या
शेतक-याला आत्महत्या करण्यापासून रोखण्याचा किंवा त्याची अडचण दूर करण्याचा तो एक





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर.तांबे...

प्रभावी मार्ग राहील असे मला वाटते. म्हणून शेततळी, पाणलोट क्षेत्र, लघु पाटबंधारे इत्यादी सिंचन क्षेत्र वाढविण्याच्या ज्या योजना आहेत त्याकडे शासन जेवढे जास्त लक्ष देईल आणि जितके जास्त चांगल्या पध्दतीने शेतीला पाणी उपलब्ध करुन देण्यात येईल तेवढया प्रमाणात शेतीतील अडचणी दूर होतील तेव्हा त्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावा असे मला या निमित्ताने सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमत्ताने मला हे सांगावयाचे आहे की,पाण्याच्या व्यवस्थापनाकडे शासनाने अधिक लक्ष दिले पाहिजे पाण्याच्या वापरासंबधी कायदा तयार केला पाहिजे आणि पाण्याचा थेंबन थेंब वाचविला पाहिजे आज आपल्याकडे जेवढे पाणी उपलब्ध आहे ते पाणी कमी आहे असे मी मानत नाही परतु त्या पाण्याचा वापर करीत असतांना चांगल्या प्रकारचे नियोजन केले आणि ड्रीप इरिगेशन किंवा इरिगेशनच्या ज्या अत्याधुनिक सिस्टीम्स आलेल्या आहेत त्याचा चांगल्या प्रकारे वापर कसा होईल हे पाहिले पाहिजे इतकेच नव्हे तर या सिस्टीम्स शेतक-याना स्वस्त दरात कसे उपलब्ध करुन देता येतील याबाबातीत शासनाने जर काही धोरण आखले तर अधिक बरे होईल. या बाबतीत मी आपल्याला एक उदाहरण देतो. सहकारक्षेत्रा च्या माध्यमातून इरिगेशन सिस्टिम्स निर्माण केल्यातर त्या सिस्टीम्स शेतक-यांना निश्चितपणे परवडू शकतील आणि मोठया प्रमाणावर ड्रीप सारख्या किंवा अन्य अत्याधुनिक इरिगेशनच्या सिस्टीम्सकडे शेतकरी आकृष्ट होतील.

सभापती महोदय, या योजनांसाठी शासनाकडून शेतकऱ्यांना जे अनुदान दिले जाते ते कमी आहे.काही वर्षापूर्वी 50 टक्के अनुदान देण्याचे ठरविण्यात आले होते. त्यावेळी सिंचन संचाची किमत कमी होती आता या सिंचन संचाची किंमत वाढलेली आहे परंतु अनुदानाची किंमत मात्र पूर्वीचीच गृहित धरण्यात आलेली असल्यामुळे ती पुरेशी नाही .तेव्हा ड्रीप इरिगेशन वा अन्य नवीन सिंचन सिस्टीम्ससाठी शेतक-यांना देण्यात येणा-या अनुदानात शासनाने वाढ करावी आणि त्यासाठी प्रोत्साहन द्यावे असे मला सुचवावयाचे आहे..

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे रोजगार हमी योजनेमध्ये सुध्दा शासनाने अनेक क्रांतिकारक निर्णय घेतलेले आहेत. रोजगार हमी योजनेवर काम करणा-या मजुरांना 66 रुपये मजुरी देण्यात येत होती त्यात वाढ करुन आता 100 रुपये मजुरी करण्यात आलेली आहे.त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, राज्य श्ंासनाने आतापर्यत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ D/ प्रथम श्री.जुन्नरे 17.20

डॉ.सुधीर.तांबे...

रोजगार हमी योजना, माहितीचा अधिकार या सारखे अनेक पथदर्शक उपक्रम संपूर्ण देशाला दिले आहे त्याबद्दल मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो. रोजगार हमी योजना आणि माहितीच्या अधिकाराचे अनुकरण सपूर्ण देशाने केले आहे. या निमित्ताने मला राज्य सरकारला एक विनंती करावीशी वाटते की,अशा प्रकारची रोजगार हमी योजना राबवत असतांना राज्यातील जे सुशिक्षित बेरोजगार आहेत, जे पदवीधर बेरोजगार आहेत त्यांना सुध्दा काम उपलब्ध करुन देण्यासाठी योजना राबविण्यात यावी म्हणजे त्या योजनेच्या माध्यमातून या सुशिक्षित बेरोजगारांना काम देता येईल. बेरोजगाराची प्रश्न हा अत्यंत महत्वाचा असून.राज्य शासनाने जो आराखडा तयार केलेला आहे त्यामध्ये सुशिक्षित बेरोजगारांना कमी महत्व दिलेले आहे वा कमी माहिती देण्यात आलेली आहे. माझ्या माहिती प्रमाणे राज्यामध्ये जवळजवळ 90 हजार सुशिक्षित बेरोजगार युवक आहेत त्यांच्यासाठी निश्चित असे धोरण आखण्याची गरज आहे.

नतर श्री.सरफरे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे....

एखादे महामंडळ निर्माण करावयाचे म्हटले तर त्यामधून वेगळा प्रश्न निर्माण होईल. आणि म्हणून याकरिता एक स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली पाहिजे. या शहरातील परप्रांतियांच्या लोंढयाबाबत आपण नेहमी चिंता व्यक्त करतो. परंतु या राज्यातील युवकांमध्ये अशाप्रकारचे कौशल्य आपल्याला शासनाच्या माध्यमातून देता आले तर त्यामधून निश्चितपणे हा तरुण वर्ग स्वयंरोजगार करील. याबाबत उदाहरण द्यावयाचे झाले तर यु.पी.एस.सी. च्या परीक्षेमध्ये गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील युवक चांगल्या प्रकारचे यश मिळवीत आहेत. तसेच, रेल्वे बोर्डाची परीक्षा असेल, वेगवेगळया प्रकारच्या परीक्षा असतील त्यांच्याकरिता महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून प्रत्येक जिल्हयामध्ये तरुणांना प्रशिक्षण देणारी, मार्गदर्शन करणारी केंद्रे निर्माण करता आली तर मोठया प्रमाणात महाराष्ट्रीयन तरुण मुले त्या सेवेमध्ये जातील. त्यासाठी शासनाने उपाय योजना करावी अशाप्रकारची विनंती मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, इगतपूरी व नंदूरबार या आदिवासी क्षेत्रामध्ये शासनाने क्रीडा संकुल व क्रीडा ॲकॅडमी निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. क्रीडा क्षेत्रामध्ये आदिवासी युवकांना प्राधान्य देण्याचे धोरण शासनाने स्वीकारल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. शासनाने शिक्षण क्षेत्रामध्ये सुध्दा खूप चांगले काम केले आहे. या सभागृहामध्ये शिक्षण क्षेत्रावर अनेक वेळा टीका केली जाते. मध्यंतरी देश पातळीवर प्रसिध्द झालेल्या अहवालानुसार केरळ राज्यानंतर चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळणारे महाराष्ट्रातील 9 जिल्हे आहेत हे आपण मान्य केले पाहिजे. सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये अनेक अडचणी येत आहेत. कायम विना अनुदानित तत्वावरील शाळांमधील "कायम" हा शब्द हटविण्यात आला असला तरी 10 वीपर्यंतच्या शाळांच्या बाबतीत तो हटविण्यात आला नाही. नुकतेच केंद्र सरकारने शिक्षणासंबंधीचे एक विधेयक पारित केले. तशाप्रकारचे विधेयक राज्य सरकारने भविष्य काळामध्ये आणावे. या निमित्ताने मला एक सूचना करावयाची आहे की, शिक्षणाचे वय 6 ते 14 पर्यंत ठरविण्यात आले आहे. त्यामध्ये बदल करुन 6 ते 18 पर्यंत शिक्षणाचे वय ठरविण्यात येऊन वयाच्या 18 वर्षापर्यंत सर्वांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले गेले पाहिजे. त्याकरिता इयत्ता 11 वी आणि 12 वी पर्यंतच्या शाळा विना अनुदानित केल्या पाहिजेत अशाप्रकारची विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

डॉ. सुधीर तांबे....

सभापती महोदय, शिक्षण सेवकाच्या बाबतीत सुध्दा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. गेली दहा वर्षे शिक्षण सेवकांना फार कमी वेतनावर काम करावे लागत आहे. 3, 4 आणि 5 हजार रुपये अशाप्रकारच्या वेतनावर ते काम करीत आहेत. त्यांच्या वेतनामध्ये वाढ करण्यासंबंधी मध्यंतरी घोषणा झाली होती. त्याची दखल घेऊन हे शासन ताबडतोबीने पावले उचलेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. शासनाने घरबांधणीचा धडक कार्यक्रम हाती घेतला आहे. राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची परंपरा चालवित असल्याचे आपण नेहमी सांगून या राज्यातील दलित, आदिवासींकरिता अनेक चांगल्या योजना राबवीत आहोत. शिक्षण क्षेत्रामध्ये कोणतेही व्यावसायिक, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शिक्षण घेण्यासाठी आपण 1700 कोटींची शिष्यवृत्तीची योजना राबवीत असून त्यामधून आदिवासी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची पूर्णपणे फी माफ करुन आणि ओ.बी.सी. विद्यार्थ्यांची 50 टक्के फी माफ करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. एवढेच नव्हेतर परदेशामध्ये शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या दलित, आदिवासी युवकांना मदत करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो

सभापती महोदय, नागरी विभागामध्ये पंडित जवाहरलाल नेहरुंच्या नावाने शहर पुनर्निमाण योजनेच्या धर्तीवर नगरोत्थान अभियान महाराष्ट्रामध्ये सुरु करण्यात आले आहे. त्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. आज आपण शहरावर हजारो कोटी रुपये खर्च करुन सुध्दा येथील सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था नीट नाही. मुंबई असो किंवा पुणे शहर असो येथील सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था पाहिली तर अत्यंत वाईट परिस्थिती आहे. याकरिता केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून नगरोत्थान अभियान योजना मोठया प्रमाणात राबविली पाहिजे. या योजनेमधून पिण्याचे पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापन या दोन गोष्टींवर आपण खर्च केला तर भविष्य काळात आपल्याला अडचण येणार नाही, सर्व काही सुरळीत होईल.

सभापती महोदय, पर्यावरणासंबंधी शेवटचा मुद्दा सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. आज वाळूच्या उपशयामध्ये प्रचंड गैरव्यवहार, भ्रष्टाचार संपूर्ण राज्यामध्ये सुरु आहे. त्याबाबत आपणाकडे काही उत्तर आहे की नाही हा खरा प्रश्न आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:30

डॉ.सुधीर तांबे . . . .

मला असे वाटते की, भंडारदरा धरण हे 100 वर्षापूर्वी बांधण्यात आले होते. तेव्हा क्रश सॅण्डचा वापर करण्यात आला होता. आजही ते धरण उत्तम स्थितीमध्ये आहे. अशा प्रकारे क्रश सॅण्डचा वापर करुन प्रकल्प उभे करण्यात आले आणि नदीतील वाळूचा उपसा करण्याचे प्रमाण कमी करण्यात आले तरी देखील त्याचा उपयोग होऊ शकतो. आज नदीच्या पाण्यातील वाळू काढल्यामुळे पर्यावरणाचा समतोल देखील बिघडत आहे. त्यामुळे याबाबतीत विचार करावयास पाहिजे. मी या ठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे समर्थन करतो आणि आपण मला भाषण करण्याची संधी दिली, त्याबद्दल आभार मानतो. धन्यवाद.

----

. . . .4 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 22-03-2010 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 05 वाजून 31 मिनिटांनी, सोमवार,दिनांक 22-03-2010 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही